# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर



## चरित्र खंड दहावा



श्री. चां. भ. खैरमोडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

## चरित्र ग्रंथ

### खंड १०

लेखक :

**चां. भ. खैरमोडे**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.**

प्रथमावृत्ती - ऑक्टोबर, १९८९

प्रकाशक - सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रसान भवन
मुंबई ४०० ०३२.

© प्रकाशकाधीन

मुद्रक - आरेम प्रिन्टर्स, ५ युनिव्हर्सल इंडस्ट्रीयल इस्टेट,
जे. पी. रोड, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५८.

किंमत ३०/- रुपये

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वाङ्‌मयीन कार्यक्रमांतर्गत मंडळाने आजवर अनेक ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यात चरित्रे, आत्मचरित्रे यांच्यासह समग्र वाङ्‌य, स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास, वगैरे विषयांवरील पुस्तकांचा समावेश आहे.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र श्री. चां. भ. खैरमोडे यांनी एकूण १५ खंडात लिहिले आहे. या १५ खंडांपैकी तीन, चार व पांच या खंडांच्या प्रकाशनार्थ मंडळाने भरघोस अनुदान देऊन सदर खंड वाचकांपुढे आणण्यास हातभार लावला आहे. त्यानंतर चां. भ. खैरमोडे यांचे निधन झाल्यामुळे या खंडांच्या प्रकाशनाचे काम जवळ जवळ १० वर्षे रखडले. श्री. खैरमोडे यांच्यानंतर त्यांच्या सर्व साहित्याची जुळवाजुळव करून श्रीमती द्वारकाबाई खैरमोडे यांनी हा विषय पुन्हा मंडळाकडे पाठविल्यावर मंडळाने ६ ते १५ चे प्रकाशन मंडळाच्या वतीने करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार मंडळाच्या वतीने या ग्रंथाच्या खंड ६/७, ८ व ९ चे प्रकाशन करण्यात आले आहे.

प्रस्तुत डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र ग्रंथ खंड १० मध्ये स्वातंत्र्यानंतर म्हणजे ऑगस्ट, १९४७ पासून १९५२ पर्यंत म्हणजे पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंतच्या कालावधीतील डॉ. आंबेडकरांच्या घटना समिती, हिंदु कोड बील, मंत्रीपदाचा राजिनामा, इत्यादी बाबतचा इतिहास कै. खैरमोडे आणि यांनी वाचकांपुढे ठेवला आहे.

या ग्रंथाच्या मागील खंडांप्रमाणे या खंडाचेही अभ्यासक व वाचक स्वागत करतील अशी खात्री आहे.

**यशवंत मनोहर**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई,
दिनांक २१ ऑक्टोबर, १९८९

# अर्पण पत्रिका

१८६८–१९५१



## राजे श्री. भवानराव पंत प्रतिनिधी
## संस्थान औंध

यांच्या चरणी हे पुष्प नम्रभावे अर्पण.

— चांगदेव

# अनुक्रमणिका

प्रस्तावना

प्रा. न. र. फाटक यांचे चरित्रकाराचा गौरव करणारे पत्र १

प्रकरण १ ले : स्वातंत्र्यानंतर [ राष्ट्रीय झेंडा ] १

,, २ रे : ,, निर्वासितांचा प्रश्न २५

,, ३ रे : संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ६५

,, ४ थे : हिंदु कोड बिल ६९

,, ५ वे : मंत्रिपदाचा राजिनामा व निवेदन ८३

,, ६ वे : राजिनामा प्रतिक्रिया १२७

,, ७ वे : निवडणुकीचे सुतोवाच १४९

,, ८ वे : ,, [ चालू ] १८१

,, ९ वे : निवडणुकीचा प्रचार २५७

,, १० वे : ,, [ चालू ] २९५

,, ११ वे : अपयशाची चिकित्सा ३२१

संदर्भ सूची

# खंड दहावा

## संदर्भ सूची

*English*

1) Dr. Ambedkar B. R. ... 1) Who were the Shudras.
   2) Statement in Parliament, in explanation of his resignation from the Cabinet.
2) Bletoher Michael ...... Nehru : A Political Biography 1951.
3) Duncan M. Derrett ..... The Hindu Law. The past and present (1957)
4) Lady Hartag ........... India New Patern.
5) James A. Michaner .... The voice of Asia.

## रिपोर्टस् व नियतकालिके

1) Times of India.
2) Illustrated Weekly.
3) New York Herald Tribune.
4) Election Manifesto of S.C. Federation — P.N. Rajbhoj (1951).
5) Evening News.
6) Free Press Bulletin.
7) The Parliamentary Debates Vol. 15, Part 2, August, September 1951.
8) The Parliamentary Debates Vol. 16, Part 2, September, October 1951
9) Manchester Guardian.

**मराठी**

१] एकनाथ दर्शन खंड १ ला - चिटणीस – पोहोनेकर १९५२
२] जनता ३] नवशक्ती
४] विविधवृत्त ५] सकाळ
६] लोकसत्ता

# प्रस्तावना

सहाव्या खंडापर्यंतच्या प्रस्तावना चरित्रकार श्री. चां भ. खैरमोडे होत्या. त्यानंतरच्या खंडाच्या प्रस्तावना लिहिण्याची कामगिरी संपादक या नात्याने मला करावी लागत आहे. साऱ्या चरित्र खंडाचे जवळ जवळ पाच हजार पृष्ठांचे लेखन, लेखकाच्या हयातीपर्यंत म्हणजे १८ नोव्हेंबर १९७१ पर्यंत बारा खंडात विभागण्याची योजना केलेली होती. कालक्रमानुसार चरित्राची जुळणी केलेली होती सततच्या वाचनाने अनेक उतारे समाविष्ट करण्याच्या आदेश व खाणा-खुणांनी योग्य मार्गदर्शन केलेले होते. एवढे सारे असतांनाही आणि स्वतः दोन पदव्या ग्रहण केलेल्या असतांना सुद्धा हे काम अंगावर घेण्याला मन कच खात होते.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी स्वतःहून हे प्रकाशनाचे काम करण्याचे आश्वासन दिले. प्रा. श्रीमती नलीनी पंडित यांच्या मदतीने गहाळ झालेला ६ वा खंडाचा शोध घेतला. शेवटी मूळ लेखनावरून ६ वा खंड प्रकाशित करावा लागला. त्याआधी घटना समितीच्या कार्याच्या काल खंडाचा इतिहास आलेला ८ वा खंड प्रसिद्ध झाला. त्यानंतर ६ व ७ वा एकत्र छापले. नंतर ९ व्या खंडात स्वातंत्र्याच्या पूर्व पिठीकेचा म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या घडामोडीत बाबासाहेबांचा वाटा काय होता याचा इतिहास आलेला आहे.

आता हा १० वा खंड प्रसिद्ध होत आहे. तो १९४८ ते १९५२ चा कालखंड आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. ज्या मतदार संघातून बाबासाहेब घटना समितीवर निवडून आले होते, तो आता पाकिस्तानात समाविष्ट झाला. घटना समितीवर काम करायचे म्हणजे बाबासाहेबांना भारताच्या मतदार संघातून समितीवर जायला हवे होते. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस श्रेष्ठींना बाबासाहेबांच्या विद्वत्तेचा व चातुर्याचा उपयोग करून घेण्याची सुबुद्धी सुचली आणि त्यांना मुंबई इलाख्यातून काँग्रेसने निवडून दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री झाले, आणि घटनेच्या कार्याला सुरुवात झाली. भारताच्या लोकशाहीला पायाभूत असणारी घटना शक्यतो तेथील परिस्थितीला अनुरुप व निर्दोष व्हावी म्हणून बाबासाहेबांनी आपल्या विद्वत्तेचा, चातुर्याचा व चिकाटीचा पुरेपूर उपयोग केला. त्यांच्या अभ्यासू वृत्तीचा आणि प्रत्येक विषयाकडे मुद्देसूद व गंभीरपणे पहाण्याचा दृष्टीकोनही सर्वांच्या लक्षात आला.

या त्यांच्या वृत्तीचा महाराष्ट्रातील काँग्रेसेत्तर पुढाऱ्यांनीही उपयोग करुन घेण्याचे ठरविले. रा. ब. बोले, अ. ह. गद्रे हे हिंदुमहासभेचे आणि मराठी मंदिरचे गावडे वगैरे लोकांनी बाबासाहेबांच्या घरी एकत्रित येऊन "राष्ट्रीय झेंडा" भगवा असावा असे लोकसभेत मांडण्याची त्यांना गळ घातली. बाबा साहेबांना महाराष्ट्रबद्दल रास्त अभिमान होता. आणि वारकरी पंथाचा व महाराष्ट्र राज्याचे प्रतीक असलेला श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या भगव्या झेंड्याचाही अभिमान होता. बाबासाहेबांनी "तुम्हां सर्वांची तशी इच्छा असेल व पाठिंबा असेल तर एक भगवा झेंडा तयार करुन दिल्लीला घेऊन या, मी लोकसभेपुढे तसे मांडतो." असे आश्वासन दिले. बाबासाहेबांची झेंडा कमिटीवर नेमणूक झाली होती, परंतु भगवा साधा की स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कृत कृपाण कुंडलींनी युक्त, स्वस्तिक चिन्हांकित भगवा झेंडा, या महाराष्ट्रातील पक्ष पुढाऱ्यांच्या आपापसातील मतभेदामुळे, ठरल्याप्रमाणे हिंदु महासभेचे अध्यक्ष श्री. भोपटकर दिल्लीला बाबासाहेबांपर्यंत पोहोचले नाहीत आणि काँग्रेसच्या चरखा युक्त तिरंगा ऐवजी अशोकचक्रांकित तिरंगा, भारताचा राष्ट्र ध्वज ठरला.

फाळणीनंतर निर्वासितांच्या प्रश्नाने फारच उग्र स्वरुप धारण केले. या कामी महार–रेजिमेंटची कामगिरी किती उल्लेखनीय आहे हे मागील खंडात ( ९ वा खंड ) आलेच आहे. स्वच्छतेची कामे करणाऱ्या खालच्या जातीतील हिंदु लोकांना पाकिस्तानातून तेथील सरकार बाहेर जाऊ देत नव्हते. जे कोणी निसटले, त्यांना निर्वासितांच्या छावण्यांतून घेतले जात नव्हते. ते अक्षरशः अन्नपाण्यावाचून आकाशाचे पांघरुण आणि धरतीची शेज करुन दिवस कंठीत होते. त्यातील काही लोकांनी आपले गाऱ्हाणे बाबासाहेबांना कळविले. बाबासाहेबांचे मन या स्थितीने विदीर्ण झालेले होते. हे असे होणार, हे त्यांनी आधीच भाकीत केलेले होते. बाबासाहेबांनी पंतप्रधान पंडित नेहरुंना या अस्पृश्य गरीब, निराधार, निर्वासितांच्या व्यवस्थेसंबंधी पत्रे लिहिली. पण कोणीही त्यांची दखल घेतली नाही. जीना, लियाकत अलींनाही तारा केल्या, पण त्यांनीही दखल घेतली नाही.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या जाहिरनाम्याप्रमाणे लागलीच भाषावार प्रांत रचना व्हायला पाहिजे होती. परंतु प्रत्येक प्रांताच्या, सर्व दृष्टीने सखोल अभ्यासाच्या अभावामुळे भाषिक प्रांत करण्याचे मागे पडू लागले. आंध्रप्रदेशाच्या जनतेने मोठे आंदोलन उभे केले. जुने गांधीवादी कार्यकर्ते श्री. पोट्टू रामलू यांनी प्राणांतिक उपोषण केले. मग पुढे आंध्रप्रदेश निर्माण झाला. दुसऱ्या प्रांतानीही आपली बाजू मांडली. त्यापैकी महाराष्ट्रानेही या प्रश्नावर उग्र रुप धारण केले. काँग्रेसमधील महाराष्ट्राचे अध्वर्यू दे. भ. शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, यशवंतराव चव्हाण या लोकांनीही महाराष्ट्र निर्मितीचा तगादा लावला.

महाराष्ट्रातील मुंबई हे शहर भारताचे पहिल्या क्रमांकाचे बंदर. त्यांत भारतातील सर्व भाषिक समावलेले आहेत. तर गुजराथी भाषिकांचा, उद्योगपती व व्यापारी म्हणून मोठा भरणा आहे. गुजराथ्यांना मुंबई महाराष्ट्रात जायला नको होती. म्हणून मुंबईचे स्वतंत्र केंद्रशासित राज्य व्हावे अशी त्यांची मागणी होती. मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व त्यावेळचे मुंबईचे अनमिषिक्त राजे समजले जाणारे श्री. स. का. पाटील व मोरारजी देसाई हे काँग्रेस श्रेष्ठी, गुजराथी - उद्योगपतींच्या बाजूचे होते. या प्रश्नावर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये दोन गट पडले. त्यातील एक गट काँग्रेस बाहेर पडला तर दुसरा सबुरीने घेण्याचे बोलू लागला. प्रथम गुजरात व महाराष्ट्र मिळून द्विभाषिक राज्याची निर्मिती केली गेली. या गोष्टीचा महाराष्ट्रीय स्वाभिमानी व्यक्तींना व पुढाऱ्यांना फार राग आला. त्यांनी महाराष्ट्रातील सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांची संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी एक समिती निवडली. त्या समितीचे अध्यक्ष होते. श्री. केशवराव जेधे आणि सचिव होते एस. एम. जोशी, आचार्य प्र. के. अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, कॉ. डांगे, डॉ. नरवणे, शंकरराव देव, सेनापती बापट इत्यादी लोकांच्या सहकार्याने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने उग्र स्वरुप धारण केले. त्यावेळच्या काँग्रेस सरकारने गोळीबार केला. श्री. चिंतामणराव देशमुखांनी आपल्या मंत्रिपदाचा राजिनामा दिला. डॉ. बाबासाहेबांनी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंना मुंबईसह महाराष्ट्र राज्य झाले पाहिजे अशी तार केली. त्यानंतर पुढे १९५७ साली ज्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसचा धुव्वा उडाला. तेव्हा वेगळ्या महाराष्ट्र राज्याची मागणी मान्य करणे राज्यकर्त्यांना भाग पडले.

या विषयाचा सखोल अभ्यास करून बाबासाहेबांनी भाषावार प्रांतरचना हा इंग्रज प्रबंध लिहून पुस्तक रुपाने प्रसिद्ध केला. त्यांत त्यांनी आपली बदलेली मते मांडून महाराष्ट्राचे चार भाग [ राज्ये ] करण्याचे सुचविले आहे, एवढेच नव्हे तर भारताची राजधानीही दोन ठिकाणी असावी; अशीही सूचना केली आहे.

डॉ. बाबासाहेबांनी जगातील सर्व प्रगत राष्ट्रांच्या घटनांचा अभ्यास करून भारताची राज्यघटना बनविली. त्या घटनेप्रमाणे २६ जानेवारी १९५० ला

भारत, प्रजासत्ताक राष्ट्र बनले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या त्रयींवर आधारलेले लोकशाही राज्य म्हणून भारत हे राष्ट्र जगाच्या पाठीवर उभे राहिले.

स्वातंत्र्य या शब्दात अभिप्रेत असलेला अर्थ भारतातील आम जनतेला लागू शकत नव्हता कारण राजकीय स्वातंत्र्य मिळाले तरी धार्मिक बंधनामुळे आर्थिक स्वातंत्र्य उपभोगता येण्यासारखे नव्हते. तीच गत समतेची! जाती व स्त्री-पुरुष भेदामुळे समान संधीला काही अर्थही नव्हता. म्हणून बाबासाहेबांनी, घटना समितीच्या उद्घाटनच्यावेळी पंडित नेहरुंनी केलेल्या भाषणाचे स्वागत करून वरील त्रुटी दाखवून दिल्या होत्या. त्या त्रुटी घालविण्यासाठी हिंदु-कोड बिल शक्य तितक्या लवकर पास करून घेण्याची तळमळ पंडित नेहरुंनी दाखविली. डॉ. आंबेडकरांनी कायदेमंत्री म्हणून हे आपल्या कार्याचे उद्दिष्ट असलेले काम अतिशय मेहनत घेऊन पूर्ण केले. या दिवसात डॉ. बाबासाहेबांची प्रकृतीही बरी रहात नव्हती. पण आपल्या हातून हे महत्वपूर्ण काम झाले पाहिजे ही त्यांची जिद्द होती.

पाकिस्तानच्या निर्मितीनंतर, शेष भारतामध्ये बहुसंख्य लोकवस्ती हिंदूंची होती. बौद्ध, जैन, शीख, हेही पंथ हिंदूमध्येच सामावले होते. त्यामुळे हिंदु कोड बिल पास करून ज्या मूळ संहितेत वीस टक्के [ आधुनिक युगाला अनुरुप ] अशा त्रुटी होत्या त्या काढून टाकणे, विकासाच्या दृष्टीने प्राप्त होते. समान हक्क प्राप्त करून देणे हे या त्रुटी भरुन काढण्याने साध्य होणार होते. परंतु पंडित नेहरुंच्या मंत्रिमंडळातील सभासद व घटना समितीचे अध्यक्ष बाबू राजेंद्र प्रसादासारखे काँग्रेसचे श्रेष्ठीही विरोध करू लागले. बाबासाहेबांसारख्या हिंदुधर्माने बहिष्कृत ठरविलेल्या जातीच्या व्यक्तीकडून बिल मांडले जात आहे. अशी भूमिका घेऊन सनातन्यांनी त्याला विरोध केला. धर्मसंहितेत ढवळढवळ करण्यासाठी बील आणणे प्रतिष्ठितांना नको होते. पुढच्या निवडणुकीवर परिणाम होईल म्हणूनही काही काँग्रेसवाल्यांना ते बील नको होते. अशा तीन प्रमुख कारणांनी पंडित नेहरुनी ते बिल लोकसभेपुढे त्यावेळी तरी न आणण्याचे ठरविले. आणि अशा रीतीने पहिल्या क्रमांकाने पास करवून घेण्याचे आश्वासन दिलेल्या बिलाची वासलात लागली. बाबासाहेबांची सारी मेहनत फुकट गेली. घटनेत, विकासासाठी ज्या काही गोष्टींची तरतूद करता आली नाही, त्यांची हिंदुकोड बिलात तरतूद करून राष्ट्राची एकात्मता साधण्याची बाबासाहेबांची मनिषा होती. स्वतःची प्रकृती बरी नसतांनाही या बिलासाठी त्यांनी अतोनात मेहनत घेतली होती. आपले हे स्वप्न भंग पावलेले दिसून येताच त्यांनी मंत्रिपदाचा राजिनामा देण्याची तयारी केली. पंडित नेहरुना त्यानी पत्राने तसे कळविले. नेहरुनी त्यांच्याकडून राजिनाम्याच्या निवेदनाची प्रत मागून घेतली.

दुसरे दिवशी सभापती श्री. अय्यंगार यांनी बाबासाहेबांना त्या वेळी राजिनाम्याचे निवेदन करण्याची परवानगी नाकारली व निवेदनाची प्रत मागितली. या अपमानास्पद वागणूकीमुळे बाबासाहेब रागाने संसदेच्या बाहेर पडले. सर्वच

अवाक झाले. सगळ्यांना हादरा बसला. बाबासाहेबांच्या विद्वत्तेचा, निर्भिडपणाचा, व इतर अनेक गुणांचा भारताच्या उन्नतीला आणखीही उपयोग झाला असता, त्याला आता मुकावे लागणार म्हणून जाणकार लोक नंतर हळहळले. परंतु त्या क्षणी सर्व सभा स्तब्ध झाली. कोणाच्या तोंडून एक शब्दही उच्चारला गेला नाही की हस्तांदोलन करण्यासाठी कोणी जागचे उठून हात पुढे केला नाही. सभापतीनी या महान विद्वान नेत्याचा घोर अवमान केला !

बाहेर येताच वृत्तपत्र प्रतिनिधींना आपल्या निवेदनाच्या प्रती बाबासाहेबांनी दिल्या. आपल्या निवेदनांत त्यांनी पुढील गोष्टी प्रामुख्याने मांडल्या होत्या. १) हिंदु कोडबिल लवकर पास करून घेण्याचे आश्वासन देऊन व आता ते मागे सारून विश्वासघात केला. २) इतर कामे करण्याची इच्छा प्रकट करूनही इतर खाती दिली नाहीत. ३) काँग्रेसचे परराष्ट्रीय धोरण पसंत नाही.

पंडित नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल बोलतांना त्यांनी काश्मिरच्या फाळणी-बद्दल आपले मत निर्भिडपणे प्रकट केले होते. बाबासाहेबांच्या मते, आपण द्विराष्ट्र स्विकारले आहे. मुस्लिम बहुसंख्य असलेला प्रदेश पाकिस्तानला देऊन जम्मु व लडाख हा बौद्ध धर्मियांचा प्रदेश वाचवावा व आपल्या, सैन्यावर होणाऱ्या खर्चात बचत करावी या प्रकारचा त्यांचा तर्कशुद्ध विचार होता. जर सार्वमताने काश्मिरचा प्रश्न सोडवायचा ठरविले, आणि जर बहुमत पाकिस्तानच्या बाजूचे झाले तर लडाख व जम्मूच्या बोद्ध लोकांचे काय होईल हा त्यांचा विचार बाबासाहेबांच्या Thoughts on Pakistan या पुस्तकाप्रमाणेच सत्ताधाऱ्यांना मानवणारा नव्हता. परंतु लोकांना आवडत नाही म्हणून योग्य ते निर्भिडपणे बोलण्याचे सोडून देणारे बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व नव्हते.

पुढे लवकरच ( १९५२ ) निवडणुका येणार होत्या. बाबासाहेबांनी शेड्युल्ड कास्टस फेडरेशनचा निवडणूक जाहीरनामा ता. ७–१०–१९५१ ला प्रसिद्ध केला या जाहिरनाम्यावरून बाबासाहेबांची राजकीय विचारसरणी १९३६ ते १९५१ पर्यंत कशी बदलत गेली व अस्पृश्यांच्या हिताच्या दृष्टीने कशी विशाल बनत गेली हे दिसून येते. त्या जाहीरनाम्यातील मुख्य कलमे येणे प्रमाणे :—

१) समतेचा पुरस्कार.
२) स्वतःचा उत्कर्ष करण्याचे स्वातंत्र्य.
३) धार्मिक, आर्थिक व राजकीय मतप्रदर्शन करण्याचा हक्क परंतु देशाच्या हितसंरक्षणार्थ मर्यादित.
४) समान संधीसाठी विशेष सवलती.
५) भीतीपासून संरक्षणासाठी सरकारला जागृत ठेवणे.
६) स्वातंत्र्य, समता व बंधुभाव याचा फेडरेशनतर्फे संपूर्ण पुरस्कार.
७) लोकशाही प्रामाणिकपणे पुरस्कृत करणाऱ्या श्रेष्ठ राज्य घटनेस फेडरेशनचा पाठिंबा राहील.

या, शे. का. फे. च्या जाहीरनाम्याला अनुसरुन समाजवादी पुढे आले. साथी अशोक मेहतांनी बाबासाहेबांशी करार केला. अशोक मेहता व बाबासाहेब यांना विरोध करणारे कॉंग्रेस, साम्यवादी व इतर लोकही होते. बाबासाहेब पहिल्या क्रमांकाने निवडून येतील म्हणून मते कुजविण्याची खेळी खेळली गेली. अशा रितीने शे. का. फे. चा समाजवाद्यांनी विश्वासघात केल्याचा वर्तमानपत्रांनी सूर उमटविला.

काही जागांसाठी शे. कामगरी पक्षाशीही शे. का. फे. चा करार झाला. शे. का. पक्षाच्या जेधे–मोरे यांना वाटत होते की शे. का. फे. ची व शे. का. पक्ष या दोघांचीही निष्ठा महात्मा फुल्यांच्यावर आहे. दोन्ही समाज वरच्या वर्गाकडून नाडवले गेले आहेत. म्हणून ही युती होणे योग्य व आवश्यक आहे.

परंतु आधीच समाजवादी पक्षाशी युती झालेली होती म्हणून युतीच्या वेळी ज्या जागी उमेदवार ठरलेले होते, त्या सोडून दुसऱ्या जागांसाठी उभे राहिलेल्या शे. का. फे. च्या व शे. का. च्या उमेदवारांना एकमेकांनी पाठिंबा द्यायचा ठरविले.

देशांच्या सर्व निवडणुकीमध्ये जे पक्षांतर्गत चिखल फेकीचे राजकारण खेळले जाते ते या प्रजासत्ताक भारताच्या पहिल्या वहिल्या निवडणुकीतही खेळले गेले. समाजवादी पुढाऱ्यांना व शे. का. पुढाऱ्यांच्या आदेशाला अनुयायींनी जुमानले नाही आणि साऱ्याचा फायदा कॉंग्रेसला मिळून त्यांचे उमेदवार बहुसंख्येने निवडले गेले. आणि सर्वात धक्का देणारी गोष्ट म्हणजे डॉ. आंबेडकरांना,–दलितांचा महान नेता, आधुनिक भारताची घटना तयार करणारा आधुनिक मनु;–कॉंग्रेसचे डॉ. बाबासाहेबांच्या पासंगालाही न पुरणारे श्री. काजरोळकर यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. हे सर्वांनाच अनपेक्षित झाले. बाबासाहेब राज्यकर्त्यांचे टीकाकार म्हणून राज्यसभेवर तरी निवडून गेले पाहिजेत म्हणून आग्रहाने काही विचारवंतांनी, निवडणूकीला बाबासाहेबांची संमती मिळविली.

अशोक मेहतांनी व बाबासाहेबांनी मिळून फेर मतमोजणीसाठी अर्ज केला. मोजणीच्या वेळी खुद्द बाबासाहेब चरित्रकार श्री. खैरमोडे शासनाच्या वतीने हजर होते. फेर मोजणीत फरक पडला नाही.

निकालानंतर दुसरे दिवशी बाबासाहेब सहकाऱ्यांशी बोलतांना म्हणाले, ' निवडणुकीतील यश अपयश हे लायकीवर अवलंबून नसते, तर ते विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीवर अवलंबून असते. मला या अपयशाचे फारसे वाईट वाटत नाही. वाईट कशाचे वाटत असेल तर कॉंग्रेसचे लोक नालायकांनाही निवडून देतात व लायक लोकांना पाडतात; त्यांत त्यांना देशाचे, धर्मांचे, समाजाचे कांही प्रेम असते काय ? ( नसते फक्त स्वार्थ असतो ) हे स्पष्ट होते. "

मानवाच्या आयुष्यात सुख दुःखाचा पाठशिवणीचा खेळ चालूच असतो. बाबासाहेबांचे निवडणूकीतील अपयश व ते अपयश त्यांना यावे म्हणून इतर पक्षाच्या पुढाऱ्यांनी केलेली चलाखी पाहून त्यांचे अंतकरण दुःखित झाले होते. " हेच

फळ काय मम तयाला " म्हणून गप्प बसणे भाग होते. या हताशपणाची कोंडी फोडणारी एक सुखद बातमी अमेरिकेहून आली. ती म्हणजे कोलंबिया युनिव्हर्सिटीने त्यांना भारताची घटना करण्याच्या महत्वाच्या कामगिरीबद्दल पदवी देण्याची ! बाबासाहेबांनी एम्. ए. पीएच् डी. या पदव्या जेथे घेतल्या तेथे " डॉक्टर ऑफ लॉज " ही पदवी देऊन ती कोलंबिया युनिव्हर्सिटी त्यांना सन्मानीत करणार होती. या बातमीने बाबासाहेबांना कृतकृत्य झाल्याचे समाधान लाभले. या १ ल्या निमंत्रणाचे वेळी भारतीय मंत्रिमंडळापुढे मोठे मोठे प्रश्न उपस्थित होते. त्यांत बाबासाहेबांना भाग घेऊन राज्य शकट नीट चालविले जाईल हे पाहावयाचे होते. म्हणून त्यांनी, सध्या सवड नाही, हा कार्यक्रम पुढे एक दोन वर्षे ढकलण्याचे अमेरिकेच्या को. यु. ला कळविले. शेवटी आता १९५२ च्या एप्रिल मध्ये येथील व्यापातून मोकळे झाल्यावर कोलंबिया युनिव्हर्सिटीशी पत्रव्यवहार केला. कोलंबिया युनिव्हर्सिटीने ५–६–५२ ला पदवीदान समारंभ जाहीर केला. ज्यावेळी बाबासाहेबांना पदवी देण्याचा ठराव झाला तेव्हा पुढे अमेरिकेचे अध्यक्ष झालेले निक्सन कोलंबिया युनिव्हर्सिटीचे प्रमुख होते. त्यांची बाबासाहेबांच्या अनुपस्थितीत पदवी देण्याची तयारी होती. परंतु बाबासाहेबांना स्वतः आपल्या युनिव्हर्सिटीत जाऊन पदवी घ्यायची होती. ती वेळ आता आली. ही बातमी वाचून बाबासाहेबांचे पुष्कळांनी अभिनंदन केले. परंतु भारतीय राजकारणातील अध्वर्यु गणल्या गेलेल्या व्यक्तीपैकी फक्त डॉ. राधाकृष्णन् यांनीच त्यांना अभिनंदाचे पत्र पाठविले. त्यांची जायची नक्की तारीख ठरली त्यावेळी पिपल्स एज्युकेशन सोसायटी व त्यांचे चाहत्या मंडळीने एकत्र येऊन त्यांना मेजवानी दिली. त्या प्रसंगी मुंबई विद्यापीठाला, की जेथे बाबासाहेबांनी पहिली पदवी घेतली, तिला बाबासाहेबांचा असा गौरव करण्याचे सुचू नये, याचा सिद्धार्थच्या प्रिन्सिपॉलांनी खेद व्यक्त केला. बाबासाहेबांनी कृतज्ञता व्यक्त करतांना छोटेसे भाषण केले. त्यांत त्यांनी हे स्पष्ट केले की, आपल्या अंतर्गत राजकारणांत काही मुद्यांवर मी विरोध दर्शवीत असलो तरी आपल्या देशाची–भारताची शान तसूभरही कमी होईल असे बाहेर बोलणार नाही. मला माझ्या देशाचा अभिमान आहे.

बाबासाहेब एकटेच न्यूयॉर्कला १–६–५२ विमानाने गेले. त्यांना तेथील डॉक्टरांकडून प्रकृतीही तपासून घ्यायची होती. या सर्व खर्चासाठी त्यांना मिळणारे डॉलर्स कमी पडणार होते. कोलंबिया युनिव्हर्सिटीचा पदवीदान समारंभ ता. ६ जून १९५२ रोजी संपन्न झाला. त्यांना डॉक्टर ऑफ लॉज '' ही बहुमानाची पदवी दिली. तेथे त्यांच्याबद्दल मोठ्या गौरवाचे उद्गार काढले गेले.

यानंतर बाबासाहेबांनी आपली प्रकृती तेथील निष्णात डॉक्टरांना दाखविली त्यांनी त्यांना एक महिनाभर तेथे रहाण्याचा सल्ला दिला. एवढा खर्च करण्यासाठी त्यांच्याजवळ पैसा नव्हता. आणि शिवाय पिपल्स एज्युकेशन सोसायटीची व राजकीय आणि सामाजिक महत्वाची कामे त्यांना लवकर उरकावयाची होती. म्हणून ते डॉक्टरांचे प्रिस्क्रीपशन्स घेऊन परत भारतात आले.

२१ जुलैला प. बर्लिन येथे भरणाऱ्या कायदेविषयक परिषदेचे त्यांना आमंत्रण आलेले होते. त्याला त्यांनी नकारात्मक उत्तर पाठविले. त्यांनी समाजाच्या कार्यासाठी कायम स्वरुपाच्या उत्पन्नासाठी आणि कार्यक्रमासाठी स्वतंत्र इमारतीसाठी शे. का. इं. ट्रस्ट करुन इमारत बांधण्याची योजना आखली होती. तिच्या कार्यात बराच गोंधळ-घोटाळा होत असल्याचे त्यांना कळले म्हणून त्यांनी एक जाहीर सभा आयोजित केली. त्यांत दोषी कार्यकर्त्यांची चांगलीच कान उघाडणी केली.

धार्मिक आचारांबद्दलही त्यांचे विचार मंथन चालून होते. लोकांना एकत्र येऊन चांगली सुस्वर प्रार्थना करतां यावी म्हणून त्यांनी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकरांकडून बुद्ध प्रार्थनेच्या रेकॉर्डस काढून घेतल्या.

बाबासाहेबांनी संहित केलेले हिंदु-कोड बिलाचा पाठिंबा विश्वासघातकी ठरला व त्याचे तुकडे तुकडे करुन काँग्रेस मंत्रिमंडळाने ते लोकसभेपुढे मांडले. यावर काही लोकांनी आपले असे मत प्रसिद्ध केले की धृतराष्ट्र-दरबारात द्रोपदीची वस्त्रे ओढतांना कौरवांनी जितके तिचे हाल केले, त्यापेक्षा जास्त हाल आंबेडकरांच्या हिंदु-कोड बिलाचे तुकडे करुन काँग्रेस सरकार करीत आहे. त्याच अधिवेशनात काँग्रेस मंत्रिमंडळाने मागासलेल्या जातींच्या प्रगतीसाठी कोणत्या योजना आखाव्यात याची चौकशी करुन शिफारशी करण्यासाठी सात सभासदांचे एक मंडळ नेमण्याचे ठरले. ते म्हणजे 'शेड्युल्डकास्टस अँड शेड्युल्ड ट्राइब्ज कमिशन' नेमण्यांत आले. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत बाबासाहेबांची प्रकृती फारच बिघडली म्हणून ते दिल्लीहून मुंबईला आले.

१९५२ च्या निवडणूक निकालाविरुद्ध डॉ. आंबेडकर आणि साथी अशोक मेहता यांना उत्तर मुंबईतील निवडणुकी रद्द कराव्या अशी मागणी करणारा अर्ज केला. त्यांनी अर्जात म्हटले की १) पिपल्स रिप्रेझेंटेशन ॲक्टच्या सेक्शन ६३ [१] प्रमाणे मतपत्रिका दिल्या नव्हत्या. २) डांगे व देशमुखांनी अयोग्य प्रचार केला. या कारणास्तव निवडणुका रद्द करण्याची मागणी केली होती.

खटला सुरु झाल्यापासून कोर्टात तुडुंब गर्दी होत होती. कॉ. डांगेच्या बाजूने श्री. चारी काम चालवीत होते.

बाबासाहेबांनी कॉ. डांगे व देशमुख यांचेवर "मते कुजवा" प्रचार केल्याचा आरोप केला. डांगे यांच्या पेट्यातून जी ३९ हजार बाद मते ठरली त्यापैकी जर डॉ. आंबेडकर व अशोक मेहतामध्ये विभागली असती तरी ते सहज निवडून येऊ शकले असते. हिंदूना अस्पृश्य उमेदवाराबद्दल घृणा असते म्हणूनही डांगे देशमुखाच्या प्रचाराचा, मते देण्यावर परिणाम झाला. या गोष्टीला, कॉ. उषाताई डांगे यांच्या 'पण ऐकतो कोण' (१९७१) या आत्मचरित्रात दुजोरा मिळतो. चारींनी या बाबासाहेबांच्या आरोपाचे खंडन केले आणि कोर्टाचे काम स्थगीत झाले.

या साऱ्या खटाटोपातून काहीही चांगले निष्पन्न झाले नाही.

वरील, १९४८ ते १९५२ या कालखंडातील घडलेल्या राजकीय व सामाजिक घटनांचा सविस्तर इतिहास या खंडात आलेला आहे.

बहिष्कृत जातीत जन्मलेल्या, विद्वत्तेने व कर्तृत्वाने समाजोन्नतीची धुरा वाहणाऱ्या बाबासाहेबांना सर्व तऱ्हेने त्यांच्या मार्गात काटे पसरविण्याचा जणू उच्चवर्णीयांनी विडाच उचलला होता. बाबासाहेबांच्या वयाबरोबर, शारिरिक दोषही वाढतच होते. वयोपरत्वे त्यांचे शरीर दुबळे बनत होते तर कार्यातील अडथळ्यांनी मनही खचत होते. हिंदु समाजातील जातीभेद जाणे शक्य नाही. अस्पृश्यांना व स्पृश्यांना एकत्र यायचे असेल तर अस्पृशांना धर्म बदलायलाच हवा; असा निष्कर्ष त्यांनी काढला. सर्वांना मानवता वाद दाखविणारा व भारतात निर्माण होऊन पौर्वात्य देशात पसरलेल्या बौद्धधर्मात धर्मांतर करण्याचे त्यांचे बेत दृढ होऊ लागले व त्या कार्याला त्यांनी सुरवातही केली. पुढची १९५७ सालची निवडणूक बाबासाहेबांनी पाहिली नाही.

हा चरित्र खंड, चरित्र लेखक श्री. चां. भ. खैरमोडे यांच्या विद्यालयीन शिक्षणाची काही वर्षे ज्या ठिकाणी गेली त्या औंध संस्थानचे भूतपूर्व महाराज श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांना अर्पण केला आहे. वीसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात, विद्यार्थी खैरमोडे यांच्या मांडीवर गणपतीची मूर्ती देऊन गणेशोत्सवाची मिरवणूक काढण्याचा महाराजांचा आदेश म्हणजे त्यांच्या प्रगत विचारांची साक्ष ! इतक्या प्रगत विचारांच्या महाराजांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी चरित्रकाराने एक खंड त्यांना अर्पण करण्याचे ठरविले होते; त्यानुसार हा खंड महाराजांना अर्पण करण्याचे श्रेय मी घेत आहे.

साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे, सचिव पं. रा. पाटील व इतर कार्यालयीन व्यक्तीमुळे हे प्रकाशनाचे काम पूर्णत्वाकडे जात आहे म्हणून मी, व्यक्तीशः व डॉ. आंबेडकरांच्या चळवळीचा अभ्यासू वर्ग, मंडळाचा सदैव ऋणी राहील.

शेवटी या लेखन प्रपंचाचा चरित्रकाराचा एक उतारा मी खाली देत आहे:—

घरादारावर, संसारावर आणि सुखदुःखावर (स्वतःच्या) तुळशीपत्र ठेऊन सतत विद्याभ्यास, संशोधन, मनन व लेखन करणारी, केवळ विशाल बुद्धीची, प्रबुद्ध व्यक्ती म्हणून, अगर केवळ सामाजिक क्रांतीचा तत्ववेत्ता व उद्गाता म्हणून, अथवा पददलितांच्या अंतःकरणांत माणूसकीच्या जीवनाचा रटरटणारा लाव्हारस उत्पन्न करणारा किमयागार पुढारी म्हणून, किंवा सामाजिक क्रांतीतून राष्ट्रव्यापी शांती उत्पन्न करणारा धार्मिक द्रष्टा म्हणून; ज्यांना या (महामानव) बाबासाहेबांच्या चरित्राचा अभ्यास करण्याची अगर त्यावर ग्रंथ लिहिण्याची इच्छा होईल, त्यांना या सर्व चरित्र खंडातून भरपूर माहिती मिळेल व इतर माहिती मिळविण्याचे मार्ग सापडतील. माझ्या नंतर जे लेखक या क्षेत्रात उतरतील त्यांना हे खंड उपयुक्त ठरतील, याचे मला समाधान,

बाकीचे उर्वरीत खंड प्रसिद्ध होतील तेव्हां होईल. गेल्या कित्येक वर्षाच्या परिश्रमाचे फळ काय ते एवढेच माझ्या हाती लागेल,

या कामात मी अनेक इतिहास व समाजशास्त्राच्या मान्यवर व्यक्तींचे सहाय्य घेतलेले आहे. त्यापैकी प्रा. नलिनी पंडित, डॉ. य. दि. फडके, डॉ. वि. द. खोबरेकर, डॉ. पी. टी. बोराळे, श्री. शां. शं. रेगे, प्रा. डॉ. लीला साळगावकर, श्री. तु. हि. म्हात्रे, श्री. सुहास सोनावणे व श्री. निवृत्ती भंडारे यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. खंड ९ वा व खंड १० वा यांची सुबक छपाईचे काम करणारे 'आरेम प्रिन्टर्स 'चा कर्मचारी वर्ग व त्यांचे मालक श्री. बाळ देसाई व मेघन डांगे या सर्वांची मी आभारी आहे.

शेवटी हा १० वा खंड ठरलेल्या मुदतीनंतर बऱ्याच दिवसांनी व मंडळाचे नवीन अध्यक्ष, माननीय डॉ. यशवंतरावजी मनोहर यांच्या कारकीर्दीत व चरित्रकार श्री. चां. भ. खैरमोडे यांच्या पुण्यतिथी दिवशी ता. १८ नोव्हेंबर १९८९ प्रकाशित होण्याचा योग आला आहे.

चरित्र खंडाच्या प्रकाशनाचे काम महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने पूर्णत्वाकडे आणलेले आहे. अभ्यासू वाचक, डॉ. बाबासाहेबांचा अनुयायी वर्ग यांना सत्याधारीत ऐतिहासिक माहिती पुरविण्याची चरित्रकर्त्याची इच्छा फलद्रूप होत आहे याचे मला समाधान वाटते.

१४७–अ, हिंदु कॉलनी,
दादर, मुंबई १४.
२५ फेब्रुवारी १९८८

**द्वारकाबाई खैरमोडे**
१४ नोव्हेंबर १९८९

( चरित्रकार **श्री. चां. भ. खैरमोडे** यांच्याबद्दलचे
**प्र. ना. फाटक** यांनी काढलेले गौरवोद्गार ! )

नवीभटवाडी क्रॉसलेन, मुंबई–४
शनिवार ता. ८–५–६५.

श्री. चांगदेव भवानराव खैरमोडे यांच्या एकसष्टीच्या समारंभाचा अध्यक्ष म्हणून आपल्या सत्कारसमितीने केलेल्या पाचारणाबद्दल मी माझे आभार प्रथम मनःपूर्वक व्यक्त करतो.

हल्लीच्या जीवन कलहांत एखाद्यांला साठावे वर्ष संपून एकसष्टाव्या वर्षात दाखल होण्याचा योग लाभावा ही खरोखरीच अभिनंदन करण्यासारखी घटना असून त्यांचा जाहीर सत्कार साजरा करणे हे एक समाजाचे कर्तव्य आहे. त्यातल्या त्यांत श्री. खैरमोडे हे ज्या महाराष्ट्रीय समाज विभागात जन्मले, त्या समाजांच्या आजतागायतची दुःस्थिती विचारांत घेतल्यास ते तर एकसष्टीनिमित्त जास्तच अभिनंदनीय ठरतात. श्री. खैरमोडे यांनी (उच्च) शिक्षण घेतले, निर्वाहाचा व्यवसाय केला, समाजाचा प्रत्येक घटक हेच करतो. परंतु त्यांनी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे विस्तीर्ण चरित्र लिहीण्याचे काम हाती घेतले हा त्यांच्या आयुष्यातील महत्वाचा भाग आहे व त्याच्या योगाने श्री. खैरमोडे यांचे नांव महाराष्ट्रांत चिरस्मरणीय होऊन राहील. त्यांनी लिहिलेले चरित्र हे केवळ आंबेडकर या एका व्यक्तीचे नसून अखिल महाराष्ट्राच्या अर्वाचिन इतिहासाचे एक नवे अंग स्पष्टपणे जनतेच्या निदर्शनास आणणारे ते एक महत्कार्य आहे. या चरित्रग्रंथाचे प्रसिद्ध झालेले खंड जो कोणी अस्थेने दृष्टीखाली घालील त्याला श्री. खैरमोडे यांच्या क्लेशकारक परिश्रमाची सहज कल्पना करता येईल. त्यांत आलेला पत्रव्यवहार हा कालांतराने महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या इतिहासाचे बहुमोल साधन समजले जाईल. चरित्रासाठी जवळचा पत्रव्यवहार जतण करणे आणि इतरांचा मिळविणे हे काम सोपे नाही, फार जिकरीचे, सहनशीलतेचे, सत्व पहाणारे असते. ते काम शक्य तेवढे जास्तीत श्री. खैरमोडे यांनी पार पाडलेले आहे. त्यांच्या चरित्रलेखनाने मराठी चरित्र-साहित्यांत उत्तम प्रकारची भर पडेल यांत संशय नाही.

श्री. खैरमोडे यांच्या लेखनकार्याकडे पाहिले म्हणजे संधी मिळाल्यास जो समाज अस्पृश्यतेच्या शिक्षेने हजारो वर्षे इतर समाजापासून दूर पडला होता, ज्याला

विद्येपासून सक्तीने दूर ठेवले होते त्या समाजांतील व्यक्ति काय करू शकतात, यांचे हे डोळ्यात भरण्याजोगे उदाहरण श्री. खैरमोड्यांनी निर्माण केल्याबद्दल शंका राहातनाही. राजकीय गुलामगिरीहून शेकडोपरीने दुर्धर असलेल्या सामाजिक गुलामगिरीने सडत पिचत असलेल्या देशबांधवांचा समूह आता कुठे थोडासा त्या भयंकर गुलाम गिरीच्या काटेरी बंधनातून सुटण्याच्या पंथास लागला आहे. ही सुटका निरर्थक नाही. अशी सुटका देशाच्या एकंदर उत्कर्षाला हातभार लावील या भवितव्याचे एक प्रसादचिन्ह म्हणजे श्री. खैरमोड्यांचे लेखन. त्यांची एकसष्टी गौरवपूर्वक साजरी करणारांत जे तरुण होतकरू असतील त्यांनी श्री. खैरमोड्यांचा कित्ता गिरवण्याचा संकल्प या प्रसंगी करावा. येथे कित्ता म्हटले तो फक्त लेखनाचा नव्हे. सर्व प्रकारच्या लोकापयोगी उपयोगाचा कित्ता या शब्दात अंतर्भाव आहे. ज्याचा जो विषय असेल त्याने ह्याविषयाची सिद्धी मिळवून तिचा लाभ सामान्य जनतेस देण्याचे ध्येय बाळगावे हा येथे कित्ता गिरविणे या शब्दांचा अर्थ आहे. श्री. खैरमोडे यांनी लेखणीच्या द्वारे लोकसेवा चालविली आहे. विद्यार्थी किंवा विद्यासंपन्नानी निराळे साधन हाती घ्यावे. पण आपल्यावर समाजाचे ऋण आहे व ते सामाजिक हिताच्या उद्योगाने फेडले पाहिजे हे श्री. खैरमोडे यांच्या कामगिरीचे तात्पर्य आहे.

मी श्री. खैरमोडे यांना आशिर्वाद देतो की, त्यांना उदंड आयुष्य लाभावे ते आयुष्य सुखाचे, निरोगी आणि कार्यक्षम असावे. त्यांच्या हातून सदैव लोकसेवा होत राहावी. आशीर्वाद दिला, ह्याबरोबरच एक लहानशी सूचना करावीशी वाटते की आशीर्वाद उत्तेजन देतो, पण कार्याचे साफल्य हे ज्यांच्या त्यांच्या श्रमावर अवलंबून असते हे विसरू नये.

मला उपस्थित राहाणे शक्य नाही म्हणून हा लेखनप्रपंच केला आहे. 'जेथे धर्म तेथे जय' या न्यायाने जेथे गुणगौरव तेथे मी शरीराने नसलो तरी मनाने उपस्थित आहे, असे समजावे. सत्कार समितीने मुंबई मराठी साहित्य संघाच्या सहकार्याची अपेक्षा धरली ती या आशीर्वादाने पूर्ण करावी अशीही एक या आशीर्वादामागें भावना आहे, कळावे.

आपला हितकांक्षी

ल. र. फाटक

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र

## खंड दहावा

### प्रकरण १.

## स्वातंत्र्यानंतर

घटना समितीचे कार्य चालू असतांना राष्ट्रीय निशाण निर्माण करण्याचा प्रश्न ऊपस्थित झाला. हे निशाण कोणत्या प्रकारचे असावे, याबद्दल अनेक पुढाऱ्यांनी, संस्थांनी आणि लेखकांनी आपापली मते प्रदर्शित केली. मुंबईतील काही संस्था, कार्यकर्ते आणि पुढारी यांनी बाबासाहेबांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला व त्यांना विनंती केली की, भारताला जे राष्ट्रीय निशाण हवे, ते भगव्या झेंड्याचे असावे; याचा घटना समितींत तुम्ही पुरस्कार करा. बाबासाहेबांनी : या बाबतीत महाराष्ट्रांत चळवळ करुन मला पाठींबा द्यावा असें सांगितले. ते त्यांनी मान्य केले या भरवशांवर बाबासाहेबांनी भगवा झेंडा हाच राष्ट्रध्वज स्वीकारावा अशी घटनासमितीत खटपट केली. पण आयत्यावेळी सदर मंडळींनी त्यांना दगा दिला, त्यामुळे बाबासाहेबांना यश आले नाहीं. राष्ट्रीय झेंडा म्हणून तिरंगी झेंडा मान्य करण्यात आला. भगव्या झेंड्यांचे प्रयत्न कसे व कां फिसकटले, याबद्दल प्रबोधनकार **श्री. ठाकरे** यांनी २०–८–४७ च्या नवशक्तीत (जनमानाचा कानोसा) पत्र प्रसिद्ध केले. ते मी येथे देत आहे :—

### "दिल्लीत भगव्या झेंड्यांची खटपट कां फिसकटली" ?

संपादक, नवशक्ति यांस :—

ता. १० जुलैला सान्ताक्रुजच्या विमानतळावर **डॉ आंबेडकर** यांना स्थानिक हिंदू महासभेचे अंनतराव गद्रे, रावबहादूर बोले प्रभृति पुढारी मंडळी आणि मराठा मंदिराचे गावडे, भिलारे वगैरे मंडळींनी हारतुरे घालून दोन भगवे झेंडे आणि

मध्यवर्ती सरकारने नेमलेल्या झेंडा कमिटीत भगव्या झेंड्याची राष्ट्रध्वज म्हणून निवड करण्याची खटपट करावी, असा आदेश दिला. ही बातमी सगळ्या पत्रांत आलेली होती. मराठा मंदिर आणि हिंदुमहासभा अशा प्रतिनिधीक संस्थानी केलेली ही खटपट पुढे फिसकटली का ? या प्रश्नाचा अजूनपर्यंत कोणीही उलगडा केलेला नाही. म्हणून चौकशी करतां जबाबदार गृहस्थांकडून मिळालेली माहिती मुद्दाम प्रसिद्धीला पाठवीत आहे.

## हा शिवाजीचा झेंडा नव्हे.

हिंदुसभावाल्यांकडे पहावे तर ते त्यांचा **सावरकर**-निर्मित कृपाण-कुंडलिनी स्वस्तिक चिन्हांकित भगवा झेंडा, काँग्रेसच्या सत्ताधारी झेंडा कमिटीने हा राष्ट्रीय झेंडा म्हणून मान्य केला नाही. म्हणून दांत-ओठ खात आहेत. राज्यभिषेकाच्या वेळी शिवाजीने फडकविलेला भगवा झेंडा, साधा होता. त्यावर कसलेही चिन्ह नव्हते. आजही कोल्हापूरचा शिवपरंपरेचा भगवा झेंडा चिन्हाशिवाय साधा भगवा असाच आहे. हाच झेंडा महाराष्ट्र, पूज्य नि वंदनीय मानतो. हिंदु महासभेचा कृपाण कुंडलिनीचा झेंडा त्या ठराविक पंथाचा आहे.तो महाराष्ट्राचा " शिवाजीचा " झेंडा मुळीच नाही. मराठा मंदिराचा झेंडा साधा भगवाच आहे. भगव्या झेंड्याच्या वादांत हा महत्वाचा मुद्दा कोणीही नजरेआड करता कामा नये. शिवाजीचा झेंडा निराळा आणि सावरकरांचा झेंडा निराळा. दोन्हींचा रंग भगवा असला तरी परंपरेचे इतिहास निराळे आहेत.

डॉ. आंबेडकरांची झेंडा कमिटीवर नेमणूक झाली नि ते दादरला ३ जुलैला परत आल्यावर, श्री. सुरबा टिपणीस त्यांच्या भेटीला गेले असता, ते म्हणाले, " राष्ट्रध्वज ठरविण्याची कमिटी नेमली गेली, तरी आपल्या महाराष्ट्रात आपल्या भगव्या झेंड्याच्या आग्रहाची चळवळ कोठेच कशी नाही ? डॉ. आंबेडकर स्वाभिमानी मऱ्हाठे आहेत. शिवाजीच्या भगव्या झेंड्याचा त्यांना तिखट अभिमान आहे. तमाम महाराष्ट्राचे मऱ्हाठे एकमुखाने भगव्या झेंड्याचा राष्ट्रध्वज म्हणून पुकारा करतील, तर दिल्लीच्या कमिटीलाही गंभीर विचार करावा लागेल, ही आंबेडकरांची भावना बरोबर होती.

महाराष्ट्र आपल्या पाठीशी उभा राहिला तर भगव्या झेंड्याची आपण कमिटीत जोरकस शिफारस करू अशी डॉ. आंबेडकरांची ग्वाही मिळताच, सुरबा टिपणीस, मराठा मंदिराचे श्री. भिलारे नि गावडे यांना भेटले. ता. ४ जुलैला टिपणीस, अनंतराव चित्रे आणि भिलारे स्थानिक हिंदु महासभेचे अध्यक्ष श्री. अनंतराव गद्रे यांना त्यांच्या बिऱ्हाडी जाऊन भेटले. अनंतरावांनी हिंदु महासभेचा हार्दिक पाठिंबा देण्याचे कबूल केले. मी भोपटकरांना तार पाठवितो आणि संध्याकाळी आपण सारेजण [ हिंदु सभेचे लोक आणि मराठा मंदिराचे चालक ] डॉक्टरांना मुद्दाम भेटून कार्याची दिशा ठरवून

एकदम कामाला लागू, असे अनंतरावांनी आश्वासन दिले त्याच दिवशी संध्याकाळी सिद्धार्थ कॉलेजात दोनही संस्थांचे आणि इतर भगव्या झेंड्याचे अभिमानी, डॉ. आंबेडकर यांना भेटले. चर्चा झाली, कार्याची आखणी केली, दुसऱ्या दिवशी मराठा मंदिराचे अध्वर्यू गावडे यांनी शंभर रुपये खर्चून शिवाजीच्या अस्सल भगव्या झेंड्याचे दोन नमुने आणून डॉक्टरांना दाखविले. चित्रा वगैरे स्थानिक दैनिकांत भगव्या झेंड्याचा पुरस्काराचा जाहिरनामा गावडे यांनी प्रसिद्ध केला. ग्वालेराधिपति जिवाजीराव शिंदे यांनी तारेने गावडे यांच्या खटपटीचा पुरस्कार केल्याचे समजते.

## सदाशिवपेठी टिंगल

याच आठवड्यात दादर येथील वनमाळी हॉलमध्ये आण्णासाहेब भोपटकर यांचे जाहीर व्याख्यान होते. अनंतराव गद्रे नि भोपटकर यांची तारातारी होणार होती, तेव्हा हे व्याख्यान भगव्या झेंड्याच्या आग्रहासाठीच असावे, अशा अंदाजाने टिपणीस प्रभृति मंडळी मुद्दाम गेली. त्यांची फार निराशा झाली. सबंध व्याख्यानात काँग्रेसची ठराविक सदाशिवपेठी टिंगल आणि अगदी शेवटी भगव्या झेंड्याचा उगाच ओझरता उल्लेख हे हिंदु महासभावाले भगव्या झेंड्याच्या प्रश्नाला प्रामाणिकपणे पाठिंबा देणार आहेत, का इतर खटपट्यांची नुसती हुल्कावणी करणार आहेत, याचा काहींच उलगडा होईना.

दुसऱ्या दिवशी मराठा मंदिराच्या ठाकूरद्वार रोडवरील कचेरीत गद्रे प्रभृति हिंदु महासभावाले, मराठा मंदिराची मंडळी नि इतर यांची सभा झाली. खंडेरावजी दौंडकर अध्यक्ष होते. एक संमिश्र कार्यकारी मंडळ नेमण्यात आले. कॉन्स्टिटयूंट असेंब्लीच्या मेंबरांना, जवाहरलाल, वल्लभभाई वगैरे दिल्लीपदस्थ अधिकाऱ्यांना तारा पाठवायच्या, ठिकठिकाणी सभा घेऊन त्यांचे ठराव पाठवावयाचे, वगैरे कार्यक्रम ठरले. शिवाय हिंदुमहासभेचे अध्यक्ष श्री. भोपटकर यांची दिल्लीला जाऊन तेथे जोराची निदर्शने करायची, हा भाग महत्वाचा ठरविण्यांत आला आणि तो पार पाडण्यात हिंदु महासभा किंचितही कसूर करणार नाही, अशी अनंतराव गद्रे यांनी हमी घेतली.

## आंबेडकरांचे आश्वासन

ता. १० जुलैला सकाळी हिंदु महासभेचे गद्रे-चोळे प्रभृति २५-३० मंडळी, मराठा मंदिराची अशीच २५-३० मंडळी मोटारीच्या मिरवणुकीने डॉ. आंबेडकरांच्या राजगृहावर आली आणि त्यांनी त्यांना दोन भगवे झेंडे अर्पण केले. महाराष्ट्राचा प्राचीन भगवा झेंडा, राष्ट्रध्वज ठरविण्याची कसोशी करण्याची विनंती करण्यांत आली. डॉ. आंबेडकर म्हणाले, "आपण थोर थोर प्रतिनिधीक संस्थांची थोर थोर मंडळी असता हे काम माझ्यासारख्या एका "महाराच्या पोरावर" सोपवता, हा तुमच्या मनाचा थोरपणा आहे. खास दिल्लीत मला जर तुमचे भक्कम पुरस्काराचे पाठबळ मिळेल तरच हे कार्य मला साधेल." नंतर सारेजण तसेच मोटारीतून मिरवणुकीने

सांताक्रूझच्या विमानतळावर गेले. तेथेही पुन्हा भाषणे झाली. फोटो काढण्यात आले. विमानात पाय ठेवण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांनी पुन्हा आग्रहाने सांगितले की अण्णासाहेब भोपटकरांना तावडतोब दिल्लीला पाठवून द्या आणि तेथे येतांच माझी भेट घ्यायला सांगा, म्हणजे पुढचे खास बेत ठरवता येतील.

## माशी कोठे शिंकली ?

आण्णासाहेब भोपटकर पाठोपाठ दिल्लीला गेले. त्यांच्याबरोबर त्यांचा जनरल सेक्रेटरी वगैरे सहाय्यकांचा लवाजमा होताच पण काय ? कोठे माशी शिंकली कोण जाणे. त्यांच्यापैकी एकही असामी डॉ. आंबेडकरांना भेटला नाही. कमिटीत डॉ. आंबेडकरांनी भगव्या ध्वजाची बाजू मांडली. पण सार्वजनिक पाठिंब्याच्या अभावी त्याचा कांही उपयोग झाला नाही. पुढे तिरंगी झेंड्याला मान्यता देण्यास काँ. असेब्लित हिंदुमहासभेचे बडे पुरस्कर्ते, सर्वश्री अणे, खरेहि बसले होते. पण त्यांनी चुकूनसुद्धा भगव्या झेंड्याचे नांव काढले नाही. अर्थात भगव्या झेंड्याचा प्रश्न गर्भातल्या गर्भात मेला.

ही वस्तुस्थिती चूक आहे, असे हिंदु महासभेच्या म्होरक्यांनीच आता सांगितले पाहिजे. अवसानघात त्यांनीच केलेला आहे. तेव्हां यापुढे भगव्या झेंड्याविषयी त्यांच्या किंचाळ्या फुकट आहेत. हिंदु राष्ट्रपति म्हणून मिरवणाऱ्या भोपटकरांना डॉ. आंबेडकरांसारख्या एका महाराच्या पोराला भेटणे कदाचित बेइभ्रतीचे तर वाटले नसेल ना ? काय असेल त्याचा खुलासा त्यांनीच केला पाहिजे.

(केशव सिताराम ठाकरे)

राष्ट्रीय ध्वज म्हणून जो अशोकचक्र चिन्हांकित तिरंगी झेंडा स्वीकारण्यात आला त्याचा थोडासा इतिहास ४–९–६० च्या टाईम्समध्ये प्रसिद्ध झाला होता. चरख्याच्या ऐवजी अशोक चक्र स्वीकारावे, ही कल्पना श्री. बद्रुदिन फैज हस्सन बद्रुदिन तय्यबजी व त्यांची पत्नी यांनी गांधीजींच्या पुढे मांडली व गांधीजीनी संमति दिली. मग श्री. नेहरु यांनी घटना समितींत ठराव मांडला व अशोकचक्र चिन्हांकित तिरंगीं झेंडा राष्ट्रध्वज म्हणून मंजूर करण्यांत आला. टाइम्सने दिलेला तो इतिहास असा :–

"To millions of Indians all over, the national tricolour with the Ashoka Chakra epitomises their hopes and aspirations, but to one Indian, it means Q 'Wee little" more. He and his wife were instrumental in its adoption as the national flag of India, The man : Badruddin Faiz Hassan Badruddin Tayabji, Indai's Ambassador at Bonn.

I met 53 year old brilliant and amiable Ambassador last

week when he spent a few days in the city, ....... he joined Sir B. N. Raw in drafting the Constitution.

Shri Tayabjis selected the Ashoka Chakra (instead of thes spinning wheel) as the National emblem — our choice was approved by Gandhiji after a little persuasion" and Tayabji drafted the resolution of the national flag which Nehru moved on the Constituent Assembly" (In personal — By Pollux, The Times of India, Sunday, 4-9-1960).

मुंबई म्युनिसिपल कामगार, चेंबूर, यांनी बाबासाहेबांना २००१ रु. ची थैली ५–८–४७ रोजी अर्पण केली. हे पैसे इमारत फंडासाठी देण्यांत आले होते. थैली अर्पण समारंभ श्री. मडकेबुवा तथा गणपत महादेव जाधव, अध्यक्ष मुंबई शाखा, ऑल इंडिया शेडयूल्ड कास्टस फेडरेशन, यांच्या अध्यक्षतेखाली झाला. (टाईम्स, (६–८–४७)

ऑल इंडिया शेडल्यूड कास्टस फेडरेशनचे अध्यक्ष श्री. एन्. शिवराज यांनी पत्रक काढून फेडरेशनच्या अनुयायांना सूचना दिली की, १५–८–४७ रोजी जे स्वातंत्र्य भारताला मिळणार आहे, त्याचा फायदा भांडवलवाले व सवर्ण हिंदू यांना मिळणार आहे, अस्पृश्य वर्गाला या स्वातंत्र्याचा कधीही फायदा घेऊ देणार नाहीत. म्हणून अस्पृश्यांनी स्वातंत्र्योत्सवांत भाग घेऊ नये. यासंबंधी श्री. काजरोळकर यांनी पत्रक काढून असे सुचविले की, अस्पृश्यांनी स्वातंत्र्योत्सवांत भाग घेतला नाही तर त्यांच्याबद्दल गैरसमज (हिंदु समाजांत) उत्पन्न येईल.

"......Even Dr. Ambedkar, the founder of the Federation, who is highly respected by all Harijans has joined the Constituent Assembly and was adopted a very liberal policy. In the circumstances, I wanted like to ask Mr. Shivraj whether he still wants separate electorates. I suggest that it is not fair that Mr. Shivraj should create a misunderstanding among the public, I trust that he will reconsider his views and take part in the celebrations enthusiastically" (The Times of India 13-8-47).

परंतु फेडरेशनच्या अनुयायांनी स्वातंत्र्योत्सवाचे समारंभ साजरे केले नाहीत.

हैदराबादचा निजाम, याला १५–८–४७ पासून वऱ्हाड प्रांताचा ताबा मिळेल, कारण ज्या तहान्वये वऱ्हाड ब्रिटीशांना देण्यात आला होता तो तह १५–८–४७ ला संपुष्टात येतो व वऱ्हाड निजामाकडे परत जातो अशा अर्थाचे एक निवेदन बाबासाहेबांनी केलेले होते ते ८–४–४७ च्या टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेले होते.

पाकीस्ताननिर्मितीसाठी पंजाब व बंगाल यांचे दोन भाग, पूर्व व पश्चिम करावे लागणार, व ते योग्य तऱ्हेने केले गेले नाहीत तर भारत सरकारला आपला भाग सुरक्षित ठेवणे फार जड जाईल, अशा अर्थाचेही एक निवेदन पत्रक **बाबासाहेबांनी** काढलेले होते ते,

"Danger of Ignoring Defence Aspect of Pakistan — Dr. Ambedkar's charge against Government of India."

या शिर्षकाखाली २१–७–४७ च्या टाईम्समध्ये प्रसिद्ध झाले होते.

महात्मा गांधी आणि **डॉ. आंबेडकर** यांच्या अस्पृश्यतानिवारण चळवळीमध्ये तफावत कोठे आहे?" हा **श्री. ह. रा. महाजनी** यांचा लेख २४–८–४७ च्या नवयुगांत प्रसिद्ध झाला होता. हिंदूंची धर्मशास्त्रे, हिंदूंची जुनीपुरानी संस्कृति व विचारसरणी यांना बाधक किंवा घातक न होणारी, अस्पृश्यता निवारणाची चळवळ **महात्मा गांधींची** आहे, आणि त्यामुळे ती चळवळ, अस्पृश्यांची मने आकर्षित करू शकत नाही. **डॉ. बाबासाहेबांची** चळवळ, समाजात लोकशाही उत्पन्न करण्याच्या दृष्टीने चालविलेली असल्यामुळे ती अस्पृश्यांना प्रिय व हितकारक वाटते, असा ठोकळ फरक **श्री. ह. रा. महाजनी** यांनी दाखविलेला आहे. शेवटी ते म्हणतात, "ज्या समाजव्यवस्थेतून अस्पृश्यतेची भयानक गुलामगिरी जन्म पावली ती व्यवस्था जोपर्यंत **म. गांधीना** आदर्शभूत वाटते तोपर्यंत अस्पृश्यांना पदरी बाळगले, त्यांच्या शिक्षणाची सोय केली, मंदिरे खुली केली तरी गुलामगिरी नष्ट होईल असे मानण्यास आधार नाही. सारा समाज तळापासून ढवळून काढा हा अस्पृश्यांच्या राजकीय चळवळीचा मी तरी अर्थ समजतो. केवळ अशक्य म्हणून तुम्ही स्पर्शास्पर्शाचे निर्बंध नष्ट केले असले तरी त्यामुळे उच्चवर्णीयांनी अस्पृश्यांचे हक्क मान्य केले असे होत नाही. त्यासाठी परकीय सत्ता केवळ नष्ट होऊनच चालणार नाही. व्यक्तिस्वातंत्र्य, समता व लोकशाही या जीवनमूल्यावर आधारलेली एक सामाजिक क्रांतीच त्या ठिकाणी होणे अगत्याचे आहे. **डॉ. आंबेडकरांच्या** अस्पृश्यांच्या चळवळीचे महत्व हे असे आहे, आणि त्या मूलभूत, पुरोगामी विचाराला ही चळवळ जोपर्यंत चिकटून राहील तोपर्यन्त अधिकार पदाचे लोणी कसे वाटावे या सलिच्छ जातीय भांडणतंट्याचे स्वरुप तिला येणार नाही. **महात्मा ज्योतिराव फुल्यासंबंधी डॉ. आंबेडकर** म्हणतात त्याप्रमाणे "Who preached the gospel that for India, social democracy was more vital than independence from foreign rule" (Who Where the Shudrasc? by Dr. Ambedkar). या वैचारिक भूमिकेच्या स्वीकार करणाऱ्या कोणत्याही आंदोलनाला खऱ्या लोकसत्तावाद्यांचा पाठींबा राहीलच."

१९४७ च्या सप्टेम्बरमध्ये मुंबईत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक भरणार होती त्यासाठी सर्वश्री **नेहरू वल्लभभाई पटेल, बाबू राजेन्द्रप्रसाद** आणि **मौलाना अब्दुल कलम आझाद** हे मुंबईत येतील तेव्हा त्यांना मुंबई कार्पोरेशनतर्फे

मानपत्र द्यावे, असे कार्पोरेशनमधील काँग्रेस पक्षाने ठरविले. त्याप्रमाणे कार्पोरेशनच्या १–९–४७ च्या बैठकीत ठराव मंजूर झाला. हे चौघेजण भारत मंत्रीमंडळाचे सभासद होते. त्यांच्याबरोबर दोघे महाराष्ट्रीय मंत्री **श्री. न. वि. गाडगीळ** व **डॉ.आंबेडकर** यांना कां मानपत्र देऊ केले नाही, असा प्रश्न उपस्थित करुन विविध वृत्ताच्या ७–९–४७ च्या अंकात आलमगिरने "काँग्रेसकंपूने केलेला दोघां थोर महाराष्ट्रीयांचा अपमान" असा मथळा देऊन एक खरमरीत माहितीपूर्ण लेख लिहिला होता. सदर लेखक म्हणतो, "–तथापि या निमित्ताने मला कार्पोरेशन मधील काँग्रेस पक्षाचे हिटलर व त्याचे गोअरींग, गोबेल्स, रिबेंट्रॉप यांना असे विचारावयाचे आहे की, हिंदुस्थान सरकारच्या मंत्रीमंडळातील या चौघांच पुढाऱ्यांच्या मानपत्रासाठी वेगळे निवडून काढण्यांत देशभक्तीचे जे मूल्यमापन तुम्ही चालविले आहे, ते कोणत्या तत्वावर ? हिंदुस्थान सरकारचे जे मंत्री मुंबईत उपस्थित राहतील त्या सर्वांना मानपत्र देण्यांत आले असते तर कार्पोरेशनची प्रतिष्ठा कमी झाली असती; असे कोणीही म्हटले नसते आणि सामुदायिक जबाबदारीच्या तत्वाचा गौरव करावयाची जर काँग्रेस पक्षायांची इच्छा असती, तर मंत्र्यामंत्र्यांमध्ये प्रथम श्रेणीतला पुढारी आणि द्वितीय श्रेणीतला पुढारी असा पंक्तीप्रपंच करुन त्या तत्वाची अशी हास्यास्पद परवड काढण्याचा हा बेवकूफपणा त्यांनी केला नसता. मग हा पंक्तीप्रपंच कां करण्यात आला ? **डॉ. आंबेडकर** यांना कार्पोरेशनमधील "मेजॉरिटीमस्त" काँग्रेसवाले प्रथम श्रेणीतील पुढारी मानीत नाहीत हे दाखविण्यासाठी की **श्री. न. वि. गाडगीळ** यांनी काँग्रेससाठी केलेला त्याग वा भोगलेले हाल क्षुद्रबुद्धि **सदोबा पाटला**च्या दृष्टीने कः पदार्थ आहेत हे भासविण्यासाठी ? हे दोघे मंत्री हिंदुस्थान सरकारच्या मंत्रीमंडळात समाविष्ट होण्यास लायक ठरले, ते काय ते दोघे सदोबापेक्षांही हिणकस होते म्हणून ? सदोबा आणि **झेंडे मास्तर** या दोघांची देशसेवा ते सामान्या काँग्रेसवाले असूनही इतर ठिकाणच्या म्युनिसिपालीट्यांची मानपत्रे स्वीकारण्यास पात्र ठरली, तर हिंदुस्थान सरकारच्या मंत्रीमंडळातील आसने भूषविणारे **डॉ. आंबेडकर** व **श्री. गाडगीळ** हेच दोघे पुढारी काँग्रेसवाल्यांच्या देशभक्तीच्या तराजूत उणे पडले की काय ?

## बुद्धिपुरस्सर अपमान

तथापि असले प्रश्न विचारण्यांत अथवा **पाटील** कंपूशी युक्तीवाद खेळण्यात मुळीच हंशील नाही. कारण **पाटीलकंपू** हे एक बेहोष झालेल्या दे. भ. चे टोळके आहे आणि त्या बेहोषपणांत त्यांना सारासार विचारशक्तीचे फडके सोडून ते डोक्याला गुंडाळलेले आहे हे मला माहीत आहे. तसे नसते तर मानपानाचा हा ठराव गेल्या कार्पोरेशनमध्ये सादर केला जाण्यापूर्वी त्या ठरावाची जी खाजगी चर्चा कार्पोरेशनमधील काँग्रेस पक्षाच्या बैठकीत आगावू करण्यात आली, त्या चर्चेच्यावेळी **डॉ. आंबेडकर** व **श्री. गाडगीळ** या उभयतांचाही समावेश मानपत्रामध्ये करण्याची सूचना काही काँग्रेसवाल्यांनी केली असता **सदोबानी** ती आपल्या अधि-

कारात केव्हांही धुडकावून लावली नसती! अर्थात ही माहिती देऊन मला येथे हेच दाखवावयाचे आहे की **सदोबाकंपूच्या** रावणराज्यातसुद्धा हितकर सल्ला देणारे असे "बिभीषण" तुरळक सापडतात आणि त्यांना जनाची नसली तरी मनाची लाज थोडी बहुत आहेच आहे. तेव्हा **सदोबाना** सुविचार कोणी ऐकविला नसेल अथवा त्यासाठी माझ्यासारख्या परस्थाची जरुरी आहे अशांतली गोष्ट नाही. अर्थात् **डॉ. आंबेडकर** व **श्री. गाडगीळ** याना वगळण्याचे जे धोरण कार्पोरेशनमधील कॉंग्रेसपक्षाने स्विकारले ते **सदोबानेच** स्वीकारले आणि तेही बुद्धिपुरस्सर स्वीकारले हे उघडच आहे.

## कुऱ्हाडीचा दांडा

म्हणून प्रश्न शिल्लक राहतो तो एवढाच की ह्या दोघा थोर महाराष्ट्रीय पुढाऱ्यांचा जो अपमान **पाटीलकंपूने** केला तो का केला? या प्रश्नाचे मला सुचत असलेले उत्तर हेच आहे की असेंब्लीच्या गेल्या निवडणुकीत **पाटीलकंपूच्या** अस्पृश्य उमेदवारांना **डॉ. आंबेडकरांच्या** उमेदवारांनी मातीत लोळवून त्यांचा जो पाणउतारा मुंबईत केला, आणि स्वातंत्र्यदिनाच्या बेहोषीत सामील न होण्याचा सल्ला **डॉ. आंबेडकरांच्या** अनुयायांनी अस्पृश्य समाजाला देऊन तो कृतीत आणावयास लावला त्याचा हा सूड **आंबेडकरांना** कार्पोरेशनच्या मानपत्राला अपात्र टरवून **सदोबानी** उगविला आहे. आणि **श्री. गाडगीळांच्या** बाबतीत **सदोबानी** स्वीकारलेल्या धोरणाच्या मुळाशी त्यांच्याबद्दल **सदोबाला** वाटणारी निर्भेळ असूया हीच आहे! **मौ. आझाद** हे आपल्या बंगल्यासाठी सुमारे पाऊण लाखाचे फर्निचर सरकारी खर्चाने मिळावे म्हणून आग्रह धरून बसले असता **श्री. गाडगीळ** यांनी त्या कामी मोडता घालून वीस हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मंजूर करण्यास नकार दिला ही गोष्ट **सदोबांना** कदाचित समजली असेल व **मौलाजींना** संतुष्ट करण्यासाठी त्यांच्या एका सहकाऱ्याचा हा असा अपमान करण्यास **सदोबा** उद्युक्त झाले असतील हे कारणही मी नजरेआड करू इच्छित नाही...."

सदर लेखातील मुद्यासंबंधी सहमत प्रदर्शित करणारी **श्री. ल. ना. सावंत, जे वि. म. गुप्ते** आणि **श्रीपत स. घेगजे** यांची पत्रे २१-९-४७ च्या विविध-वृत्तांत प्रसिद्ध झालेली होती. **श्री. घेगजे** यांनी खालील शब्दांत आपला संताप व्यक्त केलेला होता :-

"हा अपमान कॉंग्रेसवाल्यांनी पूज्य बाबासाहेबांचा केला नाही, तर तो अस्पृश्य समाजाचाच अपमान आहे ही आमची सर्वांची भावना आहे. कॉंग्रेसवाले व गांधी-बाबा अस्पृश्यांच्या उद्धाराबद्दल केवढ्याही थापा ल्गावीत असले, तरी मनातून त्यांना पूज्य बाबासाहेबांबद्दल द्वेष वाटतो हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. बाबासाहेबांनी पुणे कराराच्यावेळी कस्तुरबांच्या डोळ्यातले पाणी पाहून गांधींचे प्राण वाचविले आणि कॉंग्रेसवाल्यांचा देव त्यांचे जिवंतपणीच पुतळे उभारण्यासाठी जिवंत ठेवला. त्या

उपकाराची त्या थोर मनाची ही अशी परतफेड काँग्रेसवाल्यांनी करावी हे त्यांच्या कृतघ्नपणाला शोभेसेच आहे......"

"...लंडन युनिव्हर्सिटीचे एम्.एस्सी, डी.एस.सी., होऊन आल्यावर सिडेनहॅम कॉलेजच्या प्रिन्सीपॉलशीपसाठी त्यांनी अर्ज केला असता केवळ महार म्हणून डॉ. रघुनाथपंत परांजपे यांच्यासारख्या सुधारक, हा बुद्धिवादी शिक्षणमंत्री देखील त्यांचा अर्ज मंजूर करायला बिचकला..." हा उतारा श्री. त्र्यंबक विष्णु पर्वते यांनी बाबासाहेबांची मुलाखत घेतली होती. तीची हकिकत त्यांनी "प्रसाद" या मासिकाच्या १ सप्टेंबर १९४७ च्या अंकात

"आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते :

डॉ. भीमराव आंबेडकर"

या शिर्षकाखाली प्रसिद्ध केलेली होती, तीतून हा उतारा घेतलेला आहे. या मुलाखतींत बाबासाहेबांनी समाजवादाची हिंदुथानाला आणि विशेषतः महाराष्ट्राला जरुरी आहे की नाही, याबद्दल आपले विचार प्रदर्शित केलेत. ते येणेप्रमाणे :–

"महाराष्ट्राला समाजवाद स्वीकारल्याशिवाय दुसरी गतीच नाही. उगाच एखादा ब्राह्मण, मराठा अथवा माळी एखाद्या गिरणीचा अथवा साखरेच्या कारखान्याचा मालक झालेला पाहून महाराष्ट्रांत खाजगी भांडवलाच्या आधाराने उत्पादन वाढेल आणि देश श्रीमंत होईल असा भ्रम जर कोणी उत्पन्न करत असतील तर ते महाराष्ट्राचे दुष्मन आहेत असे मी म्हणेन. व्यापार आणि उद्योग या क्षेत्रांत अगोदरच ज्यांनी फार मोठी प्रगती केली आहे त्यांच्याशी आता त्याच क्षेत्रांत शर्यत मारून पहिला नंबर मिळविण्याची आशा महाराष्ट्रांत उत्पन्न झालेल्या व्यापाऱ्यांनी, उद्योगपतींनी अथवा त्यांच्या नांवाने बोलणाऱ्या त्यांच्या बुद्धिजीवी बगलबच्यांनी उत्पन्न करून पाहणे अगदी खुळचटपणाचे आहे. मी माझे मत इतक्या कडक शब्दांत बोलून दाखवितो याचे कारण एवढेच की, महाराष्ट्राची पिछेहाट झाली, महाराष्ट्राचा उत्कर्ष झाला पाहिजे वगैरे प्रकारांनी गळा काढून रडणारे लोक अलीकडे असे बोलू लागले आहेत की, महाराष्ट्राने व्यापारात आणि उद्योगांत लक्ष घालून खूप पैसा मिळविला पाहिजे आणि मग तो देशाच्या कामी लावला पाहिजे, याचा अर्थ असा की, कल्पांतापर्यंत यातली एकही गोष्ट होणार नाही."

"काँग्रेस सोशलिस्टांनी आपले शिक्षणाचे वर्ग तरी निदान चांगले चालविले आहेत असे तुमच्या बोलण्यावरून मला समजले. पण आता आधी उद्योगधंदे वाढावे, भांडवलशाही निर्माण व्हावी, कामगारांचा व समाजाचा त्यांनी आपल्या नफेबाजीसाठी छळ करावा, उभयपक्षांचा संघर्ष व्हावा आणि त्यातून समाजवाद व्हावा इतका "शास्त्रीय" प्रकार घडला पाहिजे तर काही तुमचे म्हणणे नाही ना ? संबंध देशाने एकदमच समाजवादी धोरण आखून भांडवलशाही म्हणजे खाजगी भांडवलशाही

उत्पन्न होण्याची मधली एक पायरी गळून गेली तर मार्क्सच्या तोंडाला काळे फासले जाईल अशी कांही भिती नाही नां? रशियाच्या जिवंत उदाहरणाने तरी तुमची ही भीती जायला पाहिजे. हिंदुस्थानांत व हिंदुस्थानांतील सर्व प्रांतात समाजवादी धोरणाने कारभार सुरू होईपर्यन्त जे काय घडेल ते आपण पाहिले पाहिजे व पसंत नसले तरी सोसले पाहिजे हे मला कबूल आहे. **पण समाजवादी म्हणविणारांची दृष्टी साफ पाहिजे, विचारसरणी गोंधळ-लेली** असतां कामा नये व आपले ध्येय शक्य तितक्या लवकर अमलांत आणण्याच्या दृष्टीने राजकीय आणि सामाजिक चळवळीचा कार्यक्रम आखला गेला पाहिजे असे माझे म्हणणे आहे. काँग्रेसने कितीही वल्गना केल्या तरी तिच्या सध्याच्या पुढाऱ्यांच्या हातून अगदी जवाहरलालांच्या हातून देखील, हे घडण्याची शक्यता नाही. काँग्रेस सोशालिस्टांनी हा भ्रमिष्टपणा टाकला पाहिजे. गांधींच्या, त्यांच्या तत्वज्ञानाच्या आणि काँग्रेसच्या छायेतून झटकून निघून, किंबहूना काँग्रेसला विरोधी बनून पक्ष संघटना केली पाहिजे. अशाच विचारांच्या काँग्रेसबाहेरील मंडळींबरोबर सहकार्य केलेले पाहिजे तरच तुमचे (समाजसत्तावाद्यांचे) उद्दिष्ट साध्य होईल.

काँग्रेस व काँग्रेसपुढारी यांच्याकडून सामाजिक क्रांतीचा कार्यक्रम कधीही पार पडणार नाही, असे जर तुमचे मत आहे तर मग तुम्ही काँग्रेस सरकारात कायदे मंत्रीपद कां स्विकारले? असा प्रश्न विचारला असतां **बाबासाहेब** म्हणाले, "बरा प्रश्न विचारला तुम्ही. असे स्पष्ट व निर्भिड बोलणे मला फार पसंत आहे. सांगतो तुम्हाला मी ही जागा कां पत्करली ते. आतां राजकीय सत्ता हिंदी लोकांच्या हाती आली असता ती सत्ता स्वीकारणारा प्रमुख असा एक राजकीय पक्ष सहकार्यासाठी निमंत्रण करीत आहे आणि आपण असहकार करावा हे मला पसंत नाही, म्हणूनच मी जात आहे. काँग्रेसच्या पक्षसंघटनेत मी सामील झालेलो नाही. त्यामुळे येणारी कोणतीही शिस्तीची बंधने मी पत्करलेली नाहीत. मंत्रीमंडळातील या जागेशिवाय इतरही चार-पांच गोष्टी मला देऊ केल्या होत्या. परंतु त्या सगळ्या मी नाकारल्या. माझे कामच असे असणार की, काँग्रेसच्या राजकीय धोरणाशी माझा वेबनाव आहे असे सांगण्याची वेळच उत्पन्न होणार नाही. शिवाय हे मंत्रीमंडळ दीड दोन वर्षापलिकडे टिकेल असे मला वाटत नाही. हे तात्पुरते सरकार आहे. नवीन निवडणुकी होऊन बहुमताने योग्यप्रकारे निवडून येईल तेच सरकार टिकावू होईल. त्यावेळी काँग्रेस उमेदवार म्हणून मी उभा रहाण्याची कांहीच शक्यता दिसत नाही.

निवडणुकीत उभे रहाणार नाही काय असा प्रश्न केला असतां बाबासाहेब म्हणाले, "राजकारण सोडण्याचा विचार नाही, त्याबद्दल मुळीच काळजी करु नका. काँग्रेसमध्ये आता काय काय बदल होतात, किती पक्षोपक्ष होतात गांधींचे व त्यांच्या विचारसरणीचे वर्चस्व कितीसे टिकते हे येत्या वर्ष दोन वर्षांत अधिक स्पष्ट होत जाईल. परंतु एक गोष्ट मला स्पष्ट दिसते ती म्हणजे काँग्रेसला विरोधी परंतु तत्वनिष्ठ

आणि कार्यक्रमाला बांधलेला असा दुसरा पक्ष निर्माण होण्याची अतिशय आवश्यकता आहे. काँग्रेसच्या आश्रयाने भांडवलदारी आणि तिच्या अनुषंगाने येणारे नफेबाजी, काळा बाजार, लोकांचे हाल या गोष्टी इतक्या असह्य झाल्या आहेत व अधिकाधिक होतील म्हणून त्यांचा प्रतिकार झाला पाहिजे. हल्ली काँग्रेसवाल्यांच्या हाती अनिर्बंध सत्ता असल्यासारखी आहे. त्याचा परिणाम काँग्रेच्या कारभारात वशिलेबाजी, लांचलुचपत, चुकीच्या गोष्टींचेही समर्थन करण्याची प्रवृत्ती वाढणे. अशा प्रकारांत होत आहे. Power corrupts and absolute power corrupts absolutely. अशी पुढे अवस्था होण्याची मला फार भिती वाटते. याला पायबंद घालण्याला एक प्रबल व विरोधी अशी राजकीय पक्षसंघटनाच हवी आणि ती समाजवादी धोरणाचा निःसंदिग्ध स्वीकार करणारीच हवी. अशी जरुरी लोकांना ठिकठिकाणी वाटत आहे. त्याचा फायदा घेणे अवश्य आहे. आमच्या इंडिपेंडंट लेबर पार्टीचे पुनरुज्जीवन, देशांतील इतर समान विचारी मंडळींच्या मदतीने करावे असा माझ्या पुढे विचार आहे. मुंबईतील आणि महाराष्ट्रातील पुष्कळ काँग्रेस पक्षीयांनी देखील अशाप्रकारचे बोलणे, मजजवळ केलेले आहे. भावी पक्षसंघटनेच्या दृष्टीने मला ते फार महत्वाचे वाटते."

सद्या कणखर पुढाऱ्यांची महाराष्ट्राला फार जरुरी आहे व तरूण पिढी यासाठी आपणांकडे आशाळभूत नजरेने पहात आहे व सध्यांचा काळ प्रतिकूल असल्यामुळे आपण हे पुढारीपण स्वीकारावे, अशा अर्थाची सूचना पुढे केली असता बाबासाहेब म्हणाले, "तुम्ही म्हणता अशा प्रकारचे उत्तेजन मला महाराष्ट्रातून मिळाले आहे, असे म्हणता येणार नाही. एक तर जन्माने महार म्हणून महाराष्ट्रातील किंवा हिन्दुस्थानातील शहाण्या किंवा साक्षर समाजाला माझा किंवा माझ्या पक्षाचा स्वीकार करणे जड वाटले. काही साफ नजरेचे, ध्येयनिष्ठ, बुद्धिवादी असे ब्राह्मण किंवा इतर पांढरपेशे आमच्याजवळ आले. परंतु बहुतेक पूर्वग्रहामुळे बाजूसच राहिले. आता हे अंतर पुष्कळ कमी झाले आहे. कायद्याने, लढ्याने, संवयीने ते आणखी कमी होईल अशीही उमेद वाटते. परंतु मला स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, एखाद्या व्यक्तिवरच विसंबून, तिच्यावर सर्वस्वी निष्ठा ठेवून, आंधळी भक्ती ठेवून या पुढील राजकारण चालणार नाही. **गांधींच्याबर** असली अंधश्रद्धा ठेवून, त्यांचा भलताच उदोउदो करून हिंदुस्थानाने आपले नुकसान करून घेतलेले आहे. असे यापुढे कोणाच्याच बाबतीत घडता कामा नये. पुढारी अगदी डोळसपणे निवडला पाहिजे. त्याचे वर्तन अगदी डोळ्यात तेल घालून पाहिले पाहिजे, पदच्युत करण्याची वेळ आली तर डरता कामा नये. इंग्लंडमध्ये पहा. **चर्चिलला** एकेकाळी भजणारे लोक त्याचे काम संपताच त्याला अलगद उचलून बाजूस ठेऊ शकले. आमची लोकशाही देखील अशीच डोळस झाली पाहिजे. स्वातंत्र्य व समता यांच्या मर्यादा आम्ही ओळखायला शिकले पाहिजे. मी जर एखाद्या राजकीय पक्षाचे धुरीणत्व करायचे असेल तर माझ्या पक्षातील लोकांना असे शिक्षण मिळाले पाहिजे असा माझा आग्रह आहे."

श्री. पर्वते यांनी आपल्या मुलाखतींतील लेखात शेवटी खालीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे :—

" क्रांतीची आपली कल्पना सांगताना आंबेडकर दहा वर्षांपूर्वी म्हणाले, "समाजवादी म्हणविणाऱ्या कोणालाही क्रांतीची कल्पना सांगणे सोपे आहे. प्रत्येक मनुष्यप्राण्याला केवळ पशूप्रमाणे पोट भरण्यासाठी दिवसाचे बारा चौदा तास शारिरीक मेहेनतीसाठी खर्च करायला लागावे आणि विकासवादाच्या तत्वाप्रमाणे त्याला प्राप्त झालेल्या बुद्धि, मन वगैरेंच्या उन्नतीसाठी काहीच फुरसद मिळू नये ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. शास्त्रीय प्रगतीने दर एक मनुष्याला फुरसद मिळवून देणे शक्य केले आहे. पण सर्व शास्त्रीय शोध, उपकरणे त्यांच्या योगाने चालणारी उत्पादक यंत्रसामुग्री यावर समाजाचा सामुदायिक ताबा नसल्यामुळे, त्यांचा उपयोग फक्त खाजगी मिळकतीच्या मालक वर्गालाच होतो. प्रत्येक मनुष्याला ही संधी मिळत नाही. ती मिळणे म्हणजेच समाजवादी क्रांती होणे असे मी समजतो. गांधींचा व त्यांचे अनुयायी म्हणविणारे यांच्यात येथे मुळातच मतभेद आहे. मनुष्यप्राण्याचा सृष्टिवरोबर आजतागायत जो झगडा चालू आहे त्यांत सृष्टिवर विजय असा मनुष्याला हल्लीच प्राप्त झालेला आहे. त्याचे सर्व फायदे घेऊन मनुष्यप्राण्याला जास्तीत जास्त सुखी करणे व सुसंस्कृत करणे, गांधीवादाला मंजूर नाही. दोन बैलांबरोबर काम करणारा तिसरा बैल शेतकऱ्याला बनवून, त्याच्या कारभारणीला—चरख्याला जुंपून, उच्चतर सुखे त्याला मिळण्याची काही जरुरी नाही, अशी व्यवस्था करणे हे गांधीवादाचे रहस्य आहे. म्हणूनच गांधीवाद कधीही समाजक्रांतीवाद होऊ शकणार नाही, आपण त्याच्याजवळ जाऊन चालणार नाही."

सिद्धार्थ कॉलेज पार्लमेंटचा उद्घाटन समारंभ बाबासाहेबांच्या हस्ते २५–९–४७ ला सकाळी ८–३० वाजता झाला. तेव्हा त्यांनी एक छोटेसे भाषण केले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मुसलमान व शीख समाजाचे हितसंरक्षण केले पण अस्पृश्य समाजाला नुसती वचने देत झुलवत ठेवले व त्याचा विश्वासघात करून ते ब्रिटिश लोक हिंदुस्थानांतून निघून गेले. तेव्हा अस्पृश्य समाजाने स्वतःच्या सामर्थ्याने आपला झगडा चालविणे जरुर आहे. घटना समितीच्या निरनिराळ्या कमिट्यांमधून मी अस्पृश्यांच्या संरक्षणासाठी खटपटी केल्या त्या पाहून मुसलमान व शीख यांनीही तसे प्रयत्न स्वतःच्या समाजासाठी केले. आश्चर्याची गोष्ट ही की, मुसलमान व शीख समाजांच्या मागण्यांना कोणी विरोध केला नाही. मी अपृश्यांसाठी ज्या मागण्या मागितल्या त्यांना राष्ट्रीय हरिजन म्हणविणारे सभासद व सरदार पटेल यांनी कमिट्यांच्या बैठकीत प्रथम पाठिंबा दिला आणि घटना समितीत त्या मागण्या मंजूर करण्यासाठी मी जेव्हा भाषण केले तेव्हा त्या मागण्या राष्ट्रहिताला बाधक आहेत, या मुख्य मुद्यावर भर देऊन राष्ट्रीय हरिजन सभासदांनी एक पत्रक, घटना समितीत वाटले व माझ्या प्रयत्नांना विरोध दर्शविला. या सर्व विश्वासघातकी परिस्थितीमुळे मला सर्व मागण्या घटना समितीत

मंजूर करून घेता आल्या नाहीत. तरी पण ज्या काही करून घेता आल्या. आता यापुढे अस्पृश्य समाजाने स्वतःच्या हिंमतीने आपला झगडा पुढे चालविला पाहिजे.

**विद्यार्थ्यांनी प्रथम अभ्यास करावा व मग राजकारणाची माहिती करून घ्यावी. ती माहिती चिकीत्सक दृष्टीने घ्यावी. अंधश्रद्धेने अगर पक्षांधतेने घेऊ नये. राजकारणात भाग घ्यावा. तोही याच भूमिकेतून. आपण सिडनहॅम कॉलेजमध्ये प्रोफेसर असतांना कसे भावनावश होत असू याचीहि माहिती बाबासाहेबांनी सांगितली. विद्यार्थ्यांनी सर्व सद्‌गुणांची वाढ करावी, आणि राजकारण लोकशाही पद्धतीने कसे चालते याचा अभ्यास करावा. ते भाषण असेः—**

"I have not got any clear line of action before me for the present, and so I am thinking to speak in a military way. This independence has come so sudden that we had time to recall our forces and we had no time to arrange our forces even.

The British in spite of their promises to us for the last fifty years, in the end, deceived us in not recognising the Scheduled Castes as a separate political entity. They did not help us in the task. They helped the Musalmans and Sikhs. It is very curious to note at this stage as to why the British helped only the Musalmans, Sikhs and not the Scheduled Castes. We are left with no support. We had to depend upon nothing else but our own strength. And as you well know that this strength also was divided in the eyes of the British Political surveyers like Cripps and his fellow friends in the delegation. They saw this division because of the separate organisation of the so called Harijan party. It is true and was true in reality that the Scheduled Castes Federation was the only representative body of the Scheduled Castes.

I am glad to say that, when I had been to England and discussed with many of the leaders of different political groups there, the permanent parliamentary Secretaries, who were in day-to-day touch of the Indian situation, had fully supported my saying that the Scheduled Castes Federation was the only representative body of the Scheduled Castes. Not only that but people like Mr. Cripps and many like him

were convinced by my mission, but inspite of this the British Delegation over-ruled everything, because they wanted to take political decision for their safety even though it was far from reality, and thus they took the political decision at our cost. This loss to the Scheduled Castes was due to the shameless attitude taken by the Raashtriya Harijans. in the Minority Sub-Committee I stressed our demand for separate electroate by suggesting a solution that a successful candidate should at last secure 35% of the votes of the community he represented but there, the hasty action of the Muslim group in leaving the hall at the time of voting made my proposal to secure equal votes for and against, i.e. 7 v/s 7. I tried myself in the Advisory Committee and a strange thing is that Mr. Manuswami Pillay, Speaker from the Madras Assembly, supported my amendment Mr. Vallabhbhai Patel also did not vote against it. But in the General Constituent Assembly, Mr. Pillay one of my supporters, was one of the signatories to oppose this proposal. I was struck with wonder to all this. This is the second crooked role played by the Rashtriya Harijans to the permanent annoyance and common interest of the Scheduled Castes at large It is for these reasons that I have not any clear line of action for the present.

Now, I must tell you one thing that the separate electorates alone are not only ends and means of the Scheduled Castes Federation. Separate electorates with our means are good but in themselves, they are bad. You have got the separate electorates but no political safeguards. I don't know what will be their lot. I could succeed in getting you some political safeguards in Legislative Assemblies and services. It is because of my efforts that the rest of the minorities like Sikhs, Indian Christians and Muslims have some safeguards. Because it was only myself, who was so very insistent on this demand, the Constituent Assembly had no courage to displease me at this stage. I am glad to say that I could serve the minorities in the real sense of the term.

It is likely that you should have been disappointed and I am also not so much happy about it. Even then ever have got to play our role in the future. I would like to tell you about the history of the British Labour party. That party during the last 24 years has developed so much that today it has its rule. The same party, when it was first organised, practically had no representation in the Parliament. What does it show? It shows that not the success at the election is the victory of the party, but the success of the principles and programme is the victory of the party. And I have no doubt that the Scheduled Castes Federation will have its role for the principles it stands for. It is for this, that I am not disappointed at all. It is for this reason that we must be aware of the following three things :—

(i) The Scheduled Castes Federation must maintain its political existence under whatever circumstances. We have got the history of the Non-Brahmin party before us. Before Congress came into prominence the All India Non-Brahmin Party was in its zenith. But when the leaders of the Non-Brahmin Party went individually in Congress for their individual purposes they were as if purchased, and as such, they had no voice in Congress then and even now. Even though they are a vast majority they are ruled and their aid is greater responsible than the individual;

(ii) You should have very able leaders. Your leaders must have the courage and calibre to match the topmost leaders in any political party. The party without efficient leaders comes to nil. The defeat of the British Labour Party in 1931 was due to this fact. And this is equally applicable to the Non-Brahmin Party in India;

(iii) In any party, just as the honest leadership which can never be sold is of vital importance in the same way, devoted workers in the party is the second important thing essential for the growth of the party. The Scheduled Castes Federation has to create many but none to my satisfaction. In one way, the Scheduled Castes Federation has no to worry about because their leader will never be sold at whatever

cost; but what of the rest of the organs ? When will they come up to the mark ? It is upto you to fulfill my need. I repeatedly tell you that the Scheduled Castes Federation must maintain its political existence, not in my individual interest, but for you and me.

In the end, I tell you, make proper use of the facilities provided by the Siddharth College. I hope that therein only I shall be able to watch the rising star to the occasion to lead the Scheduled Castes and will prove his worth. Every man has two temptation in the world, first, the money and secondly, the wife and then the children follows. It is but natural; but our people do not understand the meaning of a few children. Then in the gulf, they have no time to look where Scheduled Castes stand. So it is upto you to stand to the need of the Scheduled Castes, at large. You must be able to create devoted workers. I do not know when our forces will be needed; but we should be on our guard to wait and see.

Hitherto you must have noticed that while a large majority of our students had been interesting themselves in political movements they had not a clear realisation of what politics means, what responsibilities it involves and what methods must be pursued in order to bring political activities to function. There was, as I observe it, a complete dissociation of what we call academic life from the practical problems of life and politics. You will have to do two things :—

(i) to enlarge your minds, your vision, your capacity to think, your ability to solve problem; and

(ii) to bring that capacity, that vision, that ability to form judgement to bear upon the actual problems which the vast mass of the people of this country are facing today.

It is no more going to be a mere incubation in our solitary room, in a chemistry, or physics laboratory, it is something much wider than that. You will not merely learn political economy, political science, history, commerce, trade, currency, all the subjects which touch upon the practical life of people, but you will use that teaching, that learning

to suggest not merely to yourselves but to the politicians in charge of the affairs of this country what are the right solutions, of the problems before them and where they are going wrong.

There is one other thing which you must also remember and it is this. In an autocracy where the laws are made by the wishes of a dictator or by an absolute monarch the art of speaking is unnecessary. No autocrat, no absolute monarch need pay any attetion to eloquence because his will is law. But in a parliament where laws are made, no doubt by the wishes of the people, the man who succeeds in winning our opposition is the man who possessses the art to persuade his oppanent. You cannot win over a majority in this house by giving a black eye to your opponent. A minority is not going to curb a majority by bringing goondas nor is the majority going to record and obtain a victory by laying low the members of the minority. You will have to carry a proposition only by the art of speaking, by persuading his opponent, by winning him over his side by argument, either gentle or strong, but always logically and instructively. Therefore, a supreme qualification for success in a parliamentary institution is the capacity to possess the House. Therefore you should go to Parliament fully prepared to make a serious contribution to a serious subject and I also want to add that you should learn, very seriously the art of public speaking. It is not a very difficult art as I can tell you from my own experience. I am not a very great speaker and I do not know if anybody who would care to write the history of people in India who have played their part in Indian politics would find and justification to put me among the best speakers in India. I do not covet that honour. At one time I was so much overwhelmed by my shyness which made me so nervous that I was on the point of giving up a job of a Professor in the Sydengam College for nothing else except for the fear that the boys will probably run me down. But I can assure those of you who have similar fear to cast it away and to make an effort

to acquire the command over language which is not a very difficult task at all.

Then there must be absolute unconditional obedience to the ruling of the Speaker. You must never question the ruling of the Speaker. If there is a difficult point of order on which there is no percedent on which he cannot off hand give his ruling he will call on different sides of the house to express their point of view as to what is the correct interpretation of a certain ruling. But after he has heard all the sides and proceeds to give his ruling then that ruling you must accept as sacrament. No matter how wrong that ruling is. I have been in parliamentary institutions from 1926 to 1946 with a very short break. I have known speakers of different varieties, good and others but we have observed the ruling. You can move a motion that a certain standing order to be amended.

It is unfortunate that you have no opportunity of what I call 'visual institutions' of how parliaments work. If you get a chance to go to Paris and see the actual session there or to London and see the House of Commons or go to the U.S.A. and see the House of Representatives you will see wonderful difference between all these three bodies. In Paris you will see a wonderful assembly. Once I went to the Lower House in Paris on two or three successive days. I could not distinguish that august assembly from the Crawford Market. People were moving from one place to another, from one corner to another, there was no order, nobody was listening to the Speaker, the poor Speaker had a big log of wood on his table and big hammer also of wood. He continuously hammered, there was no attention paid to him. But just the opposite was the condition in the House of Commons. There is a rule that no member can stand in the chair when the Speaker is standing. Every member must sit. When one member is standing no other member can stand in the chair. He must sit and listen. No member can begin to speak in the House of Commons unless the Speaker calls on him. There is no duty nor obligation on

the Speaker to call upon any particular individual to speak. There is a phrase "That the Speaker calls upon such person as are able to catch his eye." That is a very delusive phrase— A Speaker may catch an eye and may deliberately wink at it. The reason is obvious. The Speaker having been in the chair for a number of years knows every individual, knows his good points, knows his bad points. As that he does is now known as his family history. He rarely allows a man to speak who is tedious, and who speaks but says nothing.

We have today what is called parliamentary democracy. Let us know that word. It is a very singular institution. It differs from autocracy or unlimited monarchy because in autocracy or unlimited monarchy there is no such thing as parliament. People's wishes count for nothing. The King or the autocrat is the sole master of the situation. He claims to represent the will of the people and governs the people according to what might be called his own will.

We have another system in vogue which is called today the dictatorship of the proletariat. The difference between the two from our point of view is very minor. Autocracy has taken upon itself the obligation to serve what are called the masses but fundamentally this kind of dictatorship does not materially differ from absolute monarchy because in neither of them the people play any part. Parliamentary democracy is a midway between the two. It is very delicate institution. Its characteristics ought to be noted very carefully in order that no violence has been described by a variety of political philosophers in a variety of different ways Parliamentary defocracy has been described as government by law. At one time this characteristic of parliamentary democracy that it was government by law was undoubtedly very significant very real. When monarchy was abolished in Europe and parliamentary democracy came into being and became operative the generation which saw this change from absolute monarchy to parliamentary democracy could well understand that the description of the parliamentary democracy as government by law was indeed very real

and very significant. Because before it the rule was personal rule. The ruler depended upon his wishes in the first place. Secondly, he always placed himself above the law. The law was for the people and not for himself. The rule of law which we now enjoy is a well established principle. We have so become used to it that we do not regard it as a matter of great virtue. But the significant fact that remains even now is that when we make the law we place even the makers of law below that law.

Some one has also said that parliamentary democracy is a democracy by majority. It is true that in our legislation there is a rule that all questions shall be decided by a majority. But I could ask to be very careful about that principle. It is one of the most dangerous principle that we have got. The majority rule has been admitted merely for reasons for convenience. But for God's sake do not ride that principle too much. You will create a great deal of difficulties. In a certain sense the rule of majority is the wrong rule. I am prepared to argue that case. Let me illustrate. We are engaged in framing a constitution. I have been placed at the head of it as its chairman. We have to guard the fundamental rights of the minorities. Do not forget that the fundamental right means that the majority has no right to do a certain thing. That is the meaning of the fundamental right. The fundamental right in a constitution puts absolute limitation upon the power of the majority to do a certain thing. As a matter of fact the majority rule has come but by what I call a fluke.

If you examine the procedure of the House of Commons and the History of it, you will find that about the year fourteen fifteen hundreds of (what happened was this that) a motion was moved in the House of Commons : those in favour went and sat in one lobby, those who were against it sat in the other lobby. The Speaker asked the clerk how many were in Ayes lobby and how many in Noes lobby. He was told that there were 20 in the Noe's lobby and 50 in the Ayes lobby. The Speaker did not declare the

result of the motion. What he did was to tell the Ayes lobby to go into the Noes lobby and to persuade them to come and sit in the house and then only he declared the result. What does that mean, something very significant, that the majority cannot have a decision in its favour unless the speaker was confident that the minority, if not actively at least passively was prepared to give consent. That was the original procedure. Later on for some reason this practice or this obligation upon the majority to go out and persuade their brethren in the opposite side to come back and to listen was dropped. However, although parliamentary democracy for the purpose accepted the principle of a majority rule do not think that you can by any way you like ill-treat or put to a disadvantage a minority. You will create a great deal of trouble for yourself in this very house. The minority must always be won over. It must never be dictated to.

There was another political philosophy — Walter Bagehot. He described parliamentary government as a government of discussion, which I think is a very true description of parliamentary government. In a parliamentary government nothing is done behind the certain, nothing is done as a result of the wishes of any particular individuals. Every subject is brought before the house either in the form of a bill or in the form of a resolution or some other motion.

When it is placed before the house it can be debated upon. It is a pity, a great pity, that we have not followed the great parliamentary practice of accepting of what we call the motion known as "enclosure"a (Here the Speaker narrated in brief how Parnell harrassed Gladstone and Lord North brook by making some of 48 hours, 36 hours and 24 hours and as a result of this how the practice of "enclosure" was brought into opposition).

However, notwithstanding the fact that all the legislatures now do have such a rule that the debate be closed and the question be put, there is always enough time for discussion. Remember that the discussion that taken place

in the parliament has relevance not merely to the decision of the issue which it indoubtedly has, but has far wider relevance and far wider significance. If the debate is on high level and is properly reported in the papers, obviously there cannot be a greater medium of political education for the people in general than a debate in the House of Commons. This, therefore, is a very important aspect.

It has been said that the parliamentary government is a self-government. No doubt logically it is so. But the most important thing that you will most remember is that what the country needs is a good government and the question is how can you have a good government? A very important question! I do not wish to dogmatice. There are one or two observations which I would like to place for your consideration because they need serious consideration. In my judgment there can be no dogma as to what consitutes good government. Different people may draw different ideas of good government. The capitalists think that a capitalist form of government where there is a laise faire is a good sort of government, the socialists on the other hand think that the socialistic form of government is a good government there might be a vairety of other people of their own brand. The fact is that there are a variety of opinions as to what consitutes good government. In a complex society, such as ours, with all its different ramifications, no sovereign remedy may be possible."

DR. B. R. AMBEDKAR — 26TH OCTOBER 1947.

The Census of India has over a number of decades ceased to be an operation in demography. It has become a Political affair. Every community seems to be attempting to artificially augument its numbers at the cost of some other community for the sake of capturing greater and greater degree of political power in its own hands. The Scheduled castes seem to have been made a common victim for the satisfactoin of the combined greed of the other communities who through their propagandists or enumerators are able to control the operations and the results of the census.

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र

## खंड दहावा

### प्रकरण २

## स्वातंत्र्यानंतर (पुढे चालू)

पाकिस्ताननिर्मितीनंतर बंगाल व पंजाब प्रांतात हिंदू व मुसलमान यांच्यात द्वेषभावना कमालीची वाढली व परस्परात न भूतो न भविष्यति असा रक्तपात झाला. या दुफळीचे परिणाम दोन्ही पक्षांना भोगावे लागले. कित्येक कुटुंबे धुळीस मिळाली, आणि कित्येकांचा निर्वंश झाला. या यादवीचे दुष्परिणाम या भागातील अस्पृश्याना फारच भोगावे लागले. पाकिस्तानातील भागातून, हिंदुस्थानातील पंजाब व बंगाल प्रांतात आलेल्या अस्पृश्यांना, हिंदू, मुसलमान, शीख व जाट यांच्याकडून कसे हाल अपेष्टा व अन्याय सोसावे लागतात, याबद्दलची पत्रे सदर निर्वासित अस्पृश्याकडून बाबासाहेबाना येत. याबद्दलची माहिती देणारे पत्र साहेबांनी १८–१२–४७ ला जवाहरलालजींना लिहिले. १) पाकिस्तान सरकार अस्पृश्यांना हिंदुस्थानांत येऊन राहण्यास संमति देत नाही. आणि भंगीकाम करणाऱ्या अस्पृश्यांना तर ते सरकार आपल्या तावडीतून मुक्त करण्यास नाखूष आहे. या सर्व लोकांनी पाकिस्तानात दरिद्री कामगार म्हणून रहावे, अशीच पाकिस्तान सरकारची इच्छा स्पष्ट होते. २) पाकिस्तान सोडून हिंदुस्थानात येऊन रहाण्याची ज्या अस्पृश्यांची इच्छा आहे, त्या अस्पृश्यांना साह्य करण्याचे कार्य एम्. ई. ओ. ही संस्था करित आहे. परंतु पाकिस्तान सरकार या संस्थेच्या कार्यात अनेक अडथळे उत्पन्न करीत आहे. ही संस्था बंद होणार आहे असे समजते. हे खरे असेल तर पाकिस्तानातून येणाऱ्या अस्पृश्य निर्वासिताना कोणी त्राता रहाणार नाही. ३) म्हणून भारत सरकारने पुढील गोष्टी ताबडतोब केल्या पाहिजेत– अ) पाकिस्तान सरकारने अस्पृश्य निर्वासितांच्या स्थलांतराच्या कार्यात अडथळे आणू

नयेत, असे सदर सरकारास सांगणे. ब) एम्. ई. ओ. या संस्थेला अस्पृश्यांच्या स्थलांतराचे कार्य करु देणे, असे सदर सरकारांस सांगणे. आणि क) अस्पृश्यांच्या स्थलांतराचे कार्य पूर्ण झाल्यानंतरच ही संस्था भारत सरकारने बंद करावी. ४) पश्चिम पंजाबच्या अस्पृश्य निर्वासिताना साह्य देण्यास भारत सरकारने एक अस्पृश्य अधिकारी नेमलेला आहे. सरहद्द प्रांत, सिंध व भावल्पूर या प्रांतातील अस्पृश्य निर्वासितांसाठी अस्पृश्य अधिकारी नेमलेले नाहीत.

पूर्व पंजाबात जे अस्पृश्य निर्वासित आलेले आहेत त्यांनी आपल्या अडचणी मला कळविलेल्या आहेत :– १) निर्वासितांसाठी ज्या वसाहती भारत सरकारने उघडलेल्या आहेत. तेथे सवर्ण हिंदूकडे अधिकारी जास्त लक्ष देतात, आणि अस्पृश्य निर्वासितांची उपेक्षा व अवहेलना करतात : अस्पृश्य निर्वासितांना सदर वसाहतीतही राहू देण्यात येत नाही. २) जे निर्वासित वसाहतीत रहातात त्यांनाच वसाहतीची सर्व प्रकारची सरकारची मदत– अन्न, वस्त्र, औषध वगैरे मिळते, असा नियम असल्यामुळे वसाहतीबाहेर रहाणाऱ्या अस्पृश्य निर्वासितांचे फार हाल होतात. स्पृश्य व अस्पृश्य निर्वासितांना जे वसाहतीत साह्य दिले जाते त्यांत पंक्तिप्रपंच होणे अटळ आहे. परंतु वसाहतीबाहेर जे अस्पृश्य निर्वासित रहातात त्यांनाही सर्व सरकारी सहाय्य देण्यासाठी सरकारी नियमांत योग्य ते फेरफार करावेत. ४) पूर्व पंजाबच्या राज्याची सूत्रे हिंदूंच्या हातांत असल्यामुळे सदर सरकारतर्फे अस्पृश्य निर्वासितांना सदर सरकारकडून मदत मिळत नाही व ही गोष्ट सदर सरकारच्या दृष्टिस आणणारी एखादी संस्था भारत सरकारने नेमलेली नाही. ५) भारत सरकारने अस्पृश्यांतील काही अधिकारी पूर्व पंजाबात नेमले तर ते अस्पृश्यांना योग्य त्या प्रमाणात जमीनी मिळतात की नाही ते डोळ्यांत तेल घालून पाहू शकतील. अशा प्रकारच्या लायक अस्पृश्य लोकांची नेमणूक व्हावी म्हणून त्यांची नावे मी सन्माननीय भारतमंत्री श्री. नियोगी यांच्याकडे पाठविलेली आहेत. ६) पूर्व पंजाबात शीख व जाट हे लोक बहुसंख्य असून फार प्रबळ आहेत. आणि अस्पृश्यांनी आपली घरे व शेते सोडून तेथून स्थलांतर करावे म्हणून ते अस्पृश्यांना परोपरीने छळत आहेत. या अस्पृश्यांची घरे व शेते आपण बळकवावीत असा त्यांचा हेतू आहे. हे उघड आहे. अस्पृश्यांनी या छळाविरुद्ध कितीही आरडाओरड केली तरी त्यांना न्याय मिळत नाही. कारण शीख व जाट हेच पोलीस व न्याय या खात्यांत भरलेले आहेत. ते आपल्या भाईबंदांना पाठिंबा देतात व अस्पृश्यांना दूर ठेवतात. म्हणून निदान ३०० अस्पृश्यांची पोलीस खात्यात भरती करण्यास पूर्व पंजाब सरकारला भाग पाडले पाहिजे. वर्तमानपत्रांत असे प्रसिद्ध झाले आहे की, ही भरती सरहद्दीवरील पोलीसांसाठी करण्यात आलेली आहे. मुलकी पोलीसांसाठी नव्हे. पूर्व पंजाबच्या मुलकी पोलीस खात्यांत एकही अस्पृश्य नाही असे मला समजते. म्हणून या खात्यात ३०० अस्पृश्यांची भरती करणे अत्यंत आवश्यक आहे. ७) पूर्व पंजाबातील सारा पद्धतीप्रमाणे

जमिनदार व कामिन असे शेतकऱ्यांचे दोन वर्ग आहेत. जमीनदार हे जमिनीचे संपूर्णतया मालक असतात. कामिन यांना जमीन विकत घेण्याचा हक्क नाही व ते जमिनीचे मालक कधीही होऊ शकत नाहीत. त्यांची घरे ज्या जमिनीवर असतात त्या जमिनीचे मालक जमीनदार हेच असतात. यामुळे कामीन हा जमीनदारांचा वंश-परंपरेने झालेला, गुलाम होतो व तो तसाच जीवन जगतो. जमीनदार कामीनांची घरे उध्वस्त करू शकतो व त्यांना गावातून हाकलून देऊ शकतो. पूर्व पंजाबातील अस्पृश्य लोक यांना कामीन म्हणून मानण्यात येते व ते त्यांचे जीवन जमीनदाराच्या कृपा कटाक्षावर अवलंबून असते. ज्या सारा पद्धतीमुळे हे अनिष्ट भेद उत्पन्न झालेले आहेत ते भेद नष्ट करावेत व त्यासाठी ती पद्धतच आमूलाग्र बदलून टाकावी, आणि रयतवारी पद्धत अंमलात आणावी. म्हणजे सर्व नागरीकांना समान दर्जा मिळेल व त्यांना जमिन विकत घेणे, धारण करणे व विकणे, याचे सर्व मालकी हक्क प्राप्त होतील ८) शेतकऱ्यांना सावकारांपासून संरक्षण मिळावे म्हणून पूर्व पंजाब सरकारने एक कायदा केलेला आहे. त्यात शेतकरी ही एक जात आहे असे एक कलम आहे. अस्पृश्य लोक जमीनदारांच्या शेतात काम करतात व शेतकरी ही एक त्यांची जात होते. बहुतेक सर्व अस्पृश्य शेतकीचा धंदा अगर रोजगार करतात ते पूर्वपरंपरेने. पूर्वीच्या पंजाब सरकारने शेतकी करणाऱ्यांना अस्पृश्य समजलेले नव्हते. अस्पृश्य ही एक जात होती व ती कोणताही धंदा करण्यास मुखत्यार होती. पण आता तिने फक्त शेतकीचाच धंदा केला पाहिजे व तो परंपरेने आलेल्या जमीनदारांच्या शेतात, अशी स्थिती झालेली आहे. त्यामुळे अस्पृश्यांना फक्त शेतमजूर म्हणूनच हिंदू, शीख, जाट वगैरे जमीनदारांचे गुलाम बनून रहावे लागते. जमीनीचा मालक म्हणून त्याला स्वतंत्र जीवन जगण्याचा मार्ग कायमचा बंद झालेला आहे. ९) पूर्व पंजाबात जी सारा पद्धत चालू आहे व तिला ज्या कायद्याचा आधार आहे, ती पद्धत व तो कायदा बदलणे अत्यंत जरूर आहे. शेतकरी या शब्दाची व्याख्या, अस्पृश्य जातीचा अशी न करता शेतात काम करणारा, मग तो कोणत्याही धर्माचा व जातीचा असो, अशी केली पाहिजे. तरच अस्पृश्यांना जमीनदारांच्या गुलामगिरीतून आपली सोडवणूक करून घेता येईल.

पूर्व पंजाबातील अस्पृश्यांच्या दुःस्थितीची माहिती व ती दुःस्थिती कशी दूर करावी, याबद्दलचे चित्र मी आपणांपुढे ठेवलेले आहे. भारत सरकार व पूर्व पंजाब सरकार या दोघांनाही, ही दुःस्थिती नष्ट करण्यासाठी योग्य ती उपाय योजना करता येईल. मात्र हे उपाय योजण्याची त्यांची मनापासून इच्छा असली पाहिजे. निर्वासितांच्या आयुष्याला स्थिरस्थावरता आणण्यासाठी भारत सरकार पैसा खर्च करते. त्यांत प्रांतिक सरकारलाही मोठे कार्यक्षेत्र आहे. पूर्व पंजाब सरकारने अस्पृश्यांच्या बाबतीत जे विरोधी धोरण स्विकारले आहे, ते बदलण्याची सक्ती भारत सरकार करु शकते. मुसलमानांच्या प्रश्नांना भारत सरकार व पूर्व पंजाब सरकार सारखेच महत्व

देतात. अस्पृश्यांचा प्रश्न मुसल्मानांच्या प्रश्नांपेक्षा फार व्यापक आहे. तरी पण भारत सरकार व पूर्व पंजाब सरकार हेदोघेही त्याकडे लक्ष देत नाहीत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. ही परिस्थिती आणि पाकिस्तानांतील अस्पृश्यांची दैनावस्था, ही वर्तमानपत्राद्वारे जगाच्या निदर्शनास आणावी, असे मला वेळोवेळी वाटत असे. परंतु आसपासच्या परिस्थितीचा विचार केल्यानंतर या दुःखाला वाचा फोडण्याचे मी रहित केले. कामाच्या व्यापामुळे आपणाला अस्पृश्यांच्या कर्मकहाणीकडे लक्ष पुरविण्यास सवड झाली नसेल, याची मला जाणीव आहे. तथापि, या प्रश्नाकडे असे उदासीनपणे पहात बसणे मला पटत नसल्यामुळे ही परिस्थिती निवारण करण्याचे वरील मार्ग मी आपणाला सुचविलेले आहेत. त्या मार्गाशिवाय इतर मार्ग आपणाला सुचत असतील तर त्यांची आपण अवश्य व तावडतोब अंमलबजावणी करणे; एवढीच माझी आपणाला विनंती आहे. ती आपण मान्य कराल तर मी आपला अत्यंत ऋणी होईन.

साहेबांच्या ज्या पत्राचा वरील सारांश आहे ते पत्र मी खाली देत आहे :-

**Vol. X (2)**

**3303 to 3310**

"New Delhi, the 18th December 1947.

My dear Shri Jawaharlal,

I have been receiving so many complaints from the Scheduled Caste evacuees who come over from Pakistan to India as well as from those who have been looked up by the Pakistan Government and prevented from coming over to India that I feel that the time has come for me to draw your attention to their sufferings. For the purpose of giving you an idea of what is happening and what is requir-ed to be done, I am setting out beolw the causes of their sufferings and the measures that should be adopted to remove them.

I

(1) The Pakistan Government are preventing in every possible way the evacuation of the Scheduled Castes from their territory. The reason behind this seems to me that they want the Scheduled Castes to remain in Pakistan to do the menial job and to serve as landless labourers for the land-holding population of Pakistan. The Pakistan Government is particularly anxious to impound the sweepers whom they have declared as persons belonging to Essential services

and whom they are not prepared to release except on one month's notice.

(2) The organisation known as the M.E.O. has been of some use in helping the Scedule Caste refugees who are anxious to evacuate. I, however understand that the Pakistan Government is not permitting the M.E.O. to get into direct touch with the Scheduled Castes who want to evacuate.. Consequently, the process of evacuating the Scheduled Castes is goining very slowly, and in some places it is at a standstill. I am also told that the M.E.O. is going to be closed very soon. If this happens then the evacuation of the Scheduled Castes from Pakistan would be quite impossible.

(3) What is necessary to do is:—

(a) to ask the Pakistan Government not to place any obstacles in the way of the evacuation of the Scheduled Castes, (b) to allow the M.E.O. to get into direct touch with Scheduled Castes and wish to evacuate; (c) to maintain the M.E.C. till all the Scheduled Castes aer evacuated.

(4) So far the Ministry of Relief and Rehabilitation has appointed only one officer from the Scheduled Castes to West Punjab. But other Provinces of Pakistan such as N.W.F.P., Sind and Bhawalpur are left over and for which no such officer has been appointed. The Ministry should be directed to make appointments to these areas forthwith to that special officers could tour the Pakistan area and find cut the places where the Scheduled Castes are prevented by the Pakistan Government from coming over.

II

With regard to those Scheduled Castes who have come over from Pakistan to Eastern Punjab, they have also sent their complaints. They are far more numerous than those coming from persons who are impounded in Pakistan. I have their gist below:—

(i)

(1) The Scheduled Castes evacuees who have come to Eastern Punjab are not living in the refugees camps established by the Government of India. The reason is that the officers in charge of these refugees camps discriminate between the caste Hindu refugees and the Scheduled Caste refugees.

(2) It appears that the Relief and Rehabilitation Department has made a rule that it is only that refugees who are staying in the Relief Camps can receive rations, clothing, etc. On account of their not staying in the Refugee Camps for the reason mentioned above, the Scheduled Caste refugees are not getting any relief. This is a great hardship.

(3) As discrimination cannot be prevented, it is necessary to modify the rule so that the Scheduled Caste refugees living outside the camps should also be entitled to relief in the same way and to the same extent as refugees living in camps.

(ii)

(1) In the allotment of lands made by the Government of Eastern Punjab the interests of the Scheduled Castes are completely overlooked. The administration of Eastern Punjab being entirely in the hands of the Caste Hindus, there is nobody either to take a personal inetrest in the rehabilitation of the Scheduled Caste evacuees nor is there any agency appointed by the Government of India especially charged with the duty of bringing to the notice of the Eastern Punjab Government that the interests of Scheduled Castes are overlooked.

(2) It is, therefore, essential that there should be a number of officers appointed by the Government of India to work in East Punjab charged with the special duty of seeing that the allotment of land is fairly made and that the Scheduled Caste refugee get their legitimate share.

(3) I have given to the Honourable Mr. Neogy a list of persons for being appointed for this purpose who, so far as I know, are best qualified to carry out this work.

(4) (a) It is a notorious fact that the Sikhs and the Jats who occupy a very prominent position in East Punjab are compelling the Scheduled Castes who are residents of East Punjab to evacuate their original homes in order to appropriate their houses or their landed property. The Scheduled Castes are unable to obtain any redress from the tyranny and oppression practised upon them by the Sikhs and the Jats to carry out their purposes for the simple reason that the Majistracy and the Policy in East Punjab are wholly manned by the Sikhs and Jats who quite naturally protect the wrong doers who are their Kith and Kin and pay no attention to the complaints of the Scheduled Castes.

(b) It is, therefore, absolutely essential that the Government of East Punjab should be compelled to recruit at least 300 Scheduled Castes in their Civil Police. It was recently published in the newspapers that the East Punjab Government had recruited some 300 Scheduled Castes in their Police Force. On enquiry I found that this recruitment has been made for the purpose of the Frontier Constabulary and not for the ordinary Civil Police Force. What the Scheduled Castes need for the purpose of their protection is recruitment to the Civil Police of East Punjab. I am informed that the Civil Police Force of East Punjab does not include even a single Scheduled Caste person.

(5) (a) The Land Revenue system of East Punjab divides the residents of a village into two classes *Zamindars* and Kaminas. In the category of the Zamindars are included those families who have an exclusive right to own land situated inside the village boundary.. The *Kaminas* have no right to buy or to own land situated in the village of which they are residents. Even the sites on which their houses are situated belong to the Zamindars, with the result that the Zamindars if they combine can compel the Kaminas to leave the village by asking them to remove their houses. This rule places the Kaminas of every village at the mercy of the Zamindars. The Scheduled Castes in all the villages

in East Punjab are classed as *Kaminas* and are therefore living in complete servitude of the Zamindars of the village.

(b) It is therefore necessary that the East Punjab Government should be called upon to abolish this dinstinction by altering their Land Revenue system and making it similar to the Ryotwari System under which all villagers are placed on equal footing so far as the capacity to own land is concerned.

(6) (a) In the Province of East Punjab there operates what is called the Land Alienation Act which is intended to protect the agriculturists from the money lenders. But there cannot be slightest doubt that it is a most vicious piece of legislation inasmuch as it contains a definition of Agriculturist which is communal and not occupational. |According to this law, a person is an agriculturist if he belongs to a community which is declared by the Government as an agricultural community. The old Punjab Government took particular care not to declare the Scheduled Castes as an agricultural community although every member of the Scheduled Castes is either a cultivator of land or an agricultural labourer. The result is that the Scheduled Castes in East Punjab are debarred from buying or acquiring landed property and are compelled to lead the life of landless labourers dependent upon the Hindu, Sikh and Jat land owners for their livelihood. This is a cruel piece of legislation I think ought not to be allowed to remain on the Statute Book.

(b) The East Punjab Government should be to amend the definition of the term 'agriculturist' and make it occupational so that everybody who earns his livelihood by agriculture irrespective of his caste and creed becomes an agriculturist entitled to own and acquire landed property.

I have enumerated all the difficulties of the Scheduled Castes which have been brought to my notice and the remedies, which I think, if adopted, will remove them. Some of

the remedies lie in the hands of the Government of India and the rest in the hands of the Government of East Punjab. There can be no question of applying such remedies as lie in the hands of the Government of India if it has the will to do so. Even with regard to those remedies which lie in the hands of the Government of East Punjab, the Government of India need not feel helpless. For, since the Government of India is paying the cost of rehabilitation, it has a moral right to compel the Government of East Punjab to adopt particular measure which the Government of India thinks necessary for a fair and equal treatment of all classes of people. That is the reason why I have not hesitated to include for action by the Government of India such remedies as lie in the hands of the Government of East Punjab. So far all care and attention has been bestowed by the Government of India on the problem of the Muslims. The problem of Scheduled Castes has either been supposed not to exist, or deemed to be so small as not to require special attention. Although some people do not like to mention the problem of the Scheduled Castes nonethless those of us who are concerned with the Scheduled Castes know that the problem exists and it is such more acute than the problem of the Muslims.

Many a times I had thought of drawing the attention of the public to the neglect by the Government of India of the problem of the Scheduled Caste refugees both in Pakistan and in India. For obvious reasons I have refrained from doing so. Owing to your pre-occupation with other matters, I have made no complaint regarding your silence about this question. But I am afraid time has come when I must insist upon your giving personal attention to this problem by issuing directions to the Minister for Relief and Rehabilitation and to the Minister without Portfolio to relieve the Scheduled Castes of their sufferings either by adopting the remedies I have suggested in this letter or by devising better remedies to effectuate the purposes I have set out. I shall be grateful if you will give this matter your immediate attention.

The Honourable Pandit Jawaharlal Nehru,
Prime Minister of India, New Delhi.

Yours sincerely,
Sd/- B. R. AMBEDKAR.

बाबासाहेबांच्या वरील पत्राला श्री. जवाहरलाल नेहरुंनी २५-१२-४७ ला उत्तर दिले. पाकिस्तानातून आणि विशेषतः सिंधमधून जे अस्पृश्य निर्वासित भारतात येऊ इच्छितात त्यांना पाकिस्तानामधून बरेच अडथळे निर्माण केले जातात हे खरे आहे. आमचा पाकिस्तानातील वकील त्यांना सर्वतोपरीने साह्य देत आहे आणि आम्हीही या बाबतीत जागरूकपणे, शक्यतो सर्व प्रकारची मदत अस्पृश्यांना देत आहोत. पूर्व पंजाबात अस्पृश्यांवर जे अन्याय होतात ते दूर करण्यासाठी पूर्व पंजाब सरकार शक्य ती उपाययोजना करीत आहे आणि आम्ही त्यांना या बाबतीत योग्य ते आदेश देत आहोत. सदर सरकारला पाकिस्तान निर्मितीमुळे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे आम्हाला सदर सरकारला अस्पृश्यांच्या प्रश्नाला प्राधान्य द्या, असे सांगणे जड वाटते. तथापि, मी या बाबतीत जातीने लक्ष घालीन आणि संबंधीत मंत्र्याला योग्य ती तजवीज करून अस्पृश्यांच्या अडचणी दूर करा, अशा मी त्याला सूचना देत आहे. श्री. नेहरुंचे ते उत्तर येणेप्रमाणे :–

3311-3312

"Prime Minister, P. M.
India. New Delhi.

The 25th December, 1947.

My dear Dr. Ambedkar,

I have your letter of the 18th December about the evacuation of Scheduled Caste people from Pakistan to India.

We have been trying our utmost to help in the evacuation of the Scheduled Castes from Pakistan, notably Sind, where they have been prevented from coming away. Our High Commissioner there is in continuous contact with this problem.

As regards the other problems raised by you they have to be dealt with by the East Punjab Government. We shall certainly advise them in the matter and see to it that every help is given to the Scheduled Caste evacuees.

We have had some difficulty in dealing with the East Punjab Government in regard to many matters chiefly because the multitude of the problem it faces. I shall gladly give my personal attention to this subject and am requesting the Minister without Portfolio to look into this matter specially.

Yours Sincerely,
Sd|-
Jawaharlal Nehru..

The Honourable Dr. B. R. Ambedkar."

पाकिस्तान निर्मितीनंतर पाकिस्तानांतील हिंदूवर मुसलमानांनी सक्तीचे धर्मांतर व छळ, असे अत्याचार केले. त्यांत अस्पृश्यांवर तर जुल्मांचा कहरच झाला. त्यांना सक्तीने मुसलमानी धर्माची दीक्षा देण्यांत आली. अस्पृश्य मुसल्मान ओळखू यावेत म्हणून त्यांना दंडावर पिवळ्या फिती बांधून घराबाहेर पडण्याची सक्ती करण्यात आली. (पेशवाईत महारांच्या गळ्यात मडकी व कमरेला वोराट्याचा फेस बांधावा लागत असे.) यासंबंधी श्री. प्यारेलाल यांनी खालील माहिती दिली आहे :--

"Prticularly pitiable was the plight of Harijans. They were required to wear badges on their persons to show that they were untouchables — on the planable ground that this was their safety. Sweepers and Washermen were not permitted to leave Sind under the "Esssntial Services Ordinance". From the interior came report, of forcible conversion to Islam from the lower classes, particularly, Harijans." (Mahatama Gandhi : The Last Phase, pp. 474-475.

हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यातील लोकांचे स्थलांतर होत होते. पण पाकिस्तानातून भंगी व धोबी यांना भारतात जाणे शक्य नाही, असा कायदा केलेला असल्यामुळे त्या जातींना पाकिस्तानातच रहाणे भाग पडले. या अन्यायी कायद्याविरूद्ध बाबासाहेबांनी लियाकत अलीखान व जीना यांना तारा पाठविल्या. पण त्यांनी त्या तारांना महत्त्व दिले नाही.

पूर्व पंजाबातील अस्पृश्य निर्वासितांची दैन्यावस्था दिवसेंदिवस वाढतच होती. अस्पृश्य वर्गातील अधिकारी नेमले तरच ते अस्पृश्यांची दुःखे दूर करू शकतील, या भावनेने साहेबांनी निर्वासित खात्याचे मंत्री यांच्याशी पत्रव्यवहार केला व काही अस्पृश्यांची नेमणूक करुन घेतली. आणखी कांही अस्पृश्य अधिकारी नेमा, असा

बाबासाहेबांनी श्री. नियोगी यांच्याकडे लकडा सुरू केला तेव्हा श्री. नियोगींनी साहेबांना नावे सुचविण्याची विनंती केली. साहेबांनी कांही अस्पृश्य उमेदवारांची यादी श्री. नियोगी यांच्याकडे पाठविली. बाबासाहेबांनी २३–३–४८ ला श्री. नियोगी यांना खाजगी पत्र पाठवून विचारले की, तुम्ही या लोकांना नेमले किंवा नाही, हे अजून मला समजले नाही, श्री. बी. के. गायकवाड आणि श्री. आर. एस. जाधव या दोन अधिकाऱ्यांना श्री. सेवकराम करमचंद हे निर्वासित खात्याचे अधिकारी कांही काम देत नाहीत. सद्‌रहू गृहस्थ या दोन अस्पृश्य गृहस्यांना तुम्ही कोणत्या राजकीय मताचे आहात असे विचरतात आणि ते असेही म्हणतात की जे लोक कॉंग्रेसच्या मताचे असतील त्यांनाच या खात्यात काम दिले जाते. श्री. करमचंद यांनी शिड्यूल कॉस्टस फेडरेशनतर्फे जे उमेदवार पाठविण्यात आले त्यांना नोकरीवर न घेता हरिजनलीगतर्फे जे उमेदवार पाठविण्यात आले त्यांनाच घेतले. फेडरेशनचे उमेदवार लीगच्या उमेदवारापेक्षा जास्त लायक होते, तरीही श्री. करमचंद यांनी हा धडधडीत अन्याय केला. फक्त कॉंग्रेसला अनुकूल असलेल्या लोकांना खात्यात नोकऱ्या देणे आणि दुसऱ्या राजकीय पक्षाने शिफारस केलेल्या उमेदवारांना नोकरी न देणे, हा उघड अन्याय आहे, आणि अशा अन्यायाला तुम्ही दूर केले नाही तर तुम्ही त्याला पाठिंबा देता असे होईल, असे तुमचे मत नसेलही, कदाचित पण अन्याय हा झालेला आहे. व तो दूर करणे हे तुमचे कर्तव्य आहे. श्री. गायकवाड आणि जाधव यांना तुम्ही काम देत नसाल तर परत पाठवा. म्हणजे त्यांना इतर काही समाजकार्य करता येईल. मी खूप दम धरला. पण आता जास्त दम धरवत नाही म्हणूनच असे उघडपणे मी हे पत्र तुम्हांस लिहीत आहे. याबद्दल मी दिलगिर आहे. पण तुम्ही अन्याय दूर केला पाहिजे, हीच माझी इच्छा. साहेबांचे सदर पत्र येणेप्रमाणे :–

"*Personal*

New Delhi,
23rd March 1948.

My dear Neogy,

You will recall that you wanted me to recommend the names of some special workers who could be employed under your Department for helping the Scheduled Caste refugees who have come over from Western Punjab to Eastern Punjab in the matter of their rehabilitation. I gave you a list of persons who could be employed for this work. I do not know what you have done with regard to the names contained in the list. There are, however, two persons whom I recommended and whom you have appointed, and about whom I propose to write to you in this matter. They are Messrs B. K. Gaikwad and R. S. Jadhav.

Both of them have been complaining to me that they are given no work at all and that they are wasting their time. They also reported to me that they were called over by Mr. Shevakram Karamchand who is the Director of the Harijan Section of your Department and who cross quesitoned as to their views on the general politics of this country. The impression left upon them, which they conveyed to me, is that the Government of India is not prepared to employ people because they do not belong to the Congress. It seems to me absurd, if not mischievous, for Government to insist that its employees should have the same political opinion as the Party in power, and I am sure that you do not share the view-point expressed by Mr. Shewakram Karamchand. What I am concerned about is that these two men who have been retained are not given the work for which they were recruited. Mr. Karamchand told them in the course of the interview that the persons recommended by the Harijan League were thoroughly incompetent and were of no use for the sort of work they were expected to do and that the persons belonging to the Scheduled Castes Federation were the most competent, and yet these men are not given the responsible work for which they were recruited merely because their political opinions are distasteful to this gentlemen. I am, therefore, driven to ask you whether you intend to give them any responsible piece of work for which they are fitted. If you are not prepared to do that I think it is only right that you should discontinue their service and allow them to return to their places and do the social work that they had been doing. I am sorry I have to write to you in this very direct fashion, but when one's patience is exhausted one has no other way.

With kind regards,

Honourable Mr. K. C. Neogy,
Minister for Relief and
Rehabilitation,
New Delhi.

Yours sincerely,
Sd|-
B. R. Ambedkar.

मडकेबुवा २८–३–४८ ला पहाटे हृदयविकाराने आपल्या रहात्या घरी दिवंगत झाले. त्यांच्या प्रेतयात्रेस साठ हजार लोक उपस्थित होते. ही बातमी बाबासाहेबांना ट्रंककॉलने दिल्लीला कळविण्यात आली तेव्हा ते म्हणाले, या बातमीने मला धक्का बसला. (जनता, ३–४–४८, पान–१)-

देवरुखकर यांचे स्मृतिदिन कांही वर्षे फेडरेशच्या कार्यकर्त्यांनी पाळले तसे मडकेबुवांचे पाळले जात नसत. कारण त्यांच्याबद्दल बहुसंख्य कार्यकर्त्यांना मनापासून प्रेम वाटत नसे. फक्त बाबासाहेबांनी समाजावर लादलेला कार्यकर्ता, अशी इतर कार्यकर्त्यांची मडकेबुवांच्याबद्दल भूमिका होती.

भारताचे शेवटचे व्हाईसरॉय, लॉर्ड माऊंट बॅटन यांच्या चिटणीसांनी बाबा साहेबांच्या विद्वतेबद्दल आणि एकंदर उच्चपातळीबद्दल गौरवपर उद्गार काढलेले आहेत. शनिवार, २४–४–४८ या दिवशी रात्री व्हाईसरॉयनी खाना दिला. बाबासाहेब पाहुणे म्हणून तेथे उपस्थित होते. तेव्हा चिटणीसांना बाबासाहेबांच्याबरोबर बोलण्याची संधी मिळाली. बाबासाहेबांच्या विद्वताप्रचुर भाषणाने चिटणीस खूप खुष झाले. त्यांनी आपल्या डायरीत त्याबद्दल जो उल्लेख केलेला आहे तो असा :-

3319-3321

"Government House, New Delhi,
Saturday, 24th April, 1948"

"They and I dined tonight amid fairy-lights on the lawn of the Delhi Gymkhana Club. Our host was Shri Krishna (well-known Delhi political correspondent), who had collected an interesting party. The principal guest was Dr. Ambedkar, the Minister for Law, the leader of the Untouchables, and a colourful personality in Indian politics over the past twenty years. He is now one of the principal figures associated with the preparation of India's new Constitution) which finally removes the stigma of Untouchability from the Statue book. As part of his emancipation, Ambedkar, himself is untouchable, has only recently married a lady doctor who is a Brahmin. The custom of centuries cannot be uprooted overnight, and the event has caused quite a stir. His wife was with him this evening, but, as it is the custom with so many Indian ladies on social occasion had little to say.

Ambedkar himself was in expans ve viewing, gave us a revealing analysis of some of the features of the new Con-

stitution. He pointed out, instance, that the special powers reserved for the judiciary under its provisions were greater than enjoyed by the United States Supreme Court. As evidence of the enduring quality of the 1935 Act, said that some two hundred fifty of its clauses has been embodied as they stood into the new Constitution.

We had a discussion on Cabinet Government, Ambedkar referred to the complaint that the present system was working too slowly in India. He thought that where the matter of policy affecting two department was involved the issue should at once be settled as between the Ministers concerned. He comment the Ceddes proposals and the system of non-departmental Cabinet chiefs with groups of departmental deputies under them. He said he was sorry Mountbatten was leaving before the Constitution was finally passed. The Commonwealth issue, he felt, was likely to be decided outside the Constituent Assembly." (Mission With Mountbatten, pp. 318-20, by Alan Campbell -- Johnson).

पाकिस्तान व हिंदुस्थान या दोन्ही देशांपैकी प्रगतिकारक विचारसरणी कोणात जास्त आहे, याबद्दल उहापोह करून मि. कॅंपबेल–जॉन्सन यांनी असे मत दिले की, हिंदुस्थानात ही विचारसरणी मोठ्या प्रमाणांत आहे. म्हणूनच डॉ. आंबेडकर हे अस्पृश्य जातीचे असताही हिंदूनी त्यांना घटना तयार करण्याच्या कामांत सामील करून घेतले.

जीना ११–९–४८ रोजी कराची येथे रात्री १०–२९ वाजता मरण पावले.

"The Indian Constitution, which was under active preparation and discussion during Lord Mountbatten's term of office, is a synthesis of the great Western charters of liberty. The obvious hiatus between the vision of this document and the realities of Indian life does not destroy the validity of the vision. It represents a great tribute to the liberalising influence of British thought, and is a fundamental attack upon the aims and aspirations of communalism. The Indian constitution offers fresh hope for the eighty million Untouchables, who under purely Hindu dogma were parials polluting food with their shadow, but are now Indian citizens with equal rights before the law. It is significant that one

of the principal personalities in Nehru's Government, and as such a prominent personality in the preparation and sponsorship of the Constitution, is Dr. Ambedkar, the well-known leader of the Untouchables." (Mission With Mountbatten, pp. 361-62, by Alan Campbell-Johnscn).

The untouchables — Who were they and why they become untouchable

[ अस्पृश्य–ते पूर्वी कोण होते आणि ते कोणत्या कारणामुळे अस्पृश्य झाले ? ] हा ग्रंथ बाबासाहेबांनी १९४७ साली लिहिला. तो "राजहंस प्रेस" दिल्ली येथे छापून अमृत बुक डेपो कंपनी, नवी दिल्ली येथे श्री. अमृत धार नुलै यांनी १९४८ च्या ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध केला. हा ग्रंथ "शूद्र पूर्वी कोण होते ?" या ग्रंथाचा उत्तरार्थ होय, असे बाबासाहेबांनी प्रस्तावनेच्या पहिल्या वाक्यातच स्पष्टीकरण केलेले आहे. हा ग्रंथ १५५ पानांचा आहे. बाबासाहेबांचे हे सोळावे वाङ्मयीन अपत्य होय. अस्पृश्य लोक व त्यांची अस्पृश्यता यांची उत्पत्ति कशी झाली, याबद्दलचे हिंदी व परदेशीय पंडित व ग्रंथकार यांचे सिद्धांत कसे चुकीचे आहेत, याचा उहापोह बाबासाहेबांनी या ग्रंथात केलेला आहे. अस्पृश्य लोक हे जीत टोळ्यांतील लोक होते ते अन्य टोळ्यांतील लोकांच्या आश्रयाला गेले. ते त्यांच्या वसाहतीबाहेर राहिले हे जीत लोक व वसाहत केलेले अन्य टोळ्यांतील लोक यांनी बुद्ध धर्माचा स्वीकार केला. हे जीत लोक व वसाहत केलेले लोक मांसाहारी होते व गोमांस खाणे त्यांना त्यावेळी वर्ज्य नव्हते. मौर्य वंशीय बुद्ध धर्मीय सम्राट बृहद्रथ यांचा खून, त्याचा ब्राह्मण सेनापति पुष्यमित्र सुंग याने इ. स. पू. १८५ सालांत केला व तेथून पुढे ब्राह्मणी धर्माचे वर्चस्व व बुद्ध धर्माचा पडता काळ हा सुरू झाला. ब्राह्मण लोक व ब्राह्मणीधर्म यांचे वर्चस्व समाजात स्थापन करण्यासाठी ब्राह्मणांनी बौद्धानुयायांचा मनस्वी छळ केला. त्या छळांना कंटाळून बहुसंख्य बुद्धानुयायी ब्राह्मणी धर्मानुयायी झाले. बुद्ध धर्माचे लोक व ब्राह्मणी धर्माचे लोक मांसाहारी होते व ते गोमांसही खात होते. परंतु ब्राह्मणी धर्माचे वर्चस्व स्थापन झाल्यानंतरच्या काळात ब्राह्मणांनी गोमांस वर्ज्य केले, गाईला पवित्र देवता बनवून तिच्या पावित्र्यावर धार्मिक ग्रंथांत स्तुतिसुमने उधळली.

"The clue to the worship of the cow is to be found in the struggle between Buddhism and Brahmanism to the means adopted by Brahmins to establish its supremacy over Buddhism. The strife between Buddhism and Brahmanism is a crucial fact in Indian history.

Without the rear list Fare of this fact, it is impossible to explain some of the features of Hinduism. Unfortunately

students of Indian history have entirely missed the importance of this strife. They know there was Brahmanism. But they seem to be entirely unaware of the struggle for supremacy of which these creeds were engaged and that their struggle which extended for 400 years has not some indelife marks on religion, society and politics of India, p. 116.

याहि पुढे ब्राह्मणांनी मांसाहार वर्ज्य केला व ते शाकाहारी झाले. याचे कारण एवढेच की, बुद्धानुयायी हे ब्राह्मणांना मांसाहारप्रिय असे म्हणत व ब्राह्मणांना त्यांचे म्हणणे खोटे पाडावयाचे होते. ब्राह्मणांचे अनुकरण बहुसंख्य ब्राह्मणेतरांनी केले. वेदकाळी व त्यानंतर कांही काळ यज्ञांत अनेक पशूना बळी देण्यांत येई व हे बळी मारण्याचे काम ब्राह्मण करीत असत. या बळींचे मांस यथाविधी खात असत. तेच ब्राह्मण बुद्ध धर्माचा पाडाव केल्यानंतर मांसाहार केल्याने व गोवध केल्याने महापातक होते, असा सिद्धांत समाजात पसरवू लागले. बुद्ध भिक्षूंना व बुद्धानुयायांना मांसाहार वर्ज्य नव्हता, परंतु हिंसेने मारलेल्या पशूचे मांस खाणे त्यांना वर्ज्य होते, नैसर्गिक रितीने मेलेले, आपणांस ज्याच्या मृत्यूची माहिती नाही अशा रितीने मेलेले पशू त्यांचे मांस खाणे हे बुद्धानुयायांना धर्मसंमत होते. जीत लोक हे बुद्ध धर्माचे कट्टे अनुयायी होते व त्यांचा कडवेपणा पाहून ब्राह्मण लोकांनी त्यांना भयंकर छळले तरी त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला नाही. ते मांसाहार करीत, त्यांत गोमांस व मृतमांस ही असत. मृत मांसाहार व गोमांस यांना ब्राह्मणी धर्मग्रंथात अत्यंत भीषण स्वरुपाचे गुन्हे म्हणून ब्राम्हणांनी स्थान दिले व मृतमांसाहार करणारे व गोमांस खाणारे बुद्ध धर्मायुयायी जीतलोक यांना अमंगळ रहाणारे, दुष्ट प्रवृत्तीचे रानटी, तामस, गुन्हेगार लोक असे धार्मिक ग्रंथात उल्लेख प्रविष्ट करण्यांत आले, आणि या लोकांना शिवणे हे सुद्धा महापातक होय, असा शेवटी धार्मिक ग्रंथात उल्लेख प्रविष्ट केल्यानंतर वसाहतींतील ( गावांतील ) लोक बुद्धानुयायी जीत लोकांना अस्पृश्य मानू लागले व या अनेक कारणांनी अस्पृश्यता व अस्पृश्य लोक यांची उत्पत्ति झाली, असा सिद्धांत बाबासाहेबांनी या ग्रंथात मांडलेला आहे.

"The Broken Men hated the Brahmins because the Brahmins were the enemies of Buddhism and the Brahmin imposed Untouchability upon the Broken Man because they would not leave Buddhism. On this reasoning it is possible to conclude that one of the roots of untouchability lies in the hatred and cotempt of which the Brahmins created against those who were Buddhists." p. 78.

आजकाल ब्राह्मणादि उच्च वर्णीय गणले गेलेले लोक व अस्पृश्य लोक हे एकाच वंशाचे पण भिन्न टोळ्यांचे लोक होते व वैदिक काळापासून बौद्ध काळापर्यंत ते आपापसात लढत होते. त्याच काळात आर्य व द्रवीड म्हणजेच नाग हे लोक या लढ्यात पडलेले होते. आजचा हिंदु समाज म्हणजे आर्य व द्रवीड ( नाग ) लोकांच्या संततीचा समाज होय. असा पूर्व पक्ष मांडून या सर्व लोकांच्या लढाया आणि हिंदु व बौद्ध लोक यांचा संघर्ष यांतून अस्पृश्य लोक व अस्पृश्यता यांची उत्पत्ति चवथ्या शतकाच्या सुमारास झाली. असा उत्तरपक्ष बाबासाहेबांनी मांडलेला आहे.

"We can, therefore, say with some confidence that Untouchability was born some time about 400 A.D. It is born out of the struggle for supremacy between Buddhism and Brahmanism which has so completely moulded the history of India and the study of which is so woefully neglected by the students of Indian history," (p. 155).

वेद, ब्राह्मणे, उपनिषदे, पुराणे, परदेशीय व एतद्देशीय ग्रंथकारांचे ग्रंथ यांतील संदर्भ व उतारे घेऊन बाबासाहेबांनी आपला सिद्धांत या छोट्या ग्रंथात मांडलेला आहे. हिंदू लोक, हिंदू पंडित व ग्रंथकार आणि पाश्चात पंडित व ग्रंथकार यांचा अस्पृश्य लोक व अस्पृश्यता या दोन्ही प्रश्नांकडे पाहाण्याचा दृष्टीकोन निराळा होता. या बाबतीतला बाबासाहेबांचा दृष्टीकोन निराळा आहे.

समाजशास्त्र, मानववंशशास्त्रश, मानवभिन्नतादर्शकशास्त्र, इतिहास, वेद, शास्त्रे आणि तर्कशास्त्र यांच्या साह्याने हा सिद्धात बाबासाहेबांनी मांडलेला आहे. तो अपूर्व आहे. **तरी पण तो सिद्धात वज्रप्राय आहे, असा त्यांचा हेका नाही.** त्यापेक्षा दुसरा सिद्धांत कोणी मांडण्यास पुढे येत असतील तर त्यांत त्यांना आनंद वाटेल, अशी प्रस्तावनेत त्यांनी आशा व्यक्त केली आहे.

".....My critics should concern themselves what I would like to say is that. I am not so vain as to claim any finality for my thesis. I do not ask them (critics) to accept it as the last word. I do not wish to influence the r judgement. They are of course free to come to their own conclusion. All I say to them is to consider whether this thesis is not a workable and therefore for the time being, a valid hypothesis if the test of a valid hypothesis is that it should fit in with all surrounding facts, explain them and give them a meaning which in its absence they do not appear to have. I do not want anything more from my critics than a fair and unbiased appraisal." — (Preface, page VIII).

बाबासाहेबांच्या या ग्रंथाबद्दल ९-१-४९ च्या दी इलस्ट्रेटेड वुइकली, टाइम्स ऑफ इंडिया या साप्ताहिकात "Books and comments या सदरांत खालील विचार प्रदर्शित केले होते. :-

## "ORIGINS OF UNTOUCHABILITY"

Dr. B. R. Ambedkar, periodically emptying the vials of his anger on Brahminic misdoings, is always readable. His latest book *The Untouchables* (Amrit Book Company, New Delhi, Rs. 8-8) purports to be a work of historical research and, although some would be sorry to see that even in such a work which ought to be distinguished by the tamper of the scholar and historian he has not entirely laid aside the bastinado and the knout, he remains readable.

The two questions which Dr. Ambedkar sets himself to answer are :— Who were the Untouchables and why did they become such ? He has gone deep into all the literature that is likely to throw light on a hitherto neglected work of historical research from *smritis* to cencus reports. And there can be nothing but admiration for the way in which he collects and sifts the available evidence; points to alternative interpretations, and accounts for his own preferences — although a student of such a literature may fairly record that in the marshalling of facts and the presenting of conclusions few could hope to rival the learning and the trenchacy of Mr. J. E. Sanjana's *Caste and Outcaste*.

## HIS DEDUCTIONS

The authour's answers to the two questions he poses can be summed up in his concluding paragraph "We can, therefore, say with some confidence that Untouchability was born some time about 400 A.D. It is (sic) born out of the struggle for supremacy between Buddhism and Brahminism which has so completely moulded the history of India....."

There are few so learned as the Doctor on such recondite subjects. Nevertheless, one cannot help asking occasionally whether his deductions are always warranted. For example, he says, "Cow-killing was not legally prohibited by Asoka. Even if it had been prohibited, a law made by the Buddhist

Emperor could never have been accepted by the Brahmins as binding upon them." Why not? Obnoxious laws have been accepted by Brahmins (and others) for fear of the consequences of defying them. So dogmatic a pronouncement on a hypothetical issue ill becomes the temper of historical research.

Again, while referring to the notorious "command performance" in Simla in 1909 when the petition for separate electorates was presented to Lord Minto, Dr. Ambedkar is less than just to his own political acumen when he dismisses the real reason somewhat contemptuously in such sentences. "At any rate, this is how the Hindus understand this demand" and "The Hindus smelt a rat in it."

## HARSH WORDS

In his preface Dr. Ambedkar concentrates his strictures on Hindus civilisation in a few short, sharp sentences. "It is not a civilisation; it is Infamy. "His indictment, if intemperately conched, is not ill-grounded, and it is easy to understand how a sensitive spirit, wounded by the enormity of age-long injustices, expresses itself in tones of despair. But it is a question of historical importance how far the rigidity of Hindu society arose from the instinct of self-preservation.; how by being rigid in some particulars and elastic in others it servived the onslaught of Budhism and Islam. And it is fair acknowledge that it is now adopting itself to new conditions.

To be critical of Dr. Ambedkar's construction and conclusions is not to deny the value of his contribution. His book is both learned and suggestive, as one would expect it to be; nor should be again permit himself (or his publishers) to disappoint our expectations in the matter of proof-reading! The errors in this book alround like the flies of a summer day."

बाबासाहेबांच्या सदर पुस्तकावर टाईम्स ऑफ इंडियाच्या (शुक्रवार) ११–२–४९ च्या अंकात पुढील गौरवपर अभिप्राय देण्यात आलेला होता. तो असा

## "DR. AMBEDKAR ON THE UNTOUCHABLES

*The Untouchables. Who they were and Why They Became Untouchables.* By Dr. B. R. Ambedkar, (Amrit Book Company, New Delhi, Rs. 8/8/-).

Undetered by what he calls the 'conspiracy of silence' of the Brahmin Scholars, Dr. Ambedkar has followed up his book on the Shudras with another on *The Untouchables,* in which he seeks to explain the origin of Untouchability. Rejecting the racial and occupational theories on this question, Dr. Ambedkar puts forth an entirely novel thesis. The Untouchables, according to him, were originally men broken away from their own tribe and settled in the outskirts of stable communities of alien tribes. They lived outside the villages long before they became Untouchables; two factors were responsible Untouchability being imposed on these Broken Men; viz. 'contempt and hatred' felt for them as Buddhist by the Brahmins, and the persistence of them men is beef-eating, when the other communities started worshipping the cow under the aegis of the Guptas and Untouchables communities in the modern sense came existence much after 400 A.D.

### THEORY EXAMINED

A theory, which while seeking the origins of Untouchability, ignores altogether its relation to caste, and does not take into account the factors that led to the exclusiveness of the caste system its organisation on the basis of high and low, appeal indeed very strange. Besides beef-eating and Buddhism seem hardly adequate to explain all the facts of Untouchability, not to mention unapproachabilities and unsseability. Are not the aboriginal tribes, who are touchables, beef-eaters ? And what proof there that Broken Communities were once all Buddhist and if they were, how is it that, having clung to Buddhism sufficiently long to incur the wrath of the Brahmins, they changed over to Hinduism everywhere in India when it had no power to do them any good ?

Nor is it easy to follow the Doctor in the distinction that he makes between 'Impure men' and Untouchables. In what way is a community treated as 'ceremoniously impure' really different from an Untouchable community ? Impelled by a desire to show that Untouchability is a recent growth, Dr. Ambedkar denies that the Manusmriti knows Untouchability, in fact, which he publicly burnt at the beginning of the political career for its obnoxious references to the Untouchables. No one who knows the references to the *Chandalas, Pukkasas*, and *Swapakas* in very early literature can believe that these communities were anything but Untouchables, despite the conclusions drawn on page 139 which are unwarranted, and despite the rather curious appeal to Bana's romance, the *Kadambari*, for proof that in his days the *Chandalas* were treated with honour.

NEW APPROACH

And yet it must be admitted that Dr. Ambedkar has opened a new line of investigation. Bringing to bear on this problem his very deep knowledge of Anthropology, Ethnology and Sociology, he has lifted it out of the narrow grooves in which alone it was made to move by Orientalists, Census-writers and politicians; and he has incidentally suggested new lines of approach to cognate problems which still await full investigation. Moreover the whole thesis is presented in his lucid, if sometimes pungent style which makes its perusal a delight. It is a pity therefore that the book should have been printed in such a slovenly manner, with misprints proving an eye-sore on almost every page."

यानंतर बाबासाहेबांचे आणखी एक पुस्तक प्रसिद्ध झाले. ते "Maharashtra As a Linguistic Province — Statement submitted to the Linguistic Provinces Commission (by B. R. Ambedkar, M.A., Ph.D, D.Sc., Barrister-at-Law, Minister of Law, Govt. of India)." हे होय. हे बाबासाहेबांचे पंधरावे वाङ्मयीन अपत्य होय. भारतातील प्रत्येक प्रांत भाषिक पायावर उभारणे जरूर आहे, या तत्वाची पहाणी करण्याकरिता भारत सरकारने भाषिक प्रांतरचना मंडळ नेमले होते. ते मंडळ मुंबईत ऑक्टोबर १९४८ आले तेव्हा बाबासाहेबांनी त्या मंडळाला सादर करण्यासाठी एक खलिता तयार

केला. त्यांचा मुक्काम पश्चिम रेल्वेच्या मुंबईतील सेंट्रल स्टेशनमध्ये स्पेशल वॅगनमध्ये असतांना त्यांनी हा खलिता एक आठवड्यांत तयार केला. यापूर्वी ते सेंट जॉर्ज हॉस्पीटलमध्ये इनडोअर पेशंट म्हणून राहिलेले होते. तेथे त्यांचे दोन दांत काढले होते. अंथरुणांत पडतां पडतां त्यांनी सदर खलित्याला सामुग्री जमा करण्यासाठी नवे जुने शंभर सव्वाशे इंग्रजी, मराठी व गुजराथी ग्रंथ वाचले. हॉस्पिटलमधून बाहेर पडल्यानंतर त्यांनी सेंट्रल स्टेशनवर खलिता लिहून काढला. ठॅकर अँड को. लिमिटेड, मुंबई या प्रकाशन संस्थेने तो ४० पानांचा खलिता ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध केला. किंमत रु. १-८०. याचा मराठी अनुवाद श्री. बा. चं. कांबळे यांनी केला व तो लगेच छापून प्रसिद्ध केला.

चाळीस पानांच्या या छोटया पुस्तकांत बाबासाहेबांनी आपले मौलिक विचार मांडून भाषिक राज्याच्या प्रश्नाची संपूर्ण कल्पना वाचकासमोर व्यक्त केली. भाषिक राज्ये निर्माण करावीत, पण त्या राज्यांची राज्यभाषा त्या प्रदेशाची नसावी. प्रदेशाची भाषा राज्यभाषा झाली तर न्यायालये व केंद्र सरकार आणि सुप्रीम कोर्ट यांच्या कामकाजात अनेक समस्या उद्भवतील आणि राज्यकारभारांत गोंधळ व अशांतता ही उत्पन्न होतील पूर्व पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम, ओरीसा हे सहा प्रदेश भाषिक राज्ये म्हणून अस्तित्वात आहेतच. मुंबई, मद्रास व मध्य प्रदेश हे प्रांत भाषिक राज्यांची मागणी करीत आहेत. ती मागणी देणे इष्ट व न्याय्य आहे. मुंबईसंबंधी जे वाद उत्पन्न झालेत ते लखपति व्यापारी, उद्योगपति आणि स्वार्थसाधू राजकारणी लोक यांच्या हटवादीपणामुळे! यांचे म्हणणे असे की, महाराष्ट्र भाषिक राज्य व्हावे पण त्यात मुंबईचा समावेश नसावा. मुंबई, महाराष्ट्र व गुजराथ अशी तीन राज्ये करावीत या सर्वांना एकत्रित करून द्विभाषिक राज्य करावे. ही बाजू जनतेपुढे मांडण्यासाठी त्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले व त्या मुद्यांना उचलून धरणारी सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक आणि राजकीय स्वरुपाची माहिती देण्यासाठी गुजराथी प्राध्यापक, वीवाला, दांतवाला व वकील हे लोक पुढे आले. या विद्वानांनी वर्तमानपत्रांतून लेख लिहून व सभेतून भाषणे करून असे मुद्दे मांडले की, (१) मुंबई महाराष्ट्राचा भाग कधीच नव्हता. (२) मुंबई मराठी साम्राज्याचा कधीच भाग नव्हता. (३) मुंबईतील लोकसंख्येत मराठी भाषिक बहुसंख्य नाहीत. (४) गुजराथी, मराठ्यांच्या आगोदरपासून मुंबईचे रहिवाशी होते. (५) मुंबई व्यापारी केंद्र असल्यामुळे ते एका महाराष्ट्राचे होऊ शकत नाही, त्यावर सर्व भारताचा अधिकार पोहचतो. (६) गुजराथी हे व्यापारी व उद्योगपती असल्यामुळे त्यांच्या प्रयत्नांनी मुंबई शहराची व बंदराची वाढ व भरभराट झाली. मराठी भाषिक हे कारकुनी व हमाली करणारे लोक असल्यामुळे त्यांना मुंबईच्या भरभराटीत काहीही भर टाकता आली नाही. ७) मुंबईची गंगाजळी नेहमी भरलेली असते व त्यावर आपणाला जगता यावे, ही बुद्धी महाराष्ट्रीय लोकांची असल्यामुळे ते मुंबई महाराष्ट्राची आहे, अशी ओरड

करतात. ८) इतर कोणत्याही राज्यनिर्मितीपेक्षा बहुभाषिक राज्यनिर्मिती अधिक श्रेयस्कर होय. ९) प्रादेशिक राज्यांची पुनर्घटना राष्ट्रीय पायावर न करता आर्थिक पायावर करावी. या सर्व मुद्यांना बाबासाहेबांनी सप्रमाण व साधार माहिती देऊन उत्तरे दिली व ते मुद्दे कसे फोल आहेत हे स्पष्ट केले.

स्वाऱ्या करणे, मुलुख जिंकणे व त्यांना राज्यांतर्गत करणे किंवा मुलुख लुटणे परत जाणे ही शिपाईगिरीची पूर्वीच्या काही पराक्रमाची कामे समजली जात. मराठ्यांनी साम्राज्य स्थापन केले, कारण त्यांची सेना पायदळ व घोडदळ यांची होती. त्यांच्यात आरमार नव्हते. मुंबई हे बंदर ते आपल्या साम्राज्यात ठेवायचे तर मराठ्यांना आरमार उभे करणे जरूर होते. त्यांच्या धामधुमीच्या काळात त्यांना हे परवडले नाही. म्हणून त्यांनी मुंबई आपल्या साम्राज्यात आणली नाही.

मुंबईतील मराठी भाषिकांची लोकसंख्या ५० टक्के आहे, अशी माहिती प्राध्यापक गाडगीळ यांनी १९४१ च्या खानेसुमारीवरून प्रसिद्ध केली. तेव्हा प्राध्यापक घीवाला हे म्हणाले की, ही लोकसंख्या ५१ टक्के आहे, आणि प्रा. वकील म्हणाले की, ती ३९ टक्के आहे. मुंबई मराठ्यांच्या हातात जाऊ नये, यासाठी हे गुजराथी प्राध्यापक आकड्याची कसरत करीत होते. ब्रिटिश अंमलखाली भारत देश आल्यानंतर भारतातील सर्व प्रदेशातील लोक मुंबईत येऊन राहिले. तसेच गुजराथी व मराठी आले. त्यांच्या लोकसंख्येवरून जर हा मुद्दा ठरवावयाचा तर गुजराथी व मराठी यांच्याशिवाय जे इतर भाषिक आहेत त्यांची जर लोकसंख्या जादा ठरली तर मुंबई त्यांना द्यावी काय ? गुजराथी हे मुंबईत स्वतः आले नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीची वखार सुरतेत होती व त्या वखारीतील माल विकण्यासाठी, दलाली करण्यासाठी कंपनीने गुजराथ्यांच्या कंपनीची दलाली स्वीकारली. सुरती वनीया महाजन या सभेने आणि भिमजी परख (१६७१) आणि नीमा (३-४-१८७७) यांनी मुंबईच्या गव्हर्नर ऑंगियर याला जे अर्ज केले होते, त्यांचा वृत्तांत ('Gazzetiar of Bombay Town and Island, Vol. I, Page 46,-47.") यांत दिलेला आहे. तो बाबासाहेबांनी आधारादाखल घेऊन असे दाखविले की, मुंबईची भरभराट करण्यासाठी गुजराथी मुंबईत येऊन राहिले नव्हते, तर ते ईस्ट इंडिया कंपनीची दलाली करून स्वतःची भरभराट करून घेण्यास येऊन राहिले होते. बंदरे आपल्या देशाला व परदेशांनाही उपयोगी पाडतात स्वित्झरलंडला बंदर नाही. पण त्या देशाचा व्यापार इतर देशांतील बंदरातून होतो. या बंदरावर त्या त्या देशाइतकाच स्वित्झरलंडला अधिकार पोहोचतो मुंबईवर महाराष्ट्राचा इतर प्रांताप्रमाणे हक्क आहेच. गुजराथ्यांचा व्यापार मुंबईत चालतो म्हणून त्यांचाच अधिकार मुंबईवर आहे, हे म्हणणे चूक आहे. मुंबईचा व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ युरोपियन लोकांनी केली. गुजराथ्यांनी त्यांची फक्त दलाली केली. हे टाईम्स ऑफ इंडियाची डिरेक्टरी वर वर चाळून पाहिली तरी दिसून येईल. गुजराथ्यानी मुंबईचे वैभव वाढविले, हा गुजराथ्यांचा

दावा खोटा आहे. मुंबईचे उत्पन्न जबर आहे व त्यांतून जी गडगंज शिल्लक राहाते; ही आपल्या जीवनाला सहज मिळेल, अशी महाराष्ट्रीयांची दृष्टी आहे. म्हणून ते मुंबईची मागणी करतात, असा गुजराथ्यांचा जो दावा आहे, तो खोटा आहे. मुंबईच्या उत्पन्नातून जो खर्च होतो त्या खर्चात गव्हर्नर, मंत्री, कायदेमंडळे, न्यायालये, पोलिस व प्रांतिक खाती–ही सर्व व त्यांच्या अंमलाखाली येणारे नोकर–यांच्या पगारांचा समावेश होतो, पण हिशोबाच्या वेळी तो खर्च मुंबईच्या उत्पन्नावर दाखवीत नाहीत म्हणून मुंबईच्या उत्पन्नांत फार शिल्लक दिसते. या शिल्लक रकमेवर फक्त मुंबईतील लोकांनाच उपयोग होतो असे नाही. भारतातील सर्व प्रांताना तिचा उपयोग होतो. आणि मुंबईचे स्वतंत्र राज्य केले तरी मुंबईतून प्राप्तीकर वगैरे उत्पन्नांतून जो भाग मध्यवर्ती सरकारकडे जाईल त्याचा उपयोग भारतातील सर्व प्रांताना होईल. मग फक्त महाराष्ट्राला त्याचा उपयोग होईल या मुद्याला काहीच महत्व रहात नाही. मग या बाबतीत प्रा. वकील वगैरे गुजराथ्यांनी एवढे आकांडतांडव का करावे? प्रा. दांतवाला आणि प्रा. घीवाला यांनी अनेक भाषिक राज्ये असावीत आणि भाषिक राज्यांचा प्रश्न सध्या न हाताळता तो काही वर्षांनी हाताळावा, असे जे मुद्दे उपस्थित केलेत ते भाषिक राज्याचा तत्वाला विरोधी आहेत आणि हे तत्व सर्वांनी मान्य केलेले आहे आणि त्याची अंमलबजावणी होणे जरूर आहे.

याप्रमाणे महाराष्ट्राच्या विरोधकांची विचारप्रणाली खोडून काढल्यानंतर बाबासाहेबांनी मुंबईसह महाराष्ट्र निर्माण होणे जरूर व इष्ट आहे, याबद्दल आपले विचार सदर पुस्तकात मांडले. क्षेत्रफळ, लोकसंख्या, उत्पन्न, भौगोलिक रचना, इत्यादि गोष्टी नवीन प्रादेशिक राज्य निर्माण करताना विचारात घ्याव्या लागतात. या सर्व गोष्टी महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यास अनुकूल आहेत. त्यासंबंधी बाबासाहेबांनी पुस्तकात आकडेवार माहिती दिलेली आहे. महाराष्ट्रापासून मुंबई स्वतंत्र करणे जर कमिशनला इष्ट आणि जरूरीचे दिसेल तर पश्चिम बंगालपासून कलकत्ता स्वतंत्र का करू नये? या प्रश्नाचे उत्तर कमिशनाला द्यावे लागेल असे बाबासाहेबांनी सांगितले. मुंबईत बुद्धिजीवी व श्रमजीवी लोक रहातात. मुंबईला वीज, पाणी, धान्य, भाजीपाला यांचा पुरवठा महाराष्ट्रातून होतो. मुंबई महाराष्ट्रातून वेगळी केली तर मुंबईच्या जीवनात कल्पनातीत उलथापालथी होतील. मुंबईसह महाराष्ट्राचा प्रश्न हा कमिशननेच सोडविला पाहिजे. त्याला लवादाचे स्थान देऊ नये असा बाबासाहेबांनी कमिशनला व विरोधकांना पुस्तकाच्या शेवटी इषारा दिलेला आहे.

66. "......Maharashtra and Bombay are not merely independent, they are really one and integral. Severence between the two would be fatal to both. The sources of water and electricity for Bombay lie in Maharashtra. The intelligentsia of Maharashtra lives in Bombay. To separate

the economic life of Bombay precarious and to dissociate the masses of Maharashtra from its intelligentsia without whose lead the masses of Maharashtra will be nowhere.

67. I have seem a suggestion made in some Arbitration quarters that problem of Bombay as a solution should be settled by arbitration. I have never heard of a more absurd suggestion than this. It is as absurd as the suggestion to refer matrimonial cause to arbitration. The matrimonial tie is too personal, to be served by a third party. Bombay and Maharashtra are tied together by God, to use a Biblical phrase. No arbitrator can put them as under. They are only agency which is authorised to do so, is the Commission. Let it decide." (pp. 39-40).

पारेख बिल्डींग सार्वजनिक गणेशोत्सव झावबाची वाडी, ठाकूरद्वार, मुंबई संस्थेतर्फे गणपतीच्या मंडपात बॉंबे सिटी प्रोहिबिशन कमिटीतर्फे सर्वोदय कला मंदिराचा कार्यक्रम ३१–८–४९ ला रात्री ८–३० वाजता झाला. या पथकात काही महार जातीचे कलाकार होते. हे गणपतीचे पुजारी व जीर्णमतवादी ब्राह्मण यांना समजले. तेव्हा त्यांनी गणपती बाटला म्हणून टाहो फोडला व त्याची शुद्धी करण्याचा एक समारंभ साजरा केला. या प्रकरणाची माहिती बऱ्याच पत्रातून आली होती. त्यापैकी काही भाग खाली देत आहे.

"कलापथकांत महार होते म्हणून गणरायाचे शुद्धीकरण! एका सार्वजनिक गणेशोत्सवातील तमाशा" या मथळयाखाली ६–९–४९ च्या "नवशक्तीत" खालील मजकूर प्रसिद्ध झालेला होता.

"गिरगांवातील एक मध्यमवर्गीय सुशिक्षित रहिवाशी असलेल्या चाळीच्या सार्वजनिक गणेशोत्सवांतील एक सत्यकथा. चाळीत पुराण मतवादी तसेच नवविचारांचे व सर्व राजकीय पंथाचे बुद्धिवादी रहिवाशी आहेत. अशा चाळीच्या या वर्षीच्या गणेशोत्सवांत मुंबई सर्वोदय कलापथकाच्या दारुबंदी तमाशाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. तमाशा सुरु होऊन अर्धा तास झाला तोच चाळीतील काही विद्वानांनी चिटणीसांना दम दिला की, "१० मिनिटांत हा तमाशा बंद झाला पाहिजे नाहीतर आम्ही शिमगा करु!" साधे शिष्टाचाराचे नियमही माहीत नसणाऱ्या या मंडळीच्या धुसफुशीतच तमाशा कसा तरी पार पडला.

एवढ्यावरच हा वाद मिटला असता तर हा प्रश्न नव्हता. पण दुसऱ्या दिवशी एक नवीनच वादळ निर्माण झाले. सकाळी गणपतीची पूजा करणाऱ्या उपाध्यायांनी पूजा केली. पण साशंक मनःस्थितीत, संध्याकाळपर्यंत त्यांनी माहिती मिळविली आणि

चिटणीसांना पत्र लिहिले की, तमाशात महार आहेत, ही गोष्ट तुम्हाला माहिती असूनही केवळ आम्हाला खिजविण्यासाठी तमाशाचा कार्यक्रम ठेवला, की ते तुम्हाला माहीत नव्हते, याचा खुलासा होईपर्यंत मी गणपतीची पूजा करणार नाही." कार्यकारी मंडळ (ज्यात सर्व सुशिक्षित आहेत.) या पत्राने बावरून गेले. चाळीत उघड उघड दोन गट तयार झाले. एक "महार गणेशोत्सवाच्या मंडपात आले तर बिघडले कोठे" असे म्हणणारा तर दुसरा "मंडपात महार आल्यामुळे गणपतीची शुद्धि झाली पाहिजे," असे म्हणणारा. या दुसऱ्या गटांत विद्वान व कायदा जाणणाऱ्या व्यक्तीही आहेत.

पत्राचा विचार करण्यासाठी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. दीड दिवस चाळीतील एक दोन व्यक्तींनी पूजा करण्याचे मनोधैर्य दाखविले, असे असूनही पूजेची अशीच अन्य व्यवस्था चालू ठेवण्याचे प्रयत्न न करता कार्यकारी मंडळ पुराणमतवादी बनले. गणरायाच्या शुद्धीसाठी शांती करण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाने घेतला.

आश्चर्य वाटते ते उपाध्यायांच्या वागणुकीचे नव्हे तर त्यांना साथ करणाऱ्या व सार्वजनिक ठिकाणी हरिजन येऊ नयेत असे मानणाऱ्या सुशिक्षित तरुणांचे असे सार्वजनिक गणेशोत्सव कायद्याने बंद होणे आवश्यक आहे, यात शंका नाही."

६–९–४९ च्या लोकशाहीच्या अंकात "सार्वजनिक गणपतीचे बाटगे भक्त" व "असले गणेशोत्सव बंद करणेच श्रेयस्कर" या दोन शीर्षकाखाली वरीलप्रमाणेच विचार प्रदर्शित केलेले होते.

१७–९–४९ च्या धनुर्धारीत "हे शहाणे कोण?" या शीर्षकाखाली "जिवा"ने या प्रकरणावर आपले विचार प्रकट केले होते. या तमाशात "ज्या मुली नाचल्या त्या महाराणी नव्हत्या, मांग होत्या. चागल्या शिकल्यासवरलेल्या होत्या. त्या झावबाच्या वाडीतील या प्रकाराबद्दल मात्र जिवाला मुळीच आश्चर्य वाटत नाही. शिमग्यामध्ये सार्वजनिकरित्या भाग घेणारे नि अचकट विचकट बोलणारे अनेक सुशिक्षित लोक याच वाडीत रहातात, हे त्याला माहीत आहे. कारण अनेक वेळां झवबाच्या वाडीतील होळी वर्तमानपत्रांतून गाजली आहे."

"गणरायाची शुद्धी?" या शीर्षकाखाली १६–९–४९ च्या प्रभातमध्ये "एक ठाकूरद्वार निवासी" यांचे या प्रकरणावर पत्र प्रसिद्ध झाले होते. त्यातील शेवटचा भाग :–

"—अखेरीस कार्यकारी मंडळाची सभा होऊन गणपतीची शुद्धी करण्यासाठी "शांत" करण्याचे ठरविण्यांत आले व हा विधी आटोपण्यांत आला.

शुद्धिकरणाची बातमी समजताच दारुबंदी समितीचे अधिकारी श्री. आंबेगांवकर होतो. जे ४ सप्टेंबर रोजी श्री. बाकरे यांना भेटले व त्यांनी वरील प्रकरणाबद्दल त्यांना

विचारणा केली. वरील प्रकार झाल्याची कबुली श्री बाकरे यांनी दिली. त्याबद्दलची साद्यंत हकीकत देण्यासाठी दि. ५ सप्टेंबर रोजी दारुबंदी कचेरीत येण्याचे त्यांनी कबूल केले. परंतु श्री. बाकरे हे दुसरे दिवशी ऑफिसांत आले नाहीत म्हणून शुक्रवार दि. ९ रोजी सदर गणेशोत्सव समितीचे सेक्रेटरीस त्यांनी भेटीस बोलाविले. या भेटीमध्ये चिटणीसांनी ह्या प्रकरणी शुद्धी झाल्याचा इन्कार केला, व याबद्दलचा लेखी कबुलीजवाब दारुबंदी समितीला द्यावयाचे कबूल केले, परंतु पुढे काय झाले हे समजण्यास मार्ग नाही.

ह्या प्रकारावरुन अनेक प्रश्न उपस्थित होण्यासारखे आहेत. हरिजनांच्या स्पर्शाने देव खरोखरच "विटाळला" तर तो मंत्रोच्चाराने कसा काय शुद्ध होणार ? अस्पृश्यता हा हिंदुधर्माला लागलेला एक कलंक आहे असे महात्मा गांधी म्हणत असत, सरकारने कायदाही केला आहे, अशा परिस्थितीत सुशिक्षित म्हणविणाऱ्यांनी असे वर्तन का करावे ? अशा प्रकराने कायदेभंग केल्यासारखे होत नाही काय ? दारुबंदी समितीच्या वतीनेही या प्रकरणाबद्दल खुलासा झाला पाहिजे व सदर गणेशोत्सव समितीनेही याबद्दल वस्तुस्थिती उजेडांत आणली पाहिजे. श्री. बाकरे व गणेशोत्सवाचे चिटणीस यांचे विधानांत विसंगति आढळते तिचाहि उलगडा झाला पाहिजे."

याच प्रकरणावर १२–१०–४९ च्या टाईम्सने मार्चमध्ये "Brahmins Still Purify God; Orthodoxy Gets Better Of Inadequate Law." या मथळ्याखाली सरकारने अपृश्यता निवारणाच्या अंमलबजावणी-बद्दल आतापर्यंत फारशी उत्सुकता दाखविली नाही व हे प्रकरण वर्तमानपत्रांनी लोकापुढे नाचते ठेवले आहे तरी सरकारचे अजून डोळे उघडलेले दिसत नाहीत, अशा अर्थाचे विचार प्रदर्शित केले.

"......The Government uses the Sarvodaya Kala Pathak for prohibition and other Government propaganda. A grant of a Lakh of rupees has been sanctioned for this. A special committee of which the Labour Commissioner is the Secretary, controls the Pathak. Any ill treatment to the Pathak is an affront to the Government. What we have the Section Police, the C.I.D., The prohibition department, the Labour Commissioner done about it, after the matter was reported in the press ?

Every Ganapathy Festival Committee in the city has to obtain permission from the Police before fixing any programme. There are many ways for Government for ensuing human treatment to all those for whom the temple entry

legislation has been passed. It is time the Legal Remembrarees took note of the loop holes in Law."

वर्तमानपत्रातून या प्रकरणावर खूप वादविवाद झाल्यानंतर
(1) "The Bombay Harijan Temple Worship" (Removal of Disabilities Act, 1938). (2) Harijan (Removal of Social Disabilities Act, 1946), and (3) The Bombay Harijan Temple Entry Act, 1949,

या पहिल्या दोन कायद्याखाली शुद्धिप्रकरणातील लोकावर कायदेशीर इलाज करता येईल काय, या संबंधी सरकार विचार करीत आहे, असा एक समज पसरला. पुन्हा सदर प्रकरणातील वाचीवीर घाबरून गेले. आपल्य गळ्यात कायद्याची घोरपड पडण्याच्या आतच आपण झावबावाडीत महात्मा गांधीचा पुतळा उभारला तर या प्रकरणाची फारशी झळ लागणार नाही, असे ठरवून या लोकांनी पुतळ्याच्या फंडाची चळवळ उत्पन्न केली. या चळवळीबद्दल वर्तमानपत्रांतून टीका करण्यात आली. २५-१०-४९ च्या धनुर्धारीत पुन्हा महात्माजींचा पुतळा या शीर्षकाखाली खालील मजकूर प्रसिद्ध झालेला होता :- ता. ८ ऑक्टोबरच्या अंकात झावबाच्या वाडीतील महात्माजीच्या पुतळ्यासंबंधी जीवाने लिहिले. त्यावर ता. १५ च्या अंकात झावबावाडी मित्रमंडळाचा खुलासा छापला. त्यानंतर त्याच वाडीतील एका इसमाचं पत्र अले आहे. तो पत्र लेखक लिहितो :-

"महात्माजींचा पुतळा बसवण्याची कल्पना वाडीतील लोकाची, हे खरे नाही, तर वाडीत सहस्त्रबुद्धे नावाचे कुणी शिल्पकार रहातात त्यांनी स्वस्तात पुतळा बसवून देतो म्हणून सांगितलं म्हणून स्मारक समितीच्या पहिल्या सभेत पुतळा बसविण्याची कल्पना निघाली. वास्तविक वाडीतील बहुसंख्य लोक हिंदुत्वनिष्ठ नि राष्ट्रीय स्वयंसेवक घवाले आहेत. संघचालक गोळवलकर गुरुजी मुंबईस आले तेव्हा वाडीच्या तोंडावर, याच लोकांनी स्वागताच्या कमानी उभारल्या होत्या. याच लोकांचे त्या स्मारक समितींमध्ये बहुमत आहे. हे लोक अजून देखील गांधीजींची मोहात्मा, पापात्मा अशी टिंगल-टवाळी करीत असतात, बरं, हा पुतळा बसवला तिथं आज काय परिस्थिती आहे ? पुतळ्याच्या आजूबाजूला सट्टया-जुगारांचे अड्डे चालू असतात. दारुच्या भट्टया चालू आहे, पोलीस छापे घालीत आहेत, मवाल्यांचा अड्डा पुतळ्यासमोर बसून रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या भगिनींची टिंगल टवाळी करतो आहे असल्या जागेत गांधीजींचा पुतळा उभारला जावा, यांत त्या थोर महात्म्याचा कोणता गौरव आहे. ?—"

वरील खुलाशावरुन हे स्पष्ट होते की, गणपतीला शुद्ध करुन घेण्यात हिंदुत्वनिष्ठ लोक व उच्च दर्जाचे सुशिक्षितहि होते, आणि कायद्यातील योग्य तो अधिकार

वजावून कायदेभंग करणाऱ्यांना सरकार कोर्टात खेचण्यासही उत्सुक नव्हते. परंतु सरकारने पुढे या कायद्यांत दुरुस्त्या घडवून आणल्या.

हैदराबाद संस्थानांत अस्पृश्यांची जी पूर्वी चळवळ चालू होती, तिच्यावर मुसलमान पुढाऱ्यांच्या छाया पडलेल्या असत. या पुढाऱ्यांची इच्छा ही की, अस्पृश्यांतील लोक जितके मुसलमान करतां येतील तेवढे करावेत व मुसलमान समाजाची लोकसंख्या वाढवावी, त्याच बरोबर जे अस्पृश्य पुढारी आहेत त्यांना काही ना काही मार्गांनी मिंधे करुन त्यांचा उपयोग हिंदू पुढाऱ्यांच्या विरुद्ध जेवढा करता येईल तेवढा करावा. या संस्थानात रझाकारांचे प्राबल्य वाढल्यानंतर काही अस्पृश्य पुढारी [संस्थानातील] रझाकारांच्या पुढाऱ्यांचे कच्छपी लागले. त्यांतील प्रमुख पुढारी श्री. बी. एस. व्यंकटराव आणि श्री, श्यामसुंदर हे होते. पहिले, श्री. लायकअली यांच्या मंत्रीमंडळांत शिक्षणमंत्री होते. हे दोघे पुढारी "अंजुमान-इ-पास्ता अक्वम [अस्पृश्यांची संघटना] या संस्थेचे प्रमुख होते. हैद्राबाद हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून व्हावे, ते भारतात विलीन होऊ नये, अशी जी चळवळ संस्थानात चालू होती तिला व्यंकटराव यांचा पाठिंबा होता. जे मुसलमान पुढारी ब्रिटीश सरकारकडे ही मागणी करण्यास लंडनला गेलेले होते त्यांच्याबरोबर श्री. व्यंकटरावहि होते. बाबासाहेबांनी धर्मांतराची घोषणा १९३५ साली केली तेव्हां हे पुढारी हैदराबाद संस्थानांत धर्मांतराची चळवळ करीत होते. तेव्हा ते हैदराबादी आंबेडकर म्हणून प्रसिद्धी पावले होते. ते मुसलमानांच्या बरोबर सहकार्य करुं लागतांच त्यांनी बाबासाहेबांच्या बरोबर असलेला आपला संबंध तोडला. श्री. व्यंकटराव आणि श्यामसुंदर यांच्या पुढारीपणाविरुद्ध, एक पक्ष संस्थानांत निर्माण झाला. त्या पक्षातील एका तरुणाने टाईम्समध्ये या दोघांचे पुढारीपण कसे स्वार्थी आहे ते अस्पृश्यांच्या हिताकडे कसे पहात नाही वगैरे मुद्यावर पत्र प्रसिद्ध केले ते असे :—

Sir — I have seen the statement of Mr. B. Shamsunder, a so-caled leader of the depressed classes of Hyderabad, made in London, wherein he declared that the nine million depressed classes of Hyderabad were behind the Nizam and that they were not Hindus and had no affinity with them or their culture or religion. Mr. Shamsundar is one of the lieutenants of Mr. B. S. Venkantrao, Minister for Education in the Laik Ali Cabinet, who himself claims to be the leader of an organisation called the Anjuman-i-Pasta Akwam (Union of the Depressed Classes) which is a step-child of Kasim Razvi, having been regularly financed by him to serve as an instrument of propaganda.

I wonder if Mr. Shamsundar knows the language of the depressed classes which are mainly Marathi nad Telgu. The very name of the party which Mr. Shamsundar claims to represent is unintelligible to the depressed classes. The depressed classes of Hyderabad have been fighting for long against their exploiters just to achieve the simple rights of human beings. They have been and shall ever remain behind the prople's struggle.

P. S. MORE."

Bombay.

(The Times of India, 30-9-48).

# खंड दहावा

## प्रकरण ३.

## संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रांतांची भाषावर राज्यरचना करण्याचे धोरण काँग्रेसने स्वीकारलेले होते. या धोरणानुसार विदर्भाचे स्वतंत्र राज्य व्हावे, यासाठी चळवळ करण्यासाठी विदर्भातील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ऑगस्ट १९४० मध्ये महाविदर्भ सभा स्थापन केली आणि विदर्भाचे स्वतंत्र राज्य झाले पाहिजे अशी चळवळ सुरु केली. महाराष्ट्रांतील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी २८ जुलै १९४६ ला संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन करुन विदर्भ, मराठवाडा आणि मुंबई यांच्यासह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे, अशी चळवळ सुरु केली. संयुक्त महाराष्ट्राची पहिली परिषद मुंबईत भरली. स्वागताध्यक्ष **श्री. स. का. पाटील**, हे होते' भाषिक प्रांत-रचनेच्या प्रश्नांचा विचार करुन त्यांवर अहवाल प्रसिद्ध करण्यासाठी मध्यवर्ती सरकारने जून १९४८ साली **"धार कमिशन"** नेमले. सदर कमिशनने ज्या संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी सूचना केल्या त्यांत त्यांने असे सूचविले की, मुंबई शहर हे बहुविध संस्कृतीचे केंद्र असल्यामुळे त्याचा संयुक्त महाराष्ट्रांत समावेश करण्यांत येऊ नये. त्याचे स्वातंत्र राज्य करावे. या सूचनेविरुद्ध महाराष्ट्रातील लोक खवळले. तेव्हा या प्रश्नाचा पुनः विचार करण्यासाठी काँग्रेसने **जे. व्ही. पी.** (जवाहर, वल्लभभाई आणि पट्टाभिसितारामय्या) समिती नेमली. या कमिटीने धार कमिशनच्या सूचनेला पाठिंबा दिला. **१९५२** च्या मध्यंतरी आंध्रचे स्वतंत्र राज्य निर्माण होईपर्यंत प्रांणांतिक उपोषण **श्री. पोट्टु रामल्लु** या काँग्रेसच्या सदस्याने सुरु केले व त्यांत ते मरण पावले. तेव्हा आंध्रच्या लोकांनी नासधूस करण्याची उग्र चळवळ हाती घेतली आणि कोट्यावधी किंमतीची सरकारी मालमत्ता जाळली व लुटली. मध्यवर्ती सरकारने हे उग्र आंदोलन पाहून १९–१२–१९५२ ला घोषणा केली की एका वर्षाचे आत आंध्र राज्याची स्थापना होईल. ही घोषणा ऐकूण कर्नाटक आणि संयुक्त महाराष्ट्र

राज्यांचीहि चळवळ जोरात चालू झाली. विदर्भ राज्याची मागणी ही संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीतील मोठा अडथळा होता. तो दूर करण्यासाठी विदर्भवादी कार्यकर्त्यांबरोबर महारांष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी विचारविनिमय केली आणि विदर्भवाद्यांना कांही सवलती देऊन संयुक्त महाराष्ट्रवाद्यानी त्यांना संयुक्त महाराष्ट्रात विदर्भ सामील करण्यास तयार केले. यासाठी नागपूर येथे २८–९–१९५३ रोजी, करार झाला. १–१०–१९५३ ला आंध्र राज्याची स्थापना झाली. भाषिक राज्यांची पुर्नरचना करण्याच्या प्रश्नांची चर्चा करुन सूचना करण्यासाठी केन्द्र सरकारने आणखी एक कमिशन ९–१२–१९५३ ला नेमले. अध्यक्ष **फजल अली** व सभासद, **हृदयनाथ कुंझरु** आणि **सरदार पण्णीकर** हे दोघे होते. कमिशनने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा असे ठरविले. आणि त्याचा अहवाल प्रसिद्ध होण्याच्या अगोदर **कुंझरु** आणि **पण्णीकर** यानी ही बातमी **श्री. हिरे** यांना खाजगी बोलण्याच्या ओघात सांगितली. तिचा स्फोट वर्तमानपत्रांत झाला. मुंबई, महाराष्ट्रात गेली तर गुजराथी व्यापारी आणि उद्योगपती यांचे काय होईल, अशी काँग्रेसमधील गुजराथ्यांना भीती वाटू लागली. काँग्रेसचे अध्यक्ष **श्री. ढेबर** आणि इतर पुढारी यांनी ३–६–१९५५ ला **श्री. मोरारजी देसाई** यांच्या बंगल्यावर, याबद्दल गुप्त खलबते केली. आणि मुंबई शहर महाराष्ट्रात न जावे यासाठी त्यांनी असा डाव टाकला की, मुंबई प्रांत द्विभाषिक– मराठी व गुजराथी– व्हावा. गुजराथ्यांनी या मागणीसाठी मुंबईत आणि गुजराथमध्ये सभा भरविण्याची चळवळ सुरू केली. तेव्हा महाराष्ट्रीय आणि गुजराथी यांच्यात, परस्पराबद्दल उद्वेग, संताप आणि असंतोष निर्माण झाला. अल्प प्रमाणात दंगलीही झाल्या. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने ६–१०–५५ ला संयुक्त महाराष्ट्राची (मुंबईसह) मागणी करणारा ठराव मंजूर केला. **फाजल अली कमिशनचा** अहवाल १०–१०–५५ ला प्रसिद्ध झाला. त्यांत सर्व प्रांतांची भाषिक राज्ये करण्याची शिफारस होती. गुजराथी काँग्रेस कार्यकर्ते आणि **श्री. ढेबर** यांच्या वजनाला बळी पडून कमिशनने अशी शिफारस केली की, विदर्भाचे स्वतंत्र राज्य व्हावे आणि गुजराथ आणि महाराष्ट्र यांचे द्विभाषिक राज्य व्हावे. अहवाल प्रसिद्ध झाला तेव्हा महाराष्ट्रीयांत असंतोषाच्या ज्वाला भडकल्या आणि प्रचंड प्रमाणात सरकारविरूद्ध आंदोलने ठिकठिकाणी होऊ लागली.

लोकप्रक्षोभाला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने महाराष्ट्रीय काँग्रेस पुढाऱ्यांना वाटाघाटीसाठी दिल्लीला बोलावले. सर्वश्री **देव, गाडगीळ, हिरे, चव्हाण** व **कुंटे** यांनी दिल्लीत १७ ते १९ ऑक्टोबर १९५५ ला वाटाघाटी केल्या. त्यात द्विभाषिकाला पाठिंबा द्यायचे ठरविले. २१ ऑक्टोबरला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने तसा ठराव केला. मग संयुक्त महाराष्ट्र चळवळवाल्यांनी काँग्रेस पुढाऱ्यांच्या विरूद्ध, त्वेषाने लढा सुरू केला. १८ नोव्हेंबरला **श्री. देसाई** यांनी मुंबई विधानसभेत त्रिराज्याचा (विदर्भ, मुंबई आणि महाराष्ट्र) ठराव मांडला. मुं. प्र. काँग्रेसतर्फे या ठरावाला

पाठिंबा देण्यासाठी २० नोव्हेम्बरला ( रविवार ) चौपाटीवर सभा झाली. श्री. **पाटील** अध्यक्ष होते. **श्री. देसाई** प्रमुख वक्ते होते. जनतेने सभेत खूपच गोंधळ उडवून दिला. तेव्हा **श्री. स. का. पाटील** रागाने म्हणाले, असा गोंधळ केला तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र यावच्चंद्रदिवाकरौ मिळणार नाही. शांततेने वागाल तरच मिळेल. **पाटलांचे** हे उद्‌गार म्हणजे आगीत तेल ओतल्यासारखे झाले. मुंबईत २१ नोव्हेंबर १९५५ ला प्रचंड हरताळ पाडला. पोलीस चौक्या, बसेस, ट्राम्स वगैरे जाळण्यात आल्या. पोलीसाना गोळीबार करावा लागला. गोळीबारात ८० लोक जखमी झाले. मुंबईतील हे भयानक दृष्य पाहून जनतेत विलक्षण चेव निर्माण झाला. कायदेमंडळातील सदस्यांनी राजीनामे द्यावेत म्हणून चळवळ निर्माण झाली. लोक जमावाने या सदस्यांच्या निवासस्थानांवर मोर्चे घेऊन गेले. विधानसभेतील ९४ काँग्रेस पक्षीय आमदार आणि विधान परिषदेतील १७ आमदार यांनी राजीनामे दिले. सरकारने १६-१-५६ ला जाहीर केले की, मुंबई शहर केंद्रशासित होईल व बाकीच्या प्रदेशांचा संयुक्त महाराष्ट्र होईल. मुंबई महाराष्ट्रात येत नाही हे पाहून जनतेच्या आधीच्या प्रक्षोभात तेल पडल्यासारखे झाले. जनतेत प्रचंड आंदोलने दररोज होऊ लागली. महाराष्ट्रातील सर्वच पक्ष यावेळी एकत्र आले. सर्वश्री **प्र. के. अत्रे, प्रबोधनकार ठाकरे** अशांसारख्या मान्यवर वक्त्यांनी आपल्या भाषणांनी लोकांची मने जागृत ठेवली. यावेळी **बाबासाहेब** मुंबईत सिद्धार्थ कॉलेजातील त्यांच्या निवासस्थानी आजारी असून त्यांचेवर औषधोपचार चालू होते. केंद्र सरकारचा १६ जानेवारी १९५६ चा म्हणजे केंद्रशासित मुंबई करण्याचा निर्णय त्यांना पसंत नव्हता. या निर्णयाविरुद्ध जनतेने १७ जानेवारीला सचिवालयावर प्रचंड मोर्चा नेला पोलिसांनी गोळीबार केला नाही. पण अश्रुधूराचा वापर मोठ्या प्रमाणात केला. ही बातमी **बाबासाहेबांना** चार वाजता समजली. तेव्हा त्यांनी **श्री. जवाहरलाल नेहरूंना** तार करुन आपली नापसंती व्यक्त केली. मुंबई महाराष्ट्राबाहेर देऊ नये आणि उत्तरप्रदेश, बिहार हे अवाढव्य प्रदेश नसावेत, त्यांचे तीन प्रदेश करावेत. महाराष्ट्राचेही तीन प्रदेश करावेत. अस्पृश्यांना राजकीय क्षेत्रांत संपूर्ण संरक्षण मिळावे. तसे झाले नाही तर फेडरेशनला घातापाताची चळवळ करणे भाग पडेल. अशा अर्थाची ती तार होती. ती मूळची तार अशी :–

TELEGRAM

Pandit Jawaharlal Nehru,
NEW DELHI.

Regret inability attend Parliament. Docotor strongly object my travelling to Delhi. Wanted to express my views in Parliament over issue of linguistic provinces. Being un-

able to do so. I am conveying views to you by this telegram. Am speaking on behalf of Federation. Federation like Bombay go Maharashtra but do not mind Bombay made separate State. However very strongly object creation of such monolithic monstrohs States as U.P. Bihar,, Maharashtra. Federation feels these States not only ge great danger to Central Government will also be great danger to minorities and Scheduled Castes. Federation wants U.P., Bihar be divided into three States. Maharashtra also be divided into three States. There be no protection to Scheduled Castes under aegies of State in which overwhelming majority is opposed to recognition of Scheduled Castes as human beings. I request you pay serious attention this question. Fear Consequenies might be very serious. Srheduled Castes are now withou atny politiral safeguard.. In their desparation may take to any kind of violende.

Ambedkar.

**पं. नेहरूंनी** अगर केंद्र सरकारने या तारेतील विनंत्यांना मान दिला नाही.

१७ जानेवारीला कडकडीत हरताळ सर्व महाराष्ट्रभर झाला. २–३ दिवसांच्या दंगलीत पोलिसांना ठिकठिकाणी गोळीबार करावा लागला. ७१ लोक ठार आणि ६०० लोक जखमी झाले. १८ जानेवारीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने ठराव केला की मंत्र्यांनी राजिनामे सादर करावेत. २३ जानेवारीला **श्री. भाऊसाहेब हिरे** आणि **श्री. यशवंतराव चव्हाण** यांनी आपापले राजिनामे **श्री. मोरारजी देसाई** यांच्याकडे पाठविले. कॉं. व कमिटीने २३ जानेवारीला ठराव केला की, राजिनामे परत घ्यावेत.

संयुक्त महाराष्ट्रासाठी पद्धतशीर चळवळ करण्यासाठी ता. ६–२–१९५६ ला संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. अध्यक्ष **केशवराव जेधे** व सरचिटणीस **एस. एम. जोशी** समितीच्या चळवळीत अनेक ठिकाणी निदर्शने झाली. काँग्रेस पुढाऱ्यांच्या फोटोंना पादत्राणांचे हार घातले व ते फोटो जाहीर सभेत जाळण्यात आले. अनेक सभा, मुलाखती, वाटाघाटी, वगैरे होऊन शेवटी ६–८–१९५६ ला लोकसभेत द्विभाषिक राज्याचे बिल मंजूर करण्यात आले. १–११–५६ ला द्विभाषिक राज्य सुरू झाले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रश्नावर काँग्रेसेत्तर राजकीय पक्षांनी संयुक्त आघाडी निर्माण केली; ती संयुक्त महाराष्ट्र समिती म्हणून. या समितीत

शिड्यूल कास्टस फेडरेशनही सामील झालेली होती. या पक्षांचे रुपांतर जानेवारी १९५७ मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या नावांत झाले. समितीने १९५७ च्या निवडणूकीत भाग घेतला व जनतेने बहुतांशी उमेदवार निवडून दिले. त्यांत रिपब्लिकन पक्षाचेही उमेदवार होते. अस्पृश्यांच्या राजकीय जीवनांत एवढी मोठी संख्या निवडली गेली ती स्पृश्य व अस्पृश्य मतदारांच्या सहकार्याने. हा अस्पृश्यांचा फार मोठा विजय होय. याचे सारे श्रेय **बाबासाहेबांच्या** कर्तृत्वाकडे जाते. हे सांगण्याची गरज नाही. १९६२ च्या निवडणूकीत हे सारे पारडे उलटे झाले कारण ६ डिसेंबर १९५६ च्या बाबासाहेबांच्या मृत्यूने रिपब्लिकन पक्षांत बरेच गट पडले. संयुक्त महाराष्ट्र समितीतही बरेच गट निर्माण झाले, आणि काँग्रेसला निवडणूकीचे क्षेत्र १९५७ पेक्षा निष्कंटक मिळाले. मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र यांना एकत्र आणून १-५-१९६० ला सरकारने (मुंबईसह) संयुक्त महाराष्ट्र निर्माण केला.

● ●

# खंड दहावा

## प्रकरण ४

# हिंदू कोड बिल

## पार्श्वभूमी

हिंदू समाजाला लागू पडणारा हिंदु कायदा हा ब्रिटिश अमदानीत तयार करण्यात आला. त्याचा पाया वेद, श्रुती आणि स्मृती या हिंदूच्या धर्मशास्त्रांनी सांगितलेले आचारविचारविषयक नियम आणि हिंदूच्या आचारविचारांतून निर्माण झालेल्या व समाजात रूढ झालेल्या रूढी व परंपरा यांचा आहे. वेदात आचारविचारासंबंधी जे नियम सांगितलेले आहेत ते कालपरत्वे आणि प्रसंगानुरूप श्रुती व स्मृती या धर्मशास्त्रांनी विशद करून वाढविले. वेद म्हणजे आर्य ऋषींनी वेळोवेळी रचलेल्या ऋचा. या ऋचा म्हणजे परमेश्वराने ऋषींना दिलेले दिव्य संदेश, श्रुती म्हणजे वेदवाक्ये, परंपरेने ऐकलेले दिव्य ज्ञान, आणि स्मृती म्हणजे वेद व श्रुती यांतील दिव्य ज्ञान स्मरणाने एकत्र केलेला निधी असा साधारणपणे समज आहे. आणि या सर्व ज्ञानाचा समुच्चय म्हणजे 'हिंदू धर्म' धर्म हा ईश्वरी आज्ञेवर उभारलेला असल्यामुळे तो प्रत्येकाने पाळला तर त्याला सद्‌गती (मोक्ष) मिळते, व न पाळला तर दुर्गती (नरक) मिळते, अशी परंपरेने श्रद्धा रूढ झाली. या सामाजिक श्रद्धेमुळे पुरोहित वर्ग व राज्यकर्ते क्षत्रिय याचे समाजात प्राबल्य वाढले. त्यात पुरोहित वर्गाने (ब्राह्मण) आपले अनियंत्रित सामर्थ्य व श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी समाजात जाती निर्माण करून त्यांचे जीवन एका मर्यादित चाकोरीत जखडून टाकणारे नियम श्रुती व स्मृती या ग्रंथात घालून हिंदूसमाजात अनुल्लंघनीय स्वरूपाच्या अनेक जाती निर्माण केल्या. स्त्री आणि पुरुष यांच्यातील व्यवहारी संबंधाबद्दल वेळोवेळी कडक नियम करण्यात आले. यामुळे हिंदू समाजातील निरनिराळ्या जाती आणि पुरुष व स्त्रिया यांच्यात प्रत्येक जीवनावश्यक क्षेत्रात कमालीची विषमता निर्माण झाली.

हिंदु कुटुंबपद्धतीच्या मालकीची जी स्थावर-जंगम मालमत्ता असेल तिची व्यवस्था व वाटपपद्धती कशी असावी यासंबंधी अनेक धर्मशास्त्रपंडितांनी टीका लिहिल्या. त्यापैकी दोन टीका प्रमुख ठरल्या. **विज्ञानेश्वर** ( ११ वे शतक ) यांनी जे नियम केले ते **'मिताक्षर'** या नावाने प्रसिद्ध आहेत, **जीमूतवाहन** (१५ वे शतक) यांनी जे नियम केले ते **'दायभाग'** म्हणून प्रसिद्ध आहेत. या दोन नियमपद्धती

भारतातील निरनिराळ्या प्रांतांत चालू होत्या. मिताक्षर पद्धत प्रथमतः गुजरातमध्ये चालू होती. ( Three Faces Has Bombay by Reba Lewis, p. 133) पण त्यानंतर ती बंगाल सोडून बाकी सर्व हिंदुस्थानात प्रचलित झाली होती. दायभाग फक्त बंगालमध्ये प्रचलित झाली. 'मिताक्षर' पद्धत एकत्र कुटुंबसंस्था आणि वारसा हक्क यांबद्दलचे कायदे सांगते. या पद्धतीखाली वारसा हक्क पुत्रपौत्रादी वंशज आणि सपिंड (एका रक्ताचे नातेवाईक) यांना मिळतो. वडील हयात असताही हा हक्क मुलाला (मुलांना) मिळू शकतो. मात्र स्त्रियांना हे हक्क नव्हते. 'दायभाग' पद्धतीखाली मुलाला (मुलांना) वारसा हक्क फक्त वडिलांच्या मृत्यूनंतर मिळू शकतो. स्त्रियांना पोटगीचा हक्क आहे. ही पोटगी देणे लागू नये म्हणून एक मार्ग धर्ममार्तंडांना सुचला, तो म्हणजे स्त्रियांनी सती जाणे. बंगालमध्ये सतीची चाल फार प्रबळ असण्याचे कारण ही दायभाग पद्धत होय.

हिंदुधर्मातील या द्विविध पद्धतीमुळे अनेक अडचणी व कटकटी निर्माण झाल्या व न्यायखात्यातील कोर्टात जे निकाल देण्यात आले त्यांतील विसंगतपणा आणि तर्कदुष्टताही कायदेपंडितांच्या लक्षात आली. स्त्रियांच्या बाबतीत वारसा हक्क व विवाह यासंबंधी तर अनेक अन्यायमूलक कायद्याची कलमे आहेत. त्यांत योग्य ती दुरुस्ती व्हावी असे समाजसुधारक व स्त्रियांच्या संस्था यांना वाटत होते त्याप्रमाणे चळवळीही करण्यात आल्या. या कलमांना दुरुस्त्या सुचविणारी अनेक बिले मध्यवर्ती कायदे-मंडळात आणली गेली. १९३७ साली सर्वश्री **अखिलचंद्र दत्त, ए. एन्. चट्टोपाध्याय, कैलास बिहारी, न. वि. गाडगीळ, के. संतानम्** आणि **डॉ. व्ही. जी. देशमुख** यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात प्रयत्न केले. हिंदु स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्कासंबंधीचा कायदा व त्यांत दुरुस्त्या सुचविणारी विधेयके (बिल्स) या गृहस्थांनी मांडली. हिंदू स्त्रियांना एकत्र कुटुंबापासून स्वतंत्र राहण्याचा हक्क असावा व त्यांना त्या कुटुंबाच्या एकत्र स्थावर-जंगम मालमत्तेतून पोटगी मिळावी, असे विधेयक **डॉ. देशमुख** यांनी आणले होते, पण ते मंजूर झाले नाही. उपरिनिर्दिष्ट लोकांची विधेयकेही मंजूर झाली नाहीत. १९३७ सालचा हिंदू स्त्रियांच्या मालमत्ते-संबंधीच्या हक्काचा कायदा मंजूर करण्यात आला. पण या जुजबी सुधारणेमुळे कायदेपंडित, समाजसुधारक आणि सुशिक्षित स्त्रिया यांचे समाधान झाले नाही. हिंदू कायद्यात सर्व प्रकारची इष्ट सुधारणा झाली पाहिजे अशी त्यांनी चळवळ सुरू केली व सरकारकडे या बाबतीत मागणी केली. या सर्व सूचनांचा विचार करून सरकारने १९४१ साली 'दी हिंदुकोड कमिटी' नेमली. सर्व हिंदु कोडकायद्याचे संहितीकरण करून सर्व हिंदूंना एकच कायदा करावा व त्यात हिंदू स्त्रियांना समान हक्क देण्यात यावेत हे या समितीचे प्रमुख काम होते. वारसाहक्क व विवाह या विषयासंबंधी विस्तृत प्रश्नपत्रिका तयार करून कमिटीने सुधारकांची, जीर्णमतवाद्यांची व स्त्री संस्थांची मते अजमावण्यासाठी पाठविल्या. त्यांच्याकडून जे अभिप्राय व ज्या सूचना

आल्या त्यांचा साकल्याने विचार करून समितीने कायद्याचा एक मसुदा तयार केला. त्याची दोन विधेयके मार्च १९४३ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळात मांडण्यात आली. ती वारसाहक्क व विवाह यासंबंधी होती. त्या दोन्ही विधेयकांवर सनातनी हिंदूंनी कडाडून हल्ला केला आणि म्हटले की, असले कायदे करून सरकार सनातन हिंदू धर्माचा निःपात करीत आहे. सुधारकांनी सदर विधेयकांना काही सूचना व दुरुस्त्या सुचविल्या. त्यांचा विचारविनिमय करण्यासाठी कायदेमंडळाने ती विधायके जॉइंट सिलेक्ट कमिटीकडे सोपविली. कमिटीने काही दुरुस्त्या करून ती विधेयके परत कायदेमंडळाकडे पाठविली, पण ती मंजूर झाली नाहीत.

१९४४ साली सरकारने दी हिंदु लॉ कमिटीचे पुनरुज्जीवन केले व हिंदू कायद्याचे संहितीकरण करण्याचे काम तिला दिले. सदर कमिटीचे अध्यक्ष **सर बेनेगल, नरसिंगराव** यांना करण्यात आले. ( अखिल भारतीय महिला परिषद–हिंदु कोडाचा मसुदा लेखिका श्रीमती के. शिवराव. अनु. श्री. मनोहर ) ही कमिटी राव कमिटी म्हणून ओळखली जाई. सदर कमिटीने हिंदू कायद्याचा मसुदा तयार केला. तोच हिंदु कोड म्हणून प्रसिद्ध झाला त्याचे विधेयक तयार करण्यात आले. ते विधेयक पूर्वीच्या जॉइंट सिलेक्ट कमिटीने तयार केलेल्या नमुन्यावरच तयार केले. सदर विधेयकाविरुद्ध सनातन्यांनी पुन्हा चळवळ सुरू केली.

'हिंदु कोड बिल' यावर वर्तमानपत्रांतून जेव्हा जेव्हा संदर्भ देण्यात येत तेव्हा तेव्हा त्याला **'आंबेडकर स्मृति'** असे संबोधण्यात येत असे. **आंबेडकर** कायदेमंत्री म्हणून हिंदु कोडला कायदेशीर भाषेची लेणी लेवविण्याचे प्रमुख काम त्यांच्याकडे आले होते. ते काम ते अत्यंत काळजीपूर्वक व सचोटीने करीत होते, त्या दिवसांत त्यांची प्रकृती बिघडत चालली होती, तरीही ते आपल्या नेहमीच्या अबाढव्य कार्यपिपासू वृत्तीने, इतर कामांच्या ओझ्याखालीसुद्धा, ' हिंदुकोड ' साठी खूप मेहनत घेत असत. हजारो विरोधकांशी चर्चा करून त्यांची बाजू कशी चुकीची व समाजाला हानिकारक आहे, हे पटवून देण्याचे ते मनापासून प्रयत्न करीत होते. राज्यघटना व हिंदु कायदा ही दोन बहुमोल व चिरंजीव देणी आपण भारताला देत आहोत, ही जाणीव त्यांना कार्यप्रवृत्तीचे बळ देत होती. हीच जाणीव त्यांच्या उत्तुंग महत्त्वाकांक्षेला पोषक होती. हिंदु कायदा सर्वांगसुंदर व्हावा म्हणून ते प्रत्येक कलम नीट तपासून, पुनः पुनः लिहून काढीत असत. अशा रितीने प्रचंड परिश्रम करून त्यांनी हे बिल तयार केले.

बिलाचा मसुदा तयार झाल्यानंतर तो लोकसभेसमोर मांडण्याची संमती **श्री. जवाहरलाल नेहरू** आणि इतर पुढाऱ्यांनी दिली. 'बिल लोकसभेत येणार! येणार!!' असा गाजावाजा वर्तमानपत्रांतून होऊ लागला तेव्हा जीर्णमतवादी, सनातनी हिंदूंनी बिलाविरुद्ध जाहीर चळवळ सुरू केली. सदर विरोधकांना **बाबा-**

साहेबांनी जाहीर सभेतून व खाजगी चर्चेतूनही उत्तरे दिली. श्री. नेहरू, हेही 'काही झाले तरी हिंदु कोड बिल आम्ही मंजूर करणारच !' अशा जाहीर सभांमधून घोषणा करू लागले. जसजसे हिंदु कोड बिल मंजूर करून घेण्याच्या घोषणा होऊ लागल्या, तसतसे जीर्णमतवादी विरोधक जास्तच चिडून जाऊ लागले. या लोकांचा मुख्य मुद्दा हा की हिंदु कोड आमच्या धर्मावर घाला घालीत आहे. अंदर की बात ही की, **आंबेडकर** हे अस्पृश्य म्हणजे अवर्ण; त्यांच्या हातून स्मृतिशास्त्रात फेरफार घडवून आणणे म्हणजे केवढा भ्रष्टाकार आणि नरकाचा मार्ग !

या संबंधात खालील मजकूर टाईम्समध्ये प्रसिद्ध झाला होता :-

"DRAFT HINDU CODE REVISED, SELET COMMITTEE"

Report on Bill — Great Improvement

NEW DELHI, AUGUST 16 : Important changes have been made in the Draft Hindu Code Bill by the Select Committee whose report has been submitted to the Central Legislature by the Minister of Law, Dr. B. R. Ambedkar.

The revised code rearranges the subject matter of the original Bill in a more logical sequence, and the sections are now numbered consequentially and not divided into parts with separate section as in the original Bill. The Bill as it now stands seeks to do away as far as possible with all customary laws.

The portion relating to marriage has been revised and appears in a more elaborate form. Provision has been made for judicial separation, restoration and conjugal rights and custody of children.

In the chapter of adoption, the adopted son is given the right to inherit one half of the estate inherited by the widow. A simple procedure for the re-distribution of adoption has been devised.

The chapter on joint family property does away with the right to claim any interest in ancestral property arising by reason of birth in a family.

Joint tenancy, as understood in Mitakshera Law is replaced by tenancy in common.

It is understood that these provisions were found in the original Bill, but not in such elaborate forms. Similarity in the chapter on women's property, it is definitely said down that all property acquired after the code is adopted will be deemed to be separate property.

The rules of succession have been simplified by recasting the chapter on succession. Elimination of what may be regarded as distant heirs has also been affected. An attempt has also been made to make the law of succession uniform for all Hindus.

Provisions relating to maintenance, found scattered in various parts of the original Bill have now been grouped together and a new provision has been added whereby the mother is put under obligation to maintain children if the father is unable to do so

It is stated by those who were closely connected with the Bill that it marks a great improvement over the previous one and ensures uniformity in law in all provinces.

## OPINION SHARPLY DIVIDED

Dr. Ambedkar is belleved to be keen on getting the Bill passed as early as possible, but the opinion in the House is so sharply divided that it is held rather doubtful whether it would be taken up during the present session. It is understood that as many as eleven members have recorded their minutes of dissent to the Bill and suggested postponement of legislation. Some of them feel that a bill of such controversial nature affecting the very roots of the present Hindu society should not be rushed through, but await further dispassionate consideration. Two reasons given for such postponement are firstly, the main object of the Bill to bring about uniformity in law cannot be achieved so long as agricultural land continues to be a provincial subject as at present, and secondly, those elected under a new constitution would be more representative of public opinion to takle the problem," (The Times of India, Tuesday, dated 17-8-48, pages 1 and 7).

जीर्णमतवादी हिंदूंचा विरोध वाढू लागला तरी नेहरू, त्या विरोधाला न जुमानता बिल मंजूर करून घेण्याचे प्रयत्न करू लागले. काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीची बैठक ७–९–५१ ला दिल्लीत झाली, तेव्हा पं. नेहरूंनी असे उद्गार काढले की, बिल पुढील निवडणुकीच्या आत मंजूर झालेच पाहिजे. याबद्दल दिरंगाई होऊ देता कामा नये. हे बिल मंजूर करून घेण्यास सरकार बांधले गेले आहे. बिलात घटस्फोट आणि एकपत्नि-व्रत ही कलमे मतभिन्नता निर्माण करण्यास कारणीभूत झालेली आहेत. त्यावर चर्चा करून विरोधकांच्या मतांना मान देण्याची तयारी बाबासाहेबांनी दाखविली. कसेही करून बिल मंजूर व्हावे हाच त्यांचा प्रबळ हेतू होता. या बैठकीचा वृत्तांत ८ सप्टेंबर १९५१ च्या टाईम्स ऑफ इंडिया पत्रात प्रसिद्ध झालेला होता, तो असा :–

"HINDU CODE BILL"

Mr. Nehru Urges Speedy Passage.

The Prime Minister to-day impressed at a Congress Parlamentary Party meeting that the passage of hte Hindu Code Bill could not be delayed, it is understood. The Government was committed to it and its enactment was desirable before the elections.

Dr. Ambedkar, who has all along been a stout protagonist of the measure, is believed to dave lent support to this appeal with the undertaking to compromise on differences of opinion as against matters of dispute such as the issues of monogamy and divorce.

While Mr. Rohini Kumar Chaudhari and Mr. Biswanath Das opposed the Bill, Mr Munshi emphasised that much of it was concerned with codifying Hindu law which varied from State to State. As such there could be no objection to this asptct of the measure.

The decision was also taken that controversial clauses should be discussed by the party outside the House so as to facilitate acceptance of compromise amendments. This follows the procedure adopted by the Congress Party during the Constituent Assembly debates.

As already decided, free voting will be allowed.

काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीची बैठक १३ सप्टेंबर १९५१ ला भरली; तेव्हा लोक-सभेच्या चालू अधिवेशनात बिलाची विवाह आणि घटस्फोट कलमे मंजूर करून घ्यावीत

आणि वारसाहक्क वगैरे विवादात्मक कलमे वेळ मिळाल्यास, चालू अधिवेशनात अगर त्यानंतरच्या अधिवेशनात मंजूर करावीत, असे ठरविण्यात आले. याबद्दलचा वृत्तांत १४ सप्टेंबरच्या टाईम्समध्ये "Hindu Code Bill—Congress Party Move" या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला होता.

हिंदु कोड बिलाचे कलम २ यात निरनिराळ्या विषयांची क्षेत्रव्याप्ती याबद्दल तरतूद केलेली होती. हे कलम कोणकोणत्या धर्मातील लोकांना लागू होते. याबद्दलची ती तरतूद होती हे कलम १७-९-५१ ला लोकसभेत चर्चेला आले (Volume 15, Part 2 — August-September 1951, P. 2674) तेव्हा त्याच्यावर अनेक सभासदांनी हल्ले केले. मुसलमान, ख्रिस्ती, जैन, शीख, वगैरे सभासदांनी हे कलम आपल्या लोकांना लागू करू नये असा गिल्ला केला. हिंदूंच्यातर्फे **श्री. श्यामाप्रसाद मुकर्जी** यांनी हल्ला चढविला. हिंदुधर्माचे मोठमोठे शास्त्री आणि संप्रदायांचे प्रमुख यांचा सल्ला न घेता केलेला हा **आंबेडकरांचा** उतावीळपणा होय असे मुकर्जी म्हणाले, तेव्हा बाबासाहेब म्हणाले, "हे प्रमुख लोक म्हणजे **करपात्रीजी महाराज** की काय?" त्यावर **श्री. पंडित मित्र** म्हणाले, "त्यांचा सल्ला तुम्ही घेतला असता तर काय बिघडले असते?" **आंबेडकरांनी** उत्तर दिले, "काही बिघडले नसते. मी त्यांना भेटण्यास येण्याची विनंती केली. पण ते आले नाहीत, मी त्यांची भेट घेण्याची टाळाटाळ केलेली नाही." (पा. २७१९).

१८ सप्टेंबर १९५१ ला लोकसभेत अनेक सभासदांची भाषणे झाली. त्यात **श्री. हृदयनाथ कुंझरू** आणि **श्री. न. वि गाडगीळ** (मंत्री–बांधकाम, उत्पादन आणि पुरवठा) यांची प्रमुख भाषणे होती, या दोघांनी जीर्णमतवाद्यांवर कडाडून हल्ला केला. **श्री. न. वि. गाडगीळ** यांचे भाषण फारच आवेशपूर्ण झाले. त्यात त्यांनी आपल्या खुसखुशीत विनोदशैलीत सुसह्य वातावरण निर्माण केले. सर्व बिलातील भाग, ८० टक्के निरानिराळ्या हिंदुधर्मशास्त्रांतील आधारावर आणि हिंदु कायद्यावर उभारून **डॉ. आंबेडकरांनी** हे प्रचंड संहितीकरण तयार तयार केले आहे. बाकीचा २० टक्के भाग नवीन सुधारणा घडवून आणणारा आहे. या ८० टक्के भागाला विरोध करण्याचे कोणालाही कारण नाही, कारण ते कायदे अस्तित्वात आहेत. मग हिंदूंनी त्यांना विरोध करणे आततायीपणाचे नव्हे काय? २० टक्के भाग सुधारणा घडवून आणणार. आहे. त्या सुधारणा भारतीय घटनेतील समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या तत्वांना धरून आहेत तेव्हा त्या सुधारणांना विरोध करणे म्हणजे जुन्या परंपरेला (जमान्याला) चिकटून राहण्याचा हट्ट करण्यासारखे आहे. "तातस्य कूपोयामीति ब्रुवाणा क्षारं जलं कः पुरुषी पिबति।" या विहिरीचे पाणी खारट असले तरी मी ते पिणार, करण ती विहीर माझ्या वाडवडिलांची आहे, अशा आशयाचे **श्री. गाडगीळांचे** भाषण होते. त्यावर जीर्णमतवादी सभासदांनी हल्ले केले तेव्हा **श्री. गाडगीळ** रागारागाने म्हणाले

की, ज्या जुन्या (टाकाऊ) चाली आहेत त्या टाकून दिल्याच पाहिजेत. जुन्या चालीत बदल करू नये असा हट्ट धरणे हास्यस्पद आहे. एखाद्या व्यक्तीला वर्तन करता येत नसेल तर तिच्याबद्दल एवढा (सार्वजनिक) हट्ट का धरावा ? मी सोमनाथच्या दर्शनाला गेलों तेव्हा माझ्या मनात असा विचार आला की, मी ब्राह्मण जातीत जन्मलो, पण ब्राह्मणाची कर्तव्ये मी करीत नाही. मग मी माझ्या ब्राह्मण जातीचा का हट्ट धरावा ? माझ्या मनात आले की आपण जानवेही घालू नये. आणि मी माझे जानवे तोडले. तेव्हापासून मी जानवे वापरीत नाही. असे म्हणता आपला 'कुर्ता' उचलून दाखवीत ते म्हणाले, "पहा ! मी खरे बोलतो मी जानवे वापरीत नाही." (pp. 2754-2766) यासंबंधी वर्तमानपत्रात मोठ्या गमतीने ही हकीकत प्रसिद्ध करण्यात आली होती.

"Mr. Gadgil's speech was punctuated with cheers and interruptions and the Minister was so carried away by the heat of the debate as even to lift up his KURTA and Jacket and bare his manly chest to the House to prove to some rash doubting Thomasas that when he said he had discarded his sacred thread he had in fact done so." (The Times of India, dated 19-9-51, page ').

**श्री. गाडगीळ** यांच्या भाषणावर हल्ला करताना **श्री. भट्ट** म्हणाले, "लेकिन अगर आप कहेंगे कि एक मछली खानेवाला बैठा है उसके साथ खाईये, तो मैं यह नही मानता कि मुझे माफ कीजिये......"

**डॉ आंबेडकर**– "इतनी मछलियाँ कहाँ हैं कि सबको बाँटी जाये ?" पा. २७९१).

**श्री. भट्ट** यांनी **आंबेडकर**यांना धारेवर धरले, तेव्हा ते जीर्णमतवाद्यांना उद्देशून म्हणाले, "They are all lunatics. They are out because our lunatic asylums are too small." (P. 2897). **श्री. भट्ट** पुढे म्हणाले, "**डॉ. आंबेडकर** आणि **पं. जवाहरलाल नेहरू** नेहरू ज्यांना वेडे मानतात, त्या लोकांना ताळ्यावर आणण्यासाठी त्यांनी मनापासून प्रयत्न करावा. हव्या त्या मार्गाने त्यांनी हिंदू कोड बिलाला पाठिंबा देण्यात तयार करावे. पण त्यांचा विरोध लक्षात न घेता हे बिल जर ते मंजूर करतील तर फार मोठे संकट उभे राहील. आम्ही तुमचे ऐकावयास तयार आहोत, पण आधी तुम्ही आमची खात्री करा की हे बिल देशाला हितकारक होणार आहे." (पा. २८१९)

यानंतर अनेक सभासदांची भाषणे २० सप्टेंबरपर्यन्त झाली. (पा. २९३७–५८) कलम दोनवर सात दिवस चर्चा झाली आणि ते मंजूर झाले. त्या अगोदर **डॉ. आंबेडकरांनी** उत्तर देणारे भाषण केले. (पा. २९३७–२९५८) **डॉ. आंबेडकरानी** उद्गार काढले की, एका कलमावर लोकसभेत एवढी प्रदीर्घ चर्चा आतापर्यंत

झालेली नाही. ही लोकसभेच्या आणि पूर्वीच्या कायदेमंडळाच्या इतिहासातील एक अद्वितीय व आश्चर्यकारक घटना होय.

"....I think it is an extraordinary event in the history of this Parliament, and, I believe, in the history of the past Legislative Assemblies that we should have been engrossed in the discussion of a single clause for not less than seven days." (page 2937).

घटस्फोटाच्या कलमाबद्दल काँग्रेसच्या सभासदांत तीव्र असंतोष पसरला. त्यांचे मत असे होते की पूर्वपरंपरेने चालत आलेली जी घटस्फोटाची चाल आहे. तिला बिलात स्थान नाही, या मुद्यावर सदर सभासदांनी बाबासाहेबांशी कडाक्याची चर्चा केली. पण बाबासाहेब आपले मत बदलण्यास तयार होईनात. ख्रिश्चन लोकांनीही बाबासाहेबांशी चर्चा करून आपले मत मांडले की, हिंदू आणि ख्रिस्ती यांचे विवाह झाले तर या घटस्फोटाच्या तरतुदीमुळे पुष्कळ घोटाळे होतील; व ते कसे टाळावेत याबद्दल बिलात योजना केली पाहिजे. सर्व विरोधकांचे म्हणणे ऐकल्यानंतर बाबासाहेबांनी बिलात दुरुस्ती करण्याचे मान्य केले. ("Divorce Clause In Bill — Differences Narrowed," The Times of India 20-9-51 P1).

बाबासाहेबांनी १८ सप्टेंबरच्या लोकसभेच्या सकाळच्या बैठकीत असे निवेदन केले की, सर्व गोष्टींचा विचार करता बिलाचा दुसरा भाग मूळ स्वरूपात चालू अधिवेशनात मंजूर होणे अशक्य दिसत आहे. कारण हे अधिवेशन लौकरच संपणार आहे. तेव्हा या दुसऱ्या भागाला योग्य त्या दुरुस्त्या करून आणि परिशिष्टे जोडून एक नवा स्वतंत्र कायदा, "विवाह आणि घटस्फोट कायदा" (Marriage and Divorce Act)" लोकसभेत मांडण्याचा मी विचार करीत आहे.

**श्रीमती दुर्गाबाई** यांनी पंतप्रधान नेहरूंना प्रश्न विचारला की, मूळच्या बिलाची अशी जर वासलात लागणार असेल तर वारसाहक्क, स्त्रियांचा इस्टेटीवरील हक्क, वगैरे इतर प्रमुख तरतुदींचे काय होणार? सर्व बिलाला सरकारचा पाठींबा आहे अशी तुम्ही घोषणा केलेली होती, आणि आता हे बिलाचे विच्छेदन चालले आहे, हे कसे? पं. नेहरूंनी उत्तर दिले की, बिलातील सर्व मूळ योजना टाकून देण्याचा सरकारचा विचार नाही. मूळ बिल जसेच्या तसे मंजूर होण्यास या अधिवेशनात वेळ मिळणार नाही म्हणून प्रमुख भाग तेवढे मंजूर करून घेणे सरकारला इष्ट वाटते. पुढील अधिवेशनात बाकीचे भाग मंजुरीसाठी मांडण्यात येतील. **पं. नेहरूंच्या** या निवेदनास पाठिंबा देणारे भाषण **बाबासाहेबांनी** केले.

**पं. ठाकुरदास भार्गव** आणि **रोहिणीकुमार चौधरी** यांनी विवाह आणि घटस्फोट हे भाग वेगवेगळे चर्चू नयेत, असे सुचविले. **श्री. रामलिंगम् चेट्टीयार**

**श्रीमती दुर्गाबाई, सरदार मान,** (शीख) आणि **पं. गोविंद मालवीय** यांनी निरनिराळ्या मुद्यांवर भाषणे केली **पं. मालवीय** यांनी बिलाला विरोध करणारे भाषण केले. त्यांचे भाषण २ तास २० मिनीटे चालू होते. उपसभापतींनी, कायदे-मंत्र्यांनी याला थोडक्या वेळात उत्तर द्यावे असे सुचविले तेव्हा **बाबासाहेब** म्हणाले, या सर्व वक्त्यांच्या मुद्यांना उत्तर देण्यासाठी मला पाच दिवस भाषण करावे लागेल व त्याच्या तयारीसाठी टिप्पणे, ग्रंथ वगैरेचा ढीग माझ्यापुढे आहे. पण मी उत्तरादाखल जे भाषण करीन ते पांच तासांचे असेल! (The Times of India, dated 20-9-51, PP. 1 & 7).

**स्वामी करपात्री** यांनी १८ सप्टेंबरला दिल्लीच्या एका सभेत भाषण करून सांगितले की हिंदु कोड बिल हे हिंदु धर्माच्या शास्त्रांचा अवमान करणारे आहे व त्याला सर्व हिंदूंचा विरोध आहे पं. नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांना हिंदुधर्मशास्त्रांचे ज्ञान नाही. त्यांनी तयार केलेले हे बिल टाकून द्यावे. **श्रीमती शांतीदेवी,** चिटणीस 'अखिल भारतीय महिला संघ' यांनी बिलाला विरोध करण्यासाठी म्हणून दिल्लीत उपोषण सुरू केले आहे, त्याला चार दिवस झाले. त्यांची प्रकृती चिंताजनक आहे, असा वृत्तांत 'Swami's criticism' या मथळ्याखाली २० सप्टेंबरच्या टाईम्समध्ये प्रसिद्ध झालेला होता.

लोकसभेच्या २० सप्टेंबरच्या बैठकीत बिलाचे कलम २ (कायद्याची व्याप्ती यासंबंधी) यावर विरोधकांच्या भाषणांतील मुद्यांना **बाबासाहेबांनी** उत्तरादाखल तडफदार व मार्मिक भाषण केले. त्यांचे भाषण चालू असता काही सभासदांनी 'पण तुम्ही राम सीता वगैरे हिंदूंच्या पवित्र देवतांबद्दल जे अनुदार उद्गार काढले ते आम्हाला चीड आणणारे आहेत' असे म्हटले तेव्हा बाबासाहेब म्हणाले, हे तुम्ही मला अगोदरच का नाही सांगितले ? हे तुम्हाला चीड आणणारे माझे भाषण, लोकसभेच्या अहवालातून गाळून टाकावे असे मी सूचवितो. **श्री. श्यामाप्रसाद मुकर्जी** हे चार वर्षे मंत्रिमंडळात होते. तेव्हा त्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत अगर बाहेर बिलाला विरोध करणारे कधी भाषण केले नाही. आता ते विरोध करतात तो केवळ विरोधासाठी. त्यांच्या विरोधात एकही मुद्दा विचार करण्यासारखा नाही. प्राचीन काळी आर्य स्त्रियांना पुरुषांइतकी समाजात समानता होती. मनूनेही स्त्रियांच्या इस्टेटीवरच्या हक्कांना अजिबात नकार दिलेला नाही. आजच्या सुधारणेच्या युगात तुम्ही स्त्रियांना समान हक्क देण्यास का विरोध करता ? जीर्णमतवादी म्हणतात की आमची आर्य संस्कृती थोर आहे व ती भरभक्कम पायावर आमच्या पूर्वजांनी उभारली म्हणून आमचा समाज व आमची संस्कृती हजारो वर्षे टिकून राहिली आहे. बाकीचे रोमन, असेरियन, इजिप्शियन वगैरे लोकांचे समाज व त्यांची संस्कृती ही नष्ट झाली. आर्य समाज हा विकसनशील समाज होता, म्हणूनच तो टिकू शकला. वेळोवेळी ज्या

सुधारक कल्पना दुसऱ्याकडून येतील त्या घेऊन, आपल्या समाजात त्या ते पचवू शकले. गौतमबुद्धाने अहिंसा आणि समता या दोन कल्पना प्रसृत केल्या, त्यातील अहिंसा ही एकच कल्पना हिंदुसमाजाला पचवता आली. समानतेची कल्पना पचविता आली नाही. म्हणूनच हिंदू समाजाची शक्ती जातिभेदादी रोगांनी विकलित झाली. तुम्ही म्हणता, हिंदू समाज व हिंदू संस्कृती अद्याप टिकून राहिली आहे. लढाईत शत्रूला खतम् करून जगणारा माणूस आणि लढाईत भाग न घेता जगलेला माणूस यांत खरे जीवन कोण जगतो ? तर 'लढाईत शत्रूला खतम् केलेला माणूस' हेच उत्तर द्यावे लागेल. तुमचा हिंदू समाज आणि तुमची संस्कृती जगत आहे, हे खरे ! पण ती लढाईत भाग न घेता जगणाऱ्या (भ्याड) माणसाप्रमाणे जगत आहे.

अशा अर्थाचे भाषण केल्यानंतर कलम २ ला आलेल्या ५० दुरुस्त्यांवर मतदान होऊन त्या बहुमताने फेटाळण्यात आल्या. आणि कलम २ मंजूर करण्यात आले. या बैठकीचा वृत्तांत २१ सप्टेंबरच्या टाईम्समध्ये 'Clause 2 of Hindu Code Bill Approved — Portions of Dr. Ambedkar's Speech Cause Uproar' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेला होता.

हिंदुकोड बिलाला विरोध करणाऱ्यांचे तीन वर्ग होते. एक सनातनी—आमचा धर्म, आमचे नैतिक विचार, आमचे धार्मिक ग्रंथ वगैरे ईश्वरप्रणीत आहेत, ते सनातन आहेत, ते जगाच्या उत्पत्तीपासून अंतापर्यंत अबाधित राहणार, त्यांच्यात ढवळाढवळ करण्याचा कोणालाही अधिकार नाही असे या वर्गाचे मत असते, म्हणून ते कोणत्याही सामाजिक व धार्मिक सुधारणेला विरोध करतात. दुसरा वर्ग राजकीय पुढाऱ्यांचा. याना आपल्या मतदाराना खूष करण्यासाठी हवी ती भूमिका घ्यावी लागते. बिलाला त्यांनी विरोध केला तो एवढ्याचसाठी. तिसरा वर्ग सवर्ण हिंदूंतील वर्णश्रेष्ठत्वाने पछाडलेल्या लोकांचा. हे बिल पास झाले तर त्याचा परिणाम असा होईल की, ज्या हिंदुधर्मशास्त्रांचे संहितीकरण आतापर्यंत वर्णश्रेष्ठ हिंदूला करता आले नाही ते एका अस्पृश्य पंडिताने केले, यात आपली नामुष्की होणार आहे. हे बिल पास झाले तर बहुजन समाज त्याला '**आंबेडकर स्मृती**' म्हणून संबोधील, आणि देशाच्या भावी इतिहासात हेच नमूद करण्यात येईल. बिलाला विरोधकांनी विरोध केला. त्यात जरी त्यांचे निरनिराळे हेतू होते तरी त्यांचा परिणाम एकच झाला, तो म्हणजे नेहरू मंत्रिमंडळ विरोधाला घाबरले व 'बिल नामंजूर झाले तर मंत्रिमंडळ राजिनामा देईल.' अशा ज्या घोषणा पूर्वी त्याने केल्या होत्या, त्याकडे कानाडोळा करून बिलाच्या बाबतीत पड घेतली; कारण लौकरच १९५२ ची निवडणूक होणार होती आणि तीत काँग्रेसपक्ष निवडून येण्यासाठी, मतदारांच्या जीर्णमतवाद्यांपुढे मंत्रिमंडळाला मान तुकवावी लागली. दोन वर्षे रात्रंदिवस जिवापाड मेहनत करून बिल तयार केले आणि त्याचा शेवट असा झाला, हे पाहून **बाबासाहेबांना** मनस्वी वाईट वाटले.

हिंदुकोड बिलाची कशी दुर्दशा करण्यात आली, यासंबंधी "The Hindu Law : Past and Present by I. Duncan M. Derrett (1957) या ग्रथात माहिती दिलेली आहे ती अशी :—

"97. A number of pamphlets were written condemning the Code. Attention was drawn to the qualifictions and social origin of the Third Draft's virtual author. He, being the accredited leader of the out-caste communities (called Scheduled Castes), felt that he could speak for a vast proportion of the population of India, and that, as it were by a card-vote, he could fling a heavy weight against the fllimiest cpponents of the Code. Unfortunately, he did not avoid — in fact he rather courted — the issue's becoming a caste issue, and the result of the controversy was almost certain from the moment. He saw himself as a Second Manu, but with the additional title, "breaker of the pride of the twice-born classes." This role could not avoid drawing upon him the mockery of the few competent to criticise the Code in detail against the back-ground of the classical Hindu law, and the obstinancy of his defence could not overcome the obstinacy of the attack.

98. When the Third Draft came to be considered by theConstituent Assembly the atmosphere was charged with unhappy and, indeed, entirely inappropriate sentiments. A very large number of amendments were tabled, but the Law Minister battled on, and by September, 1951 the session ended with only four clauses passed. That the fourth clause came to be passed was itself no small achievement, for the clause gave the Bill its over-riding effect. The principle of codification was thus admitted, without prejudice to the right to haggle over the individual clauses of the Code. The session ended, the Bill was virtually talked out, and it lapsed. The Law Minister himself resigned in disgust at the tergiversation of many of his supposed allies, and many thought that the Hindu Code Bill's chances of success were gone for ever. No one could tell whether the opposition had brought down the Government's enthusiasm, or whether, after all, the Government was doubtful about the

wisdom of the whole venture. A few saw that the opposition was entirely furious and that, under more propitious circumstances, the project would get a more favourable hearing." (pages 70-71).

बाबासाहेबांनी हिंदु कोड बिल ज्या स्वरुपात तयार केले होते त्याच स्वरूपात ते मंजूर झाले पाहिजे, या भूमिकेला ते चिकटून बसले होते. कारण या कायद्यामुळे बहुजन समाजाचे जेवढे हीत होईल तेवढे हीत घटना करू शकत नाही असे त्यांचे मत होते. घटनेत सामाजिक समता संपूर्णपणे आणता आली नाही. हे न्यून दूर करण्याच्या हेतूनेच त्यांनी हिंदुकोड तयार केले होते. ही भूमिका त्यांनी **मि. मिचेनेर** या ग्रंथकाराला विशद करून सांगितली होती. ती त्याने आपल्या ग्रंथात दिलेली आहे. ती अशी: —

"Our legal system has sometimes been called the every of the world," Dr. Ambedkar grounds as he lectures you over his desk in Parliament. "I have dedicated my life to it." "Our penal system could hardly be improved upon. But where we lag has been in social legislation. Now we have taken that up. In one joint bill (Hindu Code Bill) we will revolutionise life. Hindu Code Bill will be 100 times more beneficial to India than Constitution. We are building here a new society here and we are doing it with justice and law." When friends were suggesting surrender of minor points to gain major ones. Dr Ambedkar shouted, "I will have this Code applied to all India or none of it. There will be no compromise." Dr. Ambedkar says, "what annoys one is the intolerance of the Brahman scholars towards an attempt to expose this Brahmanic literature. When any non-Brahmin makes an attempt to tell the truth, Brahman Scholars, engaged in conspiracy of silence, take no notice of him, condemns him outright on some flimsy ground. I have been the victim of much mean tricks." (the Voice of Asia by James A. Michener).

हिंदु कोड बिलावर जीर्णमतवाद्यांचे चोहोकडून हल्ले होत असताही, "मी जसे बिल तयार केलेले आहे तसेच ते मंजूर झाले पाहिजे" या आपल्या मूळ भूमिकेला **बाबासाहेब** चिकटून राहिले होते. जीर्णमतवाद्यांचा वाढता विरोध पाहून काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी **श्री. नेहरू** यांना सल्ला दिला की, जर तुम्ही हे बिल आताच मंजूर केले तर थोड्याच दिवसांनी होणाऱ्या नव्या निवडणूकीत काँग्रेसला हार खावी लागेल, **नेहरूंनी बाबासाहेबांबरोबर** चर्चा केली. **बाबासाहेब** आपल्या भूमिकेपासून तसूभरही दूर

सरण्यास तयार नाहीत हे **पं. नेहरूंना** दिसून आले तेव्हा नेहरूंनी कॉंग्रेस पुढाऱ्यांचा सल्ला स्वीकारला. हा सारा प्रकार पाहून **बाबासाहेब** खूप संतापले व शेवटी निराश होऊन सुस्कारे टाकीत बसले! रात्रंदिवस खूप मेहनत घेऊन केलेल्या बिलाचा असा शेवट झालेला पाहून ते मनस्वी खिन्न झाले! यासंबंधी **लेडी हारटॉग** यांनी, नेहरू जीर्णमतवाद्यांच्या विरोधापुढे नमले असे मत आपल्या ग्रंथात प्रदर्शित केले आहे:–

"Committee of Sir B. Narsing Rau drafted Hindu Code Bill, marriage, divorce, guardenership and inheritance. B R. Ambedkar piloted the Bill with Nehru's support. But opposition of orthodox Hindus and delaying tactics of opposition prevented the bill from becming Act......" (India New Pattern).

शेवटी, बिलाचे निरनिराळे भाग करून व त्यांत फेरफार करून नवीन चार कायदे मंजूर करण्यात आले.

स्त्रियांच्या हितसंरक्षणाच्या हेतूने भारतात वीस कायदे करण्यात आले. ते असे–

१) सतीप्रतिबंधक कायदा, १८२६.
२) हिंदु विधवापुनर्विवाहोत्तेजक कायदा, १८५६.
३) धर्मांतरितांचा पूर्वीचा विवाह रद्द करणारा कायदा, १८६६.
४) भारतीय तलाक कायदा, १८६६.
५) ख्रिस्ती विवाह कायदा, १८७२.
६) विवाहित नारीसंपत्तिसंरक्षक कायदा, १८७४.
७) लीगल प्रॅक्टिशनर (वुइमेन्स) ॲक्ट, १९२३.
८) बालिका विवाह प्रतिबंधक (शारदा) कायदा, १९२६.
९) हिंदु उत्तराधिकार अधिनियम (संशोधित) कायदा, १९२६.
१०) पारसी विवाह आणि तलाक कायदा, १९३६.
११) हिंदुनारीसंपत्ति अधिकार कायदा, १९३७.
१२) प्रसूती अवस्थेत मिळावयाचे हक्क यासंबंधीचा कायदा, १९४३.
१३) हिंदु विजोड विवाह प्रतिबंधक कायदा, १९४६.
१४) हिंदुविवाह वैधता कायदा, १९४६.
१५) विशेष विवाह कायदा, १९५५.
१६) हिंदु विवाह कायदा, १९५५.
१७) हिंदु उत्तराधिकार कायदा, १९५६.
१८) हिंदु दत्तकग्रहण आणि निर्वाह कायदा, १९५६.
१९) हिंदु दत्तकग्रहण कायदा, १९५८.
२०) वेश्यावृत्ति उन्मूलन कायदा, १९५८. (महिला, जून १९६१, हिंदी मासिक दिल्ली, पा. ३८.)

हिंदुकोडबिलाची अशी दुर्दशा झाली आणि त्याबद्दल कोणालाही फारसे वाईट वाटलेले नाही हे पाहून **बाबासाहेबांनी** मंत्रिमंडळांतून बाहेर पडण्याचे ठरविले. ✽✽

# खंड १० वा

## प्रकरण ५

# बाबासाहेबांचा मंत्रीपदाचा राजिनामा

आपल्या मंत्रीपदाचा राजिनामा देण्याचे नक्की ठरविल्यानंतर श्री. **बाबासाहेबांनी श्री. नेहरू** यांना १०-८-५१ ला सविस्तर पत्र लिहिले. १६ ऑगस्टला हिंदु कोड बिल लोकसभेत यावे आणि ते १ सप्टेंबरपर्यंत मंजूर व्हावे, अशी त्यांनी सदर पत्रात इच्छा प्रदर्शित केली. आपली प्रकृती फार बिघडली आहे आणि अतिश्रम न करण्याचा वैद्यकीय सल्ला आहे, तथापि आपण या बिलाला अत्यंत महत्त्व देतो. विरोधकांची समजूत काढण्यासाठी अहर्निश प्रयत्न करून ते मंजूर करावे अशी माझी तीव्र इच्छा आहे, असे सदर पत्रात **बाबासाहेबांनी नेहरूंना** लिहिले. त्याचे कारण, काँग्रेसपक्षाच्या बैठकीत असे ठरले की हिंदु कोड बिलाला जादा महत्त्व द्यायचे नाही. आणि **बाबासाहेबांना** हे समजताच 'बिलाला पहिला मान दिला पाहिजे' अशी त्यांनी **नेहरूंना** सदर पत्रात विनंती केली. **पं. नेहरूंनी** त्याच दिवशी म्हणजे १०-८-५१ लाच उत्तर दिले की, बिलाला लोकांचा बराच विरोध असल्यामुळे बिल सप्टेंबरमध्ये आणावे, तो पर्यंत लोकमानसात फरक पडेल असे पक्षाच्या (काँग्रेस) बैठकीत ठरले ते योग्य आहे, व त्याबद्दल तुम्ही घाई करू नये. २७ सप्टेंबरला **बाबासाहेबांनी नेहरूंना** पत्र पाठवून कायदेमंत्रीपदाचा राजिनामा सादर केला. तो राजिनामा ताबडतोब स्वीकारा अशी त्यांनी **नेहरूंना** विनंती केली. 'हिंदुकोड बिल पास झाल्यानंतर (प्रकृतिस्वास्थ्यासाठी) राजिनामा देणार होतो, पण आता बिल लौकर पास होईल असे वाटत नसल्यामुळे मी राजिनामा देत आहे' असा **बाबासाहेबांनी** सदर पत्रात खुलासा केला. २७ सप्टेंबरला **नेहरूंनी** पत्र पाठवून **बाबासाहेबांचा** राजिनामा स्वीकारल्याचे कळविले. 'तुम्ही बिल लौकर पास होत नाही म्हणून नाराज झालात ते योग्यच आहे, पण आणखी थोडा धीर धरला असता तर बरे झाले असते' असे **पं नेहरूंनी** सदर पत्रात म्हटले. 'मंत्रीमंडळात त्यांनी जे कार्य केले ते चांगलेच

केले असेही **नेहरूंनी** नमूद केले आहे. 'तुमचा राजिनामा माझ्याकडे येण्या अगोदर तुम्ही राजिनामा देणार अशा बातम्या वर्तमानपत्रांतून आलेल्या होत्या, त्या वाचून मी आश्चर्यचकित झालो,' **पं. नेहरूंनी बाबासाहेबांना** कळविले. १ ऑक्टोबरला **बाबासाहेबांनी** पत्र पाठवून कळविले की, ६ ऑक्टोबर पर्यंत माझा राजिनामा तहकूब समजावा. 'त्या दिवशी लोकसभेत राजिनाम्यासंबंधी निवेदन करीन व मग राजिनामा तुम्ही स्वीकारा,' अशी त्यांनी **पं. नेहरूंना** त्या पत्राद्वारे विनंती केली. **नेहरूंनी** ४ ऑक्टोबरला पत्र पाठवून विनंती मान्य केल्याचे कळविले. त्याला त्याच दिवशी **बाबासाहेबांनी** उत्तर पाठविले.

वरील हकीकत ११ ऑक्टोबर १९५१ ला लोकसभेत जी चर्चा झाली तीवरून दिलेली आहे. (The Parliamentary Debates, Vol. 16, Part 2. Sept. Oct. 1951 Pages 4642 45 & 4730-37) ती चर्चा अशी :-

DR. AMBEDKAR ROSE

Mr. DEPUTY SPEAKER: The Honourable Minister might make his statement in the afternoon.

Dr. AMBEDKAR : After this Bill? (Industries Development.)

Mr. DEPUTY SPEAKER : At about six O'clock.

Mr. AMBEDKAR : It was first arranged between you and me and the Prime Minister that I should make a statement on the 6th. As certain part of the business was not finished on the 6th, it was definitely agreed that you would be pleased to suspend the rule about the transaction of business and allow me to make the statement on the 11th. So this is in the time when I should make the statement.

Mr. DEPUTY SPEAKER : It is true that I said to the honourable Law Minister that I will suspend the rule. Normally under rule 128, immediately after the question hour is over, any honourable Minister, who has resigned, can make, with the permission of the Speaker. a statement in explanation of his resignation. To-day I have to suspend the rule for that purpose, and I am going to do it. I am only suggesting that it may be put off till six O'clock. That is all.

Dr. AMBEDKAR : Why not now?

Mr. DEPUTY SPEAKER : At six O'clock I will hear the honourable Minister.

Dr. AMBEDKAR : I do not quite understand why my statement should be postponed to six O'clock.

Mr. DEPUTY SPEAKER : Under the rules the Speaker must give his consent before any honourable Minister can make a statement. I would like to know what statement the honourable Minister is going to make. Of course it involves my consent. I am not disclosing anything to the House which is not provided for. I would request the honourable Minister to give me a copy of the statement and I will allow him to read the statement after this afternoon.

Dr. AMBEDKAR : If that was so, you could have already told me when I saw you that I should hand over my statement to you before you give the permission. You did not do so.

Mr. DEPUTY SPEAKER : There is no harm.

Dr. AMBEDKAR : I came and subsequently wrote a letter but so far as I am concerned you did not say that I should furnish you with a copy of my statement before you come to the conclusion that you would permit me to make a statement and so far as I read rule 128, I do not see that there is any provision therein which requires that a statement should be submitted to the Speaker before he gives consent. The Prime Minister had asked me for a copy of my statement and I have given him a copy of my statement. If you had also given me an order that I should submit a copy of my statement to you before you come to the conclusion whether I should make it or not. I should have been very glad to do so; but you gave me no such indication when I came to you. I felt the difficulty was that under the rules the statement should be made immediately after the question hour and the Prime Minister was very keen that I should finish certain business which it may not be possible for other member to undertake because it involves certain difficult matters. I agreed to this and then I came

to you and said, "Will you kindly suspend the rules so that I may help the Prime Minister in getting the business through ?" You never said that you wanted to see a copy of my statement before you permitted me and I see that now you have raised this point for the first time.

PANDIT KUNZRU : May I know whether the Chair can claim some sort of censorship as stated by you ?

MR. DEPUTY SPEAKER : Yes. The kind of censorship which the Chair can always exercise is to avoid the matter which ought not to be placed before the House, which is libellous, slanderous, irrelevant and so on and so forth. (*Interruption*). Order, order. I am only answering the suestion which was put. I can certainly do so. I am not going to allow observations of an irrelevant nature and improper statements. I will confine myself strictly to rule 128 and if an honourable Minister goes on making a statement on the floor of the House, I am entitled to call him to order, if I find that the statement is lacking in decency or decorum or I otherwise regard it as irrelevant. I have always got the power. Otherwise, this rule would be meaningless.

So far as giving the permission to the honourable Minister is concerned, I agree he came to me. Possibly his memory is short, but he did not suggest to me that I, under the rules, can suspend the standing orders. I wanted to accommodate him and said I would allow him to make a statement at any time that he liked and I brought to his notice that I can suspend the order. He agreed. Even now during the course of his statement if I do not agree and if I feel that a particular statement ought not to be made I can certainly ask that portion to be erased from the proceedings of the House. In order to avoid this, I would like to know what exactly the statement is. It is not going beyond the rules and the scope of my powers. I am prepared to allow him to make a statement suspending the rule, that immediately after the question hour the statement may be made. It still stands. I am not going behind that position and as it is open to me while the honourable Minister is making a state-

ment, to see that this kind of matter ought not to be stated on the floor of the House. I only asked him, now that there is time to give me a copy of the statement. I learn that he has given a copy to the Prime Minister, the Leader of the House. But to the hands of the Speaker the entire privilege of theHouse, the honour, the decorum and everything is entrusted. Therefore there ought to be no difference so far as the Speaker is concerned in this matter. I am not going out of the way. I am trying to exercise my powers without prejudice either to the dignity of the House or of the honourable members with regard to the freedom of making a statement. I will allow the honourable Minister to make the statement at six O'clock.

SHRI KAMATH : Is it not a fact that under the rules a Minister or a Member may be called to order on the ground of irrelevance or otherwise but that statement should not be pre-censored ?

MR. DEPUTY SPEAKER : That is not so. I think under the rules I am entitled to see what is the statement that the honourable Minister is going to make now.

DR. AMBEDKAR : I take it that you do not wish me to make a statement; that is how I interpret your ruling. I am no longer a Minister. I am going out. I am not going to submit myself to this kind of dictation.

PANDIT KUNZRU : May I know when Shri Shyama Prasad Mookerjee resigned if he was asked by the Speaker to be supplied with a copy of the statement before he made it in the House ?

MR. DEPUTY SPEAKER : He had a talk with the honourable Speaker and he told him what he intended to state on the floor of the House.

All that was discussed in the House. The House will now proceed with the next business.

PANDIT KUNZRU : A copy of the speech was not supplied to him.

MR. DEPUTY SPEAKER : That was not necessary.

SHRI KAMATH : We have been deprived of the statement any way.

MR. DEPUTY SPEAKER : It was left to him. Honourable Members are now told that he is not going to make a statement. (pages 4642-45, dated 11-10-51).

## DR. AMBEDKAR'S LETTER OF RESIGNATION

MR. DEPUTY SPEAKER : I said that at six O'clock Dr. Ambedkar may make his statement if he likes. I do not find him in his seat. Under the rules, immediately after the question hour is over, any honourable Minister who has resigned can, with the consent of the Speaker, be allowed to make a statement. To-day the question hour was over this morning after the short notice question and Dr. Ambedkar piloted the Delimitation of Constituencies Motions and that is why it could not be done immediately when he wanted to make a statement. Thereafter, I though, in keeping with the practice, either he may do it immediately after the questions or at the close of the day at six O'clock. Therefore I fixed six O'clock. I would be only too glad to give him an opportunity now, but he is not here.

### 6. P. M.

As regards the copy of his statement, it is true when he wanted to make an oral statement, at the time he approached me in the Chamber. I could not anticipate and ask him to put the thing in writing and give it me. It was not right. Therefore, I allow him to make a statement and even said that I would suspend the rules, if he could not make the statement immediately after the question hour. But this morning I found that what he wanted to make by way of a statement, he had put it in writing and had given a copy to the Prime Minister, who is also the leader of the House. Naturally, I sent word through the Secretary, sufficiently in advance or long before he rose to make his statement, to send me a copy of the statement. I am sorry to say that he would not furnish me with a copy. I do not know why. I

have to regulate the debate; not that I wanted to interfere with the statement at all. When any statement is read before the House usually the person gives me a copy. I do not know the reasons why he declined to do so.

When he wanted to make a statement I said that he may make a statement without any reserve at 6 O'clock but he did not choose to do so. I am, therefore, sorry that he did not avail himself of that opportunity. I wanted to clear a misunderstanding. I had also asked him before he stood on his legs to furnish me with a copy, which unfortunately he could not furnish. At 6 O'clock whether he furnished me with a copy of the statement or not I would have allowed him to make a statement orally in this House. He has not chosen to do so.

SHRI JNANI RAM (Bihar) : The statement has already appeared in the Press.

MR. DEPUTY SPEAKER : I do not know. The House will not take any notice of it.

THE PRIME MINISTER (JAWAHARLAL NEHRU) : May I say a few words in this connection ? It is a matter of regret to me, if for no other reason, for the fact that an old colleague should part company in the way that he has done to-day. I do not wish to go into the various matters that have arisen to which you have referred. I got a copy of that statement at 9.30 A. M. as I was sitting in my place here, about 45 minutes before he actually rose to make it. I read it with some surprise, because it was not the kind of statement that I had expected from a Minister resigning. However, there it was and it was my intention when he made that statement to say a few words, because it was not desirable nor permissible under the rules to have a debate on such a matter. I should just like, with your permission, tc read out the letter or resignation sent to me and a few other letters exchanged before and after.

The first letter which I received from him....

DR. DESHMUKH (Madhya Pradesh) : On a point of order, if it was the desire of the Chair to give Dr. Ambedkar another opportunity then I think instead of the Prime Minister making any statement on this issue just now, it would be better to wait to see if Dr. Ambedkar is prepared to avail himself of the opportunity.

KHWAJA INAIT ULLAH (Bihar) : We have already got a copy in our hands....

DR. DESHMUKH : If an opportunity is proposed to be given...

MR. DEPUTY SPEAKER : I do not know whether any honourable Member can speak on behalf of another has any authority from Dr. Ambedkar....

DR. DESHMUKH : Not at all.

MR. DEPUTY SPEAKER : Though he might have resigned as a Minister he is still a Member of the House. We expect in fairness that when he asked the Deputy Speaker to waive notice and the Deputy Speaker had agreed to waive notice and fixed 6 O'clock for the statement, we expected him to be here and make his representation. It was open to him to make the statement or not, but he is not in his seat at all. The Prime Minister wants to make a statement...

SHRI JAWAHARLAL NEHRU : I wish to read out to the House his letter of resignation, because normally a statement by a Minister is related to his letter of resignation.

DR. DESHMUKH : How does it arise since the statement is not there ?

MR. DEPUTY SPEAKER : It arises this way. We have Ministers introduced to the House when a Minister is appointed under the direction or on the advice of the Prime Minister. It is open to the Prime Minister to read the letter of resignation to the House.

DR. DESHMUKH : It is the privilege of a Member to make a statement. If that is lacking I do not know under what rules you are proposing to act and how the necessity

for any other statement arises.

MR. DEPUTY SPEAKER : It is always open to the Chair to allow any statement to be made on behalf of the Government.

DR. DESHMUKH : I do not object to that I want to point out how it arises out of the situation that arose this morning.

MR. DEPUTY SPEAKER : The Government wants to make an explanation regarding a particular matter and whether all persons are interested an opportunity should be given.

SHRI JAWAHARLAL NEHRU : As you know, Sir, so far as I am concerned I was expecting him to make his statement and if I may say so with all respect, I did not know that the statement would not be made then or that you would fix another time for it. I did not except the developments as they occurred. But since this has happened and the statement has been published in the press or is going to be. I think the House would be interested greately in the letters exchanged. I am not referring to the statement in the least, but I am referring to the letters exchanged between Dr. Ambedkar and myself.

The first letter he wrote to me does not refer to his resignation and is dated 10th August, 1951. It reads :

New Delhi,
10th August 1951.

My dear Prime Minister,

My health is causing a great deal of anxiety to me and to my doctors. They have been pressing that I must allow them a longer period of about a month for continuous treatment and that such treatment cannot now be postponed without giving rise to further complication I am most anxious that the Hindu Code Bill should be disposed of before I put myself in the hands of my doctors. I would, therefore, like to give the Hindu Code Bill a higher priority

by taking it up on the 16th of August and finish it by the 1st of September if opponments do not practice obstructive tactics. You know I attach the greatest importance to this measure and would be prepared to undergo any strain on my health to get the Bill through. But if the strain could be avoided by getting through the bill earlier I am sure you will have no objection. In proposing 16th August, I am allowing priority to all urgent Bills such as those relating to the Punjab, the Ordinances and Shri Gopalaswami Ayyangar's Bill relating to part C States.

I write this because I heard that in the last Party meeting you are reported to have said that the Bill may be taken up in the first week of September. I am sure that was merely your suggestion. It was not your decision.

With kind regards,

Yours sincerely,
Sd|- B. R. Ambedkar

I wrote to him the same day :

10th August, 1951

My dear Ambedkar,

I wrote to you yesterday about the Hindu Code Bill. Today I got your letter of the 10th.

I am sorry that your health is causing anxiety. I suggest that you take things a little easy.

About the Hindu Code Bill, you know that we have a good deal of opposition not only inside the House but outside With the best will in the world, we cannot brush aside this opposition and get things done quickly. They have it in their power to delay a great deal.| We must therefore proceed with some tact and with a view to achieve results. I am anxious that the Bill should be passed in this Session.

The Cabinet decision was, and I think it was recorded in the minutes, that the Bill should be taken up at the beginning of September. I mentioned that at the Party meeting and

they agreed. For us to try to hasten it and bring it earlier would needlessly give a handle to our opponents and create trouble. Also it would be far more advantageous to have it early in September, after we have finished with some of the important Bills—the ordinances, the Part C States Bill, the Industry Bill.| If we try to have the Hindu Code Bill before any of these, again that will create a furore and give a handle to others, I think that taking everything into consideration, it is far better to stick to the dates we have announced and then go ahead with it. We shall be able to do so then with greater vigour and somewhat less opposition. Parliament is going to sit till at least the 1st week of October. So there is plenty of time.

Yours sincerely,

Sd|- Jawaharlal Nehru

On the 27th September I received the following letter of resignation.

"For a long time I have been thinking of resigning my seat from the Cabinet. The only that had held me back from giving effect to my intention was the hope that it would be possible to give effect to the Hindu Code Bill before the life of the present Parliament came to an end.| I even agreed to break up the Bill and restrict it to marriage and divorce in the fond hope that at least this much of our labour may bear fruit. But even this part of the Bill has been killed. I see no purpose in my continuing to be a member of your Cabinet.

I would like my resignation to take effect immediately. The only possible consideration that may come in the way of your accepting my resignation is the fact that there are certain Bills and Motions standing in my name and which have not yet been finished. But I feel that my absence may not be felt because these Bills and Motions can be put through by any other Minister of your Cabinet. However, if you wish that I should put them though before my resignation takes effect, I shall be prepared to stay on till they

are finished but only till then. For I do not wish to deny the activity I owe to you and the Cabinet. In that event I would request that the Bills and Motions standing in my name should be given priority over others".

My reply dated the same day, that is the 27th September:

"I have your letter of the 27th September. Two days ago news of your resignation appeared in the Press and I was rather mystified. At the beginning of the session you spoke to me about your ill-health and I know of course that you have not been keeping well.

In view of your ill-health and your desire to resign from the Cabinet, I cannot press you to stay on. I should like to express, however, my appreciation of our comradeship during these years since we have worked together in the Cabinet. We have dicered sometimes, but that has not acected my appreciation of the good work that you had done. I am sorry indeed that you will be going away.

I will now refer to another matter that had made me dissatisfied with the Government. It relates to the treatment accorded to the Backward Classes and the Scheduled Castes. I was very sorry that the Constitution did not embody any safeguards for the Backward Classes. It was left to be done by the Executive Govt. on the basis of the recommendations of a Commission to be appointed by the President. More than a year has elapsed since we passed the Constitution. But the Government has not even thought of appointing the Commission. The year 1946 during which I was out of office, was a year of great anxiety to me and to the leading members of the Scheduled Castes. The British had realised from the commitments they had made in the matter of constitutional safeguards for the Scheduled Castes, and the Scheduled castes had no knowing as to what the Constituent Assembly would do in that behalf. In this period of anxiety I had prepared a report on the condition of the Scheduled Castes for submission to the United Nations. But I did not submit it. I felt that it would be better to wait until the Constituent Assembly and the future Parliament was given a chance to deal with the matter. The provisions made in the Constitution for safeguarding the position of the Scheduled Castes were not to my satisfaction. However, I accepted them for what they were worth hoping that the Government

will show some determination to make them effective. What is the position of the Scheduled Castes today? So far as I see it is the same as before. The same old tyranny, the same old oppression, the same old discrimination which existed before and perhaps in a worst form. I can refer to hundreds of cases where people from the Scheduled Castes round about Delhi and adjoining places have come to me with tales of woes against the Caste Hindus and against the Police who have refused to register their complaints and render them any help. I have been wondering whether there is any other parallel in the world to the condition of the Scheduled Castes in India. I cannot find any. And yet why is no relief granted to the Scheduled Castes? Compare the concern the Government shows over safeguarding the Muslims. The Prime Minister's whole time and attention is devoted for the protection of the Muslims. I yield to none, not even to the Prime Minister, in my desire to give the Muslims of India the utmost protection wherever and when ever they stand in need of it. But what I want to know is, are the Muslims the only people who need protection? Are the Scheduled Castes, the Scheduled Tribes and the Indian Christians not in need of protection? What concern has he shown for these communities? So far as I know, none; and yet these are the communities which need far more care and attention than the Muslims.

I could not control within myself the indignation I have felt over the neglect of the Scheduled Castes by the Government and on one occasion I gave vent to my feelings at a public meeting of the Scheduled Castes. A question was asked to the Hon'ble the Home Minister whether my charge that the Scheduled Castes had not benefitted by the rule which guaranteed to them 12½ percent representation was true. In answer to the question the Hon'ble the Home Minister was pleased to say that my charge was baseless. Subsequently for some reason—it may be for satisfying the qualms of his conscience—he, I am afraid, sent round a circular to the various departments of Government of India

asking them to report how many Scheduled Castes candidates had been recently recruited in Government service. I am informed that most departments said in reply 'NIL' or nearly 'nil'. If my information is correct I need make commentary on the answer given by the Hon'ble the Home Minister.

From my early childhood I have dedicated myself to the upliftment of the Scheduled Castes among whom I was born. It is not that there were no temptations in my way If I had considered my own interests I could have been any thing I wanted to be and if I had joined the Congress I would have reached to the highest place in that organisation. But as I said, I had dedicated myself to the upliftment of the Scheduled Castes and I have followed the adage which says that it is better to be narrow-minded if you wish to be enthusiastic about a cause which you wish to accomplish. You can therefore will imagine what pain it has caused me to see that the cause of the Scheduled Castes has been relegated to the limbo of nothing.

The third matter has given me cause not merely for dissatisfaction but for actual anxiety and even worry in the foreign policy of the country. Any one who has followed the course of our foreign policy and along with it the attitude of other countries towards India could not fail to realize the sudden change that has taken place in their attitude towards us. On 15th of August 1947 when we began our life as an independent country, there was no country which wished us ill. Every country in the world was our friend. Today, after four years, all our friends have deserted us. We have no friends left. We have alienated ourselves. We are pursuing a lonely furrow with no one even to second our Resolution in the U.N.O. When I think of our foreign policy I am reminded of what Bismark and Bernard Shaw have said. Bismark has said that, "Politics is not a game of realising the ideal. Politics is the game of the possible." Bernard Show, not very long ago, said that, "good ideas are good but one must not forget that

it is often dangerous to be too good." Our foreign policy is in complete opposition to those words of wisdom uttered by two of the world's greatest men.

How dangerous it has been to us this policy of doing the impossible and of being too good is illustrated by the great brain of our resources made by our military expenditure, by the difficulty of getting food for our starving millions and by difficulty of getting aid for the industrialisation of our country.

Out of 350 crores of rupees of revenue we raise annually, we spend about 180 rrores of rupees only on the Army. It is a colossal expenditure which has hardly any parallel. This colossal expenditure is the direct result of our foreign policy. .We have to foot the whole of our Bill for our defence ourselves, because we have no friends on which we can depend for help in any emergency that may arise. I have been wondering whether this is the right sort of foreign policy.

Our quarrel with Pakistan is a part of our foreign policy about which I feel deeply dissatisfied. There are two grounds which have disturbed our relations with Pakistan one is Kashmir and the other is the condition of our people in East Bengal.. I felt that we should be more deeply concerned with East Bengal where the condition of our people seems from all the newspapers intolerable than with Kashmir. Notwithstanding this we have been staking our all on the Kashmir issus. Even then I feel that we have been fighting on an unreal issue. The issue on which we are fighting most of the time is who is in the right and who is in the wrong. The real issue to my mind is not who is in the right but what is right. Taking that to be the main question, my view has always been that the right solution is to partition Kashmir. Give the Hindu and Buddhist part to India and the Muslim part to Pakistan as we did in the case of India. We are really not concerned with the Muslim part of Kashmir. It is a matter between the Muslime of Kashmir and Pakistan. They may decide the

issue as they like. Or if you like divide it into three parts — the ceeae fire zone, the valley and the Jammu-Ladakh region and have a plebiscite only in the valley. What I am afraid of is that in the proposed plebiscite, which is to be an over-all plebiscite the Hindus and Buddhists of Kashmir are likely to be dragged into Pakistan against their wishes and we may have to face the same problem as we are facing today in East Bengal.

I will now refer to the fourth matter which has a good deal to do with my resignation. The Cabinet has become a merely recording and registration office of decisions already arrived at by Committees. As I have said that the Cabinet now works by Committees. There is a Defenhe Committee. All important matters relating to Foreign Affairs are dealt with by it. All matters relating to the Defence are disposed by the Defence Committee. The same members of the Cabinet are appointed by them. I am not a member of either of these committtees. They work behind an iron curtain. Others who are not members have only take joint responsibility without any opportunity of taking part in the shaping of policy. This is an impossible position

I will now deal with a matter which has led me finally to come to the decision that I should resign It is the treatment which was accorded to the Hindu Code. The Bill was introduced in this House on the 11th April 1947. After a life of four years it was killed and died unwept and unsuing after 4 clauses of it were passed. While it was before the House, it lived by fits and starts. For full one year the Goveroment did not feel it necessary to refer it to a Select Committee. It was referred to the Select Committee on 9-4-48. The Report was presented to the House on 12-8-48 The motion for the consideration of the Report was made me on 31-8-48. It was merely for making the motion that the Bill was kept on the Agenda. The discussion of the motion was not allowed to take place until the February Session of the year 1949. Even then it was not allowed to have a continuous discussion. It was distributed over 10

months. 4 days in February, 1 day in March and 2 days in April 1949. After this, one day was given to the Bill in December 1949, namely the 19th December on which day the House adopted my motion that the Bill, as reported by the Select Committee, be taken into consideration. No time was given to the Bill in the year 1950. Next time the Bill came before the House was on 5th February 1951 when the clause by clause consideration of the Bill was taken. Only three days 5th, 6th and 7th February was given to the Bill and left there to rot.

This being the last Session of the present Parliament, Cabinet had to consider whether the Hindu Code Bill should be got through before the Parliament ended or whether it should be left over to the New Parliament. The Cabinet unanimously decided that it should be put through in this Parliament. So the Bill was put on the agenda and was taken up on the 17th September 1951 for further clause by clause consideration. As discussion was going on, the Prime Minister put forth a new proposal. namely, the Bill as a whole may not be got through within the time available and that it was desirable to get a part of it enacted into law rather than allow the whole of it to go to waste. It was a great wrench to me. But I agreed, for as the proverb says, 'it is better to save a part when the whole is likely to be lost'. The Prime Minister suggested that we should select the Marriage and Divorce Part. The Bill in its trunctated form went on. Afttr two or three days of discussion of the Bill the Prime Minister came up with another proposal. This time his poposal was to drop the whole Bill—even the Marriage and Divorce Portion. This came to me as a great shock—a bolt from tht blue. I was stunned and could not say anything. I am not prepared to accept that the dropping of this trunctated bill was dropped because other and more powerful members of the Cabinet wanted precedtnce for their Bills. I am unable to understand how the Benaras and Aligarh Uhiversity Bills, how the Press Bill could have given precedence over the Hindu Code even in its attenuated form.

It is not that there was no law on tht Statute Book to govern the Aligarh Univtrsity or the Benaras University. It is not that these Universities would have gone to rack and ruins if the Bills had not been passed in this session. It is not that tht Press Bill was urgent. There is already a law on the Statute Book and the Bill could have waited. I got the impression that the Prime Minister, although sincere, had not the earnestness and determination required to get the Hindu Code Bill through.

In regard to this Bill I nave been made to go through the greatest mental torture. The aid of Party Machinery was denied to me. The Prime Minister gave freedom of Vote an unusual thing in the history of the Party. I did not mind it. But I expected two things. I expected a party whip as to time limit on speelhes and instruction to the Chief Whip to move closure when sufficient debate had taken place. A whip on time limit on speeches would have got the bill through. When freedom of voting was given there could have been no objection to have given a whip for time limit on speeches. But such a whip was never issued. The conduct of the Minister for Parliamentary Affairs who is also the Chief Whip of the Party in connection with the Hindu Code, to say the least has been most etxtraordinary. He has been the deadliest opponent of the Code and has never been present to aid me by moving a closure motion. For days and hours filibustering has gone on a single clause. But the Chief Whip whose duty is to economise Government time and push on the Government business has been systematically absent when the Hindu Code has been under consideratton in the House. I have never seen a case of a Chief Whip so disloyal to a disloyal whip. Notwithstanding this unconstitutional behaviour, the Chief Whip is really a darling of the Frime Minister. For notwithstanding his disloyalty he got a promotion in the Party organization. It is impossible to carry on in such circumstances.

It has been said that the Bill had to be dropped because the opposition was strong. How strong was the opposition ?

This Bill has been discussed several times in the Party and was carried to division by opponents. Every time the opponents were routed. The last time when the Bill was taken up in the Party Meeting. out of 120 only 20 were found to be against it. When the Bill was taken in the Party for discussion, 4 clauses were passed in about 3½ hours time. This shows how much opposition there was to the Bill within the party. In the House itself there have been divisions on three clauses of the Bill 2, 3 and 4. Every time there has been an overwhelming majority in favour even on clauses 4 which is the soul of the Hindu Code.

I was therefore quite unable to accept the Prime Minister's decision to abandon the Bill on the ground of time. I have been obliged to give this elaborate explanation for my resignation because some people have suggested that I am going because of my illness. I wish to repudiate any such suggestion. I am the last man to abandon my duty because of illness.

It may be said that my resignation is out of time and that if I was dissatisfied with the Foreign Policy of the Government and the treatment accorded to the Backward Classes and the Scheduled Castes I should have gone earlier. The charge may sound true. But I had reasons which held me back. In the first place most of the time I have been a member of the cabinet. I have been busy with the framing of the Constitution. It absorbed all my attention till 26th January 1950 and thereafter I was concerned with the People's Representation Bill and the Delimitation Orders. I had hardly any time to our Foreign Affairs. I did not think it right to do away leaving this work unfinished.

In the second place I thought it necessary to stay on, for the sake of the Hindu Code. In the opinion of some, it may be wrong for me to have held on for the sake of the Hindu Code. I took a different view. The Hindu Code was the greatest social reform measure ever undertaken by the Legislature in this country. No law passed by the Indian Legislature in the past or likely to be passed in the future

can be compared to it in point of its significance. To leave inequality between class and class, between sex and sex which is the soul of Hindu Socitty untouched and to go on passing legislation relating to economic problems is to make a farce of our Constitution and to build a palace on a dung heap. This is the significance I attached to the Hindu Code. It is for its sake that I stayed on notwithstanding my differences. So if I have committed a wrong it is in the hope of doing some good. Had I no ground for such a hope, for overcoming the obstructionist tactics of the apponents? I would like in this connection to refer only to three of the statements made by the Prime Minister on the floor of the House.

On 28th November, 1949 the Prime Minister gave the following assurance. He said :

"What is more, the Government is committed to this thing (Hindu Code). It is going through with it."

* * * *

"Government would proceed with that. It is for this House to accept a measure, but if a Government takes an important measure and the House rejects that Government, then the Government goes an another Government comes in its place. It should be clearly understood that this is one of the important measures to which the Government attaches importance and on which it will stand or fall."

Again on 19th December 1949 the Prime Minister said :

"I do not wish the House to think in the slightest degree that we consider that this Hindu Code Bill is not of importance, because we do attach the greatest importance to it, as I said, not because of any particular clause or anything but because of the basic approach to this vast problem in economic and social. We have achieved political freedom in this country, political independence. That is a stage in the journey, and there

are other stages economis, social and other. And if society is to advance, there must be this integrated advance on all fronts."

On the 26th September 1951 the Prime Minister said :

"It is not necessary for me to assure the House of the desire of Government to proceed with it within possibilities, and so far as we are concerned we consider this matter as adjourned till such time as the next opportunity—I hope it will be in this Parliament—offers itself."

This was after the Prime Minister had announced the dropping of the Bill. Who could not have believed in those pronouncements of the Prime Minister ? If I did not think that there could be a difference between the promises and performances of the Prime Minister, the fault is certainly not mine. My exit from the Cabinet may not be a matter of much concern to anybody in this country. But I must be ture to myself and that I can be only going out. Before I do so I wish to thank my colleagues for the kindness and courtsy they have shown to me during my membership of the Cabinet. While I am not resigning my membership of Parliament I also wish to express my gratitude to Members of Parliament for having shown great tolerance towards me.

Sd|- B. R. AMBEDKAR

New Delhi,

10th October, 1951

# खंड १० वा

## प्रकरण ६

# राजिनाम्यावरील प्रतिक्रिया

## राजिनामा (पुढे चालू)

प्रकृती बरी नव्हती म्हणून **आंबेडकरांनी** राजिनामा दिला की नेहरू, हिंदु-कोड बिल ( भीमस्मृति ) मंजूर करण्यास तयार नव्हते म्हणून ? **आंबेडकर व नेहरू** यांच्यातील झालेला पत्रव्यवहार लोकसभेत **पं. नेहरूंनी** वाचून दाखविला, हे योग्य की अयोग्य झाले या मुद्यांवर वर्तमानपत्रांतून व लोकसभेत बरीच चर्चा झाली. तिचे काही नमुने मी येथे देत आहे.

### RESIGNATION NOT DUE TO ILLNESS

Dr. Ambedkar's statement, New Delhi, October 12

Dr. B. R. Ambedkar said here to-day that he had not resigned on grounds of illness.

In a statement he said that in his letter of August 10 last, to the Prime Minister, he had referred to his illness but had not mentioned it as a ground for his resignation. He had mentioned it is a ground for getting higher priority for the Hindu Code. In their letter of resigntion of September 27 last, he had not mentioned illness as a ground for his resignation.

"How anybody can spell out from those two letters that I resigned because of my health, I am unable to understand. I knew that attempts were being made to give such an impression, that is why I wanted to make a statement in the

House so that nobody should be under any false impression."

The former Law Minister expressed surprise over the question about his statement in Parliament on his resignation, having been raised against at 6 P.M. yesterday. After reading the press reports of what had happened in the House in his absence, he found that some confusion had been created in the minds of the members by what was said by the Prime Minister and the Deputy Speaker.

"Unfortunately," Dr. Ambedkar said, "the Prime Minister did not inform me that he was going to raise the question in the evening at six O'clock. If he had told me of his intention to do so, I would have certainly been present in the House to hear what he had to say, and offer my explanation there. But I received no such intimation from him and consequently was not present in the House.

"I, therefore, think it necessary to clarify the position. I have not been able to understand what exactly the Prime Minister wanted to gain by reading the correspondence between him and me, I can only guess. If the impression which the Prime Minister seems to be desirous of creating by reading the correspondence was that the ground for my resignation was my illness, it is not difficult to dispel that conslusion."

## PROPRIETY OF READING OUT DR. AMBEDKAR'S LETTERS

### Mr. Kamath's Query in Parliament

New Delhi, October 12 : The propriety of the Prime Minister's reading out to Parliament last evening the letters exchanged between Dr. Ambedkar and himself, without taking the permission of the former and without informing him; was raised in Parliament this morning by Mr. H. V. Kamath.

Soon after Dr. Ambedkar had taken his seat in the front bench amidst cheers, Mr. Kamath raised this question and asked whether Dr. Ambedkar would be permitted to make

a statement commenting on the correspondence. The Deputy Speaker said that every member should speak for himself. He pointed out that he had fixed 6 P.M. last evening as the time for Dr. Ambedkar to make the statement. At that time Dr. Ambedkar was not in his seat and the Prime Minister wanted to read out certain relevant papers and permission was given. No particular notice need be given to any member.

Clarifying his position, Dr. Ambedkar said that when he left the Chamber in the morning, he was quite sure that he had left the impression on the House and the Chair that he was not prepared to make a statement at 6 P.M. He was not saying that he felt injured by the Prime Minister's reading out the correspondence at 6 P.M. "knowing fully well that I had stated clearly in the morning that I was not going to obey your observations and make the statement at 6 P.M."

Dr. Ambedkar added:—

"Whether it was jusifiable for the Prime Minister to have read out the letters or not is a matter I leave to the Prime Minister and yourself, because I have other channels open to me for correcting wrong impressions."

Closing the incident, the Deputy Speaker said: "It is always open to a member to change his mind, and make the statement, especially when once I had fixed 6 P.M. as the time for the statement."

(The Times of India, 11-10-51).

विविधवृत्त या साप्ताहिकाच्या १४–१०–५१ च्या अंकात आलमगीर यांनी या प्रकरणावर खालीलप्रमाणे विचार प्रदर्शित केले होते :–

**डॉ. आंबेडकरांचा अपमान**

धक्कातंत्राच्या या नेहरूनियोजित काळात **श्री. जवाहरलाल नेहरू** यांच्यानंतर भारताचे कायदामंत्री **डॉ. आंबेडकर** यांनी खुद्द नेहरूंच्या काँग्रेस सरकारलाच एक जबरदस्त धक्का गेल्या गुरुवारी देऊन नेहरूंच्या डोळ्यांसमोर काजवे चमकावले. हा धक्का आपल्या मंत्रिपदाच्या राजिनाम्याची कारणे जाहीर करून **डॉ. आंबेडकर** यांनी दिला आहे. आणि ही कारणे प्रकट करताना **डॉ. आंबेडकरांनी** नेहरू

सरकारवर, विशेषतः **श्री. जवाहरलाल नेहरू** यांच्यावर, व्यक्तिशः जे आरोप केले आहेत त्यांचे समाधानकारक खंडण **श्री. नेहरू** यांना करता आलेले नाही. तथापि, या कारणांचा विचार तूर्त बाजूला ठेवून डॉ. आंबेडकर हे आपल्या राजिनामा प्रकरणी स्वतःचे निवेदन करण्यास उभे राहिले असता त्यांना हरकत घेऊन पार्लमेंटचे डे. स्पीकर श्री. अनंतशयनम् अय्यंगार यांनी जी दंडेली केली, आणि जिचे पर्यवसान डॉ. आंबेडकर यांनी सभागृहातून चालते होण्यात झाले, तिचा तीव्र निषेध करणे मला जरुर आहे. डॉ. आंबेडकर यांनी स्वतःच्या लेखी निवेदनाची प्रत आपल्याला आगाऊ दिली नाही आणि ती न दिल्यामुळे सभागृहात एखाद्या सभासदाने अप्रस्तुत, बदनामीकारक व सभागृहाच्या इभ्रतीला कमीपणा आणणारी विधाने करू नयेत म्हणून सावधगिरी घेण्याचे आपले कर्तव्य आपल्याला पार पाडता आले नसते असे कारण पुढे करून श्री. अनंतशयनम् अय्यंगार यांनी डॉ. आंबेडकरांच्या बाबतीत स्वीकारलेल्या दंडेलीच्या धोरणाचे समर्थन केले. पण हे त्यांचे समर्थन केवळ पोकळ आहे, एवढेच नाही, तर ते अन्याय्य आणि बेकादेशीर आहे, असेच मी म्हणतो डॉ. आंबेडकर हे निवेदन करणार हे कळून तशी परवानगीही त्यांनी त्यांना दिली होती. या निवेदनाची ही अशी पार्श्वभूमी असता अय्यंगार यांना निवेदनाच्या प्रतीची मागणी ऐन वेळी कशी करता येते ? बरे, या मागणीवर बोट ठेवून डॉ. आंबेडकरांना श्री. अय्यंगार यांनी निवेदन करण्याची परवानगी नाकारली असेही म्हणता येत नाही, कारण निवेदनाची प्रत मिळत नसताही डॉ. आंबेडकरांना सायंकाळी ६ वाजता हे निवेदन वाचण्याची परवानगी श्री. अय्यंगार देतच होते. मग महत्त्व श्री. अय्यंगार यांच्या मागणीला होते, सभागृहाच्या इभ्रतीला होते, की आणखी दुसऱ्या कशाला होते ?

श्री. अय्यंगार याच्या या लंगड्या समर्थनावरून असेच म्हणावे लागते की केवळ आंबेडकर यांचा अपमान व पाणउतारा करण्याच्या हेतूनेच श्री. अय्यंगार यांनी ही दंडेली पार्लमेंटमध्ये गाजविली आणि आपली क्षुद्र मनोवृत्ती प्रकट केली. श्री. अय्यंगार हे हिंदुकोड बिलाचे एक छुपे विरोधक आहेत ही गोष्टही या प्रसंगी मला नजरेआड करता येत नाही.

**त्यांना अधिकार नाही**

शिवाय डॉ. आंबेडकर यांनी स्वतःचे निवेदन डे. स्पीकरला आगाऊ सादर करणे जरुर होते, असा आग्रह तरी श्री. अय्यंगार यांना कसा धरता येतो ?

**डॉ. आंबेडकरांनी लेखी निवेदन तयार न करता उत्स्फूर्त भाषण करून आपल्या राजिनाम्याची कारणे जाहीर केली असती तर त्यांची अशी अडचण श्री. अय्यंगार यांना करता आली असती काय ? अथवा त्या तोंडी भाषणाचा सारांश आगाऊ कळविण्यात यावा असा तरी आग्रह धरता आला असता काय ? मग जो न्याय तोंडी निवेदनाबद्दल तोच लेखी निवेदनाला त्यांनी का लावू नये ?**

आणि डॉ. आंबेडकरांसारखा एक जबाबदार मंत्री अप्रस्तुत बदनामीकारक अथवा सभागृहाच्या प्रतिष्ठेला बाधक असे भाषण करील अशी अगाऊ कल्पना तरी श्री. अय्यंगार यांनी का करुन घ्यावी ? अशी सूचना करणे हे जेवढे मंत्र्यांच्या इभ्रतीला कमीपणा आणणारे आहे, तेवढेच सभापतीच्या कर्तव्याबद्दल आणि अधिकाराबद्दल श्री. अय्यंगार यांनी फाजील कल्पना करून घेऊन त्यांचे भलतेच स्तोम माजविल्यासारखे ठरत नाही काय ? स्वतःच्या मोठेपणाबद्दल ज्याच्या कल्पना अवास्तव असतात त्याने इतरांच्या सभ्यतेबाबतसुद्धा त्यांना काही सवलती देणे अगत्याचे असते. पण ती जाणीव श्री. अय्यंगार यांना असल्याचे दिसत नाही. थोडक्यात म्हणजे डॉ. आंबेडकर यांच्याकडून त्यांच्या निवेदनाची प्रत आगाऊ मागण्याचा कोणताही अधिकार श्री. अय्यंगार यांना पोहोचत नव्हता व नाही. व डॉ. आंबेडकर यांनी श्री. नेहरू यांना एक प्रत आगाऊ दिली हा उल्लेखही त्यांनी करणे अप्रस्तुतपणाचे होते. कारण श्री. नेहरूंनाही ह्या निवेदनाची प्रत आगाऊ मिळण्याचा अधिकार नाही. डॉ. आंबेडकर यांनी ती प्रत त्यांना दिली हे त्यांचे सौजन्य म्हटले पाहिजे.

**अशी निवेदने कोणालाही पूर्वकल्पना न देता करण्याचा मंत्र्यांना अधिकार आहे. आणि १९३८ साली डॉ. खेर यांनी असे निवेदन मध्यप्रांताच्या असेंब्लीमध्ये करून आणि त्यावेळचे मध्यप्रांत असेंब्लीचे स्पीकर श्री. घनःश्यामदास गुप्ता यांनी ते बिनतक्रार मान्य करून या बाबतीत पायंडाही पाडून ठेवला आहे.**

## " अस्पृश्य मनु डॉ. आंबेडकर "

अर्थात ही किळसवाणी दडपशाही पार्लमेंटमध्ये केली जाण्यास सभापतीच कारणीभूत आहेत आणि त्यांनीच आपल्या पक्षपाती वर्तनाने सभागृहाच्या इभ्रतीला कमीपणा आणला याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

**माझा तर असा तर्क आहे की डॉ. आंबेडकर यांना हिवचले तर निवेदन वाचून न दाखविता ते चालते होतील अशी कल्पना घेऊनच हा डाव सभापती श्री. अय्यंगार यांनी टाकला व एका दगडाने दोन पक्षी मारले. एक तर त्यामुळे डॉ. आंबेडकरांचा त्याना पाणउतारा करता आला आणि दुसरे असे की ते निवेदन डॉ. आंबेडकरांनी वाचून दाखविले असते तर पार्लमेंटच्या रिपोर्टात रीतसर दाखल होऊन सरकारची शोभा झाली असती, त्या निवेदनाला सरकारी रिपोर्टातून मज्जाव करता आला. या निवेदनात काँग्रेस, काँग्रेसपक्षाचे व्हिप श्री. सत्यनारायण सिन्हा यांच्यावर उघड-उघड आरोप आहेत, नेहरूंच्या विश्वासघातावर टीका आहे. मग हे निवेदन रिपोर्टात दाखल न होण्यासाठीच ही कारवाई मुद्दाम करण्यात आली असे का म्हणू नये ?**

ही वृत्ती तिरस्करणीय आहे एवढेच मी म्हणतो. ह्या बनावानंतर डॉ. आंबेडकर यांनी जाहीर केलेल्या त्यांच्या राजिनाम्याच्या कारणांचा थोडक्यात विचार करणे क्रमप्राप्त आहे. तथापि ही कारणे वाचल्यानंतर सकृद्दर्शनीच मला असे म्हणणे जरूर वाटते की ही जी कारणे डॉ. आंबेडकर यांनी पुढे केली आहेत, त्यांतील वैयक्तिक भाग गाळला असता अथवा आपल्याला प्रत्यक्ष राज्यकारभाराशी संबंध येणारे खाते नेहरूंनी दिले नाही, अशा प्रकारचे वैषम्यनिदर्शक निर्देश गाळले असते, तर जास्त चांगले झाले असते. नेहरूंचे परराष्ट्रीय धोरण, अवाढव्य लष्करी खर्च अथवा काश्मीरचा कुजत पडलेला प्रश्न ह्या प्रश्नांशी गेली चार वर्षे डॉ. आंबेडकरांचा संबंध आला होता. अर्थात त्यांनी प्रकट केलेली कारणे देखील परिणामकारक वाटत नाहीत. पूर्व बंगालमधील हिंदू व भारतीय अस्पृश्य यांची उपेक्षा, मुसलमानांची खुशामत, देशाचे धोरण ठरविण्याच्या बाबतीत आपल्याला बहिष्कृत करून अस्पृश्य लेखण्याचा नेहरूंच्या मंत्रिमंडळाने केलेला प्रयत्न आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदुकोडबिलाच्या बाबतीत नेहरूंनी केलेला विश्वासघात हीच कारणे माझ्या मते जास्त महत्वाची आहेत.

**या निवेदनातून डॉ. आंबेडकरांच्या मनाला पोळणारी जी एकच एक वेदना प्रकट होत आहे ती हीच की भारताची राज्यघटना तयार करून आधुनिक मनूच्या स्थानावर जरी डॉ. आंबेडकर हे जाऊन बसले, तरी त्यांना काँग्रेसने, नेहरूंनी आणि त्यांच्या गोटातील सनातन्यांनी अस्पृश्य मनू म्हणूनच लेखले आणि तसेच वागविले ! मी म्हणतो की हे एकच कारण डॉ. आंबेडकरांनी पुढे केले असते आणि "हिंदुकोड बिलाबरोबर माझे सरकार तरेल अथवा पडेल" या श्री. जवाहरलाल नेहरूंच्या घोषणेतील पोकळपणा व भंपकपणा, त्यांच्या धरसोडीच्या धोरणाचा उच्चार करून, उघड केला असता तर त्यांचा विषाद जास्त तत्त्वनिष्ठ, जास्त प्रांजल आणि जास्त उठावदार दिसला असता. इतर कारणांवर डॉ. आंबेडकरांनी बोट ठेवणे म्हणजे काँग्रेसच्या इतर सर्वसामान्य टीकाकारांशीच सहमत होण्यासारखे आहे, पण सरकारी घटक म्हणून चार वर्षे काम केलेल्या सरकारी मंत्र्याला मात्र आपल्या राजिनाम्याची कारणे सांगताना ही भूमिका स्वीकारता येत नाही.**

पत्रकारांच्या स्वातंत्र्याची गळचेपी करण्यासाठी नेहरूंना त्यांच्या पक्षीयांनी ज्या सवलती दिल्या व ज्या मिळाल्यामुळे सरकारने घाईघाईने बिल पास करून घेतले, त्या सवलती नेहरूंना आपल्या अनुयायांकडून हिंदुकोड बिलासाठी हक्काने मागता आल्या नाहीत अथवा तसे दडपणही घालता आले नाही हा नेहरूंचा दुबळेपणा

डॉ. आंबेडकरांनी उठावदारपणे मांडला असता आणि त्या जोरावर स्वतःचा राजिनामा देऊन नेहरूंच्याही राजिनाम्याची मागणी केली असती, तर हा पवित्रा जेवढा नाट्यपूर्ण, तेवढाच बिनतोड दिसला असता. (पा. ४, १२ व १)

बाबासाहेबांनी राजिनामा दिला याबद्दल टीका करणारे वक्तव्य मद्रासचे श्री. व्ही. कूर्मय्या, अध्यक्ष, बॅकवर्ड क्लासेस, शेड्यूल्ड कास्टस अँड ट्राईब्स फेडरेशन, मद्रास, यांनी १४-१०-५१ रोजी प्रसिद्ध केले. पंतप्रधान श्री. नेहरू यांनी हिंदुकोड बिल हे परिस्थितीचे अवलोकन करून पुढील लोकसभेपर्यंत तहकूब ठेवले हे योग्य केले; आणि नेहरूंच्या मंत्रिमंडळात चार वर्षे, विसंगत सूर न काढता गुपचूप बसून, आंबेडकरांनी काळ व्यतीत केला व आता नेहरूंच्या धोरणावर ते हल्ले चढवीत आहेत हे आंबेडकरांना शोभत नाही, अशा अर्थाचे श्री. कूर्मय्या यांचे विचार होते. त्यांच्या वक्तव्याचा वृत्तांत प्रसिद्ध झाला होता तो असा :–

### DR. AMBEDKAR'S RESIGNATION

#### Madras Leader's Criticism

Madras, October 14 : Mr. V. Kurmayya, President of the Backward Classes, Scheduled Castes and Scheduled Tribes Federation, Madras, yesterday criticised Dr. Ambedkar's action in resigning from the Cabinet.

Mr. Kurmayya said, in a statement, while this did not come as surprise to people intimately known to him and to the Scheduled Castes Federation, the immediate cause of his resignation, according to his statement, was the dropping of the Hindu Code Bill. Mr. Nehru as the responsible and undaunted leader of the nation "had to mobilise sufficient strength from all shades and schools of thought in the country before getting the Bill through Parliament and his decision to postpone this "truncated" Bill to the new Parliament was most wise."

Mr. Kurmayya said: "Dr. Ambedkar had also raised other issues which led him to resign from the Central Cabinet. If Dr. Ambedkar had honestly and sincerely felt that he was ignored and his opinion was not cared for by the Cabinet, he had no business to continue to be a member of the Cabinnt for the last four years."

He stated that his view that Kashmir should be partitioned would shake the very foundation of the sovereign Republic of India. (The Times of India, 15-10-51).

डॉ. आंबेडकर यांनी अस्पृश्यांची व दलितलोकांची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी जे सतत प्रयत्न केले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा आणि हिंदी घटना तयार करण्यात आंबेडकरांनी जे जिवापाड प्रयास केले त्याची दखल न घेता त्यांना वाईट रीतीने वागवून त्यांना मंत्रिमंडळात राहणे अशक्य केल्यामुळे हिंदी सरकारचा निषेध करणारा, आणि लोकसभेत उपसभापतींनी आंबेडकरांना जी तर्कदुष्ट वागणूक दिली त्याबद्दल त्यांचा निषेध करणारा ठराव मुंबईतील अस्पृश्य लोकांनी १४-१०-५१ ला रात्री भरविलेल्या जाहीर सभेत मंजूर केला. ही सभा ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन, मुंबई शाखा, यांच्या वतीने आंबेडकर मैदान, वरळी येथे भरविण्यात आली होती. अध्यक्ष श्री. एच. के. पटेल हे होते. या सभेचा वृत्तांत १५-११-५१ च्या टाईम्समध्ये "Bombay Protest" या शीर्षकाखाली आणि श्री. कूर्मय्या यांच्या निवेदनाच्या वृत्तांताखाली देण्यात आलेला होता.

या प्रकरणावर 'मँचेस्टर गार्डियन' या ब्रिटिश पत्राने १२-१०-५१ च्या आपल्या अंकात विचार प्रदर्शित केले. आंबेडकरांचा राजिनामा म्हणजे एका मंत्र्याचे मंत्रिमंडळाविरुद्ध बंड होय आणि हे बंड श्री. नेहरू यांना फार हानिकारक होणार आहे, असे या पत्राने उद्‌गार काढले होते. पुढील निवडणुकींवर दृष्टी ठेवून आंबेडकरांनी राजिनाम्याची वेळ साधली, कारण त्यांना सहा कोटी अस्पृश्यांचा लढा विरोधी पक्षात राहून लढवायचा आहे. आंबेडकर हे चिनी लालभाईंवर टीका करतात, कारण त्यांचे साम्यवादी तत्त्वज्ञान आंबेडकराना मान्य नाही. पण यदाकदाचित आंबेडकराना अस्पृश्यांचे नेतृत्व करता आले नाही तर लालभाई ते नेतृत्व करू शकतील, असे सदर पत्राने उद्‌गार काढले आहेत. या पत्राच्या उद्‌गारांचे वृत्त १५-१०-५१ च्या टाईम्सने "U.K. Paper's Comment" या सदराखाली आणि मुंबईच्या सभेच्या वृत्तांताखाली प्रसिद्ध केले होते.

राजिनाम्यासंबंधी जे निवेदन बाबासाहेबानी प्रसिद्धीसाठी दिले त्याचा वृत्तांत मँचेस्टर गार्डियन (आता फक्त गार्डियन) या पत्राने १२ ऑक्टोबर १९५१ च्या अंकात प्रसिद्ध केला तो असा :–

"India's Lonely Furrow"

Ex-Minister's Critcism

From our Correspondent ......................

भावार्थ :– डॉ. आंबेडकरांनी राजिनाम्यासंबंधी जे आत्मनिवेदन ११ ऑक्टो-१९५१ च्या रात्री जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्धीस दिले त्यात त्यानी परराष्ट्र. व्यवहार, पाकिस्तान आणि उपसमित्या यासंबंधी नेहरू प्रधानमंडळाने जी धोरणे स्वीकारलेली आहेत त्याबद्दल खरमरीत टीका केलेली आहे. ११ ऑक्टोबरला आंबेडकरांनी लोकसभात्याग केला, कारण उपसभापती हे त्याना आत्मनिवेदन

वाचून दाखविण्यास परवानगी देत नव्हते. परराष्ट्रधोरणाबद्दल आंबेडकरांनी आत्मनिवेदनात म्हटले आहे की, स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जगातील सर्व देश भारताकडे मित्रत्वाच्या सहानुभूतीने पहात होते. त्यानंतर भारताने अलिप्ततावादाची भूमिका स्वीकारली व ते सर्व देश भारतापासून दूर झाले. आता भारताला कोणताही परकीय देश मित्र म्हणून मानावयास तयार नाही. याचा परिणाम असा झाला की शेजारच्या शत्रूपासून भारताचे संरक्षण करण्यासाठी प्रचंड सैन्य भारताला ठेवावे लागले आहे. त्यासाठी भारताला आपल्या उत्पन्नातून ५० टक्क्यांहून जास्त पैसे खर्चावे लागतात. काश्मीरच्या संबंधात भारताने पाकिस्तानशी वैर उत्पन्न केले व त्यासाठी भरमसाठ खर्च आतापर्यंत केला. भारत–पाकिस्तान यांचा काश्मीर संबंधीचा संघर्ष खतम करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे काश्मीरची फाळणी तीन भागात करणे– पाकिस्तानव्याप्त भाग, काश्मीरचे खोरे व जम्मूलडाक. काश्मीर खोऱ्यात लोकमताने ठरवावे की, काश्मीरने पाकिस्तानात अगर भारतात जावे किंवा स्वतंत्र राहावे. पूर्व पाकिस्तानातील मुसलमानेतर लोकांना भारताने साहाय्य करण्यास हवे होते. पण त्याबद्दल भारताने मूग गिळलेले आहेत. भारतातील अस्पृश्य वर्गालाही सरकारच्या मदतीची फार जरूरी आहे, पण याबद्दल सरकारने भरीव असे कार्य केलेले नाही. हिंदुकोड मंजूर करून घेण्यासाठी आपले सरकार आपले स्वत्व पणास लावील आणि ते मंजूर नाही झाले तर आपले सरकार राजिनामा देईल, असे उद्‌गार पंतप्रधानांनी काढलेले होते. त्याप्रमाणे ते वागलेले नाहीत.

पंतप्रधानमंडळातील काही मंत्र्यांच्या समित्या व उपसमित्या नेमण्यात येतात व त्या राज्यकारभाराची सूत्रे हलवितात. या समित्यांत तेच तेच लोक घेण्यात येतात. य एकाही समितीत मला घेण्यात आले नव्हते. या समित्या जे निर्णय घेतात ते गुप्तपणे. व ते नीर्णय पंतप्रधानांच्या मंडळापुढे मांडण्यात येतात. त्यांना कोणी विरोध करण्यास धजत नाही. हे निर्णय प्रधानमंडळाचे निर्णय म्हणून जाहीर करण्यात येतात.

आपली प्रकृती बरी नाही, म्हणून आपण राजिनामा देत आहोत, असे प्रथम आंबेडकरांनी राजिनाम्याचे कारण दिले होते. निवेदनात इतर कारणे दिली आहेत. यापैकी खरी कारणे कोणती याबद्दल लोकसभेत शंका व तर्कवितर्क प्रदर्शित करण्यात आले. पंतप्रधान व उपसभापती श्री. अय्यंगार यांनी प्रथम आंबेडकरांना निवेदन वाचू द्यावे असे ठरविलेले होते. पण ते वाचण्याच्या अगोदर श्री. अय्यंगार यांनी निवेदनाची प्रत आंबेडकरांच्याकडे मागितली तेव्हा आंबेडकरांनी त्यांना विचारले, 'प्रत मागण्याचा तुम्हाला अधिकार आहे काय?' लोकसभेच्या सभासदाला आपले मत प्रदर्शित करण्याच्या बाबतीत हे तुमचे आक्रमण होत आहे. यावर श्री. अय्यंगार म्हणाले की, लोकसभेत वादविवादाचे वादळ उत्पन्न करणारे व सभेच्या एकंदर दर्जाला बाध आणणारे मुद्दे निवेदनात आहेत की काय एवढेच पाहण्याची माझी इच्छा

आहे. आंबेडकरांनी निवेदनाची प्रत देण्याचे नाकारले आणि सभेतील एकंदर वातावरण पाहून त्यांनी सभात्याग केला.

राजिनामाप्रकरणावर मँचेस्टर गार्डियनने अग्रलेख लिहिला त्याचा भावार्थ मी खाली देत आहे.

भावार्थ :- भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी अस्पृश्यांचे पुढारी डॉ. आंबेडकर हे काँग्रेसचे विरोधक होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते काँग्रेसबरोबर इमानाने सहकार्य करू लागले. आता त्यांनी मंत्रिमंडळाच्या सभासदत्वाचा राजिनामा दिलेला आहे. आणि आता ते स्वतंत्र झालेले आहेत. त्यांची कारकीर्द उज्ज्वल व कौतुकास्पद आहे. कायदेमंत्री म्हणून ते काम करीत होते आणि भारतीय घटना तयार करण्यात त्यांचा प्रमुख भाग होता. एका अस्पृश्य माणसाने लोकसभेत घटनेचा मसुदा मांडावा आणि तो मंजूर करून घ्यावा हे ( नेहमीच्या प्रथेनुसार ) विसंगतच होते. कांही आठवड्यापूर्वी त्यांच्यात आणि त्यांचे पूर्वीचे शत्रू , हिंदुलोक, यांच्यात संघर्ष निर्माण झाले. हिंदुकोड बिल हे आपण तयार केलेल्या अवस्थेत मंजूर झाले तर ते आपल्या राजकीय जीवनातील एक दुसरे स्मृतिचिन्ह म्हणून राहील अशी डॉ. आंबेडकर अपेक्षा करीत होते. **हिंदूंचे धार्मिक व सामाजिक आचार-विचार व चालीरीती यांना आधुनिकतेचे रूप देणे ही बिलात प्रमुख बाब होती.** परंतु लोकसभेतील हिंदुसभासदांनी बिलाला विरोध केला, आणि बिल बेमुदत पुढे ढकलण्यात आले. आपण राजिनामा का देतो, यासंबंधी लोकसभेत भाषण करण्याची डॉ. आंबेडकरांनी इच्छा प्रदर्शित केली तेव्हा उपसभापतींनी त्यांना परवानगी दिली नाही, हे इतर लोकांना उर्मटपणाचे दिसले. डॉ. आंबेडकर जे भाषण करणार होते त्याचे रूपांतर आता त्यांनी निवडणुकीचा जाहीरनामा म्हणून केलेले आहे. तो जाहीरनामा त्यांनी प्रसिद्ध केलेला आहे. त्यात त्यांनी मंत्रिमंडळाच्या भोंगळ कारभारावर सडकून टीका केलेली आहे. काश्मीरची फाळणी करणे हा एकच उपाय काश्मीरचा प्रश्न सोडवू शकेल असे त्या जाहीरनाम्यात सुचविलेले आहे. काश्मीरच्या प्रश्नामुळे भारताला दर साल वीस कोटी रुपये खर्चावे लागतात. हा प्रश्न अस्तित्वात नसता तर ही मोठी रक्कम समाजप्रगतीच्या कार्यासाठी खर्च करता आली असती. पं. नेहरूंनी विचित्र परराष्ट्रीय धोरण स्वीकारून भारताचे परदेशमित्र दूर लोटले, याबद्दल जाहीरनाम्यात नेहरूंवर टीका केलेली आहे. आंबेडकर यांनी जी मते जाहीर निवेदनात प्रदर्शित केलेली आहेत ती आता भारतातील आमजनतेत पसरलेली आहेत. कोणत्या ना कोणत्या उपायांनी आणि केव्हांतरी भारताची व चीनची मैत्री होईल आणि त्यामुळे आशियातील बरेच देश अलिप्ततावादाचा स्वीकार करतील आणि नंतर पश्चिम राष्ट्रे व रशिया यांच्यातील संघर्ष वितळून जाईल असा नेहरू अजूनही विश्वास बाळगतात. नेहरूंचा हा आशावाद माननीय आहे, हे खरे. पण या आशावादाला ( ध्येयाला ) चीन पाठिंबा देईल, असे मत नेहरू कोणत्या आधारावर स्वीकारतात ? त्यांना पेकिंगहून भारतीय राजनैतिक अधिकारी जे अहवाल पाठवितात

ते कोणत्या स्वरूपाचे आहेत ? आपल्या मंत्रिमंडळातील एका सभासदाने आपल्या विरुद्ध बंड उभारलेले आहे, ही बाब नेहरूंना फार भोवणार आहे. येत्या निवडणुकीत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे नेतृत्व स्वीकारावे आणि काँग्रेसला एक विरोधी पक्ष म्हणून त्याचे बळ वाढवावे, या हेतूने आंबेडकरांनी ऐन मोक्याच्या वेळी राजिनामा दिला हे योग्यच केले. मध्यवर्ती कायदेमंडळासाठी ७२ उमेदवार व प्रांतिक कायदेमंडळासाठी ४५० उमेदवार, फेडरेशन येत्या निवडणुकीत उभे करणार आहे. चिनी कम्युनिस्टस यांच्यावर डॉ. आंबेडकरांनी टीका केली आहे हे विशेष महत्त्वाचे आहे. भारतात ६ कोटी अस्पृश्य आहेत. काँग्रेसला आंबेडकर आवडोत अगर न आवडोत, पण तिने स्वतःला असा प्रश्न विचारावा की, अस्पृश्यांचे नेतृत्व डॉ. आंबेडकरांकडे न जाता कम्युनिस्टांकडे गेले तर भारतात कोणता हल्कल्लोळ उठेल ?

इतर प्रतिक्रिया अशा होत्या–

RESIGNATIONS

Sir, — From the reports appearing in the press about the resignations of Mr. Achhru Ram and Dr. Ambedkar, it appears that the explanation given by our Prime Minister in both the cases shows that there is a settled belief in his and his colleagues' minds that their principles are so completely above board that it becomes unnecessary to scan with car all of their acts.

It seems that the Prime Minister has settled it with himself that he and his colleagues are incapable of acting improperly towards others.

Does the Prime Minister desire that he and his colleagues may, with impunity, disagree and dismiss a retired High Court Judge of undoubted integrity and that the latter should not put before the public the real state of affairs ?

In the case of Dr. Ambedkar one may not agree with all of his grievances, but one of them conspicuously stands out. How can the responsibility of the Cabinet be joint if decisions are taken behind the back of some of the Cabinet members without hearing, their views ?

Delhi, October 15. H. L. BHAGAT.

(Times of India, 18-10-51)

DR. AMBEDKAR

Sir, — The way in which Dr. Ambedkar was gagged in Parliament by the Deputy Speaker effectively indicates the interpretation of freedom of speech by those who are in power.

It is ridiculous even to think that a man of Dr. Ambedkar's capacity, intellect and acumen would fail to observe the formalities of the House. But the tendering of his resignation changed the whole show. As the maker of our Constitution he received bouquests, but now he is given brickbats.

Barsi, October 16. P. S. RABADE.

(The Times of India, 19-10-51)

DR. AMBEDWAR

Sir, — Those who helped the exit of Dr. Ambedkar from the Cabinet have only put India 50 years behind inasmuch as the Hindu Code Bill could not be passed by the present Parliament.

Every progressive section of the Hindu population welcomes this piece of legislation to remodel it on a scientific basis, but that a small minority of the orthodox section should have won their fight is a sad commentary on the achievements of the Nehru Government.

Bombay, October 16. V. V. DEVAN.

(The Times of India, 20-10-51.)

CONGRESS POLICY

Sir, — Mr. Nehru declared that irrespective of the political opinions of individuals of exceptional ability, experience any integrity, he would not only warmly support their candidature in the elections but would even like to see such men occupying key posts as in the past. In contradiction of this declaration, he refuses even direct support to Dr. Matthai who laboured for four years as Minister for Transport and Finance at great personal sacrifice. The Congress has openly pitted an opponent from its ranks against him. This is the reward for his unselfish service to the country.

Dr. Ambedkar is similarly treated, he having burnt midnight oil to draw up India's Constitution.

If this is the treatment meted out to loyal servants of the nation, who could earn on their own ten times the amount received from Government, how does Mr. Nehru expect independent men of ability and integrity to help him in the admnistration of the country?

Bombay, October 25. RUSSA MEHTA.

(The Times of India, 27-10-51.)

डॉ. आंबेडकरांनी शनिवारी ता. २४-११-५१ रोजी बाँबे युनियन ऑफ जर्नॅलिस्टचे अध्यक्ष श्री कामथ व इतर पत्रकार यांच्याशी निरनिराळ्या प्रश्न बद्दल चर्चा केली. त्यात हिंदु कोड बिलासंबंधी प्रामुख्याने चर्चा झाली. त्या चर्चेचा वृत्तांत २५-११-५१ च्या नवशक्तीत प्रसिद्ध झाला होता. त्याच दिवशी त्यांचे बिलावर भाषण झाले होते. त्याचा वृत्तांत खालीलप्रमाणे :–

## पंडित नेहरूंमुळे हिंदु कोड बिल बारगळले !
## डॉ. आंबेडकरांचा पुन्हा आरोप

मुंबई शनिवार :–खुद्द पंडित नेहरूंनी एक वेळ मला हिंदुकोड बिल लोकसभेतून गाळण्याची विनंती केली होती, असे डॉ. आंबेडकरांनी आज रोजी सायंकाळी दादर येथील महिलांच्या सभेत हिंदुकोड बिल या विषयावर बोलताना सांगितले. ही सभा समाजवादी पक्ष व शे. का. फे. यांचे विद्यमाने घेण्यात आली होती. अध्यक्षस्थानी डॉ. सौ. काशीबाई अवसरे होत्या.

हिंदु कोड बिलाचे अनुरोधाने काँग्रेसवर हल्ला करताना आंबेडकर पुढे म्हणाले, काँग्रेस हा राजकीय पक्ष आहे की धर्मशाळा आहे ? अन्यथा, एकाच संस्थेत नेहरू व अनंतशयनम् अय्यंगार नि पंडित गोविंद मालवीय ही मंडळी एकत्र कशी राहू शकतात ? कोड बिलाने हिंदु स्त्रियांचा किती फायदा होणार आहे हे विशद करून आंबेडकर म्हणाले, "नेहरू बिलाचे बाजूने असोत वा विरोधी असोत, हे बिल संमत करून घेतल्याखेरीज मी स्वस्थ बसणार नाही. बिल गेल्या ४ वर्षांत केव्हाच पास झाले असते, पण नेहरूंनी ते मारून टाकले." (क्रित्ता).

आपण राजिनामा दिला याची दोन प्रमुख कारणे देतात. १) श्री. नेहरू व काँग्रेस पक्ष यांनी हिंदु कोड बिल मंजूर करण्यात आपणाशी दगलबाजी केली, आणि २) काँग्रेस राजवटीत अस्पृश्यांवर अत्यंत हीन प्रकारचे अन्याय होतात तरी ते दूर करण्यास काँग्रेस सरकार मनापासून प्रयत्न करीत नाही. हे लेडी हारटॉग यांनी "India New Pattern" 1955) या आपल्या ग्रंथात कबूल केलेले आहे.

काँग्रेसपक्षीय ( हरिजन ) मंत्री श्री. जगजीवन राम हेही आंबेडकरांप्रमाणे अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध नेहमी आरडाओरडा करीत असतात, परंतु काँग्रेस सरकार त्यांनाही भीक घालीत नाही, असेही विचार सदर लेखिकेने प्रदर्शित केलेले आहेत.

"This (non-support of the Congress Party to the Bill) was one of the reasons for the resignation of Dr. Ambedkar who had worked for it devotedly and was bitterly disappointed at the outcome." (page 81).

"The leaders of the Scheduled Castes and their representatives in Parliament have been bitterly disappointed at the treatment still meted out to members of their community. This was one of the grounds for Dr. Ambedkar's resignation from the Cabinet and Mr. Jagjivan Ram has repeatedly complained in the Present Parliament of cases of continuing discrimination, especially in the economic sphere." (page 86).

१९५२ नंतरच्या काळात मध्यवर्ती सरकारतर्फे पूर्वीच्या हिंदुकोडच्या मसुद्यातून १) दी हिंदु मॅरेज ॲक्ट, १९५५, २) दी हिंदु सक्सेशन ॲक्ट, १९५६ (जून), ३) दी हिंदु मायनॉरिटी ॲंड गार्डियनशिप ॲक्ट, १९५६ (ऑगस्ट), आणि ४) दी हिंदु अडॉप्शन ॲंड मेन्टेनन्स ॲक्ट, १९५६ (डिसेंबर) हे कायदे करण्यात आले, ते डॉ. आंबेडकरांनी कायदेमंत्री म्हणून राजिनामा दिल्यानंतरच्या काळात झालेले कायदे आहेत. पहिल्या कायद्यात 'हिंदु' शब्दाची व्याख्या हिंदू, बौद्ध, जैन व शीख अशी करण्यात आलेली आहे. स्त्री आणि पुरुष यांना समान वारसाहक्क देण्यात आलेला आहे.

काँग्रेसपक्ष १९४७ पासून सत्तारूढ झाला व त्याने सत्ता १५ वर्षांचेवर टिकविली. मध्यवर्ती मंत्रिमंडळात जे मंत्री व उपमंत्री घेण्यात आले त्यात बहुसंख्य लोक उत्तर प्रदेश आणि मुंबई प्रांतातून घेण्यात आले. इतर प्रांतांवर या बाबतीत अन्याय झाला अशी ओरड बरेच दिवस करण्यात आली. पण त्या अन्यायाचे परिमार्जन पूर्णपणे कधीही करण्यात आले नाही. काँग्रेस पक्षात बेदिली उत्पन्न होण्यास हे एक कारण झाले. तथापि मध्यवर्ती मंडळात जे लोक होते ते श्रीमंत घराण्यातील, वरच्या दर्जाचे सुशिक्षित, कॉलिज व विद्यापीठांतून पदव्या घेतलेले होते. त्यामुळे मंत्रिमंडळातील कार्यक्षमतेबद्दल कोणाला शंका घेता आली नाही. तथापि, काही मंत्र्यांनी आपल्या कारभारात बराच गोंधळ आणि वशिलेबाजीचे प्रकार केले व त्यामुळे लोकमत प्रक्षुब्ध झाले. काही मंत्र्यांना राजिनामे देणे भाग पडले. मध्यवर्ती मंत्रिमंडळात २३ हिंदू होते. त्यात एक अस्पृश्य ( जगजीवन राम ), व एक शीख ( सुवर्ण सिंग) होते. बाकीच्यांत दोन मुसलमान ( आझाद आणि कबीर ) होते. तथापि, मंत्रिमंडळात

ब्राह्मणांचे (नेहरू, लालबहादूर, गोविंद पंत) वर्चस्व चालू राहिले. ही ब्राह्मणवर्चस्वाची जाणीव असताही जनतेने, पं. नेहरूंच्या व्यक्तिमाहात्म्याकडे लक्ष देऊन, सदर जातीय प्रश्नांकडे कानाडोळा केला. या बाबतीत मायकेल ब्रेचर यांचे खालील उद्गार या सर्व प्रश्नांवर चांगला प्रकाश टाकतात.

"...From the outset, a disproportionate share of senior ministerial posts has gone to two States — Uttar Pradesh (the former United Provinces or Uttar Pradesh) and Bombay. In 1957, for example, they accounted for seven of the thirteen Cabinet Members. In terms of communal representation, there were twenty-three Hindu members of the Cabinet and Ministers of State including an Untouchable (Ram), two Muslims (Azad and Kabir), a Sikh (Swaran Singh) and a Jain (Ajit Prasad Jain). Among the Hindus, Brahmins predominated with twelve, headed by Nehru and Pant. As might be expected, Sanskrit derived languages were spoken by the vast majority (twenty-four out of twenty-seven). Members of the Cabinet, on the whole, come from cities, while Ministers of State are from towns and villages. The majority are from well-to-do families. The educational level is extremely high; almost 90 per cent of Cabinet Members received a University or College education. Many were trained for the law. Perhaps the most noteworthy fact is that sixteen of the twenty-seven (proudly) claim imprisonment under the British Raj. No wonder, then, that a prison record — for political activities — has been dubbed 'the union card' for influence in the Congress and, therefore, in the Government. The average age of Cabinet Members was fifty-eight; five of the thirteen were more than sixty and three over sixty-five — Nehru, Pant and Azad."

(Nehru : A Political Biography, 1959, by Michael Bletcher, pages 450-51).

काँग्रेस पक्ष सत्तारूढ झाल्यानंतर त्यात आणि मध्यवर्ती व प्रांतिक मंत्रीमंडळातील सभासदांचे हेवेदावे आणि प्रामाणिक मतभेद उत्पन्न झाले. पण कायदेमंडळे व लोकसभा येथे पक्षाचे बहुमत नेहमीच असल्यामुळे मंत्रिमंडळे टिकाव धरून सत्तेवर राहिली. याला प्रमुख कारण म्हणजे नेहरूंचे व्यक्तिमाहात्म्य. नेहरूंच्या काहीशा दूरदृष्टीमुळे मध्यवर्ती काँग्रेसमंडळात १९४७ ते १९५६ पर्यंत पाच काँग्रेसतर मंत्री घेण्यात आले

26. On the Kashmir issue, the policy adopted by the Congress Government is not acceptable to the Scheduled Castes Federation. This policy if continued will lead to a perpetual enemity between India and Pakistan, and the possibility of war between the two countries. The Scheduled Castes Federation believes that it is essential for the good of both the countries that they should be good and friendly neighbours. For this purpose the proper policy to adopt towards Pakistan should be based upon two considerations. (1) There should be no talk about the annulment of the partition of India, Partition should be accepted as a settled fact not to be reopened and that the two countries to continue as two separate sovereign States. (2) That Kashmir to be partitioned — the Muslim area to go to Pakistan (subject to the wishes of Kashmiris living in the Valley) and the non-Muslim area consisting of Jammu and Ladhak to come to India.

27. This pollcy has the best chance of producing friendly relations between the two countries, and the Scheduled Castes Federation will press for its acceptance.

28. The other centre of our foreign policy which has made other nations our enemies is China. India is made to fight her battle for entry in the United Nations Organisations as a permanent member thereof. This is an extraordinary thing. Why should India fight the battle of Chlna when China is quite capable of fighting her own battle ? This championing of the cause of Communist China by India has been responsible for the prevaillng antagonism between India and America with the result that it has become impossible for India to obtain financial and technical aid from America.

29. We refused Dominion Status. We become an independent country. Subsequently we agreed to remain in the British Commenwealth — and yet our relations with the other countries is not at (all) friendly.

30. In our foreign policy we have not been able to make a distinction between capitalism and Parliamentary Democracy. The dislike of *Capitalism* is understandable. But we take care that we do not weaker(n) Parliamentary Democracy and help Dictatorship to grow. It would be like throwing the baby out of the bath but in emptying it of dirty water.

31. India's first duty should be to herself. Instead of fighting to make Communist China a permanent member of the U.N.O., India should fight for getting herself recognised as the permanent member of the U.N.O. Instead of doing this India is spending herself in fighting the battle of Mao as against Chiangkai Shek. This quizotic (Quixotic) policy of saving the world is going to bring about the ruination of India and the sonner this sivicidal foreign policy is reversed the better for India. Before championing the cause of Asiatic countries, Isdia must strive every nerve, must seek every aid to make herself strong. Then only will her voice be effective. This will be the line of Foreign Policy that the Scheduled Castes Federation will pursue.

## III. QUESTION OF RESOURCES

33. Programme is not a mere matter of words or ideas. If it is to be put into action, it is necessary to find the necessary finance. Nobody will take a Party's programme seriously unless and ustil the Party is able to show how it is going to foot the bills.

34. Although the amount required for the programme set out by the Federation is by no means small, the financial problem is not unmanageable. The Scheduled Castes Federation suggests the following ways of raising finance for the development of the country :—

(i) Reduction of Expenditure over the Army.

(ii) Re-levy of the salt-tax.

(iii) Abolition of prohibition and the saving of Excise Revenue.

(iv) Nationalisation of Insurance.

35. The total revenues of the Government of India are about Rs. 350|- crores. Out of this the Army is eating up more than 50 per cent of the Revenues or Rs. 180|- crores per annum. This is a colossal expenditure on the defence in a country where people are dying of starvation. On the basis of the settlement of the Kashmir issue in the way suggested in the Manifesto and the change in the foreign policy and the creation of friendly relations with other foreign nations, there should be no risk in reducing the defence expenditure by Rs. 50|- crores per year.

36. There is no reason why the levy of the Salt tax should not be resumed. The giving up of the levy of the Salt tax was a concession to mere sentiment. It has not made salt cheap. Instead salt has become very dear. The only thing that has happened is that the State has lost a valuable source of revenue which used to produce Rs. 11 crores of revenue per year and which has seriously handicapped the State in advancing the development of the country. The incident of the tax on the people will be nothing even if it is levied at a rate which will produce Rs. 30|- crores per year.

37. Prohibition is sheer madness. Its progress must not only be arrested but it must be immediately abolished. It has produced more evils than those it was intended to stop. Manufacture of liquor has become a cottage industry. Formerly only men drank liquor. Now women and children also drink because liquor is manufactured in every home in the presesce of women and children. It has produced more crime and worst sort of demoralisation of the lower classes.

38. From the point of view of conserving the resources of the State it is a huge waste. The excise revenue of Part

'A' State in 1945-46 was Rs. 51.67 crores. In 1950-51, it was 25.23 crores. The Budget estimate for 1951-52 is 24.95 crores. The figures for 1945-46 include the prepartitioned Punjab and Bengal. Nevertheless, broadly the statement can be made that the loss on account of prohibition in part 'A' States is of the order of Rs. 25 crores a year. This does not, however, take into account the possible rise in excise revenue that might have taken place in the absence of prohibition.

39. For Bombay, excise revenue in 1946-47 was Rs. 9.74 crores. In 1950-51, it was 1.20 crores and the budget estimate for 1951-52 is Rs. 1.05 crores. The loss in excise revenue thus works out of about Rs. 8.7 crores a year.

40. The excise revenue in Madras was Rs. 16.80 crores in 1945-46. It declined to 50 crores in 1950-51. For 1951-52 the budget estimate is .36 crores. The loss in excise revesue in consequence of prohibition thus works out at Rs. 16 crores.

41. In the Uttar Pradesh excise revenue in 1947-48 was Rs. 7.046 crores. For 1950-51, it was Rs. 5.93 crores. The loss thus works out at Rs. 1.2 crores.

42. The excise revenue in Madhya Pradesh, Punjab and Bengal also shows some fall.

43. The loss in excise revenue for Bombay and Madras alone works out at almost Rs. 25 crores which is also the approximate decline in the excise revenue in Part 'A' States taken together.

44. These figures are incomplete. They do not contain any data for Part 'B' States. For they are not available. They also do not contain any data on the expenditure on enforcement in consequence of the adoption of the policy of prohibition.

45. From the point of equity, there is no justification for prohibition. The cost of prohibition is borne by the

general public. Why should the general public be made to pay the cost of reforming a lakh or two of habitual drunkards who could never be reformed? Why should the general public be made to pay the cost of prohibition when the other wants of the public such as education, housing and health are crying for remedy? Why not use the money for development plans? Who has greater priority, the Drunkard or the Hungry? These are pertinent questions to which there is no answer except arrogance and obstinacy. Whatever happens, the policy of prohibition must be reversed and this colossal waste of public money should be put a stop to and the resources utilised for advancing general welfare.

46. As regards nationalisation of insurance it is the most profitable source of money as the following figures show :

| | |
|---|---|
| Total number of Insurers registered in 1950 under the Insurance Act .. .. | 339 |
| Total number of Life Insurance Policies effected in 1949 .. .. .. | 33,03,000 |
| Sum Insured .. .. .. | 7,39,49,00,000 |
| Annual Income by way of Premium .. | 0,37,18,00.000 |
| Total Invested in Government Securities as required .. .. .. | 8,64,16,000 |
| Expense of Management .. .. .. | 29.2 per cent of the premium income |

47. From these figures it will be seen that the total money in the hands of Life Insurance Com anies per annum is 37 crores. Unlike Bank deposits they are not demand deposits. Not being demand deposits they can be easily invested in long term development projects. It is true that Insurance Companies invest their monies in Government Securities. So that it may be said that in the last resort it is the Government which gets the insurance money. But this is no answer to nationalisation of insurance. For the amount invested in Government Securities is very small, 9 crores out of 37 crores. Secondly, Government has to pay

interest on these securities which is a needless burden on the tax payer. Thirdly Insurance Companies spend up annually 29 per cent of the income from premium which is 1 crores out of 37 crores for the year 1949. This is intolerable waste of money. All this could be stopped by nationalisation.

48. The Scheduled Castes Federation will not press for nationalization of Insurance. It will make Insurance Compulsory for all State and Private Employees. Compulsory Insurance will give security to the individual and funds for the Government for future development.

49. To sum up, under the scheme set out by the Federation the available resources for the development of the country will come to :

| | | |
|---|---|---|
| (1) | From the Army Budget .. | .. Rs. 50 crores |
| (2) | From the salt revenue .. | .. Rs. 30 crores |
| (3) | From Excise .. | .. Rs. 25 crores |
| (4) | From Life Insurance | Figures not available. |
| (5) | From Compulsory Insurance of State and Private Employees | |

50. The sources indicated can be depended upon to provide enough funds for the development of the country.

## IV. CO-OPERATION BETWEEN SCHEDULED CASTES FEDERATION AND OTHER POLITICAL PARTIES.

51. Mere Organization does not make a party. A party means a body of people who are bound by principles. Without principles a party cannot function as a party for in the absence of principles there is nothing to hold the members of it together. A Party without principles is only a caravansarai. The Scheduled Castes Federation will not therefore ally itself with a political party which has not laid down its principles and whose constitution does not demand a pledge from its members to stand by those prinples and whose principles are not in antagonism with those of the Federation.

52. It is not enough to have political ideals. What is necessary is the victory of ideals. But the victory of ideals can be ensured only by organised parties and not by individuals. For these reasons the Federation will not support an independent candidate who belongs to no party except in exceptional cases.

53. Secondly, the Scheduled Castes Federation would like to work in co-operation with the Backward Classes and the Scheduled Tribes. For they are more or less in the same position as the Scheduled Castes. These classes unfortunately have not developed that degree of political consciousness which the Scheduled Castes have by reason of political and social activity of the Scheduled Castes Federation during the last twenty years. The Constitution of Free India has made the Backward Classes, the Scheduled Tribes and the Scheduled Castes virtually the masters of the country. Hitherto the minority of Caste Hindus have made themselves the rulers of the country. The fear of the Scheduled Castes Federation is that the Backward Classes and the Scheduled Tribes by reason of their want of consciousness may fall a prey to the minority of Caste Hindus and continue to be their slaves instead of becoming masters of their own. The Scheduled Caste Federation's first concern is to help these Classes to get on their feet If they so wish, the Scheduled Castes Federation would be prepared to change the name and call itself the Backward Classes Federation so as to include both sections in a common organization. If this is not possible the Scheduled Castes Federation would be ready and willing to forge a working alliance with such organizations.

54. As regards other Political Parties, the Scheduled Castes Federation's attitude can be easily defined. The Scheduled Castes Federation will not have any alliance with any reactionary Party such as the Hindu Mahasabha or the R.S.S.

55. The Scheduled Castes Federation will not have any alliance with a Party like the Communist Party, the

objects of which are to destroy individual freedom and Parliamentary Democracy and substitute in its place dictatorship.

56. The Scheduled Castes Federation does not believe in totalitarianism and therefore will not join a political Party which is already totalitarian and will not permit an opposition Party to grow.

57. The Scheduled Castes Federation is equally opposed to the growth of multiplicity of Political Parties. The ideal of the Scheduled Castes Federation is to have two Parties. That alone can given stability to the State and Freedom to the individual. The Federation will strive to bring about a two party system in this country. Such an ideal however does not seem to be realizable within the short time available from now and the coming general election. For the moment what is possible is to form an All India Party consisting not of individual members but of different political parties as units, each having its own autono- in the matter of its internal organization and the setting up of candidates on some agreed basis and reciprocal obligation to support one another's candidate subject to a committee of approval. In short the Party should be somewhat on the lines of the British Labour Party which is a Federal Party.

58. The Scheduled Castes Federation is prepared to be a unit of such a Federal Party if Parties such as the K.M.P. Party, the Socialist Party, the Justice Party and where no such Parties exist other Parties on the following terms and conditions :

(i) Every Party to such an alliance must have its principles set out in clear terms;

(ii) The principles of such a Party should not be opposed to the principles of the Scheduled Castes Federation;

(iii) The Party seeking alliance must pledge its support for the social and economic uplift of the Scheduled Castes!

(iv) The Party must agree to permit the Scheduled Castes Federration to function as an autonomous unit within the Federal Organization in the matter of its internal affairs; and

(v) The Party must not be affiliated to any Party which is not recognised by the Federal Party as a unit of its own.

59. With regard to individuals who seek the aid of the Scheduled Castes Federation in election they would be required to become Associate Members of the Federation and sign a pledge to the effect that they accept the principles, the policy, the programme and the descipline of the Federation.

**संपूर्ण जाहीरनामा मी वर उद्धृत केलेला आहे. त्याचा मुख्य हेतू हा की, १९३६ साली स्थापन केलेला स्वतंत्र मजूर पक्ष व नंतर १९४२ साली स्थापन केलेला फेडरेशन पक्ष यांचे ध्येय, धोरण व कार्यक्रम यासंबंधी वाचक आणि अभ्यासू लोक यांना तारतम्य दृष्टीने विचार करता यावा, आणि १९३६ ते १९५१ पर्यंतच्या काळात बाबा-साहेबांची राजकीय दृष्टी हितवर्धनाच्या भूमिकेवरून कशी विशाल व व्यापक होत गेली, हे नीट लक्षात यावे.**

दिल्लीत भरलेल्या फेडरेशनच्या बैठकीचा व जाहीरनाम्याचा संपूर्ण वृत्तांत १३–१०–५१ च्या जनता पत्रात प्रसिद्ध झालेला होता. त्यांतील प्रमुख भाग मी येथे इंग्रजी न समजणाऱ्या वाचकांसाठी देत आहे.

सर्व सार्वजनिक कार्यात पक्षाचे धोरण खालील तत्वांना अनुसरून राहील. :–

१) फेडरेशन समतेचा पुरस्कार करील. भारतीयांना केवळ कायद्याच्या दृष्टीने समानता मिळविता येणार नाही, तर जेथे जेथे समानता नाही अगर जेथे समानता लाथाडली जाते तेथे फेडरेशन समानतेच्या हक्कासाठी झगडेल.

२) प्रत्येक भारतीयाला स्वतःचा उत्कर्ष आपल्या मनाप्रमाणे करण्याचे स्वातंत्र्य आहे व सरकार ते पूर्ण करण्यात निमित्त मात्र राहील.

३) प्रत्येक भारतीयाला धार्मिक, आर्थिक व राजकीय मत प्रदर्शनाचा व वागण्याचा हक्क राहील व त्यांच्यावर गदा न येईल याबद्दल फेडरेशन दक्ष राहील. हे हक्क प्रसंगविशेषी इतर देशबांधवांच्या व देशाच्या हितसंरक्षणार्थ मर्यादीत राहतील.

४) प्रत्येक भारतीयाला आपल्या उत्कर्षासाठी समान संधी देण्याचा व ज्यांना ती कधी मिळाली नाही त्यांना ती प्रथम देण्याचा मार्ग अवलंबिला जातो की नाही यावर फेडरेशन कटाक्ष ठेवील.

५) भीतीपासून प्रत्येक भारतीयाचे निवारण करण्यात सरकारला फेडरेशन जागृत ठेवील.

६) स्वातंत्र्य, समता व आपुलकी (बंधुत्व) यांचा फेडरेशन संपूर्ण पुरस्कार करील, एवढेच नव्हे तर माणसा माणसामधील वर्ग, वर्गामधील व राष्ट्राराष्ट्रातील असलेले हेवेदावे व होणारा अमानुष छळ यांचा बीमोड करण्याचे आटोकाट प्रयत्न फेडरेशन करील.

७) व्यक्ती व जनता यांच्या सर्वांगीण हिताच्या दृष्टीने लोकशाहीचे प्रामाणिकपणे पुरस्कार करणारी राज्यघटना म्हणूनच श्रेष्ठ होय. अशा खऱ्या लोकशाही सरकारला फेडरेशन पाठिंबा देईल.

## दलित फेडरेशनचे धोरण

जाहीर केलेल्या ध्येयानुसार तंतोतंत वागण्याचे दलित फेडरेशनचे धोरण राहील कम्युनिझम, सोशॉलिझम, गांधीझम यासारख्या किंवा इतर विचार मतप्रणालीच अंधश्रद्धेने फेडरेशन कधीच अंगीकार करणार नाही. अगर उत्तेजन देणार नाही ज्या विचारसरणीमुळे अगर योजनेमुळे जनतेला आर्थिक स्वास्थ समाधानकारक मिळेल आणि जीवनात खरे सुख लाभेल अशा प्रगतीपर आणि पुरोगामी योजनांचा, मग त्यांचा उगम कोठेही होवो, फेडरेशनच्या तत्वाला अशा योजना पूरक असल्या तरच जनहिताच्या दृष्टीने फेडरेशन जरूर स्वीकार करील. दलित फेडरेशनचे धोरण पुरोगामी, प्रगतीपर, तंत्रशुद्ध, आधुनिक आणि सामान्य जनतेला पोषक असे राहील. बौद्धिक चातुर्याचे व्यवहारशून्य खेळ खेळणार नाही.

## अ) अंतर्गत राज्यव्यवस्था

भरीव कार्यदृष्टी म्हणून फेडरेशनतर्फे खालील गोष्टींना प्रामुख्याने महत्त्व देण्यात येईल :-

१) खालचा वर्ग व वरचा वर्ग यांच्यात असलेला हजार वर्षांचा वैरभाव गांधी-वधानंतर झालेल्या दंग्यात व जाळपोळीत दिसून आला. हा वैरभाव नष्ट करण्यासाठी खालच्या वर्गाचा सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय दर्जा वरच्या वर्गाच्या दर्जाबरोबर आणण्यास सतत प्रयत्न केले पाहिजेत.

२) शिक्षणाचा प्रसार, मुलकी व लष्करी खात्यांत मानाच्या नोकऱ्या व शेती-साठी लागवडीस जमिनी देणे या मार्गांनी खालच्या वर्गाची सुधारणा झपाट्याने करता येईल.

३) खालच्या वर्गात संतती नियमनाच्या मार्गाचे उपदेशणे व लोकसंख्येच्या वाढीला आळा घालणे.

यांतील इतर महत्त्वाच्या घटना खालीलप्रमाणे आहेत :–

४) भाषावार प्रांत रचना.

५) राज्यव्यवस्थेचे शुद्धिकरण.

६) काळाबाजारवाले आणि नियंत्रणे.

७) वाढते दर आणि वाढता खर्च.

फेडरेशन भाषावार प्रांत रचनेचा पुरस्कार करील. राज्यव्यवस्थेत जो गोंधळ आणि जी अनीती चालली आहे तिला काँग्रेसनेच जन्म दिला आहे. अशा नीतीभ्रष्ट लोकांना शासन करणे योग्य आहे असे काँग्रेसला मुळीच वाटत नाही. खुद्द काँग्रेसच्या प्रतिष्ठित सभासदांनी या अनीती व वशिलेबाजी बद्दल काँग्रेस मंत्र्यांवर उघड आरोप केले आहेत. काँग्रेस हाय कमांडला या गंभीर आरोपांची साधी चवकशी करण्याची पण दिक्कत वाटली नाही. ही चवकशी करण्याचे तर दूर राहिलेच पण ज्यांनी आरोप केले त्यांची हायकमांडने मुस्कटदाबी केली आणि गुन्हेगारांना शासन न करता उघड या अनीतीचा पुरस्कार केला. जिथे मंत्र्यासारखे वरील जबाबदार लोक उघड गुन्हे करतात आणि ते पचले जातात, तेथे खालचे अधिकारी या अनितीच्या फेऱ्यातून सुटतील कसे ? अशा देशद्रोही व गुन्हेगार मंत्र्यांची व अधिकाऱ्यांची निःपक्षपाती. आणि कसून चवकशी झाली पाहिजे. एवढेच नव्हे तर अंतर्गत राज्यव्यवस्थेचा नैतिक दर्जा वाढविला पाहिजे काँग्रेसने लावलेला कलंक धूवून काढण्याची तीव्र जाणीव दलित फेडरेशन ठेवील; एवढेच नव्हे तर गुन्हेगारांना योग्य शासन होईल असे करील. वाढती नियंत्रणे आणि काळाबाजार हे काँग्रेसच्या अंदाधुंदीच्या राज्यकारभाराचे प्रतीक आहे. काँग्रेस व बडे व्यापारी यांच्या मैत्रीचा तो दुष्परिणाम आहे. मुळापासून काँग्रेस भांडवलदारांची मिंधी आहे. आणि तिने या भांडवलदारांना मोकाट स्वातंत्र्य दिले आहे. मध्यवर्ती सरकारातील घडामोडीकडे लक्ष दिले तर काँग्रेस व भांडवलदार यांनी हा व्यवहार अबाधित करण्याचा जणू घाटच घातला आहे. हे दिसून येईल. निवडणुकीच्या गंगाजळीसाठी काँग्रेस भांडवलदाराना स्वत्व विकण्यास एका पायावर उभी आहे व भांडवलदार काँग्रेसला निवडणुकीसाठी पैसा चारुन सत्तेचा सौदा करायला उत्सुक आहे. काँग्रेस व भांडवलदार यांचे नाते हे असे आहे. अशा विध्वंसक शक्तीचे निर्मूलन करणे सर्वस्वी मतदारांच्या हाती आहे. भांडवलदारांनी पुढे केलेल्या व त्यांचे मिंधे असलेल्या उमेदवारांना मतदारांनी पाठिंबा दिला नाही तर हा प्रश्न सहज सुटेल. फेडरेशनने भांडवलदारांना आपल्या जवळ कधीच येऊ दिले नाही. अश भांडवलदारांचे सरकार प्रस्थापित न होण्याची फेडरेशन कंबर बांधून खबरदारी घेईल.

## ब) परराष्ट्रीय धोरणाचा प्रश्न

भारताला स्वातंत्र्य लाभले त्या दिवशी जगांतील साऱ्या राष्ट्रांचे संबंध मित्रत्वाचे होते, व ती राष्ट्रे भारताचे शुभ इच्छित होती. आजची परिस्थिती अगदी उलट आहे. आज भारताला खरा मित्र कुणी नाही. सर्व राष्ट्रे भारताची शत्रू नसली तरी भारतावर फार नाराज आहेत. भारताच्या हिताकडे ती पहात नाहीत. याला काँग्रेस सरकारचे धरसोडीचे परराष्ट्रीय धोरण कारणीभूत आहे. भारताचे काश्मिरबद्दल धोरण, युनोमध्ये कम्युनिस्ट चीनच्या प्रवेशाबद्दल विसाडवाई आणि कोरीयन युद्धाबद्दल अनास्था याबद्दल गेल्या तीन वर्षातील पोरकट धोरणामुळे इतर राष्ट्रांनी भारताकडे पाठ फिरवली आहे. काश्मीरबाबत काँग्रेस सरकारचे धोरण दलित फेडरेशनला मुळींच पसंत नाही. हेच धोरण पुढे कायम ठेवले तर भारत आणि पाकिस्तान यामध्ये तीव्र मतभेद तर रहातीलच पण त्यामुळे या दोन देशांत युद्ध होण्याचा संभव आहे. या दोन देशांत सख्य असावे असे फेडरेशनला प्रामाणिकपणे वाटते. पाकिस्तानच्या धोरणाबाबतींत खालील गोष्टींचा विचार प्रामुख्याने व्हावा :–

१) विभक्त झालेल्या हिंदुस्थानच्या एकीकरणाची भाषा बंद करावी आणि पाकिस्तान व भारत हे दोन स्वतंत्र देश मनापासून मान्य करण्यांत यावेत.

२) काश्मिरची फाळणी करण्यांत येऊन बहुसंख्यांक मुसलमानी प्रजेचे सार्वमत घेऊन तो प्रदेश पाकिस्तानला देण्यात यावा व मुस्लीमेतर प्रदेश (जम्मू व लडाक) भारताला जोडावा. दोन राष्ट्रात ऐक्य साधण्याची यामुळे चांगली संधी निर्माण होईल. फेडरेशन या गोष्टींना पोषक प्रचार करील.

चीनबद्दलच्या धोरणामुळे इतर दोस्त राष्ट्रे आमची शत्रू बनली आहेत. यूनोमध्ये कायमच्या सभासदत्वासाठी भारताला अजून लढावे लागत आहे याचे हे एक कारण आहे. ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. चायना आपल्या हक्कांसाठी भांडण्यास समर्थ असतांना ही जबाबदारी भारताने फुकटची जोखीम शीरावर कां घ्यावी ? चायनाच्या प्रश्नावरील भारताच्या कटाक्षामुळे अमेरिकेकडून आर्थिक व तांत्रिक मदत मिळणे दुरापास्त झाले आहे.

आम्ही वसाहतीचें स्वराज्य नाकरले. आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र झालो. ब्रिटिश कॉमनवेल्थचे सभासद रहाण्याचें आम्ही मान्य केले आणि इतके असूनही आमचे इतर राष्ट्रांशी हितसंबंध चांगले नाहीत. भांडवलशाही व लोकशाहीतील भेदाचे पडसाद आमच्या परराष्ट्रीय धोरणांत उमटले नाहीत. भांडवलशाहीबद्दल तिरस्कार एक वेळ मान्य. पण लोकसभेतील लोकशाहीची गल्लत करून तिची जागा हुकूमशाही न घेईल याची आम्ही काळजी घेतली पाहिजे. भारताचे पहिले कर्तव्य म्हणजे स्वतःच्या उत्कर्ष होय. कम्युनिस्ट चायनाला युनोमध्ये प्रवेश मिळण्याची भारताने धडपड

करण्यापूर्वी स्वतःचे स्थान, युनोचा कायमचा सभासद म्हणून निश्चित करण्याच्या प्रयत्नास लागणे अगत्याचे आहे. **मॉओचा** पक्ष घेऊन **चँग कै शेकला** डावलण्याचा नाद भारताने सोडावा. जगाला वाचविण्याच्य अभासाचे हे लहरी परराष्ट्रीय धोरण भारताचा नाश करील. लवकरच या आत्मघातकी परराष्ट्रीय धोरणात फेरबदल करणे भारताच्या हिताचेच ठरेल. पौर्वात्य देशाच्या हितासाठी झगडण्याचे नेतृत्व स्वीकारण्यापूर्वी भारताने आपले हात मजबूत करण्यासाठी कंबर कसून धडपडले पाहिजे आणि मिळेल तितकी मदत पदरात पाडून घेतली तरच भारताचे वजन वाढेल. दलित फेडरेशन अशा परराष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार करील."

१) लष्करावरील खर्चात कपात करणे. २) मिठावर कर पुनः लादणे. ३) दारुबंदीचे नियम सैल करून अबकारी उत्पन्न वाढविणे आणि ४) विमा कंपन्यांचे राष्ट्रीयकरण करणे या मार्गांचा अवलंब करून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे हेहि फेडरेशनच्या कार्यक्रमांत स्पष्ट केलेले होते. दारुबंदीमुळे प्रत्येक प्रांतांत अबकारी उत्पनात दरवर्षी अनेक कोटी रुपयांची तूट येत असे. ते आकडे देऊन, कार्यक्रमांत स्पष्ट केलेले होते.

भगवान बुद्ध यांचे चरित्र आणि धर्मपरिवर्तनाचे विशाल कार्य यासंबंधीची बाबासाहेबांनी साधनसामुग्री १९४० पासून जमा करून ठेवलेली होती. ती व्यवस्थित मांडण्यासाठी त्यांनी १९५० पर्यंत परिश्रम केले. आणि प्रत्यक्ष ग्रंथ लिहिण्यास २४ ऑक्टोबर १९५१ ला सकाळी ७ वाजता सुरुवात केली. लिहिलेला मजकूर टाईप करण्यासाठी नानकचंद यांना दररोज देऊ लागले. मी हा ग्रंथ लिहीत आहे याबद्दलची वाच्यता कोणाकडेही करावयाची नाही, अशी त्यांनी नानकचंदाला सूचना दिली. प्रत्येक प्रकरणाच्या दोन प्रती टाईप केल्यानंतर **बाबासाहेब** पुनः त्यात फेरफार करीत असत आणि फेरफार केलेले कागद पुनः नानकचंद टाईप करीत असत. या ग्रंथाचे प्रथमतः "बुद्ध अँड हिज गॉस्पेल" असे नांव **बाबासाहेबांनी** दिलेले होते. ते पुढील काळात "बुद्ध अँड हिज धम्म" असे ठेवले. या ग्रंथाची प्रकरणे वेळोवेळी फेरफार केल्यामुळे नानकचंदांना ती पुनः टाईप करावी लागली.

* *

## खंड १० वा

### प्रकरण ८ वे

# निवडणुकीचे सूतोवाच (पुढे चालू)

या निवडणुकीच्या कार्यक्रमाचे, सूत-उवाच करण्यासाठी साहेबांनी प्रथम उत्तर हिंदुस्थानात दौरा काढला. ७-११-५१ ला लखनौ येथे जाहीर सभेत भाषण करून त्यांनी निवडणूकीच्या प्रचाराचा नारळ फोडला. ते भाषण विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांपुढे होते. मागासलेला वर्ग आणि विशेषतः अस्पृश्य वर्ग यांच्याबद्दल देशात इतकी बेफिकिरी माजलेली आहे की, या वर्गांना समानतेचा दर्जा मिळणे अशक्य आहे असे वाटू लागलेले आहे. या वर्गात प्रस्तुतच्या सरकारबद्दल अशी निराशा वाटू लागल्यामुळे त्यांना कम्युनिस्टांची राजवट येवो, पण ही कॉंग्रेसची राजवट नको, असे वाटू लागणे साहजिक आहे. आणि त्याप्रमाणे झाले तर या देशाचे भवितव्य भयंकर होणार आहे हे खास. याची सर्व जबाबदारी सत्तारुढ पक्षावर आहे.

कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांत आणि त्यांच्या राजवटीत भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे लोकांच्या दृष्टोत्पतीस आलेली होती त्याविरुद्ध तीव्र नापसंती, उद्वेग आणि जळफळाट अनेक पुढाऱ्यांनी आणि वर्तमानपत्रांनी केलेला होता. तथापि या भ्रष्टाचारांत खंड पडला नाही. अशा भ्रष्टाचारांना आळा घालून राज्यकारभारात शुद्धता निर्माण करायची अशी फेडरेशनच्या जाहिरनाम्यात मागणी केलेली होती. हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर एक आठवड्यानंतर कॉंग्रेस पक्षियांच्या नैतिक अधःपतनाची दोन उदाहरणे उघडकीस आली ती अशी :-

'पुण्याच्या माजी नगरध्यक्षाची झडती, अटक! बेकायदा धान्याचा प्रचंड साठा'

पुणे, ता. १३ [हिं. स] - पुण्यांतील एक बडे नागरिक व नगरपालिकेचे माजी अध्यक्ष शेठ मुरलीधर लोहीया यांच्या घरावर काल दुपारी सप्लाय कंट्रोल पोलिसानी छापा घालून बेकायदेशीर धान्यसाठा व साठ लोकांना जेवणासाठी पुरेल

एवढे तयार अन्न जप्त केले. या प्रकारामुळे पुण्यात विशेषतः व्यापारी वर्गात फार खळबळ उडाली आहे. मुलाच्या साखरपुड्यासाठी जेवणावळ होणार असल्याची कुणकुण लागल्यामुळे पोलीसांनी छापा घातला. जेवणावळीचा पंचनामा झाल्यावर पोलीसांनी लोहिया शेठजींच्या घराची कसून झडती घेतली.

## काय काय सापडले ?

झडतीत तिसऱ्या मजल्यावर पिपांत व पोत्यात ९० शेर उत्तम प्रतीचा गहू, ७० शेर आंबेमोहर तांदूळ व ६० शेर बाजरी मिळाली. छाप्याचे वेळी फोर्थ सिटी मेजिस्ट्रेट श्री. गावडे हजर होते. रात्री १ वाजेपर्यंत झडतीचे काम चालू होते. १ वाजता शेठजींना अटक करून एक लाखाच्या जामिनावर सोडण्यात आले.

एवढा मोठा जामिन अजूनपर्यंत पुण्यात घेण्यात आला नव्हता. मुरलीधर शेट लोहीया कॉंग्रेसचे कार्यकर्ते असून उमेदवारीसाठी या वेळी त्यांनी अर्जही केला होता. छाप्याचे वेळी त्यांच्या बंगल्यावर नेहमीची " कॉंग्रेस कमिटीमार्फत गाऱ्हाणी सोडवून घेण्यासाठी येथे यावीत. ती सोडविण्याची व्यवस्था केली जाईल " अशी पाटी होती. या प्रकरणाची कसून चौकशी चालू आहे. [ नवशक्ती १४–१०–५१ ]

" नेहरूंचा आदेश शुक्लांनी धाब्यावर
बसविला ? कॉंग्रेस प्रचारार्थ सरकारी
साधनांचा वापर."

नागपूर ता. १६ : पंतप्रधान रविशंकर शुक्ला यांनी छत्तीसगड येथे निवडणूक मोहिमेला प्रारंभ केला असून, ते त्याकरिता सरकारी गाडीचा आणि विमानांचा उपयोग करीत आहेत असे समजते. त्यांच्या समवेत प्रसिद्धी खात्याचे अधिकारीही असतात. श्री. शुक्ला हे सराईपल्ली मतदार संघातील असून तेथे त्यांनी केलेले भाषण प्रसिद्धी खात्यामार्फत प्रकट करण्यात आलेले आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी आपले सरकारी दौरे निवडणूक प्रचार मोहिमेपासून अलिप्त ठेवावे, असा प्रत्यक्ष सरकारचा आदेश असतांनाही महामंत्र्यांनी असे आचरण करावे, याकडे कॉंग्रेसच्या अध्यक्षांचे लक्ष वेधले जात आहे." [नवशक्ति १७–१०–६१]

फेडरेशनच्या जाहीरनाम्यांत काश्मिर प्रश्न फाळणीने सोडवावा अशी मागणी केली होती. काश्मिरच्या फाळणीच्या विरुद्ध मते लगेच प्रदर्शित होऊ लागली. त्यापैकी काही मी येथे देतो.

" काश्मिरची फाळणी म्हणजे भारतात अनेक
" स्थाने " निर्माण करण्याचा डाव
आंबेडकरांच्या सूचनेने मसुदी गडबडले "

जम्मू ता. १३ काश्मीरची जातीय तत्त्वावर फाळणी करण्याचा डाव बाहेरच्या

हितसंबंधी लोकांकडून टाकण्यांत येत आहे असा इशारा काश्मिर नॅशनल कॉन्फरन्सचे सरचिटणीस मौलाना महमद सैद मसुदी यांनी काल दिला.

मौलाना मसुदी यांनी डॉ. आंबेडकरांच्या दलित फेडरेशनतर्फे काढलेल्या जाहीर नाम्यांतील काश्मीरच्या फाळणीचा उल्लेख केला. फाळणीच्या सूचनेवर नॅशनल कॉन्फरन्सची ही पहिलीच प्रतिक्रिया आहे.

## चंचूप्रवेश

मौलाना म्हणाले की, हा चंचूप्रवेश आहे. काश्मीरच नव्हे तर भारताची फाळणी करून दलित जातीसाठी, शिखांसाठी वेगवेगळी स्थाने निर्माण करण्याचा हा डाव आहे.

त्यामुळे निरुपद्रवी वाटणारी ही योजना भारताला व काश्मिरला भयंकर ठरणारी आहे.

## बाहेरचे उत्तेजन

काश्मिरमधील फुटपाड्यांना उत्तेजन देण्यासाठी व भारताची निधर्मिकता नष्ट करण्यासाठी ही सूचना आलेली असून त्याची स्फूर्ती बाहेरची आहे. प्रजापरिषदेच्या लोकांनी जातीय प्रचाराला बळी पडू नये अशीही विनंती त्यांनी केली.
[नवशक्ती १४-१०-५१]

बंगाल शेड्यूल कॉस्टस फेडरेशनचे पूर्वीचे अध्यक्ष आणि पाकिस्तानचे पूर्वीचे मंत्री श्री. जोतिंद्रनाथ मंडल यांनी काश्मिरच्या फाळणीला विरोध केला. त्याचा वृत्तांत असा :—

X — 8

## "DIVISION OF KASHMIR — DR. AMBEDKAR'S PLAN CRITICISED

Calcutta, October 15 : Dr. B. R. Ambedkar's suggestion for the division of Kashmir communitywise was fraught with mischievous potentialities and was bound to repeat the scenes of horror and devastation which Hindus, Sikhs and Muslims experienced after the partition of India, observed Mr. J. N. Mandal, a former member of the Pakistani Central Cabinet, here to-day.

In a rejoinder to Dr. Ambedkar's recent statement after his resignation from the Indian Cabinet, he said : "I reject this suggestion summarily, and I believe that the vast

majority of the Scheduled Castes shares my view." Dr. Ambedkar's cherished goal of life to uplift the poor and the oppresed can be better achieved by the full application of his intellect and integrity, by the establishment of a system in the country wherein the distinction between man and man, either on the basis of religion or caste, will disappear and economic and social justice will be ensured to all.

Mr. Mandal, who is also a former President of the Bengal branch of the All India Scheduled Castes' Federation, expressed his shock, and distress at Dr. Ambedkar's resignation from the Cabinet on the eve of the General Election.

His resignation Mr. Mandal added, was deplorable not only from the national standpoint, but also from the Scheduled Castes' point of view. The reasons he stated for his step were shocking to the entire Scheduled Caste community whose interests Dr. Ambedkar represented in the Government of India.

Mr. Mandal did not think that the Law Minister's portfolio was an "empty soap box", as suggested by Dr. Ambedkar, and said that eminent English and Indian jurists, namely, Lord Macaulay, Lord Sinha and Mr. Tej Bahadur Sapru had held the same portfolio."

(*The Times of India*, Tuesday, 16-10-51)

अल्पसंख्यांक जातींना काश्मीरच्या फाळणीने फार हाल सोसावे लागतील ही जी भूमिका बॅ. मंडल यांनी स्विकारली. ती ढोंगी होती, कारण जेव्हा पाकिस्तानमध्ये अल्पसंख्यांकावर जुल्म होत असत तेव्हा तेव्हा जे निषेधपर उद्‌गार भारतातून उठत तेव्हा तेव्हा बॅ. मंडल म्हणत असत की, हे भारतीयांचे उद्‌गार खोटे आहेत. पाकिस्तानातील सर्व जमाती गुण्यागोविंदाने रहातात. अशा आशयाचे पत्र श्री. मोरे यांनी टाईम्समध्ये प्रसिद्ध केले ते असे :–

"MR. MANDAL

Sir, — That Mr. Mandal who was himself a party to the tortures inflicted by Pakistan on the minorities should suddenly feel anxious about the minorities in Kashmir is mere hypocrisy.

Whenever India accused Pakistan of atrocities Mr. Mandal was always there to contradict India's charges and declare that the minorities in Pakistan were living in perfect peace. Having been driven out of the Pakistan Cabinet he is now converting himself into a patriot and expects the Scheduled Castes to share his views.

Dr. Ambedkar's views on Kashmir remind us of his forecast about Pakistan, which has proved true. The poor manner in which the Kashmir case has been placed before the United Nations by our delegates makes one feel that things are heading for the partitioning of that unhappy State.

Bombay, October 18. P. S. MORE"

(*The Times of India*, 20-10-51)

"DR. AMBEDKAR

Sir, — In criticising Dr. Ambedkar's views on the Kashmir issue as mischievous, Mr. Mandal has conveniently avoided the historical fact. Mr. Mandal forgets that exactly prior to independence persons talking of the partitioning of India were pronounced by critics as mischievous but they realised that partition was a fact when India and Pakistan were shaped as the final solution to India's deadlock.

The way in which the Kashmir issue is being handled by the United Nations may cause the partitioning of Kashmir. Should that occur, we will have only two alternatives — either to accept the United Nations decision or to leave the organisation. But we may not adopt the latter course, in which case India will have to accept the former.

What Dr. Ambedkar has done in the matter is that he has tackled the Kashmir problem in the light of the existing circumstances. Can this be called a mischievous tendency?

Bombay, October 20. K. R. NAIYA"

(*The Times of India*, 23-10-51)

१९५२ मध्ये होणाऱ्या निवडणूकीच्या प्रचारासाठी बाबासाहेबांनी पंजाब प्रांतात ऑक्टोबर १९५१ मध्ये दौरा काढला. तेथे त्यांनी अनेक ठिकाणी फेडरेशनच्या

उमेदवारांना निवडून आणा या मुद्यावर भर देऊन भाषणे केली. त्या भाषणांपैकी जुलंदर जिल्ह्यातील रामदासपूर येथे २७–१०–५१ रोजी, लुधियाना येथे २८–१०–५१ रोजी आणि पतियाळा येथे २९–१०–५१ रोजी केलेली भाषणे विशेष माहितीने भरलेली होती त्यांचा सारांश असा :–

आपल्या लोकांचे भले कसे करता येईल यासंबंधी मी १९२० पासून चळवळ सुरु केली. मी अमेरिकेत व इंग्लंडमध्ये मोठ्या पदव्या संपादन करुन मुंबईस आलो, तेव्हा एका अप्रसिद्ध चाळीत रहात होतो. मी अर्थशास्त्राचा प्राध्यापक, सरकारी कॉलेजात रहावे असा सरकारचा मानस होता. सरकारला मला शोधून काढण्यास फार त्रास झाला. कारण आमची चाळ त्याला लवकर सापडली नाही. मी ही सरकारने देऊ केलेली नोकरी स्वीकारली असती तर डायरेक्टर ऑफ एज्युकेशन या हुद्यावर गेलो असतो व मला तीन–चार हजार रुपये पगार मिळाला असता. पण मी सरकारी नोकरीत अडकलो असतो तर समाजसेवेची माझी महत्त्वाकांक्षा मला पुरी करता येणे शक्य नव्हते. म्हणून मी ती जागा स्वीकारली नाही. नंतर मी लंडनला (जुलै १९२०) गेलो व आणखी थोर पदव्या घेऊन आलो. (एप्रिल १९२३) तेव्हाही सरकारने मला डिस्ट्रिक्ट जज्जाची दरमहा दोन हजार रुपये पगारावर जागा देऊ केली होती. मी ती जागा स्विकारली असती तर हायकोर्टाचा जज्ज तुम्हाला करू असे सरकारने वचन दिले होते. पण ती जागा मी स्वीकारली नाही. दोनशे रुपये दरमहा मिळतील अशी लहानसहान कामे करुन मी चळवळ सुरु केली. (१९२४) हायकोर्टाचा जज्ज व्हावे की व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कॉन्सिलचा सभासद व्हावे, असा १९४२ साली माझ्यापुढे पेच उत्पन्न झाला. मी हायकोर्टाचा जज्ज झालो असतो तर मला दरमहा पाच हजार रुपये पगार मिळाला असता आणि एक हजारांचे पेन्शन मिळाले असते. जज्ज होण्याने मला चळवळीत भाग घेता आला नसता म्हणून मी व्हाईसरॉयच्य. कार्यकारी मंडळाचे सभासदत्व पत्करले. त्यानंतर मी कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळात गेलो (१९४७) तेव्हा काही लोकांनी माझ्याविरुद्ध ओरड केली. मी मंत्रीमंडळात गेलो म्हणजे मी कॉंग्रेसमध्ये गेलो असा या लोकांनी अर्थ केला. मी कोणत्याच राजकीय पक्षात गेलो नाही. मंत्रिमंडळात गेलो ते केवळ आपल्या लोकांचे भले करता यावे, या उद्देशाने ! मी या संबंधी लखनौ येथे पूर्वी खुलासा केलेला होता. दगड आणि माती एकत्र मिसळली व ते मिश्रण पाण्यात टाकले तर माती विरघळून जाईल. दगड विरघळणार नाही. मी दगड आहे. मी विरघळलो नाही. कॉंग्रेसचे ३० अस्पृश्य पार्लमेंटमध्ये आहेत. त्यांनी आपल्या लोकांच्या बाबतीत काही केलेले आहे का ? असे मी त्यांना विचारले तेव्हा त्यांना उत्तर देता आलेले नाही. त्यांनी आपल्या लोकांच्या बाबतीत पार्लमेंटमध्ये एकही प्रश्न विचारलेला नाही. कारण त्यांच्या मुसक्या कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी बांधलेल्या आहेत. मी चार वर्षे व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात आणि चार वर्षे कॉंग्रेसच्या मंत्रीमंडळात काढली. आपल्या लोकांच्या

हितासाठी कोणती कामे मी या आठ वर्षांत केली, हे तुम्हांला माहीत आहे काँग्रेस अस्पृश्यांच्या हक्कासंबंधी फारसे जागृत नाही व जास्त कार्य करण्यास तयार नाही. हे पाहून मी मंत्रिमंडळातून बाहेर पडलो.

ब्रिटिश लोक हिंदुस्थानात व्यापार करण्यासाठी आले, पण त्यांनी येथे साम्राज्य स्थापन केले. हिंदुस्थानांतील राजे, महाराजे, बादशाह यांच्या अफाट सैन्याचा पराभव करण्यास इंग्रजांनी जे सैन्य इंग्लंडमधून आणले ते अगदी अपुरे होते. त्यांनी या देशांतील अस्पृश्यांच्या पलटणी तयार केल्या व त्या पलटणीच्या बळावर हे साम्राज्य स्थापन केले. पण शेवटी इंग्रजांनी हिंदू मुसलमान यांनाच राज्यकारभारात मोठा हिस्सा दिला व अस्पृश्यांना दूर ठेवले. हा इंग्रजांचा कृतघ्नपणा होय. आम्ही जर इंग्रजी राज्यात सत्ताधारी झालो असतो तर अस्पृश्य म्हणून राहिलो नसतो. आम्ही इतरांवर सत्ता गाजविली असती. आम्ही श्रीमंत झालो असतो. सत्ता आणि श्रीमंती या दोन अशा शक्ती आहेत की, त्यापुढे सर्वांना मान वाकवावी लागते. हे लोक पोलीस खाते व न्याय खाते यांना आपल्या मुठीत ठेऊ शकतात. आज काँग्रेसची कारकीर्द सुरु आहे व ती खूप टिकावी म्हणून सत्ता व श्रीमंती ज्यांच्या हातात आहे, अशानाच काँग्रेस निवडणुकीत उभे करते व ते या दोन शक्तीच्या जोरावर निवडून येतात. म्हणजेच मी व माझ्यासारखे समाजहितदक्ष लोक यांना काँग्रेसमध्ये जागा नाही. जे सत्ताधारी होतात ते नंतर जनतेला लुटून गबर होतात. याची उदाहरणे अनेक प्रांतात आहेत. मद्रासचे मुख्यमंत्री श्री. टी. प्रकाशम् यांच्यावर, लांच खाऊन लाखो रुपये कमावल्याचे आरोप काँग्रेसवाल्यानीच केले. श्री. टी. प्रकाशमला शेवटी काढून टाकण्यात आले. पंजाबमध्ये श्री. भार्गव व साचार हे मुख्यमंत्री होते. दोघानी परस्परावर लाचलुचपतीचे आरोप केले. ते चौकशी अंती खरे ठरले. उत्तरप्रदेश व इतर प्रांत यांच्यातही हेच प्रकार आहेत. जे जे लोक काँग्रेसच्या मंत्र्यावर काळाबाजार करणे, लांच खाणे वगैरे आरोप करतात त्या लोकांना कोणत्यातरी खोट्या प्रकरणात गुंतवून तुरुंगात डांबले जाते पण मध्यवर्ती सरकार गुन्हेगार मंत्र्यांना कोर्टात खेचीत नाही व तुरुंगात टाकीत नाही. कारण या सरकारवर सत्ताधारी आणि श्रीमंत लोकांचा वरचष्मा आहे. इंग्लंडमध्ये एका मिनिस्टरने पोषाखासाठी कापड एका व्यापारी मित्राकडून घेतले व त्याचा स्फोट एका सभासदाने पार्लमेंटमध्ये केला. मुख्य प्रधान ॲटली यानी ताबडतोब चौकशी मंडळ नेमले व आरोप सिद्ध होताच त्यांनी सदर मंत्र्याला बडतर्फ केले. आपले मुख्यप्रधान असे का करीत नाहीत? कारण, ते सत्ताधारी व श्रीमंत यांच्या वरचष्म्या खाली आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अस्पृश्यांची काय परिस्थिती होणार? या प्रश्न-बद्दल मी, गांधी व सरकार यांच्या बरोबर १९३० पासुन झगडत आलो आहे. स्वतंत्र मतदार संघामुळे अस्पृश्यांचा राजकीय विकास होईल, म्हणून ती मागणी मी वर्तुळ

परिषदेत केली. व ब्रिटीश सरकारने तिला मंजुरी दिली. पण गांधीजींनी १९३२ मध्ये प्राणांतिक उपोषण करून एकत्र मतदार संघ व राखीव जागा ही देण्यांत आली. तेव्हा जो पुणे करार झाला त्या कराराप्रमाणे काँग्रेसकडून वागणे झाले नाही. कारण गांधीजींनी वचन दिले होते की, काँग्रेस तुमच्या उमेदवाराविरुद्ध निवडणुक लढविणार नाही. पण त्या वचनाला काडीचीही किंमत राहिली नाही. काँग्रेसने अस्पृश्यांचे खरे प्रतिनिधी पाडून स्वतःचे कळसूत्री उमेदवार पैशाच्या व सत्तेच्या जोरावर निवडून आणले आणि अस्पृश्यांच्या राजकीय विकासावर प्रहार केला. गांधी व काँग्रेस यांना अस्पृश्य लोक सत्ताधारी व श्रीमंत व्हावेत, असे वाटत नाही. हेच या सर्व झगड्याचे मूळ आहे एवढेच नव्हे तर अस्श्यांच्या प्राणसंरक्षणाबद्दलही काँग्रेसचे पुढारी बेफिकीर आहेत. कांही हरिजन एम पी., नेहरूंना भेटले व त्यांनी विनंती केली की, आमच्या लोकांसाठी काही तरी भरीव कार्य करण्याची योजना हाती घ्या. नेहरू भडकून म्हणाले, आम्ही सर्व काही केलेले आहे. आता जास्त काय करावयाचे आहे? बिचारे हरिजन एम्. पी. सर्द झाले. पाकिस्तान निर्माण होताना तेथील मुसलमान अस्पृश्यांना सांगत होते की, तुम्ही येथेच रहा. तुमचे भले होईल. पण त्या अस्पृश्यांना भारतात यावयाचे होते. मी नेहरूंना सुचविले की, तुम्ही या अस्पृश्यांना सुरक्षितपणे भारतात आणण्याची तजवीज करा. पण ते त्या अस्पृश्यांना सांगत होते की, तुम्ही तेथेच रहा. तुमचे भले होईल. पण नेहरूंनी काही खास केले नाही, मी पाकिस्तानात दोन प्रतिनिधी पाठवून अस्पृश्यांच्या स्थलांतराला मदत करण्याचे कार्य केले. यासाठी नंतर महार बटालियन पाठविण्यात आली. गांधी, नेहरू आणि काँग्रेस यांना अस्पृश्यांची सुधारणा व्हावी, अस्पृश्यांच्या हातात राजकीय सत्ता यावी, अस्पृश्यांनी शिकून खूप विद्वान व्हावे, अस्पृश्यांनी व्यापारधंदे करून खूप पैसे मिळवावेत आणि खूप इस्टेट करावी, असे वाटत नाही. मग ते अस्पृश्यांची स्थिती सुधारण्यासाठी आम्ही जे जे करतो व बोलतो त्याला त्याला विरोध करतात, त्याचे मर्म हेच आहे. अस्पृश्यांना दहा वर्षे राखीव जागा ठेवलेल्या आहेत. त्यांची मुदत आणखी वाढवा असे मी कमिटीत सुचविले तेव्हा सरदार पटेल यांनी विरोध केला. बाकीच्या सभासदांनी त्याला पाठिंबा दिला, ही परिस्थिती पाहून माझे मत असे झाले आहे की, काँग्रेस पक्ष, हिंदु लोक अगर कोणतेही राजकीय पक्ष व लोक यांच्या आश्रयावर आपली प्रगती होईल ही इच्छा अस्पृश्यांनी मनांत बाळगणे म्हणजे स्वतःच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय गुलामगिरीची वेसण त्या त्या पक्षांच्या लोकांच्या हातात देण्यासारखे आहे. अस्पृश्यांनी स्वतःच्या संघटनेच्या शक्तीवर या पक्षांबरोबर व लोकांबरोबर झगडा करण्यास शिकले पाहिजे, आणि हा आपला झगडा आणखी पुष्कळ वर्षे चालणार आहे. माझ्या गेल्या ३० वर्षांच्या प्रयत्नामुळे आपणांस थोडे राजकीय हक्क मिळाले आहेत. आणखी जास्त राजकीय हक्क आपणाला मिळवावयाचे आहेत.

वयाची पंचावन्न वर्षे संपली की राजकारणी लोकांनी राजकीय क्षेत्रांतून निवृत्त व्हावे. सरकारी नोकरीतही ही परिस्थिती आहे. परंतु सध्याचे राजकारणी लोक ५५ वर्षे संपली तरी राजकीय प्रांतात रहातात व नवे बुढ्ढे लोक येतात. त्यांच्या तोंडात समाजाच्या कल्याणांच्या गोष्टी असतात व त्यांच्या मायावी भाषणाला मतदार बळी पडतात. परंतु हे लोक स्वतःचे खिसे भरतात आणि जनताहिकडे बिलकूल पहात नाहीत. ही परिस्थिती तुम्हांला माहीत आहे. मी गेली ३० वर्षे राजकीय क्षेत्रात आहे. मी ५५ वर्षांची सीमा ओलांडलेली आहे. तरी मी या क्षेत्रात केवळ अस्पृश्य लोकांचे जेवढे मला भले करता येईल तेवढे करावे म्हणून राहिलो आहे! मला स्वार्थ साधावयाचा नाही. मी ३० वर्षात अस्पृश्यांना उच्च स्थानावर नेऊन ठेवलेले आहे. त्यांना सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय हक्क मिळवून दिलेले आहेत. गांधी, काँग्रेस, हिंदुसमाज व सरकार यांच्याशी सतत झगडत राहून मी आपल्या समाजासाठी जे हिताचे कार्य केलेले आहे त्यापेक्षा आणखी जास्त कार्य करावे याच हेतूने मी राजकीय क्षेत्रात अजून राहिलो आहे आपला समाज सत्ताधारी व श्रीमंत झाला पाहिजे, तरच इतर समाजांच्या अन्यायी वर्तनाला तोंड देता येईल. आपल्या हातात सत्ता व संपत्ती आली तर आपल्याला छळणारे आजचे लोक आपल्यापुढे नाक घासत राहतील. म्हणून तुम्हाला माझी विनंती आहे की, तुम्ही फेडरेशनच्या झेंड्याखाली या, संघटीत व्हा, आणि फेडरेशनचे उमेदवार कायदेमंडळात निवडून द्या. ते निवडलेले लोक तुमच्यासाठी कायदेमंडळांत झगडत रहातील. काँग्रेसचे हरिजन उमेदवार तुमच्या हिताची राखरांगोळी करतील. कारण ते काँग्रेसच्या हातची बाहुली आहेत. आणि काँग्रेस ही हिंदूंची संस्था आहे व हिंदु आपल्याला त्यांच्या गुलामगिरीतच ठेवण्याचा प्रयत्न या हरिजन उमेदवारांतर्फे करीत रहातील तर तुम्ही सावध व्हा व फेडरेशन उमेदवार निवडून आणा. तुम्ही तुमच्या पायावर उभे रहा. कोणावर विसंबून राहू नका. खुद्द माझ्यासाठी तुम्ही कोणतेही कार्य अडून पडू देऊ नका. तुम्ही स्वतःचे हित करा व आपला समाज वर आणा.

ही तीन भाषणे इंग्रजीतून आली भरपूर माहितीच्या दृष्टीने ती उपयुक्त होती म्हणून ती मी येथे देत आहे. :–

RAMDASPUR, JULLUNDAR, 17-10-1951

"Dear brothers and sisters! I had an idea to tour the Punjab before but I could not come here and I have come to know that many poople collected in Jullundur and were disappointed to find that I had not come here. I hope you will excuse me for this inconvenience caused to you all. My inability to come here although caused much inconvenience to so many people but I was helpless and it was all

due to the following reasons. Firstly, during my four years in the Congress Government, I had been overburdened with official work and could not find time to come here. Secondly, I was also not keeping good health during all these years and still I am not quite well. Thirdly, the Acchuts of the whole of India with that I should tour the whole of India and speak to them. You can well understand that our country is such a big continent that it is not possible for a single man to tour the whole country even in two years, So I could not fulfil people's desire and could not come here when they wanted me. Therefore I want that all our people should stand on their own legs and be united so that they may be able to weather away the storm without my assistance and not to press upon me too much.

A man should leave politics after the age of 52 years, because even Government gives notice to a Government servant after the age of 55 that he is unfit for service now and he should retire. But the politicians of the present age start their politics after the age of 55 years so that they may be able to earn their livelihood, does not matter whether they are able to service the country or not. They have only one point in mind and that is to get something out of it for their own self. I have no selfish motives. I am not continuing in the politics simply for my own good but I am doing so far the sake of my community. I jumped into politics in 1920 and since then I have taken part in politics and upto this time. I have spent thirty long years of my life in serving my community. Although I want to leave politics but I have been compelled to remain in politics thinking the necessity of organising my community. Out of these thirty years, eight years I was Member of the Government. I do not know if there is any politician who has been in politics continuously for such long time. I remained in the Government for eight years and had I wished I could have remained for ever there. I am not proud of it but I know that with my qualifications at my back, nobody had power to expell me if I simply wanted to remain there. But the cause of

my community necessitaned my resignation from the membership of the Congress Government. I may assure you that I have always the well-being of my community in mind wherever I go.

When I came from England after getting my degree in Doctor of Philosophy, there was nobody in India with such qualifications. So when I reached Bombay and settled in the Mohalla from where I had gone, the Bombay Government after a great difficulty found my place, as nobody knew where I was residing, it was such an unpopular place, and approached me to accept the post of Professor of Political Economy. I refused the offer. If I had accepted that job, I would have been at least the Director of Public Instructions. I would have got three or four thousands of rupees per month. I refused the post because I had a great feeling for the service of my community which I could not have done remaining in that service. A Government servant, you know, cannot serve his community as he has to go according to the wishes of the Government and follow the policy of the Government.

After earning some money for two-three years, I again went to England for further studies and came back as a Barister. When I returned to Bombay, I was again asked by Bombay Government to accept the post of a District Judge. I was offered Rs. 2,000/- per month and promised that I will be a High Court Judge after some time. But I did not accept that also. My income although, from the other source at that time was only Rs. 200/-.

In 1942, I had to face two questions. One was to serve as a High Court Judge and the other was to join the Government of India as a member of the Viceroy's Executive Council. Had I joined the High Court, I would have received Rs. 5,000/- per mensem as pay and Rs. 1,000/- as pention after retirement but I did not do that. I entered politics. I got birth in Achhut community and will die for my community and the cause of my community is supreme to me. I did not join any party or body. I remained independent

while in the Congress Government, I remained true to my people. Many people thought that I had joined the Congress Party as I had accepted the Cabinet Ministership of the Congress Government. The critics pointed out that Dr. Ambedkar had joined Congress and why the Scheduled Castes people should continue to remain in the Scheduled Castes Federation. I explained about it at Lucknow that earth and stone are two different things and they can never mix together. Stone will remain the stone and the earth will remain the earth. I am like a rock (stone) which does not melt but turns the course of rivers. Wherever I may be, in whatever company I may find myself, I would never lose my separate identity. If anybody asks my co-operation I would gladly give it for a worthy cause. I co-operate with the Congress Government for four years with all my might, and with the sincerity in the service of my mother-land. But during all these years I did not allow myself, to merge into the Congress organisation. I would gladly help and co-operate with those who are sweet-tongued but whose intention and action go against the interest of our people.

Now coming to the ensuing general elections I appeal to the Scheduled Castes people to treat the elections as a strugle for life and death and work in that spirit during the coming months. We must use all our strength to get our candidates elected. Man derives strength from the number of people behind him and from the wealth he possess. We are a minority; we are not wealthy. Our population in an average village does not exceed 5 per cent of the total population. We are helpless against the combined wealth and strength of the 95 per cent of the population. The police who invariably belong to the high-caste Hindus never even pay heed to our genuine complaints; on the contrary, we are persecuted for lodging complaints. Owing to poverty we are unable to have the authorities on our side.

*But we can have one power and that is the political power. This power we must win. Armed with this power, we can protest the interest of our people.*

Dr. Ambedkar who was addressing students of Lucknow University, said: "If we are to avoid any such revolution, my first submission to politician is that they should recognise this problem urgently." Dr. Ambedkar deplored that though the Constitution had introduced the system of adult franchise recognising the principles of one man one law, in the economic and social life of India that principle had not been adopted. Dr. Ambedkar referred to the Kashmir pooblem and said that Kashmir was not a unitary State. It was a composite State, consisting of Hindus, Buddhists and Muslims. Jammu and Ladak were non-Muslim areas whereas the Kashmir Valley was Muslim. He said : "We do not know how the Kashmiries will vote but Indian is committed to the United Nations for an overall plebiscites. If the plebiscite goes in favour of Pakistan what will happen to the 20 per cent non-Muslim population? That is a very big question. If we cannot save the whole of Kashmiri at least let us save our Kith and Kin. It is a plain analysis of pact which cannot be denied."

### GLOOMY FUTURE

Replying to a question by a student, Dr. Ambedkar said he was very pessimistic about the future of India, because foreign countries did not consider India an important country and internally the administration had completely deteriorated in comparison with the British regime. Corruption and nepotism were rampant and the Congress High Command did not institute any inquiry against certain Ministers by Congressmen themselves. On the other hand they were protected by them.

Dr. Ambedkar said that during the British regime famines occurred at an interval of 15 to 20 years but these days each year brought a famine. "What has happened to the economy of this country? Are we going to die like flies?", he asked".

.. (The Times of India, 10-11-1951).

# खंड १० वा

## प्रकरण ९ वे

# निवडणूकीचा प्रचार

उत्तर हिंदुस्थानातील निवडणूक प्रचार करुन दिल्लीहून **बाबासाहेब** मुंबईस आले. बोरीबंदर स्टेशनवर, पंजाब मेलने रविवारी दि. १८–११–५१ रोजी ते उतरले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी सुमारे सहा हजार स्त्री–पुरुष स्टेशनात **"आंबेडकर झिंदाबाद"** अशा गर्जना करीत उभे राहिले होते, हा स्वागत समारंभ फेडरेशनच्या वॉर्ड कमिटीचा आणि सोशालिस्ट पक्ष यांच्या तर्फे संयुक्तपणे आखण्यात आला होता. **बाबासाहेब** निवडणूकीच्या प्रचारासाठीच मुंबईस आलेले होते. सोशालिस्ट पक्षाचे मुख्य चिटणीस **श्री. अशोक मेहता** हे बाबासाहेबांच्या मेलच्या डब्यात पंधरा मिनिटे बोलत बसले. ते दोघेही खाली उतरले तेव्हा सोशालिस्ट पक्ष व फेडरेशन यांच्या तर्फे त्यांना हारतुरे अर्पण करण्यात आले. फेडरेशनच्या वॉर्ड कमिट्यातर्फे स्वागतासाठी पुष्कळ जनसमुदाय उपस्थित होता. पण प्लॅटफॉर्मवर जागा नसल्यामुळे रेल्वे अधिकाऱ्यांनी स्वागतासाठी प्लॅटफॉर्म नं. ८ व ९ च्या दरम्यानच्या मोकळ्या जागेत दोन खुर्च्या टाकून सोय केली. खुर्च्यांवर **बाबासाहेब** व **माईसाहेब** बसले. इतक्यात गर्दीतून ८५ वर्षाचे वृद्ध **श्री. सिताराम केशव बोले** हे आले. त्यांना बसायला खुर्ची नव्हती. तेव्हां **बाबासाहेब** विनोदाने म्हणाले, "राव बहादूर ! तिसरी खुर्ची नाही तुमच्यासाठी ! तेव्हा तुम्ही माझ्या मांडीवर बसा कसे !" म्हणून साहेबांनी आपल्या उजव्या मांडीवर हात ठेवला, आणि खरोखरच रावबहादूर साहेबांच्या मांडीवर जाऊन बसले. थोडीशी गंभीर पण वरील चमत्कारीक घटना पाहून सर्वांनाच हसू आले. बाबासाहेब मनापासून हसत असतानाचा फोटो टाईम्सच्या फोटोग्राफरने घेतला. तो टाईम्स पत्राच्या १९-११-५१ (सोमवार)च्या अंकात पहिल्या पानावर फोटोच्या खाली

Dr. B. R. Ambedkar, who arrived in Bombay on Sunday, is snapped in a jovial mood with Mr. S. K. Bole during the reception at Victoria Terminus. The former Law Minister, amidst laughter, invited his old associate to sit on

his lap when it was found that there were not enough chairs."

(The Times of India, dated 19-11-1951).

हा मथळा देऊन प्रसिद्ध केला.

या मजकूराच्या खाली समारंभाचा वृत्तांत दिला होता.

ओपन कॉलरचा शर्ट व कोट, डोकीवर हॅट, डाव्या हातात काठी, उजव्य हाताने, श्री. बोले यांना मांडीवरच्या स्थितीत कमरेला (विळखा घालून) धरलेले आणि मनमोकळे हास्य, असा बाबासाहेबांचा फोटो होता.

राजिनाम्याच्या प्रकरणाचे वादळ दिल्लीत व देशातील अनेक वर्तमान पत्रांत चालू असता बाबासाहेब पुढील (१९५२ च्या) निवडणूका लढविण्याची तयारी करण्यासाठी मुंबईस आले. मुंबईत आल्यावर निरनिराळ्या राजकीय पक्षांचे पुढारी आणि प्रतिनिधी त्यांच्या भेटीस येऊ लागले. येणाऱ्यांचा हेतू हा की, बाबासाहेबांचा निवडणूकी-संबंधीचा कार्यक्रम कोणता आहे, हे अजमावणे, या प्रतिनिधीशी चर्चा केल्यानंतर बाबासाहेबांना कळून आले की, कांही पक्ष आपल्या पक्षाशी निवडणूक--करार करण्यास उत्सुक आहेत. त्यांना हेही कळून आले की, १९४६ च्या निवडणूकींत सर्व पक्षांनी मिळून शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे उमेदवार पाडण्यात यश मिळविले. त्यावेळी शे. का. फेडरेशनने फक्त स्वतःच्या बळावर निवडणूक लढवली होती. आणि त्यांत त्याना अपयश आले म्हणून यावेळी इतरांशी सहकार्य करणे जरूरीचे आहे, हे बाबासाहेबांना कळून चुकले. म्हणून त्यांनी सदर पक्षांच्या प्रतिनिधींना स्पष्टपणे सांगितले की सत्तारूढ पक्षाच्या धोरणावर आणि कृतीवर जो पक्ष प्रखरपणे हल्ला चढवून लोकमत आपल्या बाजूस वळवू शकेल, अशाच पक्षांशी फेडरेशन करार करील या संबंधी बऱ्याच वाटाघाटी झाल्या. त्यांना उद्देशून श्री. विचलकर यांनी टाईम्समध्ये एक पत्र प्रसिद्ध करून असा विचार प्रदर्शित केला की, फेडरेशनबरोबर जे राजकीय पक्ष विशेषतः समाजवादी पक्ष निवडणूकीच्या वाटाघाटी करीत आहेत त्यामुळे सामान्य मतदारांना संभ्रम उत्पन्न झालेला आहे की, कोणत्या पक्षाला मत द्यावे ? फेडरेशन समाजवादी युती ही मतदारांना मान्य होणार नाही, वगैरे ते पत्र असे :–

"MYSTIFYING THE VOTER

Sir, — Of the various party alignments to which Mr. Jamadar refers, surely the one most calculated to mystify the voter is the strange alliance between the Socialists and Ambedkarites in certain States.

The Ambedkarites,, among other things, pronounce themselves in favour of participating Kashmir, condemn

Mr. Nehru's "Left -of-the-Centre" foreign policy as suicidal and advocate a hook-up with the policies of the United States.

The Socialists have been seconded to none in their horror of the very idea of partitioning Kashmir nor have they suggested in alternative to Mr. Nehru's foreign policy. Do they, then, support the partioning of Kashmir? Would they like to precipitate this country into the eager embrace of the "capitalist war-mongers?"

The common voter may well wonder what strange synthesis is likely to emerge from the Socialist theisis and the Ambedkarite anti-thesis.

The Socialisst' present alliance with the Ambedkarites seems to be inspired by nothing more than a hysterical desire to "dish the Congress." Let them remember John Morley's warning that "He who begins his life by stifling his convictions to stifle."

Bombay, November 12, S. R. BIVALKAR."

(The Times of India, 19-11-1951).

मुंबईतील पहिली निवडणूक प्रचार सभा, सेंट झेविअर जिमखाना मैदान येथे २२-११-५१ रोजी झाली. सभेला तुफान गर्दी जमली होती. काँग्रेसच्या राजवटीत अस्पृश्यांच्या हिताकडे सरकारने जाणून बुजून दुर्लक्ष केले कारण हे सरकार सवर्ण हिंदूच्या हातात आहे, आणि त्यांना अस्पृश्यांच्या आत्मोन्नतीच्या चळवळीबद्दल तिटकारा आहे. अशा आशयाचा सूर भाषणांतून उमटत होता.

"CONGRESS APATHY TOWARDS SCHEDULED CASTES

Charges Reiterated by Dr. Ambedkar.

Dr. B. R. Ambedkar, former Law Minister of the Government of India, declared on Thursday that Mr. Nehru had deliberately evaded answering the charges he had levelled against the Government and the Congress Party, because charges were true and unanswerable.

Mr. Nehru had many occasions to contradict the statement he had issued when he resigned from the Government last month, but the Prime Minister preferred to remain silent knowing fully well that the charges were indisputable.

Dr. Ambedkar, who was inaugurating the election campaign of the Scheduled Castes Federation, of which he is the President, at a mammonth public meeting at St. Xavier's College grounds at Parel, reiterated the charges he had made in that statement and said that he had left the Government in which he had worked for four years because he was convinced that the Congress and the Government were utterly indifferent to the welfare and progress of the Scheduled Castes and Backward Classes.

"NO SYMPATHY

He had occasions to watch Congress leaders from close quarters and he could now say with confidence that the Congress had no sympathy and love for the oppressed Backward Classes.

He complained that when he was a Minister in the Congress Government he was not only not given charge of portfolios promised by the Prime Minister, but he was shut out from the policy-making Cabinet Committees.

As a Minister he could not criticise the policy of the Government nor could be ask any question in Parliament about the Scheduled Castes.

Dr. Ambedkar repudiated the charge made against him by some Congressmen that he had played a very insignificant part in drafting the Constitution. There could be no greater lie than this, he said, and added that he was prepared to prove by documentary evidence how his colleagues on the Drafting Committee had showed little interest in the drafting of the Constitution. They rarely attended the meetings of the Committee and the whole burden, therefore, fell on him and the Secretary of the Committee.

He detailed a long list of instances to show the indifierent attitude of the Congress to the grievances of the Scheduled Castes and said that even the foreign British Government was more sympathetic and generous to them and sincerely worked for their ametoration.

Dr. Ambedkar referred to the recent electoral alliance of the Socialist Party and the Federation and called upon

Scheduled Caste voters to cast their votes for Socialist and Federation candidates. He was confident that his community would stand solidly behind the alliance and return the candidates put up by the two parties to the legislatures.

The alliance, he said, had been entered into a spirit of give and take and they must abide by it. However, the Federation would not give up its separate political entity.

Dr. Ambedkar was present with a purse containing collections made from the sale of tickets at the meeting. The amount was not announced."

(The Times of India, 23-11-1951).

## "अस्पृश्यांच्या उन्नतीबाबत भारत सरकारने फक्त शब्दावंडबर माजविले"

### चार वर्षे काँग्रेसशी केलेल्या सहकार्यात डॉ. आंबेडकरांना आलेला अनुभव :-

मुंबई गुरुवार-काँग्रेसच्या संचालनांत अस्पृश्याच्या उन्नतीविषयी शब्दापलीकडे दुसरे काहीही केले नाही. म्हणून मी काँग्रेस सरकारातून राजिनामा देऊन बाहेर पडलो, असे उद्गार माजी कायदे मंत्री **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी आज सायंकाळी परळ येथे काढताच २५ हजार अस्पृश्य श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

मुंबई शे. का. फेडरेशनतर्फे, श्री. आर. जी. खरात यांच्या अध्यक्षतेखाली सेंट झेवियर्स कॉलिज जिमखाना ग्रांऊड, परळ, भरविण्यांत आलेल्या सत्कार सभेत बोलतांना **डॉ. आंबेडकर** यांनी सुरवातीसच खुलासा केला की, "ही सभा सर्व समाजाची नसून फक्त अस्पृश्य समाजाची असल्यांने काहींशी "एकांगी" आहे. अर्थातच माझे "भाषणही एकांगीच" होणार."

### अस्पृश्यांची भविकता

या वेळी झालेला व नंतर त्यांचे भाषण संपेपर्यन्त मधून मधून होणारा टाळ्यांच कडकडाड, अस्पृश्य समाज अद्यापहि किती भाविकतेने **बाबासाहेबांना** आपला नेत मानतो, हेच दर्शवीत होता.

समाजवाद्यांशी जसा "संधी" केला तसा काँग्रेसशी का केला नाही याचे कारण सविस्तर सांगतांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** म्हणाले, "अस्पृश्यांसाठी लोकसभेत व प्रादेशिक विधिमंडळात राखीव जागा मिळाव्यात, तसेच सरकारी नोकऱ्यांतून त्यांना जागा मिळाव्यात, तसेच सरकारी नोकऱ्यांतून त्यांना जागा मिळण्याची कायदेशीर तरतूद करावी, या हेतूने म्हणजेच अस्पृश्यांना राजकीय

संरक्षण मिळण्यासाठी मी काँग्रेसशी गेली चार वर्षे इमाने इतबारे–कुठचेही शल्य (किल्मिष) मनांत न ठेवता सहकार्य केले. परंतु माझा अनुभव फार वाईट आहे. राखीव जागा फक्त १० वर्षांपुरत्याच मिळाल्या. १० वर्षांनंतर अस्पृश्य व स्पृश्य यांची सामाजिक पातळी एक होईल याची काहीही हमी काँग्रेस नेते देऊ शकत नाहीत. पण ही कालमर्यादा कां ? आजवर जे अनेक आरोप काँग्रेस सरकारवर केलेले आहेत ते आंकडेवारीनिशी असत्य आहेत असे सरकार दाखवून देईपर्यन्त, ते खरे आहेत असेच आम्ही मानणार" (टाळया).

## पाकिस्तानातील अस्पृश्य

फाळणीनंतर पाकिस्तानातील अस्पृश्यांनी भारतात येऊ नये असे धोरण पाकिस्तान सरकारने अवलंबिले, तेव्हा तिकडील महार बटालियनच्या सहाय्याने आपण एकेक अच्छूत भारतात ओढून आणला असे सांगावयास मला अत्यंत वाईट वाटते. भारतात आल्यावरही ४० अस्पृश्यनिर्वासितांनी राजघाटावरील गांधीजींच्या सामाधीपाशी सत्याग्रह केला. तेव्हा त्यांच्याकडे कोणीही वृत्तपत्रांनी सुद्धा लक्ष दिले नाही. "अशीही तक्रार डॉक्टर साहेबांनी केली. आपण अत्यंत आजारी असतानाही गेली चार वर्षे काँग्रेस सरकारची सेवा केल्याचे सांगून त्यांनी आपले भाषण संपविले.

## बाबासाहेबांना प्रेमाची भेट

"**डॉ. आंबेडकरांना** २५ हजारांची थैली अर्पण करण्याचा आमचा मानस होता. पण सायंकाळी ६ वाजेपर्यन्त या सभेची तिकीटे विकून जो निधी गोळा झाला तो न मोजतां आम्ही डॉक्टरसाहेबांना अर्पण करीत आहोत. बहुधी २५ हजारांचा आमचा संकल्प सिद्धीस गेला नसावा, याबद्दल वाईट वाटते" असे सुरवातीला सत्कार सभेच्या संचालकांनी जाहीर केले. (लोकसत्ता, शुक्रवार ता. २३/११/५१)

२३/११/५१ ला मुंबईत [चौपाटी] काँग्रेसतर्फे प्रचंड सभा [दोन लाख प्रेषक] भरविण्यात आली होती. तीत निवडणूक प्रचाराचे पहिले भाषण **जवाहर नेहरूनी** केले. त्यांत त्यांनी **डॉ. आंबेडकरांनी** काँग्रेस राजवटीविरुद्ध जे मुद्दे उपस्थित केले होते त्यांना उत्तरे दिली. या सभेचा वृत्तांत

२४/११/५१ च्या टाईम्समध्ये (पान १ व ७) प्रसिद्ध झाला होता.

**श्री. नेहरुंच्या** भाषणाचा वृत्तांत नवशक्तीने प्रसिद्ध केला तो असा :–

"माझे परराष्ट्रीय धोरण पटत नसेल, तर काँग्रेसला मते देऊं नका !

**डॉ. आंबेडकरांना** उत्तर देताना **नेहरुंचे** त्वेषपूर्ण उद्‌गार :–

**मुंबई, शुक्रवार** :– "माझ्या परराष्ट्रीय धोरणावर अनेकांकडून अनेक प्रकारचे हल्ले केले जातात. **डॉ. आंबेडकर** म्हणतात की, या धोरणामुळे आम्हाला कुणीही मित्र राहिलेला नाही. पण मी ठासून सांगतो की, याच धोरणामुळे आमची जगात इभ्रत

वादली आहे. तात्त्विक दृष्ट्याच नव्हे तर व्यवहारिकदृष्टीनेसुद्धा हीच भूमिका बरोबर ठरली आहे. मी पंतप्रधान असेपर्यंत तिच्यात डावीकडे किंवा उजवीकडे किंचितसुद्धा बदल होणार नाही. ज्यांना ती मान्य नसेल त्यांनी कॉंग्रेसला मते देऊ नयेत" अशा खणखणीत व स्पष्ट भाषेत **पं. नेहरूंनी** आपल्या परराष्ट्रीय धोरणाचे चौपाटीवरील विराट सभेत समर्थन केले.

आजच्या भाषणात **पं. नेहरूंनी डॉ. आंबेडकरांच्या** आरोपांना प्रथमतःच उत्तर देण्याचा प्रयत्न केला. जनसंघ व रा. स्व. संघादि जातीय संस्थांवर आणि सोशालिस्टांवरही त्यांनी टीकेचे सडासड आसूड ओढले. मधून मधून होणारी गडबड सोडली तर सुमारे १॥ लक्ष नागरिकांचा समुदाय **पं. नेहरूंचे** हे एक तास चाललेले भाषण एकतानतेने ऐकत होता.......

**पं नेहरू** आपल्या भाषणात म्हणाले की, आज राष्ट्राचा पंतप्रधान किंवा कॉंग्रेसचा अध्यक्ष म्हणून मी आपल्यापुढे उभा नाही तर आपला स्वातंत्र्य लढ्यातील एक सहकारी व आपल्या प्रेमाचा व कृपेचा वाटेकरी म्हणूनच मी बोलत आहे.

लोक म्हणतात निवडणूकीसाठी मी देशभर फिरत आहे. ते थोडेसे खरे आहे. परंतु अशा तऱ्हेने फिरण्याची संधी मिळत असताना मला वाटते की, या विशाल देशाचे पुन्हा दर्शन घ्यावे. लोकांच्या चेहऱ्याचे निरीक्षण पहावे (करावे) त्यांच्या डोळयांत निरखून पहावे. त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घ्यावा. विशाल "भारताचा पुन्हा शोध घ्यावा." परवा हिमाचल प्रदेशात सभांमधून बोलताना हिमालयाची शुभ्र हिमशिखरे दिसत होती. आज येथून सागराचे नृत्य दिसत आहे. उद्या त्रावणको कोचिनमध्ये असेन. पण इच्छा असूनही दिल्लीच्या खुर्चीला जखडल्यामुळे मलरे फिरता येत नाही....दिल्लीला राज्यकारभार हाती घेतल्यापासून आम्ही काही चुका केल्या. काही बरोबर केले. कित्येकदा पडलो, कित्येकदा यशस्वी झालो. पण पडण्यांत अपयश नाही ते मन खचण्यांत आहे. पुन्हा पुन्हा पडूनही उठण्यांत व पुढे धावण्यात पुरुषार्थ आहे. 'इस तरह तय हमने की हय मंझील। गिर पडे, गिरकर उठ, फिर चले। या कवनातील ध्येयवादाप्रमाणे आमचा ध्येयवाद असला पाहिजे. म्हणूनच मी आपणास आधी सांगितले की, मी मतांचा भिकारी म्हणून आपणाकडे आलो नाही. हा भिकारी तर मी जरुर आहे. पण आपल्या प्रेमाचा भिकारी आहे.

निवडणूकीचे महत्व आहेच. या निवडणूकांत अनेक पक्षोपक्ष उतरले आहेत. मी त्यांच्या गुण दोषांची चर्चा करू इच्छित नाही. कॉंग्रेसला आपण जाणता. तिचे गुणदोषही आपल्याला माहित आहेत....आज विरोधी पक्षांचे फक्त एकच धोरण आहे. आणि ते म्हणजे कॉंग्रेसला विरोध करण्याचे. त्या दृष्टीने अनेक पक्ष एकमेकांशी सहकार्याचे करार करीत आहेत. सैद्धांतिक प्रश्न त्यांच्या आड येत नाहीत. एका प्रमुख पुढाऱ्याने तर येथेच सभेत सांगितले की, कॉंग्रेसला मते देण्याऐवजी ती

समुद्रात फेकून द्या. यावरूनच या पुढाऱ्यांचा काँग्रेस विरोध कोणत्या थराला गेल आहे हे कळून येईल.

## आंबेडकर व मुकर्जीवर हल्ला

पुढे पुढे पंडित **नेहरूंच्या** भाषणात अतिशय ओज व त्वेष आला. ते म्हणाले, 'आमच्या बरोबर अनेक दिवस मंत्री असलेले लोक आता बाहेर पडल्याबरोबर काँग्रेसवर वाटेल तसा हल्ला चढवू लागले आहेत. त्यांना टीका करण्याचा अधिकार आहे हे मान्य करतो. पण इतके दिवस मंत्रिमंडळात असताना त्यांना सरकारमधील व काँग्रेसमधील दोष का दिसले नाहीत ? आणि दिसले असतील तर ते मूग गिळून स्वस्थ का बसले ? ही काय जबाबदारीची जाणीव झाली ? जनतेची फसवणूक क करीत आहात ? देशाशी खेळत का आहात ? असा माझा त्यांना रोखठोक सवाल आहे. या देशामध्ये आम्हाला राज्य चालवायचे आहे ते शिवीगाळीने किंवा धमकीने चालवायचे आहे की शांततेने ? निवडणूकांमध्ये काँग्रेस हरली तरी मला पर्वा नाही. पण शानदारीने मिळविलेले स्वातंत्र्य आम्ही शानदारीने टिकवू.

## मी समाजवादीच

सोशालिस्ट पक्षाकडे वळून पं. **नेहरूंनी** सांगितले की, मी स्वतः समाजवादीच आहे. या देशाला किंबहुना जगाला समाजवादाशिवाय तरणोपाय नाही, असा माझा विश्वास आहे. सोशालिस्टांत माझे कांही सहकारी आहेत. मला त्यांच्याविषयी आदर आहे. परंतु समाजवाद्यांशी माझा, मार्गाबाबत मतभेद आहे. नुसती सुंदर स्वप्ने रंगविणे किंवा नकाशे तयार करणे म्हणजे देशाची प्रगति करणे नव्हे. तुमच्या योजना व्यवहार्य हव्यात. तसेच स्थित्यंतर वेगाने घडवून घेताना एखादेवेळी सबंध रचनाच मोडून पडण्याची भिती असते. म्हणून मी म्हणतो की, हळूहळू व सावधानतेने बदल घडवून आणले पाहिजेत. त्यासाठीच आम्ही पंचवार्षिक योजना तयार केली.

## जातीयवादाला कसून विरोध

गेल्या काही महिन्यापासून जातीयवादाविरूद्ध मी आघाडी उघडली आहे. पण आमचे साथीसुद्धा म्हणू लागले की, गरिबीच्या प्रश्नावर पांघरुण घालण्यासाठी लोकांचे लक्ष मी दुसरीकडे वळवीत आहे. परंतु तसे नाही. आज पंजाब, राजस्थान, मध्यभारत आदि भागात या प्रश्नाने फार तीव्र स्वरुप धारण केले आहे. तेथे अनेक जाहगीरदार संस्थानिक यांनी या जातीय संस्थांना आधार दिला आहे. त्यांचा पैसा या संस्थांमधून खेळत आहे. काँग्रेसजनाच्या मनात, अगदी आमच्या मनातसुद्धा जातीयता व प्रांतीयता घर करु पहात आहेत. त्यामुळे आमचे ऐक्य दुभंगून राष्ट्राचा पायाच उखडला जाईल. १९४७ च्या जातीयतेच्या बळीची करुण कहाणी, त्यावेळची दृश्ये मी विसरणार नाही. कोणी राक्षससुद्धा इतके भीषण अत्याचार करू शकणार नाही. म्हणूनच मी जातीय वादावर इतका त्वेषाने हल्ले चढवीत आहे.

## मी पाक धार्जिण

मी पाकिस्तानची मनधरणी करतो असे काही लोक म्हणतात. पाकिस्तानबरोबर असेल तर मी शंभरवेळा मनधरणी करीन. पण ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात मुळीचसुद्धा भाग घेतला नाही, जे त्यावेळी मागे दडले ते आता शूराचा आव आणून पुढे येत आहेत. आम्हाला सांगतात, पाकिस्तानवार स्वारी करा. आम्ही सैन्यात भरती होऊ. खरी वेळ आली की, हे पुन्हा मागे लपतील ती गोष्ट वेगळी. या जुन्या लोकानीच नवा संघ काढला नि त्याला नाव दिले जनसंघ. तीच गोष्ट रा. स्व. संघाची व रामराज्य परिषदेची. भोळ्या लोकांना फसविण्यासाठी नानाप्रकारची सोंगे पुढे येत आहेत.

## आंबेडकरांची टीका

**आंबेडकरांच्या** टीकेचा उल्लेख करून पं. **नेहरू** म्हणाले की, माझा राजकारणात वागण्याचा शिरस्ता **आंबेडकरांपेक्षा** फार वेगळा आहे. म्हणून मी आजपर्यंत त्यांच्या टीकेला उत्तर देण्याच्या भानगडीत पडलो नाही. आजसुद्धा वा पुढे केव्हांही मी त्यांचेप्रमाणे भाषा वापरणार नाही. काँग्रेस ही हरिजनांची शत्रू आहे असे त्यांचे म्हणणे. खरोखर मी असे म्हणेन की, आम्ही केलेले कार्य प्रशंसाजनक आहे व यापेक्षा अधिक करण्याची आमची इच्छा आहे. परराष्ट्र धोरणावरील टीकेबाबत ते म्हणाले की, जगाच्या नकाशात जरी ७०/७२ राष्ट्रे दिसत आली तरी खरी स्वतंत्र राष्ट्रे थोडीच आहेत. इतर राष्ट्रे कोणत्या ना कोणत्या प्रबळ राष्ट्राच्या दडपणा खाली आहेत. भारत खरे स्वतंत्र राष्ट्र असून आम्ही आमचे स्वातंत्र्य, न्यायप्रेम व सचोटी युनोत सिद्ध करून वाहवा मिळवली आहे. सध्याच्या परिस्थितीत यापेक्षा दुसरे परराष्ट्र धोरणच भारताला असू शकणार नाही. निवडणूकीनंतर काँग्रेसचे शुद्धीकरण करण्याचा आपला विचार प्रकट करून नेहरू म्हणाले की, काँग्रेसमधील लाचलुचपत वशिलेबाजी वगैरेबद्दल आमच्याकडे अनेक तक्रारी येतात. त्यापैकी काही खऱ्याही असतील. कित्येक ठिकाणी श्रीमंतावर दडपण आणून निवडणूक निधी जमविला जातो, अशाही वार्ता आहेत. असे होऊ नये म्हणून आपण सर्वांनीच दक्षता घेतली पाहिजे....'

[ नवशक्ती, शनिवार २४/११/५१, पा. १ व ४ ]

नवशक्ती पत्राने बाबासाहेबांची मुलाखत घेऊन तीत अनेक मुद्यावर त्यांची मते अजमाविली. त्या मुलाखतीचा वृत्तांत

**'काश्मिरमधील हिंदु-बौद्धांना वाचविण्यासाठी मी फाळणी मागत आहे.'**

## विरोधी पक्षाच्या स्थापनेसाठीच समाजवाद्यांशी युति

काश्मिरमधील हिंदुबौद्धांना वाचविण्यासाठी मी फाळणी करा असे म्हणत आहे. आपल्या धर्माचे संस्कृतीचे लोक आहेत त्यांना वाचविणे यांत कसली जातियता

आहे ?" असे उद्गार डॉ. आंबेडकरांनी काही प्रचलीत प्रश्नांवर " नवशक्तींच्य प्रतिनिधीला दिलेल्या खास मुलाखतीत काढले.

## अविभक्त कुटुंबाची विभागणी

समजा, हिंदु व मुसलमानांचे एक अविभक्त कुटुंब होते. त्यांनी एकमेकांपासून फुटून निघण्याचे ठरविल्यावर त्यांच्या संयुक्त मालमत्तेची विभागणी करावयास नको काय ? काश्मीर व हैद्राबाद हे दोन प्रश्न फाळणीनंतर उरले होते. हैद्राबादमध्ये हिंदूची बहुसंख्या असल्यामुळे ते भारतात आले. आतां उरले काश्मीर त्याबाबतीत आमची भूमिका प्रथमपासूनच घरखोडीची आहे. युद्ध झाले आणि आम्ही युनोकडे गेलो आता सीमा समिती बनवून आम्ही काश्मीरचे भवितव्य ठरविणार आहोत. आज आपल्या संरक्षण खर्चाचा भार आपणाला झेपत नाही. अशा स्थितीत काश्मिरचा प्रश्न किती दिवस आपण लांबणीवर टाकणार आहोत ?

## पूर्व बंगालची पुनरावृत्ती

काश्मीरमध्ये प्रादेशिक सार्वमत (Local prebiseite) घ्यावे. याबद्दल आपले मत काय आहे. या विषयी बोलतांना ते म्हणाले मी प्रथम कांही सूचन केली होती. पण ती मान्य झाली नाही. काश्मीरमध्ये महत्वाची गोष्ट एवढीच आ की, तेथे हिंदु-मुस्लिम अशी मिश्र वसति फारशी नाही. जम्मू व लडाख हे सलग हिंदुबौद्धाचे भाग आहेत. आज काश्मीरचा प्रश्न ज्या रीतीने हाताळला जात आहे त्यामुळे त्याचे भवितव्य असुरक्षित आहे. शिवाय नेहरू सार्वत्रिक सार्वमत घेऊ पहात आहेत. समजा, या सार्वमतांत भारताचा पराजय झाला तर तेथील हिंदु-बौद्धांची स्थिती काय होईल ? पूर्व बंगालची पुनरावृत्ती तेथे होणार नाही काय ? एक नवीन निर्वासितांचा प्रश्न येणार नाही काय ?

## माझा वास्तववाद

मला त्यांना वाचवायचे आहे. आपल्या धर्माचे, संस्कृतीचे लोक आहेत त्यांन वाचविणे यांत कसली जातीयता आहे ? कोणांसाठी आपण भीत आहोत I do not want to hug to a theory which is not practical.
मला हे जमणार नाही. आपण जीवनाच्या सत्यापासून पळणारे लोक आहोत. आपल्या देशांत एक प्रकारचा बौद्धिक पलायनवाद (Intellectual escapism) शिरला आहे. त्यामुळे वस्तुस्थितीकडे डोळेझाक करुन एक प्रकारच्या बौद्धिक कसरतींत (Mental aerobaties) आपण मश्गूल होतो ही सवय घातुक आहे. त्यामुळे आपण झटकन निर्णय घेऊ शकत नाही."

तेव्हा मी विचारले की लोकांचा मुख्य अक्षेप तुमच्यावर असा आहे की युनोत या वेळी भारत आपली बाजू मांडत असताना फाळणीची सूचना करावयास नको

होती ! "डॉक्टर उत्तरले-" मग केव्हां सांगायचे ? सगळे संपल्यानंतर? ? मीखोटे बोलत तर नाही ना ? आमचा हा अंतर्गत प्रश्न आहे. त्याच्यावर वस्तुस्थितीला धरून बोलण्याचा आमचा अधिकार आहे. लोक माझ्यावर टीका करतील या भीतीने मी तो बजावणार नाही असे कधीच होणार नाही !'

## निवडणूक जाहीरनामा

या संबंधीच बोलताना पुढे डॉक्टरसाहेब शे. का. फे. च्या जाहीरनाम्यासंबंधी म्हणाले, माझ्या या वास्तववादी दृष्टीची छाप माझ्या जाहीरनाम्यावर पडली आहे. मला कोणताही 'इझम्' माहीत नाही आणि त्यामुळेच आदर्श निवडणूक जाहीरनामा ज्याला म्हणता येईल असा मी तयार केला आहे. तुम्ही पाहिजे असेल तर तुलनात्मक अभ्यास करून पहा !'

## समाजवाद्यांशी करार का ?

निवडणूकीचा विषय निघालाच तेव्हा मी विचारले की तुमचा नि समाजवादी पक्षाचा करार कोणत्या भूमिकेवरून झाला ? त्यावर **डॉ. आंबेडकर** म्हणाले, मल वाटते की तो केवळ निवडणूक करार आहे. त्याला कोणतेही निश्चित तात्विक अधिष्ठान नाही. आम्ही निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर पंधरा दिवस वाट पाहिली. कोणी आमच्याकडे सहकार्यासाठी येईल का या इच्छेने ! समाजवादी पक्ष प्रथम आला. कॉंग्रेसने विचारलेच नाही ! आम्ही कम्युनिस्ट व जातीयवादी संस्था यांच्याशी सहकार्य करावयाचे नाही असे ठरविलेच होते. प्रजापक्षही आला नाही. तेव्हा आम्ही समाजवादी पक्षांशी त्यांचे आमचे पटले म्हणून करार केला. तो किती दिवस टिकेल मी काय सांगणार ! हे राजकारण आहे. मला कोणत्याही पक्षाबद्दल शत्रुत्वबुद्धी वाटत नाही. सूडबुद्धीने कोणाशी वागावे हे माझ्या स्वभावातच नाही. आमच्या फेडरेशनचे जे दलितवर्गीयासंबंधीचे कार्य आहे ते जेथे साधेल तेथे आम्ही सहकार्य करणार. कॉंग्रेस जर सहकार्यासाठी आली असती तर त्यांच्यातील दोषांवर बोट ठेवून ते सुधारून घेण्याची (मी) मागणी केली असती, म्हणून कदाचित ते माझ्याकडे आले नसावेत.

## उमेदवारांची निवड

पुढील निवडणुकीत कॉंग्रेसला कितपत विरोध होईल असे मी विचारले ! डॉक्टर हसून म्हणाले- 'मी काय ज्योतिषी आहे ? पण सर्वत्र प्रखर विरोध होईल असे दिसते. पंजाब बंगालमध्ये कॉंग्रेसला बहुमत मिळेल की नाही याची शंकाच आहे. सर्व विरोधी पक्ष एक झाले असते तर बरे झाले असते. अद्यापि वैयक्तिक दृष्टीकोनातून उमेदवार उभे केले जातात. उमेदवार निवडण्याची पद्धतही सदोष आहे. इंग्लंडप्रमाणे जर स्थानिक समित्या स्थापन करून त्यांच्याकडून उमेदवारांची नावे निवडली तर बरे होईल.

काश्मिर प्रश्नाविषयी डॉ. **आंबेडकरांनी** जे निर्भीड मतप्रदर्शन केले त्यामुळे देशात खळबळ उडाली होती. म्हणून साहजिकच मी काश्मिरच्या प्रश्नावर प्रथम डॉक्टरांशी चर्चा सुरू केली. मी विचारले की, काश्मिरची फाळणी ही जातीय तत्वावर केली की द्विराष्ट्रवाद मान्य केल्यासारखे होत नाही काय? तात्बडतोब डॉक्टरसाहे म्हणाले, 'मी वास्तववादी मनुष्य आहे. जे दिसते त्याचा विचार करून त्यावर उपाय शोधून काढणे हे राजकारणी माणसाचे काम. या दृष्टीने मी पूर्वी पाकिस्तानला मान्यता द्या असा आग्रह धरला होता. ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया इत्यादी देशात जे घडले त्याची पुनरावृत्ती या देशाते होऊ नये असे मला वाटत होते. म्हणून मी स्पष्टपणे सांगितले होते की मुसलमानाना जर स्वतःचे राज्य पाहिजे असेल तर त्यांच्या इच्छेविरुद्ध एखाद्या राज्यात आपण त्यांना कोंबून ठेवू शकणार नाही. त्याप्रमाणेच झाले. सारे मुसलमान पाकिस्तानसाठी झगडले आणि त्यांनी स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले? त्या फाळणीचाच काश्मिर हा अखेरचा भाग आहे असे माझे मत आहे.'

[ नवशक्ती, २५–११–५१ ]

नवशक्तीने बाबासाहेबांची व्यक्तिरेखा खालीलप्रमाणे प्रसिद्ध केली :–

# " व्यक्ति रेखा "

## विरोधी पक्षाचे नेते डॉ. आंबेडकर

डॉ. **आंबेडकरानी** स्वराज्य आल्यानंतर चार वर्षे मंत्रिपदावर राहून हिंदुकोड बिल, प्रतिनिधत्वाचे बिल इत्यादी महत्वाचे कायदेविषयक कामकाज केले. घटना समितीत त्यानी घटनेच्या मसुदासमितीत जे कार्य केले ते अपूर्व आहे. चार वर्षे आपल्या ज्ञानाचा भरपूर फायदा त्यांनी देशाला करून दिला. त्याबद्दल कृतज्ञतेचा शब्द उच्चारण्याऐवजी **नेहरूनी आंबेडकरानाच** खोटे ठरविण्याचा प्रयत्न चालविला आहे. **नेहरूंचे** परराष्ट्रीय धोरण ही त्यांची खाजगी मालमत्ता नव्हती. तरीही गेली चार वर्षे **आंबेडकरानी** प्रत्यक्ष मंत्रिमंडळात असताना संयुक्त जबाबदारीची जाणीव ठेवून टीका केली नाही. **आंबेडकरांची** टीका हा उथळ पाण्याचा खळखळाट नाही अशी माझी खात्री आहे. पण खरोखरच **आंबेडकरानी नेहरू** सरकारची लक्तरे लोंबविण्याचे ठरविले तर काय होईल याचा विचार करावा? जीप प्रकरण, पूर्वरचित घराचा गोंधळ, सिंद्री प्रकरण, लंडनमधील मेनन यांचा गोंधळ इत्यादी गोष्टींवर **आंबेडकर** प्रकाश टाकू शकणार नाहीत असे थोडेच आहे? **नेहरू** सरकारवर अधिक बोचक व विदारक टीका येणार नाही असे थोडेच आहे.

पण विरोधी पक्षात सामील होऊनही **आंबेडकरानी** तो संयम राखला आहे. **आंबेडकरानी** चार वर्षे मंत्री म्हणून आदर्श कामगिरी केली. आता विरोधी पक्षाचे एक नेते म्हणून ते कामगिरी करीत आहेत. त्यांचे ज्ञान, त्यांचा अनुभव, आतापर्यंत

निर्भीड मतांचा पुरस्कार करून दाखविलेली निस्पृहता व त्यागमय वृत्ती यामुळे **आंबेडकरांचे** नेतृत्व आता विधायक स्वरुप धारण करील अशी मला आशा आहे. या देशात एक प्रभावी व नव्या तत्वज्ञानावर आधारलेला विरोधी पक्ष असावा ही तळमळ त्यांना लागून राहिलेली आहे. या दृष्टीनेच त्यांनी समाजवादी पक्षाशी हात मिळवणी केली आहे. आंबेडकर हे ज्ञानमार्गी आहेत. जीवनाच्या दोन्ही बाजू आपण (स्वतः) पाहिल्या आहेत; आता दूर शांत वातावरणात ज्ञानार्जन करीत कोठेतरी बसावे असे त्यांना नेहमी वाटते. या देशांतील अनंत भेद पाहून या लोकशाहीचे काय होणार अशी चिंता त्यांना सदैव त्रस्त करते. मागे ते एकदा म्हणाले होते की, बौद्ध धर्माचा प्रसार करण्यात आपले आयुष्य खर्च करावेसे वाटते. राजकारणात जी अनभ्यस्त वृत्ती आहे, उथळपणा आहे, वैयक्तिक स्वार्थ आहे, त्यामुळे त्यांना राजकारणाचा उबग येतो. **आंबेडकरांच्या** जीवनाची ही बाजू लोकांना माहित नाही. ते कट्टर धर्मनिष्ठ आहेत.

**आंबेडकरांची** चातुर्वर्ण्य आदि जुन्या हिंदुपद्धतीवर टीका वाचली व ऐकली म्हणजे लोक संतापतात. **आंबेडकरांच्या** टीकेत उग्रता आहे. **आंबेडकर** कटुतेने बोलतात म्हणून त्यांना जातीयवादी म्हणतात. अस्पृश्यांसाठी **गांधी ठक्करबाप्पा** इत्यादींनी कार्य केले, म्हणून त्यांना जातीय म्हणाल का? कां **आंबेडकर** त्याच जातीत जन्मले आणि त्यांनी दलित सेवेसाठी आयुष्य वाहिले. म्हणून तुम्ही त्यांना जातीय म्हणता? ही तर्कदुष्टता आहे. क्षुद्रता आहे. १९२७ साली ते विलायतेतून परत आले तेव्हां **आंबेडकराला** कितीतरी सुवर्णमय आकर्षणे दाखविण्यांत आली होती आज ते कोंठल्यातरी न्यायालयांत न्यायाधीश झाले असते किंवा एखाद्या सरकारी कचेरीत बडे अधिकारी झाले असते. पण त्यांच्यावर लाथ मारून, अगदी अमानुष असा सामाजिक छळ सोसून **आंबेडकरानी** दलितांच्या सेवेचे कंकण बांधले! त्यांच्या कटुतेला सामाजिक विषमतेची पार्श्वभूमी आहे.

वास्तववाद व बुद्धिनिष्ठा या त्यांच्या दोन निष्ठा आहेत. पाकिस्तानवर त्यांनी जे पुस्तक लिहिले आहे त्यांत याचा प्रत्यय तुम्हाला येईल. त्यांना ढोंगबाजीची मनस्वी चीड आहे. विभूतिपूजा आणि भक्तिमार्ग यांनी देशाचे भयंकर नुकसान केले आहे असे त्यांचे मत आहे पण अनैतिकता, मूल्यहीन जीवन यांचेही ते द्वेष्टे आहेत.

विरोधी पक्षाच्या नेत्याजवळ लागणारी अभ्यासाची वृत्ती त्यांच्याजवळ आहे. कुठल्याहि प्रश्नाचा अभ्यास करावयाचा म्हणजे त्यासाठी ते जगातील सारी पुस्तक धुंडाळतील. त्यांची मालमत्ता म्हणजे त्यांचा ग्रंथसंग्रह. ते उत्कृष्ट अध्यापक आहेत. पण राजकारणातील बारकावेही ते विसरत नाहीत. त्यांच्याजवळ प्रतिपक्षींयाबद्दल घृणा नाही. कोणाशीही मन मोकळेपणाने बोलतील, तेथे कृत्रिमता आढळणार नाही. त्यांचे बोलणे म्हणजे एक मेजवानी! लोकसंग्रहाला लागणारे हे सगळे गुण असल्यामुळे विरोधी पक्षाला ते चांगले रूप देतील, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. ते

"पार्लमेंटरिअन" तर आहेतच! म्हणूनच मला कित्येकवेळा वाटते की **आंबेडकर** आणि समाजवादी यांच्या युतीने या देशांत जरा वास्तववादी, चाणाक्ष, कल्पक लोकसंग्रही असा विरोधी पक्ष निघाला तर एक महत् भाग्य ठरेल! निरंकुश– (नवशक्ति, २५/११/५१)

या निवडणूकीत १९४६ च्या निवडणूकीप्रमाणे काही अस्पृश्यांना कॉंग्रेसचे हरिजन उमेदवार म्हणून कॉंग्रेस पक्षांने निवडून आणले. १९४६ च्या निवडणूकीत शे. का. प. च्या उमेदवारांना मते देऊ इच्छिणाऱ्या अस्पृश्य वर्गीय मतदारांनी अनेक वाम मार्गाचा अवलंब करुन त्यांना मतकेंद्रावर जाऊ दिले नाही. १९५१ च्या निवडणुकीत असले प्रकार काही ठिकाणी झाले हे प्रकार लोकशाहीच्या तत्वाला धरुन नव्हते, हे उघड आहे. परंतु सत्तारूढ पक्ष व त्यांचे अनुयायी यांना त्याबद्दल खेद वाटत नव्हती. कोणत्याही भल्याबुऱ्या प्रकारांनी आपले उमेदवार निवडून यावेत व आपला पक्ष सत्तारूढ व्हावा हीच मनिषा, त्या पक्षाला लोकशाही पेक्षा जास्त महत्वाची वाटत होती. उमेदवार निवडणुकीत यशस्वी व्हावेत म्हणून या पक्षाने जसा चंग बांधला होता त्याचप्रमाणे उमेदवार उभे करण्यासाठी तो पक्ष सत्यासत्य, नीती–अनीती अगर सरकारी नियमांबद्दल आदर यापैकी काहीही पाहण्याच्या मानसिक अवस्थेत नव्हता. याची काही उदाहरणे दृष्टोत्पत्तीस आली. त्यापैकी एक उदाहरण **बाबा-साहेबांचे** एके काळचे जिवलग स्नेही व सहकारी **श्री. दत्तोबा संतराम पोवार** यांचे होय. त्यांना निवडणुकीसाठी कसे उभे करण्यात आले याची माहिती आलम-गीरने विविधवृत्ताच्या २५–११–५१ च्या अंकात दिली होती ती अशी :—

## 'ह्यो तर आमचो मामलेदार'

सरकारी खुलाशाची एक कथा ही अशारीतीने संपल्यावर नव्या खुलाशासाठी एक प्रकरण मी **मोरारजींच्या** रेव्हिन्यू खात्यापुढे सोपवीत आहे व त्यासाठी 'ह्यो तर आमचो मामलेदार' या मथळ्याखाली ता. ११ नोव्हेंबरच्या अंकात मी लिहिलेली स्फुटे, मी पुढे करीत आहे. पण तत्पूर्वी **मोरारजींच्या** आणि त्यांच्या रेव्हिन्यू खात्याच्या माहितीसाठी एक पत्र मी प्रसिद्ध करणार आहे. हे पत्र मला पुष्टी देण्या-साठी एका पत्रलेखकाने अनाहूतपणे पाठवून दिले असून ते पुढीलप्रमाणे आहे :—

श्री. अलमगीर, **विविधवृत्त** यांसी—

स. न. वि. वि.

ता. ११ नवंबर सन १९५१ च्या विविधवृत्तामध्ये वेंगुर्ले येथील महालकरी **श्री. द. सं. पोवार** हे नोकरीवर हजर असतांना त्यास कॉंग्रेस तिकीट दिल्याबद्दल आपण लिहिलेली हकीकत अगदी बरोबर आहे. **श्री. द. सं पोवार** यांनी आपणास कॉंग्रेस तिकीट मिळण्यासाठी गेल्या सप्टेंबरमध्ये महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीकडे अर्ज करून आपणास नोकरीतून मोकळे करण्याबद्दल सरकारकडेही अर्ज केला होता व

याप्रमाणे त्यांना ऑक्टोबरच्या मध्यावर सरकार मोकळे करणार अशी गावातून खातमी होती. परंतु गेल्या पंधरा दिवसांपूर्वी त्यांना तिकिट मिळत नाही अशी अफवा पसरली व सरकारी नोकरीवर असतांना काँग्रेस तिकीटासाठी अर्ज केला म्हणू **श्री. पोवार** यांचे स्टेटमेंट घेण्यापर्यंत पाळी आली होती. परंतु यक्षिणीची कांडी फिरावी तसा एकदम बदल होऊन ता. ९–११–५१ रोजी सेक्रेटरीएटमधून रत्नागिरी कलेक्टरला तार येऊन **श्री. पोवार** यांस नोकरीवरून मोकळे करावे असे कळविण्यात आले. त्या दिवशी रत्नागिरी कलेक्टरचा मुक्काम वेंगुर्ले येथे असून **श्री. पोवार** हे ड्यूटीवर कलेक्टरच्या तैनातीस होते. कलेक्टरला तार मिळाल्याबरोबर कलेक्टरनी ट्रेझरी अव्वल कारकून, वेंगुर्ले यांना आपल्या ऑफिसमधून तातडीने हुकूम देऊन **श्री. पोवार** यांजकडील चार्ज पांच वाजेपर्यंत घेऊन त्यांना मोकळे करावे असे कळविले. लगेच चार्ज देऊन श्री. पोवार हे दुसऱ्या दिवशी सकाळी कोल्हापूरास पसार झाले. व तिसऱ्या दिवशी मुंबईला गेले. **श्री. पोवार** हे पूर्वी कोल्हापूरास बरीच वर्षे सिव्हिल कोर्टाचे नाझर होते व संस्थान विलीन झाल्यावर त्यांची रायबाग येथे महालकरी म्हणून नेमणूक झाली. त्यांना रेव्हिन्यू खात्यातील बिलकूल माहिती नव्हती. फक्त वरिष्ठांची मर्जी राखावी, बरदास्त ठेवावी व नेहमी काँग्रेस गोटात रहावे हाच त्यांचा बाणा, शिवाय ते चांभार जातीचे मागासलेल्या वर्गातील असल्यामुळे त्यांना उत्तेजन द्यावे म्हणूनच त्यांना तिकीट मिळाले असावे. यांच्यापेक्षा त्यांची लायकी व विद्वत्ता नाही. काही दिवसांपूर्वी श्री. भाऊसाहेब हिरे वेंगुर्ले येथे आल्यावेळी त्यांजकडे रडगाणे गाऊन त्यांनी काँग्रेसचे तिकीट मिळविले असावे. त्यांच्या नोकरीची वर्षे पुरी होण्यास आणखी आठ महिने अपुरे होते. परंतु त्यांना आठ महिन्यांची सूट देऊन त्यांची नोकरी पुरी मानावी व त्यांना भरपूर पेन्शन द्यावी अशी सरकारची शिफारस असल्याची वदंता आहे.

कळावे, कृपा लोभ असावा, ही विनंती.

आपला,

**एक खरा माहितगार** (वेंगुर्ले)

## खुलासा कसा कराल ?

आता जो खुलासा मी मुंबई सरकारच्या रेव्हिन्यू खात्याकडे मागत आहे तो करताना ता. ११ नोव्हेंबरच्या अंकातील माझी स्फुटे व वरील पत्र या दोहोतील विधाने नीट लक्षातघेऊनच सरकारने आपला खुलासा करावा अशी माझी मागणी आहे. वेंगुर्ल्याचे महालकरी श्री. पोवार यांना सरकारी नोकरीतून मुक्त करण्यात आले आहे. अशा खुलाशाची मला मुळीच जरुरी नाही हे येथे मी स्पष्ट करतो. मला जो खुलासा पाहिजे तो सरकारी नोकरीचा राजिनामा देणे अवश्य आहे म्हणून जो दंडक मोरारजी देसाई यांनी घातला आहे. त्या दंडकाला धरून महालकरी श्री. पोवार

यांनी वर्तन केले की नाही यासंबंधात पाहिजे आहे. [ **सरकारी नोकरीवर असताना असा अर्ज पोवारांनी केला की नाही, मोरारजी देसाई यांना ही गोष्ट माहित होती की नाही, हा शिस्तभंग श्री. पोवार यांनी केला म्हणून त्यांना मोरारजींनी शासन का केले नाही. आणि ज्या दिवशी श्री. पोवार यांचे नांव काँग्रेस उमेदवार म्हणून जाहिर झाले. त्या दिवशीही श्री. पोवार हे सरकारी नोकर म्हणून काम करीत होते की नाही, या चारही प्रश्नांची खुलासेवार उत्तरे मला कळविणे जरुर आहे.** ] श्री. पोवार यांच्याबाबत व्यक्तिशः मला काही लिहावयाचे नाही अथवा त्यांच्यासारख्या अगदी सामान्य अशा उमेदवारांची भर काँग्रेसच्या काळ्यागोन्या उडदामध्ये पडली काय अथवा न पडली काय, मला त्याचे सोहेर-सुतकही नाही. पण नाकाने कांदे सोलणाऱ्या **मोरारजी** सारख्या कडक शिस्तप्रिय अशा सज्जनांच्या कारभारातच अशी ही घाण असू नये या सदिच्छेनेच या प्रकाराला तोंड फोडणे मला इष्ट वाटते. सरकारी खुलासा मला हवा तो माझ्या या सदिच्छेशी सहकार्य म्हणूनच हवा. तो मोघम असता नये अथवा मुद्याची गोष्ट लपवून न विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणारा फसवाही असता नये, एवढेच मला म्हणावयाचे आहे आणि म्हणूनच ही माझी रोखठोकीची मागणी आहे.

आलमगिरच्या मुद्यांना सरकारी उत्तर प्रसिद्ध झाले नाही. श्री. पोवार यांच्या उदाहरणाप्रमाणे पूर्वखादेशांताह एक उदाहरण या निवडणूकीस झाले होते पण तो हरिजन उमेदवार आयत्यावेळी निवडणुकीतून मागे हटला. त्याच्यावर शिस्तीचा सरकारी बडगा फिरला होता असे मी ऐकले होते.

२५-११-५१ ला [रविवार] शिवाजीपार्कवर सोशलिस्ट आणि शे. का. फेडरेशन यांच्यातर्फे सायंकाळी भरविण्यात येणाऱ्या निवडणूक प्रचार सभेला दहा हजार गोदी कामगार हे मिरवणुकीने जात असता घोडपदेव रोड व कॉनॉट रोड यांच्या सांध्यावर श्री. केशव लक्ष्मण बोरकर आणि डॉ. एम्. यू. मास्कानेंस यांच्या अनुयायांनी मिरवणुकीवर दगड, सोडावॉटरच्या बाटल्या फेकून, लाठ्यांनी हल्ला केला. त्यात सहा पोलिस कॉन्स्टेबल्स व आठ मिरवणुकीतील लोक यांना जखमा झाल्या. हल्लेखोरांनी व मिरवणुकीतील लोकांनी खूपच आरडाओरड केल्यामुळे सभोवती शांतताभंग होण्याची चिन्हे दिसू लागली. तेव्हा पोलिसांनी हवेत गोळीबार करुन जमावाला काबूत ठेवले. पोलिसांनी श्री. बोरकर (कॉंग्रेसचे कार्पोरेटर) यांना व त्यांचे ३० अनुयायी यांना अटक केली. मिरवणूक शिवाजीपार्कला गेली.

(The Times of India — 26-11- 51).

सभेचे अध्यक्ष, **अशोक मेहेता** व मुख्य वक्ते, **डॉ. आंबेडकर** होते लोक समुदाय दीड लाखाचे वर होता. बाबासाहेबांचे भाषण तब्बल तासभर झाले. सुरवा-

तीच्या वक्त्यांनी काँग्रेसच्या अनुयायांनी मिरवणुकीवर हल्ला केल्याबद्दल त्यांचा निषेध केला. नंतर बाबासाहेबांनी आपल्या भाषणात **श्री. नेहरूंच्या** पुढारीपणावर व धोरणावर प्रखर टीका केली. आणि **श्री. नेहरूंनी** कॉंग्रेस पक्षाची सूत्र कोणाच्या तरी हाती देऊन मोकळे व्हावे, अगर **नेहरूंच्या** अनियमित राजकीय पक्षाला व सरकारला वठणीवर आणणारा सामर्थ्यशाली प्रतिपक्ष निर्माण केला पाहिजे, नाहीतर आपल्या देशाचे भवितव्य धोक्यांत आहे, असा **बाबासाहेबांच्या** भाषणाचा सूर होता. संयुक्त महाराष्ट्र काश्मिर, वगैरे प्रश्न सोडविण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणारे लोक कायदेमंडळांत असले पाहिजेत व असलेच लोक प्रतिपक्ष बनवून काँग्रेस पक्षाला वठणीवर आणू शकतील. असा **बाबासाहेबांच्या** भाषणाचा सूर होता. **नेहरूंनी** काँग्रेस पक्ष सोडावा व समाजवादी व फेडरेशन या पक्षांच्या राजकारणांत भाग घ्यावा असेही बाबासाहेबांनी भाषणात सुचविले. त्यांच्या भाषणाचा वृत्तांत २६/११/२५१ च्या टाईम्स ऑफ इंडियाने (पा. १ आणि ६) प्रसिद्ध केला होता तो असा :–

"MR. NEHRU MUST LEAVE CONGRESS

Dr. Ambedkar's Suggestion

The suggestion that Mr. Jawaharlal Nehru should come out of the Congress early and join hands with progressive organisations outside to lead the nation to progress and prosperity was made by Dr. B. R. Ambedkar, former Law Minister, Government of India addressing a mass election meeting at Shivaji Park, Bombay, on Sunday night.

The Scheduled Castes' Federation leader, who bitterly criticised the Congress throughout his 65 minute speech, expressed his own fear that organisation might not consider Mr. Nehru as its leader after the elections were over.

More than a lakh and a half men and women, including a large number of Scheduled Castes workers, who had earlier marched to the venue of the meeting in procession from different parts of the city, heard Dr. Ambedkar say that many Congressmen were opposed to Mr. Nehru's leadership of the Congress till recently. They changed their minds overnight, apparently having realised his importance in winning the elections, he said. Dr. Ambedkar wondered how those Congressmen would consider Mr. Nehru after the elections.

## "SOUL OF CONGRESS"

Citing numerous instances where Mr. Nehru had failed to carry the Congress with him, Dr. Ambedkar stated that the popular belief that Mr. Nehru was the soul of the Congress was completely wrong. Mr. Nehru was possibly living in a dreamland. Having been closely associated with the Congress and the Government, Dr. Ambedkar claimed to know better what Congressmen thought of Mr. Nehru. The sooner he realised this fact the better for him as well as for country, he said and added that a progressive man like Mr. Nehru should leave such an organisation and come to join hands with the Socialists and men like him to lead the country on the right path.

Dr. Ambedkar devoted the major part of his speech to answer the questions posed to him by Mr. Nehru in his speech at the Chowpatty meeting. Even though he had made certain charges against the Congress and the Government in his letter of resignation, Dr. Ambedkar said, he did not care to answer them till he possibly saw them on the front page of "The Times of India" a few days ago. Dr. Ambedkar said he was surprised at the way in which Mr. Nehru dealt with them at the Chowpatty meeting.

## WORK FOR HARIJANS

The first charge that Dr. Ambedkar had levelled was lack of sympathy on the part of the Congress and the Government towards the Untouchables. If Mr. Nehru wanted to deny that charge, the best way for him to do that was by issuing an official press note giving a detailed account of what the Government had done for them during the past four years, so that the people could draw their own conclusions, he said.

The next charge against the Government was in respect of its foreign policy. It might be true that he had not expressed his difference of opinion while he was in office, he said, but that was mainly because he was busily engaged in the laborious and more important task of drafting India's Constitution. Did Mr. Nehru expect Cabinet members to

come to the meeting with a resignation letter every time and express their difference of opinion, leaving aside more important works, he asked. Reiterating that the present foreign policy of the Government was disastrous for the nation, Dr. Ambedkar asked Mr. Nehru to judge his criticism on its merits, irrespective of when it was made.

Emphasing the need for a strong opposition, the former Law Minister said that a political party with unlimited power could do considerable harm to the country. He quoted examples of the United States, Britain and France to illustrate how a strong opposition could keep the ruling party in check. He, therefore, appealed to the people to support the candidates jointly put up by the Socialists and Scheduled Castes' Federation.

Dr. Ambedkar said that he was in favour of forming linguistic States and inclusion of Bombay in the proposed Maharashtra State. The issue could be fought out in Parliament only if strong men were returned to the House by the people, because the Hyderabad question, which was linked with it, was bound to bring difficulties in the way, he observed.

The meeting was organised under the joint auspices of the State Socialist Party and the Scheduled Castes' Federation. Mr. Ashoka Mehta, General Secretary of the Socialist Party presided."

(The Times of India, 26-11-1951, pages 1 & 6, speech in the joint meeting of the Socialist Party and the Scheduled Castes Federation in the Shivaji Park on 25-11-1951, at 6-30 P.M. to 9 P.M. Ashok Mehta presided).

निवडणूक प्रचाराचे एक उत्कृष्ट भाषण बाबासाहेबांनी सोमवारी दिनांक २६ नोव्हेंबर १९५१ ला संध्याकाळी सर कॉवसजी जहांगीर हॉलमध्ये भरविण्यात आलेल्या जाहिर सभेत केले. या सभेचे अध्यक्षडॉ . **पुरुषोत्तम त्रिकमदास** हे होते यावेळी **बाबासाहेब** डोळे व गुडघे यांच्या आजाराने हैराण झालेले होते. डोळ्यांवर घड्या ठेवून दोन दिवस झाकून ठेवलेले होते. सभेत ते आले ते डोळ्यांवर वड्या घालून व वर काळा चष्मा लावून, दोन तीन माणसांच्या खांद्यावर हातांनी स्वतःच्या

भार टाकून, त्यांनी भाषण बसून करावे असा आग्रह सर्व समाजवादी व फेडरेशनच्या कार्यकर्त्यांनी केला, पण बाबासाहेबांनी उभे राहूनच भाषण केले. ते भाषणाला उभे राहिले, तेव्हा सभेत टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. हॉलच्या बाहेर हजारो प्रेक्षक उभे राहिलेले होते तेही त्यांत सामील झाले. औषधाच्या गोळ्या घेऊन **बाबासाहेबांनी** भाषणाला सुरुवात केली. राज्यकारभार निर्मळपणे चालवणे कसे जरुर आहे व असा कारभार, कॉंग्रेस पक्षीय सरकार चालविण्यास असमर्थ आहे, म्हणून जनतेने दुसऱ्या पक्षाचे सरकार सत्तेवर आणावे हे मुद्दे सयुक्तिक व सप्रमाण मांडून **बाबासाहेबांनी** प्रेक्षकांना दीड तास मंत्रमुग्ध करुन सोडले. त्यांचे भाषण ऐकण्यास सर्व थरांतील लोक, कायदे पंडित, श्रीमंत व्यापारी, समाजवादी, साम्यवादी व इतर नागरिक उपस्थित होते. अस्पृश्य अनुयायांची उपस्थिती तर विचारायलाच नको, एवढी असंख्य होती. भाषण संपले तेंव्हा श्रोते **बाबासाहेबांच्या** भाषणाची प्रशंसा करीतच हॉलच्या बाहेर पडले. या सभेचा वृत्तांत २७-११-५१ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता तो असा :—

"FAILURES TO GIVE PEOPLE PURE ADMINISTRTION
DR. AMBEDKAR'S CHARGES AGAINST CONGRESS

The charge that the Nehru Government and the Congress Party had failed to give a pure and incorruptible administration was made on Monday by Dr. B.R. Ambedkar, former Law Minister of the Government of India.

The Congress had been rightly accused of not providing food and clothing to the people. But there was something greater and important than food and clothing which the present Government had failed to give to the people. That was pure administration, free from corruption, bribery, nepotism and favouritism.

Dr. Ambedkar, who was addressing a crowded meeting at the Sir Cawasji Jehangir Hall in Bombay, supported his charge by citing several instances of corruption and bribery in Uttar Pradesh, Bihar and Madras and asked the Congress High Command why it did not think it fit to institute an enquiry into the allegations made against the Ministries of those States by Congress legislators.

It seemed extraordinary to him that the Congress Party which ruled the country, should be so indifferent to its own reputation, honour and integrity and should not appoint

an enquiry committee to go into these charges made against the Government by its own members.

## CONGRESS MAIN OBSTACLE

He stated that it might be difficult to give to the people a pure Government? he asked. It was a matter which entirely rested in the hands of the Government. If the Government was determined to make its administration fool-proof and knave-proof, nothing could have stood in its way. But really what stood in its way was the Congress itself, because it did not believe in purity of administration.

He was particularly pained at the statement made by Mr. Nehru as President of the Congress at the recent Delhi session in which he practically defended corruption prevailing in the country. Mr. Nehru had said that corruption in India was not such a great evil as would demand great attention.

He also referred to a storm raised against him by Congress members of Parliament for ceetain disqualification clauses for elections which he wanted to introduce into the Representation of the People Act. He wanted black-marketeers and holders of permits and licences to be disqualified from contesting elections along with contractors. But he was forced to remove the clause because of strong opposition from Congress members. Another battle which he fought bitterly but lost in the end was in regard to expenses incurred during elections by parties.

"Is this conduct and attitude of the Congress compatible with the maintenance of purity of administration?" he queried, and said "Nobody can have trust and faith in a proof which plays fast and loose with the question of purity of administration."

Purity of administration was very necessary for the welfare of the people because the public was more concerned with how the law was administered and not with how the law was made.

Dr. Ambedkar said that he had received several complaints alleging that Congress workers in the Districts were influencing judicial officers.

## STRONG OPPOSITION

Stressing the need for a strong opposition in India, Dr. Ambedkar called upon the Congress to allow other political parties to function as opposition parties and not to suppress the political voice of the people. To the monied class he uttered a note of warning not to subscribe to the funds of the Congress Party.

The former Law Minister made a reference to the accusation which he alleged, had been made by Mr. S. K. Patil that he (Dr. Ambedkar) was ungrateful because he had resigned from the Cabinet. Mr. Patil seemed to have funny notions about gratefulness, he said and quoted a citation from Irish philosopher which read : "No man can be ungrateful at the cost of his integrity; no nation can be ungrateful at the cost of its independence and no woman can be unfrateful at the cost of her honour.

Gratefulness had its own limitations. Dr. Ambedkar said. He did not want to be a slave in the Government of India.

## REPLY TO MR. PATIL

Replying to the claim made by Mr. Patil that it was through his efforts that Dr. Ambedkar found a place in the Central Government, Dr. Ambedkar said that it was one of the greatest surprise of his life how he got into the Cabinet, particularly when the Congress was determined and practicaly vowed not to permit him to enter even the portals of the Constituent Assembly.

Mr. Purshottam Trikamdas presided over meeting. The meeting was held under the joint auspices of the Socialist Party and the Scheduled Castes Federation." Speech by Ambedkar in the joint meeting of the Praja Socialist Party and the Scheduled Castes Federation, held in the Sir Cawasji Jehangir Hall, Bombay, Fort, on 26-11-1951, president Shri

Purshottam Trikamdas, Bar-at-Law, at 7 P.M. to 9 P.M. — The Times of India, 27-11-1951).

याच सभेचा वृत्तांत नवशक्तीत आलेला होता तो असा :—

**काँग्रेसने राज्यकारभार शुद्ध ठेवण्याचा थोडा तरी प्रयत्न केला आहे काय ?**

## बेबंद काँग्रेस राजवटीवर आंबेडकरांचे मर्मभेदक प्रहार !

**मुंबई सोमवार** :— "काँग्रेसने या देशांतील राज्यकारभार शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न केलेला नाही. अनेक प्रांतातील मंत्र्यांविरुद्ध काँग्रेसवाद्यांनीच भयंकर आरोप केले होते. त्यांची साधी पक्षीय चौकशी तरी केली आहे काय ? काँग्रेसच्या मानाच्य सचोटीच्या दृष्टीने ही लज्जास्पद गोष्ट आहे. असे उद्गार आज कावसजी जहांगी हॉलमध्ये झालेल्या प्रचंड सभेत डॉ. आंबेडकरांनी काढले.

**स. का. पाटील** हे आपल्या मित्रांजवळ खाजगी रीतीने असे सांगत आहे की माझ्या सूचनेमुळे **आंबेडकरांना** पहिल्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले. आणि आत ते कृतघ्न होऊन काँग्रेसवर व काँग्रेस मंत्रिमंडळावर टीका करीत आहे. ही माहिती खरी आहे का ? असा प्रश्न सभेतील एका श्रोत्याने प्रारंभी **आंबेडकरांना** विचारला होता त्याला उत्तर देताना **डॉ. आंबेडकर** म्हणाले, मला काँग्रेसच्या मंत्रिमंडळात स्थान कसे मिळाले ही माझ्या आयुष्यातील अत्यंत आश्चर्याची गोष्ट आहे. मला घटना सभेची सर्व दारे, खिडक्या आणि भेगासुद्धा बंद करण्यात आल्या होत्या. आम्ही इतर कोणालाही घटनासभेत घेऊ पण **आंबेडकरांना** येऊं देणार नाही. अशी काँग्रेसवाद्यांची प्रतिज्ञा होती. पण मी बंगाल **बंगाल विधीमंडळातून** गेलो. सिंहाच्या गुहेत सांपडल्यासारखी माझी स्थिती होती. मी कोणाशीही बोलत नव्हतो. मी एकदा एक भाषण केले. असे सहा महिने गेले. पुढे एक दिवस घटना सभेचे कामकाज संपल्यावर अकस्मात मला **नेहरूंनी** खोलीत बोलावून विचारले की तुम्ही मंत्रिमंडळात याल का ? मी सारासार विचार करून व सहकाऱ्यांच्या सल्ल्याने, सहकार्याची संधी आली आहे ती स्वीकारावी असे ठरवून मी ते मंत्रिपद स्विकारले. पुढे **सरदार पटेल** व **राजाजी** दोघेही म्हणू लागले की आमच्यामुळे तुम्हाला मंत्रिमंडळात घेतले. आता त्यांच्या स्पर्धेत **स. का. पाटील** सामील झाले आहेत असे दिसते. या वरून मी एकच निष्कर्ष काढतो की मी काही तरी चांगले काम केले असावे म्हणून ही श्रेय घेण्याची स्पर्धा चालू आहे.'

आता मी कृतघ्न झालो आहे असे लोक म्हणतात. पण मी ओकॉनेल या आयरिश देशभक्ताच्या शब्दात त्यांना उत्तर देऊ इच्छितो. (ते असे)
No man can be grateful at the cost of his intigrity. (No nation can be grateful at the cost of his independence and no woman can be ungreatful at the cost of her honour).

माझी सचोटी मी बाजूला ठेऊन मी कृतघ्न राहिलो तर तो मानवी व्यक्तिमत्वाच वध आहे असे मी समजेन. मला माझा प्रामाणिकपणा अधिक महत्वाचा वाटतो.'

## अनुशासनाची शुद्धता

या खुलाशानंतर **डॉ. आंबेडकर** आपल्या मूळ विषयाकडे वळले. 'राज्यकारा भाराची शुद्धता हा त्यांचा आजचा प्रमुख विषय होता. ते म्हणाले कोणतेही सरकार आज जनहीत किती साधते याच्यावर त्याचे श्रेष्ठत्व अवलंबून आहे. अन्नवस्त्रादी प्रश्न तर महत्वाचे आहेतच. पण त्याहूनही महत्वाची गोष्ट म्हणजे राज्यकारभार किती शुद्धतेने केला जातो ही आहे. आपल्या देशात गेली चार वर्षे अन्नाचे दुर्भिक्ष, वस्त्राचं दुर्भिक्ष, इत्यादी संकटे तर सतत येत आहेतच पण सगळ्यात महत्वाचा दोष कोणता असेल तर तो म्हणजे अशुद्ध आणि लाचबाजीने भरलेले राज्यशासन! राज्य-शासन शुद्ध राखण्यास तर बाहेरची मदत लागत नाही ना! फक्त तशी ती शुद्ध खण्याची इच्छा पाहिजे. राज्यशासन शुद्ध राखण्याची आज मोठी कोणती काँग्रेस पुढे अडचण असेल तर ती म्हणजे काँग्रेसलाच ती शुद्ध ठेवण्याची इच्छा नाही.'

## अनेक प्रकरणे

भारतातील उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल इत्यादी प्रांतात जनतेने नव्हे, तर काँग्रेसवाल्यानीच काँग्रेस मंत्र्याविरुद्ध अनेक आक्षेप घेतले आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे. त्यापैकी कोणत्याही प्रांतात या भयंकर आरोपाची न्यायालयीन तर राहोच पण साधी पक्षीय चौकशीही झाली नाही. १९१०–११ च्या सुमारास **लॉर्ड ॲस्किय** हे इग्लंडचे पंतप्रधान असताना **लॉर्ड रिडिंग** व **लॉर्ड जॉर्ज** यांचा केवळ एक कंत्राटात हात आहे अशी अफवा उठली होती. पण त्यांनी लगेच एक चौकशी समिती नेमली. ते निर्दोष निघाले. तरी सुद्धा त्या दोघानाही राजिनामे देण्यास भाग पाडले. कारण त्यांना वाटते होते की, आपल्या सहकाऱ्यापेक्षा देशहीत मोठे आहे. अशाच प्रकारचे दुसरे उदाहरण गेल्या वर्षी **ॲटलीच्या** कारकीर्दीत झाले होते. **लॉर्ड लिस्टोवल** हे व्यापार मंत्री होते. एका व्यापारी मित्राकडून ब्रँडीची बाटली व सुटाचे नकापड घेतल्याचा आरोप त्यांच्यावर होता. वस्तुतः चौकशीनंतर त्यात काही तथ्य ाही; तो मित्र म्हणून भेट दि होती असे आढळले. पण तरीही **ॲटलीनी** त्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकले.

## आणि ही कळकळ !

ही इंग्लंडमधील राज्यकारभार शुद्ध ठेवण्याची असलेली कळकळ पहा आणि काँग्रेसची कळकळ पहा. या मंत्र्याविरुद्ध किती गंभीर आरोप होते पण त्यांचे काय झाले ?

## आणखी काही उदाहरणे (प्रतिनिधीत्वाचे बिल)

मी आणखी काही उदाहरणे देतो. मी प्रतिनिधित्वाचे बिल तयार करीत असताना सरकारी कंत्राटे असणाऱ्या पार्लमेंटचे दरवाजे बंद असावेत म्हणून तरतूद केली होती. पण ती केल्यावर काँग्रेस पार्लमेंटरी पक्षात वादळ उठले. शेवटी मला तो भाग गाळावा लागला. दुसरे उदाहरण, मी त्याच बिलात प्रत्येक उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर जे नियंत्रण घातले होते त्याबद्दलचे आहे. या प्रश्नावरही खूप रण माजले. तीन दिवस त्यांच्यात चर्चा चालू होती. पार्लमेंटमधील काँग्रेस सभासद नेहरूंकडे धावले. त्यांना म्हणाले, 'तुम्ही काँग्रेसला शत्रुस्थानी मानणाऱ्या या माणाला हे महत्वाचे बिल तयार करावयास का सांगितले ! त्यांना काँग्रेसचा नाश करावयाचा आहे.' मी त्या बिलांत अशी तरतूद केली होती की कोणत्याही उमेदवारासाठी होणारा निवडणूक खर्च त्याच्या नावावर मांडला जावा. याचा परिणाम असा झाला असता की निवडणूक निधीचे पैसे वारेमाण कोणत्याही उमेदवारावर पक्षाच्या नांवाने उधळतां आले नसते. पण मला हेही कलम शेवटी गाळावे लागले. मी त्यासाठी खूप झुंज दिली. पण शेवटी हरलो.

## ही काय चाड ?

मला सांगा की ही प्रवृत्ती लोकशाहीच्या पावित्र्याशी सुसंगत आहे काय ? प्रत्येक देशांतील निवडणूक कायद्यात अशा प्रकारचे कलम आहे. कोणताही लोकशाहीनिष्ठ पक्ष हे सहन करणार नाही. कारण कोणताही कायदा कितीही चांगला असला तरी तो व्यवहारांत कशा पद्धतीने येतो याला राज्यकारभारांत महत्व आहे.

## आणखी एक दोष (न्यायाधिशावर दडपण)

हे झाले राज्यशासनातील दोष. मला मी दिल्लीहून इकडे येताना असे कळले कीं, या भागांत काही ठिकाणी स्थानिक काँग्रेस नेते न्यायाधिशांवर दडपण आणून आपल्या मनासारखे निर्णय लावून घेण्याचा प्रयत्न करतात. आपल्या राज्यघटनेत कायदा हा सर्वांना समान लेखील असे म्हटले आहे. अशा प्रकारचा हस्तक्षेप झाला तर या देशांत काय होईल हे मी सांगू शकत नाही.

## विस्तवाशी खेळ

मला वाटते काँग्रेसने या देशांत विरोधी पक्षांना चिरडून टाकण्याची भाषा बोलण्यापेक्षा ते वाढावेत म्हणून उत्तेजन द्यावयास हवे. ज्या देशांत पार्लमेंटरी लोकशाही आहे तेथे अनेक पक्ष नाहीत काय ? मग येथे तुम्हाला भीति कां वाटते ? अशी दडपशाही करणारी काँग्रेस विस्तवाशी खेळ खेळत आहे. तीच गोष्ट पैसेवाल्यांची. हे धनिक, पक्षाच्या निवडणूक निधीला पैसे देऊन स्वतःचे वर्चस्व लादू पहात आहेत. त्यांनी हे लक्षात ठेवावे कीं हेही घातुक ठरेल. तसेच सरकारी अधिकारी सत्तारूढ

पक्षापुढे नमून वर्तन करतील तर स्वतंत्र व शुद्ध निपक्षपातीपणे निवडणूका होणार नाहीत. त्यांनी स्वकर्तव्ये, निष्ठने व निपक्षपातीपणे केली पाहिजेत.

## विरोधी पक्षाची गरज

कोणतेही सरकार बिनचूक कारभार करीत नाही. प्रत्येकाकडून प्रमाद हे घडतातच. पण ते दाखविण्यासाठी जनतेला चुकांची माहिती होण्यासाठी विरोधी पक्षाची आवश्यकता असते इंग्लंड, कॅनडा या देशांत विरोधी पक्षाला अधिकृत मान्यता असते. त्यांच्या नेत्यांना सरकारी पगार मिळतो.

## शे. का. फे. समाजवादी करार

शे. का. फे. व समाजवादी यांच्या निवडणूक सहकार्याबद्दल लोकांना वैषम्य का वाटावे या विषयी आश्चर्य व्यक्त करुन **डॉ. आंबेडकर** म्हणाले– "मी जातीने अस्पृश्य आहे. तसे मी राजकारणातही अस्पृश्य रहावे अशी या लोकांची इच्छा आहे काय ? कदाचित् मी कॉंग्रेसमध्ये गेलो नाही म्हणून त्यांना वैषम्य वाटत असावेय

शेवटी **आंबेडकर** म्हणाले की, या देशातील राज्यकारभार शुद्ध ठेवण्याचा प्रयत्नही ज्या कॉंग्रेसने केला नाही त्या कॉंग्रेसला पुन्हा निवडून द्यायचे की नाही हे तुम्हीच ठरवा...'

प्रारंभी राजा **हाथीसिंग** व **पुरुषोत्तमदास त्रिकमदास** यांची सभेत भाषणे झाली होती. [ नवशक्ति, २७–११–५१, मंगळवार ता. १ व ४ ]

## 'सोशालिस्ट शे. का. फे. युतीचा पं. नेहरूना खेद'

## आंबेडकर–अशोकांना नेहरूंचे उत्तर

मद्रास, ता. २७–केवळ निवडणूक जिंकण्यासाठी म्हणून समाजवादी आणि शे. का. फे. यांच्या घडलेल्या चमत्कारिक युतीबद्दल **नेहरुनी** आज सायंकाळी येथल्या विराट सभेत खेद व्यक्त केला !

सभेला चार लाखावर लोक उपस्थित होते. या सभेत दीड तासपर्यंत त्यांचे भाषण झाले. पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्र्यांप्रमाणे निवडणुकीच्या वेळी स्थापन झालेल्या पक्षांचा व त्यांच्या तत्वशून्य एकजुटीचा उल्लेख करून ते म्हणाले–या पक्षांचा कार्यक्रम नकारात्मक म्हणजे केवळ कॉंग्रेसचा पराभव करणे एवढाच आहे. याउलट एकट्या कॉंग्रेसजवळच कार्यक्रम आहे. आपल्यापुढे अनेक प्रश्न आहेत आणि ते प्रश्न आपण एकमेकांचे पाय न ओढता एकोप्याने कार्य केले तरच सुटतील. निवडणुकीच, हे काही साध्य नाही. पण त्याचबरोबर लोकांनी कॉंग्रेसला पाठिंबा देणे आवश्यक आहे. म्हणजे कॉंग्रेस संघटनेच्या द्वारा इतर मोठ्या गोष्टी तिला करता येतील.

## काय हे नवे शोध !

**नेहरू** पुढे म्हणाले–आजच मी वर्तमानपत्रांत मुंबईतील समाजवादी शे. का. फे. सभेबद्दल वाचले. **अशोक मेहता** व **डॉ. आंबेडकर** यांची शरीरे दोन असली तरी मने एकच आहेत. आणि त्यांची एकजूटही संधीसाधूपणाची नाही. असे त्या सभेत सांगण्यात आले. खरोखर आश्चर्यकारक आहे हे ! निवडणुकीच्या वेळी लोकांना काय काय शोध लागतात हे ! मंत्रिमंडळातून बाहेर पडल्यानंतर **डॉ. आंबेडकर** यांनी भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर कडक टीका केली आहे. **अशोक मेहता** व **आंबेडकर** यांच्या या मनोमिलनात समाजवाद्यांनी **डॉ. आंबेडकरांचे** परराष्ट्रीय धोरण पत्करले आहे काय ? **डॉ. राममोहन लोहिया** यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय तज्ञाल **डॉ. आंबेडकरांसाठी** समाजवादी पक्षाने सोडून दिले काय ? परराष्ट्रीय धोरण कसे पचालवावे याबद्दल इतके दिवस **लोहिया** सांगत असत. पण समाजवादी नभांगणां आता **डॉ. आंबेडकर** व **डॉ. लोहिया** असे दोन तारे चमकणार. हे दोघे डॉक्टर एकत्र येऊन काय करावे ते नक्की ठरवितील अशी मी आशा करतो.

कोणत्याही व्यक्तीबद्दल उणा शब्द मी बोलू इच्छित नाही. कारण या अनेक क्षांत माझे जिवलग स्नेही आहेत व त्यांच्याबद्दल मला आदर आहे.' [ नवशक्ती दि. २८–११–५१ ]

# खंड १० वा

## प्रकरण १० वे

# निवडणुकीचा प्रचार

काँग्रेसचे अध्यक्ष **श्री. जवाहरलाल नेहरू** यांचे मद्रास येथे २७-११-१९५१ रोजी ४ लाख श्रोत्यांच्यापुढे प्रचार-व्याख्यान झाले. सदर भाषणात त्यांनी इतर राजकीय पक्षांचे पुढारी, त्यांची राजकीय दृष्टी आणि त्यांनी निवडणुका जिंकण्यासाठी परस्परांत केलेले करार यासंबंधी उपरोधक उद्‌गार काढले. **डॉ. आंबेडकर** हे आज सरकारच्या राष्ट्रीय धोरणावर टीका करीत आहेत. मग ते मंत्रिमंडळात चार वर्षे गुपचूपपणे का बसले ? तेव्हा त्यांनी कां टीका केली नाही ? असे **श्री. नेहरूंनी** उद्‌गार काढले समाजवादी पक्षाने **डॉ. आंबेडकर** यांचे परराष्ट्र धोरण स्विकारले आहे की काय ? असेही ते म्हणाले. या सभेचा वृत्तांत २८-११-५१ च्या टाईम्समध्ये प्रसिद्ध झालेला होता. त्याच्या वरच्या भागात **श्री. आर. के. लक्ष्मणन्** यांचे **नेहरूंवरील** व्यंगचित्र छापलेले होते. चार चाकी निवडणुकीचे लहान व्यासपीठ, त्यावर लहान आकाराचे काँग्रेस पुढारी बसलेले आहेत. आणि त्याच्यामध्ये जाडजूड, उंचच उंच आणि ताठर मानेने **नेहरूजी** उभे राहिलेले आहेत. त्या व्यासपीठाला दोरी लावून काँग्रेसचे लहान आकाराचे अध्यक्ष **नेहरू** तो व्यासपीठाचा गाडा ओढीत आहेत आणि हा सर्व मौजेचा देखावा [की ज्याला श्री. लक्ष्मणने Personality and the President असा मथळा दिलेला होता] ते पहात उभे आहेत. तो वृत्तांत मी खाली उधृत करतो :—

"PARTY PACTS ON EVE OF ELECTIONS DEPLORED

Mr. Nehru's Rejoinder to Dr. Ambedkar

Madras, November 27. ....

The Congress President, Mr. Nehru, deplored at a mass meeting at Island Grounds here this evening "the strange and extra-ordinary combination of the Socialist Party with Dr. Ambedkar's Scheduled Castes' Federation for the purpose of merely winning the General Elections."

About four lakhs of persons attended the meeting Mr. Nehru, who spoke for a hundred minutes, also referred to the growth of new parties like mushrooms on the eve of the elections and their electoral alliance with one another without rhyme or reason or principles. He declared that while those parties had only a "negative programme", namtly, to defeat the Congress, the Congress was the only organisation which had a "positive programme." Many problems, both in the economic and social sphere, awaited solution, he said. "We can only face them by functioning together and not by trying to pull each other down." The Congress with its wide organisational backing and its support from the peasantry and common folk, could alone preserve national unity, he said. Though elections were not an end in itself, it was necessary that people should back the Congrtss so that through the organisation bigger things could be achieved.

## PARTY ALLIANCES

The Prime Minister declared that many parties all over India had been born on tht eve of the elections, some of them as recently as "two months ago". Some of them had extraordinary combinations. "Only to-day," he said, "I read in the newspapers that the Socialist Party has embraced Dr. Ambedkar and his group and that they have declared at a big rally in Bombay that Mr. Asoka Mehta and Dr. Ambedkar are more or less two bodies with one mind and one heart and they have said loudly that their alliance is not an opportunist or a temporary alliance because they stand for the same things.

"Quite extra-ordinary — what discovery people make on the eve of election. I am interested in many things about this alliance. Dr. Ambedkar, ever since he left the Government of India, has expressed himself in strong language about the foreign policy of India. He has every right to do so. It is a mere, shall I say, incidental happening that he had not done so in the last four years he was in the Government of India. What I am interested in is this, in this

union of heart and soul between Mr. Mehta and Dr. Ambedkar, has Socialist Party adopted the foreign policy of Dr. Ambedkar.

FOREIGN POLICY

"Thus for we have been told how foreign policies should run by Dr. Lohia. Now it is evident that there are two stars in the firmament of the Socialist Party, Dr. Lohia and Dr. Ambedkar. I hope the two doctors will meet and decide what exactly should be done. I do not wish to say a single word which is disrespectful of any individual. Nor in many of these parties, the Socialist Party, the K.M.P. Party or even the Communist Party, I have intimate friends, and I respect them. I do not run away from them or their parties as some of you may."

Mr. Nehru added : "My intimate friend and colleague, Mr. Kripalani, the leader of the K.M.P. Party, said things that astonished me. Mr. Kripalani feels strongly about many things, and I respect his feelings. But when it comes in his saying that it is better for the people to throw their votes into the sea than give them to the Congress, there one begins to suspect that his reasoning faculties are not functioning satisfactorily and that he is just angry."

Continuing Mr. Nehru declared that Mr. Kripalari had further stated that there would be a bloody revolution "if people voted for the Congress. I do not know if he wants the people's blood turn cold by repeating the word evolution and that bloody revolution can only be saved by Mr. Kripalani. I do not understand what all this means. It is not serious talk for thinking. A revolution may come or may not come. But fortunately, speaking only for myself, I can fit in both in a revolution and in peaceful times. So it does not frighten me in the least whether a revolution comes or does not come."

Mr. Nehru characterised all such talk as a negative approach to the problems facing the country. "It is all negative, nay nay, nay "he said thumping the table........'

(speech by Nehru in the public meeting at Madras on 27-2-1952, replying Ambedkar's criticism on Nehru cabinet. The Times of India, 28-11-1951).

**श्री. नेहरू** यांच्या मद्रासमधील भाषणातील मुद्दे खोडून काढण्याच्या उद्देशाने **श्री. अशोक मेहता** यांनी एक पत्रक २८-११-५१ ला रात्री काढले. त्याच वृत्तांत नवशक्तीने दिला तो असा :—

### "काँग्रेस तेवढे गंगोदक नि समाजवाद्यांचे मात्र गटार काय ? समाजवादी–आंबेडकर ऐक्याबाबत नेहरूंना अशोक मेहतांचा रोकडा सवाल

मुंबई, बुधवार—शे. का. फेडरेशन व समाजवादी पक्ष यांच्यातील सहकार्यही केवळ निवडणूक करार नव्हे असे **साथी अशोक मेहता** यांनी **नेहरूंना** उत्तरादाखल काढलेल्या पत्रकांत सांगितले आहे. **अशोक मेहता** आपल्या पत्रकांत म्हणतात 'काल **पं. नेहरूंनी** शे. का. फे. व समाजवादी पक्ष यांच्या सहकार्याची टर उडविण्याचा प्रयत्न मद्रास येथे केला आहे. आम्ही अनेक वेळा स्पष्ट केले आहे की, समाजवादी, पक्ष फार वर्षापूर्वीपासून वर्गीय जमाती व वन्य जमाती यांच्यात निकट संबंध यावेत, शक्य तो त्यांच्यात समरस होता यावे म्हणून खटपट करीत आहे. अशा पद्धतीचन समझोता आदिवासी, महासभा, शे. का. फे. यांच्याशी निवडणुकी आल्या असताना व्हावा हा केवळ योगायोग. मी हे पुन्हां सांगतो की, हा केवळ निवडणुक करार नव्हे भारतांतील समाजवादी चळवळीने, आपल्याकडे दलित वर्गाचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## मूळ वृत्ती

भारतात आज रचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. केवळ कार्यक्रम विषयक बदल करून भागणार नाही. या विषयी आमचे आणि दलित समाज व त्यांचे पक्ष यांचे एकमत आहे. समाजवादी पक्ष, आदिवासी, महासभा व शे. का. फे. यांच्यात व **पं. नेहरूंच्या** नेतृत्वाखाली असलेल्या सनातनी काँग्रेसमध्ये ही महत्वाची भेदरेषा आहे.

## मतभेद अमान्य

शे. का. फे. व समाजवादी पक्ष यांच्यातील परराष्ट्रीय धोरणविषयक मतभेद कोणीच नाकारलेले नाहीत. पण त्यांच्यातील एक मतैक्याच मूलभूत मुद्दा आहे, आणि तो म्हणजे देशाचे परराष्ट्रीय धोरण हे अंतर्गत धोरणातून निर्माण झालेले असावे कारण त्यांच्यावरच परराष्ट्रीय नीती अवलंबून असते. नेहरूंनी या मताचा पुरस्कार केलेला नाही. निदान तशी कृतीतरी केलेली नाही.

## हे धर्मातीत्व

**पं. नेहरूंचे** सहकारी म्हणून **श्याम प्रसाद मुकर्जी** यांच्या मंत्रिमंडळांत होते. त्यावेळी नेहरूंच्या निधर्मीपणाला बाध आला नाही. नव्हे तो मुत्सद्देगिरीचा उच्चांक समजला गेला. पण **अशोक मेहता** व **आंबेडकर** हे एकत्र आले म्हणजे ते सर्व तत्वशून्य ठरते! 'काँग्रेसचे मात्र गंगोदक आणि समाजवाद्यांचे मात्र ते गटार!'' [नवशक्ती गुरु. २९-११-५१, पा. १]

नेहरूंच्या मद्रासमधील भाषणाला उद्देशून ३०-११-५१ च्या नवशक्तित [काल प्रवाह स्तंभात एक स्फूट लिहिले होते ते असे :—

## निवडणूकीतील शोध

**डॉ. आंबेडकरांच्या** परराष्ट्रीय धोरणावरील टीकेने **नेहरू** अस्वस्थ झाले आहेत. म्हणून ते, **आंबेडकरांनी** पूर्वी कधी टीका केली नाही नि आता मात्र ते टीका करीत आहेत अशी हाकाटी मारीत हिंडत आहेत. **आंबेडकरांनी** केलेल्या टीकेला पंतप्रधानांनी दिलेले हे उत्तर समजावयाचे काय? नेहरू उत्तर देण्याचे टाळता आहेत असाच याचा अर्थ आहे. समजा चार वर्षात जे आक्षेप घेतले नव्हते ते आत घेतले गेले म्हणून ते आक्षेप चुकीचे ठरतात काय? ते त्या आक्षेपांचे उत्तर ठरते काय! म्हणून **आंबेडकरांच्या** टीकेला समर्पक उत्तर देण्याचा प्रयत्न करून ते आक्षेप कसे फोल आहेत हे सिद्ध करा! नुसत्या वैयक्तिक दूषणाने काम होणार नाही. काश्मिरच्या प्रश्नाबाबत **आंबेडकरांनी** जी सूचना केली आहे यासंबंधी तुमचे काय मत आहे, स्पष्ट करा आणि इतर सर्व धोरणाचे समर्थन करा. नेहरूंना दुसरी एक काळजी पडली आहे. ते म्हणतात की, डॉ. **लोहियांचा** सल्ला सोडून आता समाजवादी पक्ष **आंबेडकरांचे** परराष्ट्रीय धोरण स्वीकारणार काय? **आंबेडकर** आणि **लोहिया** यांनी एकत्र येऊन आपले धोरण असावे असे त्यांनी सुचविले आहे. शे. का. प. व समाजवादी पक्ष हे दोन वेगळे पक्ष आहेत आणि त्यांचे काही बाबतीत मतभेद आहेत, हे स्पष्ट आहे. तरीसुद्धा **अशोक मेहतानी** म्हटल्याप्रमाणे भारताचे परराष्ट्रीय धोरण हे अंतर्गत धोरणांतून निर्माण झालेले असावे, या अत्यंत महत्वाच्या मुद्यावर दोघांचे एकमत आहे. आणि त्यामुळे ढोबळ मानाने त्यांचे सहकार्य शक्य झालेले आहे. **नेहरूंच्या** समर्थकांनी याचा विचार करावा. **राजाजी, नेहरूंचे** समर्थन करतांना मागे एक म्हणाले होते की, भारतांचे परराष्ट्रीय धोरण आपल्या राष्ट्रीय हितावर आधारलेले नसून भारताच्या परंपरेवर आधारलेले आहे. हा नेहरूंना टोला आहे की, नेहरूंची ही स्तुति आहे? तेंव्हा **नेहरूंनी** व त्यांच्या समर्थकांनी विरोधकांचे आक्षेप खोडून काढावेत, विरोधकांच्या हेतूवर वा पात्रतेवर आघात करु नयेत! सध्या फक्त राळ उडविण्याचे काम चालू आहे!''

प्रजासोशालिस्ट पार्टी व फेडरेशन यांच्यात जी निवडणूक युती झाली. ती

चांगली झाली. तिच्यावर आक्षेप घेणारे अगर टीका करणारे लोक या युतीकडे काक-दृष्टीने पहातात. हे बरोबर नाही. अशा अशयाचा एक अग्रलेख नवशक्तीने लिहिला तो असा.

## तत्वच्युति नव्हे, तत्वनिष्ठा.

समाजवादी पक्ष आणि **डॉ. आंबेडकर** यांचे शेडयूल्ड कास्ट फेडरेशन यांच्या-मध्ये झालेला निवडणूक करार अनेकांना झोंबला आहे, असे स्पष्ट दिसते. खुद्द **पं. जवाहरलाल नेहरु** यांनाहि हा करार बोचला असून मद्रास येथील भाषणांत त्यांनी सोशालिस्ट आणि **आंबेडकर** यांच्यावर उपरोधाचे शस्त्र धरले. मोठ्या माणसाचा आवाज मोठा असावा हे साहजिकच आहे. पण **नेहरूंनी** या कराराची नीटशी माहिती करुन घेतलेली नाही हे उघड दिसते. त्यामुळे **आंबेडकरांचे** परराष्ट्रीय धोरण समाजवाद्यांनी स्वीकारले आहे काय, असला निरर्थक प्रश्न त्यांनी विचारला. जाता जाता त्यांनी **डॉ. लोहियांना** आंतरराष्ट्रीय तज्ञतेचे शिफारस पत्र दिले आहे. आणि या दोन डॉक्टरांनी एकत्र येऊन धोरण ठरवावे, अशीही सूचना केली आहे. हे दोन डॉक्टर नेहरुंच्या या सूचनेचा कसा आदर करावयाचा ते ठरवतील. पण परराष्ट्र धोरणाचे बुजगावणे **नेहरूंनी** या करारासमोर उभे करावे ही मोठी मजेदार गोष्ट आहे. या दोन पक्षांचे परराष्ट्र धोरण शंभर टक्के जुळत नाही हे दोघांनीही स्पष्ट केले आहे. पण म्हणून दोघांचे सहकार्यच होऊ नये ही भूमिका अजबच म्हटली पाहिजे.

## नकटीचा नखरा

पण यात अजब असे काही नाही. या दोन पक्षांच्या सहकार्याची छाया दिसताच काँग्रेसजनाच्या पोटात भीतीचा गोळा उठला आहे. विरोधी पक्षांना वेगवेगळे फोडून त्यांचा धुव्वा उडवावयाचा ही भेदनीती आता वाया जाणार असे त्यांना दिसू लागले आहे. त्यामुळे ही मतासाठी सौदेबाजी चालली आहे असा ओरडा त्यांनी सुरु केला आहे. जसे, काही मते ही बीन काँग्रेसवाल्यांना शिवनिर्माल्यवतच आहेत ! निदान काँग्रेसच्या पक्षपात्यांनी तरी मताच्या सौद्याची ही भाषा करू नये. निवडणुकीची तिकीटे देताना काँग्रेसने कसेबसे उमेदवार निवडले ते लोकांसमोर अजून उभे आहेत. आणि ही निवड होत असताना **नेहरूंच्या** सेक्युलर वादापासून समाजवादापर्यंत सर्व तत्वाचे कसे धडाधड मुडदे पडले हेही लोकांना ठाऊक आहे. तेव्हा नकटीने दुस-ऱ्याच्या नाकाची लांबी मोजण्यासारखा हा उपद्व्याप काँग्रेस पक्षपात्यांनी तरी करू नये. समाजवादी आणि शे. का. फे. यांची संयुक्त आघाडी निर्माण झाली तर काँग्रेसवाल्यांना दणका मिळेल हे खरे आहे. पण त्यामुळे चिडून जाऊन **आंबेडकरांना** समाजवादी पक्ष मिळाला, **अशोक मेहतानी** डोळेझाक केली असे बरळण्यामुळे काही फायदा (होणार) नाही. दोन्ही पक्ष आपल्यापरी खंबीर आहेत. आणि अशी खंबीर

माणसेच सहकार्यासाठी एकत्र येऊ शकतात. सहकार्य म्हणजेच एकमेकांना गिळणे ही अजब व्याख्या आहे. पण त्यामुळे भेदरण्याइतके कार्यकर्ते किंवा जनता भोळसट नाही,

## कर्णपिशाची माहिती

**अशोक मेहतानी** पडद्याआड जाऊन गुपचुप हा करार **आंबेडकरांशी** केला. आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा होत असलेला विरोध गुंडाळून ठेवला. असे कर्ण-पिशाच्च्याने एका संपादकाला सांगितले आहे. पुढारी आणि सामान्य कार्यकर्ते यांच्यामध्ये युद्धच चाललेले असते, असा एक लाल-प्रवाद उठवून देण्याची कला संपादकांना प्राप्त झाली आहे. आणि ते याचा पुरा उपयोग करीत आहेत. **अशोक मेहतांना** बदनाम करून सामान्य कार्यकर्त्यांना उगीचच गोंजारण्याचे हे नाटक निष्फळ आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा कट्टर विरोध असेल तर कोणताही पुढारी असा करार करू शकणार नाही. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनला समाजवादी पक्षाने सर्वसाधारण मतदार संघातील आपल्या खात्रीच्या अशा जागा देऊन तेथील आपले उमेदवार मागे घेतले आहेत. कार्यकर्त्यांच्या मान्यतेवाचून असले निर्णय घेतले जाऊ शकत नाहीत. वस्तुतः असला करार यशस्वी करणे हे सामान्य कार्यकर्त्यांवरच अवलंबून असते. या दोन पक्षांतील कार्यकर्त्यांना एकत्र कार्य करण्याची, एकमेकांना जवळून पाहण्याची संधी आली आहे. महाराष्ट्राच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने ही गोष्ट आम्हाला विशेष महत्वाची वाटते.

## जीनावादी राजकारण नाही

**आंबेडकरांच्या** अनुयायांचा एक साचेबंद गट आहे. आणि तो **आंबेडकरांवर** डोळे मिटून विश्वास ठेवतो, असा एक आक्षेप आहे. **आंबेडकरांचे** अस्पृश्यांमधील एकमेव नेतृत्व **अशोक मेहतानी** मान्य केले ही त्यांची तात्त्विक चूक असून त्यामुळे राष्ट्राचे साफ वाटोळे होणार, अशी काही लोकांनी हाय खाल्ली आहे. पण अशी हाय खाण्याचे त्यांना कारण नाही. **आंबेडकरांच्या** पक्षातील कार्यकर्ते त्यांच्याशी वादविवाद करू शकतात, पण **आंबेडकरांचे** व्यक्तिमहात्म्य त्यांच्या समाजात अफाट आहे. ते त्या समाजाच्या मागासलेपणाप्रमाणेच **आंबेडकरांच्या** कर्तृत्वाचेही फळ आहे. त्यामुळे अस्पृश्य समाजाकडे जातांना **आंबेडकरांना** डावलून चालणारच नाही. अस्पृश्य समाजाचे नेते **आंबेडकर** आहेत ही वस्तुस्थिती आहे. ती गोष्ट मान्य केल्यामुळे आकाश कोसळून पडत नाही. मान्य न करण्याने वस्तुस्थिती बदलत नाही. मान्य न करणारा हट्टवादी आहे. दुर्धर अहंकारी आहे, एवढेच म्हणता येईल. **जीनाच्या** नेतृत्वाचे काही गुण **आंबेडकरांच्या** अंगी आहेत, ही गोष्ट खरीच आहे. पण आज **आंबेडकरांच्या** राजकारणाची **जीनाच्या** राजकारणाशी तुलना करणे हे हास्यास्पद आहे. कारण आजच्या परिस्थितीत **आंबेडकरांची** इच्छा असली तरी ते **जीनांचे** राजकारण खेळू शकत नाहीत. **महात्मा गांधींनी**

उपवास करून अस्पृश्यांना संयुक्त मतदार संघ मान्य करावयाला भाग पडले आणि ब्रिटिशांच्या कुटिल नीतीपासून हिंदूना वाचवले हे त्यांचे महदुपकार आहेत. पण हा करार नाखुशीने का होईना पण अखेर **आंबेडकरानी** मान्य केला. याचे श्रेय त्यांना देण्याइतके सौजन्य दाखवाल की नाही ! आज सर्वत्र संयुक्त मतदार संघ आहेत आणि अस्पृश्यांसाठी असलेल्या राखीव जागा दहा वर्षांनी नष्ट होणार आहेत. या पार्श्वभूमीवर **आंबेडकरांच्या** राजकारणाचा विचार केला तर त्यांचे राजकारण **जीनांच्या** वळणावर जाऊं शकत नाही, हे स्पष्ट होईल. दहा वर्षांनी राखीव जागा नष्ट होणार आणि अस्पृश्य उमेदवारांना सर्वसाधारण लोकांच्या मतावरच अवलंबून रहावे लागणार आहे. यासाठी **आंबेडकरांच्या** पक्षाला सर्वसामान्य लोकांशी संपर्क वाढविणे अवश्यकच आहे.

## सहकार्याची गरज

आतांपर्यंत राखीव जागांत **आंबेडकरांच्या** उमेदवारांना पाडून काँग्रेसचे उमेदवार इतर मतांच्या जोरावर निवडून येत, यावेळीही काँग्रेसचा डाव तयार होता. पण शे. का. फे. आणि समाजवादी यांची एकजूट झाल्याने तो डाव साधणार नाही. काँग्रेसला त्याचे वैशम्य वाटले तरी त्यामुळे अन्याय नष्ट झाला आहे. केवळ महाराष्ट्राच्या दृष्टीने समाजवादी आणि शे. का. फे. यांच्या सहकार्याचे आम्हाला अधिक मोल वाटते. महाराष्ट्रातील समाज जातीयतेने भंगलेला आहे. स्पृश्य हिंदू निरनिराळ्या पक्षांच्या झेंड्याखाली एकत्र येऊं शकतात. पण अस्पृश्य समाज वेगळाच पडतो. त्यासाठी **आंबेडकरांच्या** नांवाने मनगटे चावून काही फायदा नाही. अस्पृश्य आणि स्पृश्य हे एक दिलाने राजकारणांत वागू शकतात एवढी गोष्ट या कराराने साधणार असेल तर एकंदर महाराष्ट्रीय राजकारणावर त्याचा खोल परिणाम होईल. महाराष्ट्राचे भवितव्य उज्वल बनेल. स्पृश्यास्पृश्यांचे सहकार्य केवळ राजकारणापुरते असून चालणार नाही. त्याने जीवनाच्या अनेक शाखा व्यापल्या पाहिजेत. पण अस्पृश्य समाज हा राजकीय दृष्ट्या अतिशय जागृत आणि म्हणूनच अभेद्य असा झालेला आहे. म्हणूनां त्याच्याशी होणाऱ्या सहकार्याची सुरुवात ही राजकीय सहकार्याने होणे अपरिहार्य आहे. या समाजाशी सहकार्य करायचे नाही आणि आपल्या हाती असलेल्या राजकीय सत्तेच्या जोरावर त्याला डावलायचे असे धोरण ठेवले तर त्याचा परिणाम काय होईल ? तो समाज अधिक चिडेल, नैराश्याने अधिक बेभान होईल. समाजवादी आणि शे.का.फे. यांच्या सहकार्याबद्दलच्या टीकाकारांना उद्देशून डॉ. आंबेडकरांनी उच्चारलेले एक वाक्य मोठे भेदक आहे. ते म्हणाले, "मी जातीने अस्पृश्य आहे, म्हणून राजकारणातही अस्पृश्य रहावे, असे लोकाना वाटते काय ?"

## तात्विक दृष्टी

समाजवादी पक्षाने शे. का. फे. शी जे सहकार्य केले त्यामागे एक तात्विक दृष्टी आहे, असे त्यांचे नेते सांगतात. कराराच्या टीकाकारांनी तिच्याकडे ढुंकूनही

पाहिले नाही. हे त्यांच्या विकृत मनोवृत्तीचे द्योतक आहे. शेड्यूल्ड कास्ट आणि शेड्यूल्ड टोळ्या या मागासलेल्या आहे. त्यांचे दास्य केवळ आर्थिक नसून सामाजिक सांस्कृतिकही आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये "जातीय" वृत्ति अपरिहार्यपणे आहे. पण येथील पुरोगामी समाजवादी चळवळीला भवितव्य असेल तर या जमातींना त्या चळवळीने आपलेसे केलेच पाहिजे. अस्पृश्य आणि वन्य जमाती यांचेही हीत हा समाजवादी चळवळीचा गाभा आहे. समाजाच्या पुनर्रचनेचा प्रश्न ज्यांना हाती घ्यावयाचा आहे ते या जमातींना टाळू शकत नाहीत. शे. का. फे. शीं झालेला करार हा केवळ निवडणुकीपुरता नाही, असे ज्यावेळी समाजवादी नेते म्हणतात त्यावेळी त्यांना हा अर्थ अभिप्रेत असतो. आणि तसा तो असेल तर ही तात्विक दृष्टी मोलाची आहे. शे. का. फे. आणि समाजवादी पक्ष यांच्यामध्ये काही धोके आहेत. केवळ स्वार्थी दृष्टीने ते पक्ष या कराराकडे पहात नसतील असे आम्ही म्हणत नाही. पण निवडणुकीनंतर हा स्वार्थ नाहीसा होईल आणि त्यावेळीच या कराराच्या खऱ्या कार्याला सुरवात होईल. इतक्या उच्च दृष्टीने या करारांचे पालन झाले तर तो क्रांती कारक ठरेल. व्यवहार मोठा कठीण असतो. **आंबेडकरांना** आतापर्यंत राजकारणांत जी वागणूक मिळाली आहे त्यामुळे ते कडवट बनले आहेत. आपल्या विद्वत्तेची आणि बुद्धिमतेची जाणीव असल्यामुळे त्यांच्या स्वभावांत दर्प असला तर तो सहाजिकच आहे. अशा नेत्याशी सहकार्य करण्याचा प्रयत्न करणे ही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी असामान्य आत्मविश्वास असायला पाहिजे. समाजवादी नेत्यांनी हा आत्मविश्वास आपल्या कृतीने प्रकट केला आहे. आपली तात्विक दृष्टी अढळ ठेऊन ते वागतील तर ते नवा इतिहास निर्माण करतील. अर्थात यासाठी शे. का. फे. च्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे सहकार्य हवेच ते देणे परिस्थितीने त्यांना अपरिहार्य केले आहे. करार कसा पाळला जातो यावर त्याचे भवितव्य अवलंबून आहे. करार आशादायी आहे."
नवशक्ति, अग्रलेख–२९–११–'५१ गुरुवार).

**पं. नेहरूजींनी** चौपाटीच्या भाषणात **आंबेडकरांच्या** मुद्यांवर जी उत्तरात्मक टीका केली तिला **आंबेडकरांनी** विनोदपूर्ण उत्तर दिले होते. त्या संबंधी नवशक्तीने खालील स्फुट लिहीले होते. ते असे—

## विनोदी उत्तर

काँग्रेस सरकारने अस्पृश्यांच्या हिताकडे दुर्लक्ष केले हा आरोप खोटा आहे. असे **पं. नेहरुंनी** रागारागांत चौपाटीवरच्या सभेत जाहीर केले **नेहरूंच्या** या उत्तराला डॉ. आंबेडकरांनी दिलेले उत्तर मोठ मार्मिक आहे. ते म्हणाले "हा माझा किंवा **नेहरूंच्या** मताचा प्रश्न नाही. वस्तुस्थितीचा प्रश्न आहे. सरकारने एक पत्रक काढून आपण अस्पृश्यांसाठी काय केले हे जाहीर केले की मला आपोआप उत्तर मिळेल" भारत सरकारने असे एखादे पत्रक काढल्याचे माझ्या वाचनांत नाही. पण

भारत सरकारचे एक मंत्री **श्री. काकासाहेब गाडगीळ** यांनी आंबेडकरांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. **काकासाहेब** म्हणाले की, सिद्धार्थ कॉलेजला सरकारने केलेली मदत आंबेडकर विसरलेले दिसतात. आता काय म्हणावें? काकासाहेब विनोदी वक्ते म्हणून ओळखले जातात. हे उत्तर देतांना त्यांना विनोदाची लहर आली होती असा माझा कयास आहे. कारण सिद्धार्थ कॉलेजात अस्पृश्य विद्यार्थ्यांना सवलती आहेत हे खरे. पण ते सर्व विद्यार्थ्यांना खुले आहे. आज त्याचा फायदा घेणारे बहुसंख्य विद्यार्थी स्पृशच आहेत. तेव्हां त्या कॉलेजला दिलेली मदत अस्पृश्याना मदत असे कसे म्हणता येईल? की हे कॉलेज **आंबेडकरानी** काढले म्हणून तसे म्हणावयाचे!' (नवशक्ति–काल प्रवाह २१–११–५१).

यानंतर सुमारे दोन आठवड्यांनी श्री. **काकासाहे गाडगीळ** यांच्यासंबंधी एक बातमी प्रसिद्ध झाली होती. फारशी महत्वाची नाही. परंतु तींत बाबासाहेबांच्या नावाचा उल्लेख आहे. तो कॉंग्रेसमधील दोन थोर व्यक्तीनी निरनिराळया भावनेने केलेला असल्यामुळे ती बातमी मी येथे उधृदत करीत आहे ती अशी :–

## "काका देता थापा सकलांसी"

पुणे मंगळवार– "काका गाडगीळ थापा देतात हा माझा पंधरा वर्षाचा अनुभव आहे. आज पंधरा वर्षांनी ही गोष्ट माझ्या ध्यानांत आली. काकासाहेब गाडगीळ थापा देतात हे मीच म्हणतो असे नाही तर त्याला देवगिरीकर हिरेहि पाठिंबा देतील" असे उद्गार श्री. **केशवराव जेधे** यांनी येथील सभेत काढले. याला पुरावा देताना श्री. केशवराव जेधे यांनी एक घटना सांगितली. ते म्हणाले, "दिल्लींत एका चहापान प्रसंगी काकानी महाराष्ट्रीय मंत्र्यांवर दृष्टि ठेवून ओवी केली ती अशी :–

चिंतामणी देई अर्थ। भीम सांगे परमार्थ ॥
नरहरी देई सामर्थ्य (वीज) सकलासी ॥

ही औवी ऐकून देवगिरीवर–हिऱ्यांनी दुसरी एक ओंवी त्याला उत्तर म्हणून केली. ती पुढील प्रमाणे :–

चिंतामणी झाला रंक। भीम करी तो शंख ॥
काका देतो थापा। सकलासी ॥ (नवशक्ति बुधवार–५–१२–५१ पां. १)

शेतकरी कामकरी पक्ष आणि शे. का. फे. यांच्यात सोलापूर जिल्ह्यातील जागेसाठी करार झालेला आहे अशी घोषणा **श्री. शंकरराव मोरे** यांनी सोलापूर जिल्हयातील एका निवडणुकीच्या प्रचार सभेत केली. त्यामुळे जिल्ह्यांतील शे. का. फे. चे कार्यकर्ते आणि समाजवादी पक्षाचे पुढारी याच्यात गोंधळ उडाला. या बाबातीत विचार विनिमय करण्यासाठी हे लोक बाबासाहेबांना भेटण्यास जात आहेत, अशा बातम्या २९–११–५१ च्या नवशक्ति १ व ४ पानावर छापल्या होत्या.

**बाबासाहेबांशी** चर्चा केल्यानंतर फेडरेशनने शे. कां. पक्षांशी मर्यादित स्वरुपाचा करार केला असा खुलासा जाहीर करण्यांत आला. पण हा खुलासा प्र. सो. पक्षाला पटला नाही. या संबंधी **श्री. मधु लिमये,** संयुक्त चिटणीस प्र. सो. पक्ष मुंबई यांचे पत्रक ५–१२–५१ बुधवारच्या नवशक्तित (पा. १ व ४) प्रसिद्ध झाले होते. त्यांत त्यांनी शे. कां. पक्षाला जास्त स्पष्टीकरण करण्यांस विनंती केली होती. व समाजवादी पक्ष शे. कां. फे. शी झालेला करार पाळील असे आश्वासन दिले होते. ते पत्रक असे.

**"शे. कामगारी पक्षांशी मर्यादित सहकार्य कां केलेत ? शे. का. फेडरेशनच्या नेत्यावरच खुलाशाची जबाबदारी–मधु लिमये यांचे मत.**

समाजवादी व शे का. फे. यांच्या सहकारासंबंधी काढलेल्या या पत्रकांत **मधु** लिमये म्हणतात "आपल्या देशांतील वर्गक्रित जमाती व अन्य जमाती यांच्या संस्थाकडे दोन दृष्टींनी पाहता येईल. एक म्हणजे या संघटना वर्गीय व प्रतिगामी असल्यामुळे त्याकडे अजिबात लक्ष न देणे. दुसरी दृष्टी अशी की, या वरवर दिसणाऱ्या प्रतिगामित्वासाठी आमच्या समाजातील एका दबल्या गेलेल्या पीडित गटाची क्रांतिगर्भ असंतुष्टता दडलेली आहे, हे लक्षात घेऊन त्यांना समाजवादी चळवळीत आणण्याचा प्रयत्न करणे.

## सहमताचे मुद्दे

शे. का. फे. च्या पुढाऱ्यांशी बोलणे केल्यानंतर असे आढळले की सामाजिक व आर्थिक बाबतींत तावडतोबिच्या क्रांतिकारक सुधारणा व लोकशाहीवर श्रद्धा यासारख्या अत्यंत महत्वाच्या मुद्यावर आमचे एक मत होत आहे. कम्युनिस्ट व जातीयवादी यांना बाजूला सारुन कॉंग्रेसच्या विरुद्ध एक पुरोगामी आघाडी निर्माण करणे हे समाजवादी पक्षाचे नेहमीचेच धोरण होते.

## शे. का. प. व समाजवादी

शेतकरी कामगार पक्षाने आपल्या कुप्रसिद्ध दाभाडी प्रबंधामध्ये कॉमिन्फॉर्मचे आदेश मानण्याचे ठरविले म्हणून ती एक कम्युनिस्टांचीच आघाडी असे समजून समाजवादी पक्षाने त्यांच्याशी अगोदर खंडाळा येथे केलेला करार मोडला. डॉ. **आंबेडकरांचेही** हेच मत होते, हे काही त्यांनी समाजवादी प्रतिनिधींना खाजगी रीतीने सांगितले नाही. तर नाशिकला प्रकट मेळाव्यात त्यांनी हे बोलावू दाखविले. त्या भाषणाचे प्रतिवृत्त यु. प्रे. इ. ने दिलेच होते.

## मूळ भूमिका सोडली

यानंतर शे. का. फे. ने ही आपली भूमिका सोडली आणि शे. का. पक्षाच्या कांही उमेदवारांना पाठिंबा देण्याचे ठरविले. आम्हाला ही गोष्ट माहीत होती. पण त्याला आमची संमती कधीच नव्हती.

**श्री. गायकवाड** म्हणतात की, शे.का. पक्षाच्या काही नेत्यांनी आम्ही कम्युनिस्ट नसून महान समाजसुधारक **ज्योतिबा फुले** यांचे अनुयायी आहोत असे सांगितले, म्हणून आम्ही हे सहकार्य दिले. फेडरेशनला हे स्पष्टीकरण समाधानकारक वाटत असले तरी समाजवादी पक्षांतल्या फार थोड्यांना ते स्वीकारार्ह वाटते. आमची श्री. राऊत वा श्री. जेधे यांच्याविरुद्ध वैयक्तिक अशी कोणतीच तक्रार नाही पण शे. का. पक्षाला कॉमिन्फॉर्म गटात ओढणाऱ्या मोरे–खाडिलकर गटाने त्यांना आपल्या हातची खेळणी म्हणून कसे वापरले हे आम्हांला माहीत आहे.

## राजभोजाचे समर्थन

श्री. राजभोज असे म्हणतात की, दिल्ली येथे समाजवाद्यांनी आम्हाला जी यादी दिली त्या खेरीज इतर ठिकाणी उभ्या असलेल्या शे. का. पक्षाच्या उमेदवारांनाच आम्ही पाठिंबा देत असल्याने शे का. फे. या समाजवाद्यांशी झालेला करार कायम आहे. त्यावेळी आम्ही लोकसभेच्या उमेदवारांची चर्चा केली नाही हे खरे.

पण समाजवादी उमेदवारांना बाजूला सारून लोकसभेसाठी शे. का. पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा देणे हे करारा मागील भावनेशी विसंगत आहे, कारण तो केवळ एखाद्या यादीचा प्रश्न नसून तत्वाचा प्रश्न आहे.

## स्पष्टीकरण द्या

शे. का. पक्ष कॉमिन्फॉर्मवरील निष्ठा टाकील तर आम्ही समाजवादी पक्षीयही त्यांना समान धर्मी म्हणून मानण्यास तयार आहोत. पण दुर्दैवाने वस्तुस्थिती तशी नाही. तेव्हा त्या पक्षाशी शे. का. फे. ने जे मर्यादित सहकार्य केले आहे त्याचे स्पष्टीकरण आम्ही द्यावयाचे नसून फेडरेशनच्या नेत्यांनी द्यावयाचे आहे. असे असले तरीही समाजवादी पक्षाने शे. का. फे. ला जे वचन दिले आहे ते तो पाळील. आणि त्यांच्या राखीव व सर्वसाधारण जागांसाठी मनःपूर्वक काम करीत राहील.' [ नवशक्ति बुधवार, ५–१२–५१ पा. १ व ४ ]

**श्री. श्रीप्रकाश** मिनिस्टर फॉर नॅचरल रिसोर्सेस ॲंड सायंटीफिक रिसर्च गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, यानी जयपूर येथे २९–११–५१ ला भाषण करताना **आंबेडकरांनी** काँग्रेस पक्षीयावर केलेल्या आरोपाना उत्तरे दिली. त्याचा वृत्तांत ३०–११–५१ च्या टाईम्समध्ये "Permit holders and Elections — Rajainder to Dr. Ambedkar" या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेला होता. **आंबेडकरांनी** जे निर्बंधाचे नियम तयार केलेले होते त्यामुळे मोटारीचे लायसेन्स व रेडिओचे लायसेन्स असलेल्या व्यक्तींना निवडणुकीचे उमेदवार म्हणून उभे राहता येणार नव्हते म्हणून काँग्रेस पक्षीयांनी त्या नियमाविरूद्ध तक्रारी केल्या. सर्व पक्षीयांस पसंत पडतील असे नियम असावेत असे मी **आंबेडकरांना** सांगितले होते. असा श्री. श्रीप्रकाश यांच्या भाषणाचा मथितार्थ होता.

**बाबासाहेबांची** निवडणूक प्रचारासाठी, पुण्यात डिसेंबर–१९५१ च्या पहिल्य आठवड्यात ४–५ दिवस व्याख्याने देण्याचे जाहीर झाले. तेव्हा पुणेकरांनी त्यांन दहा हजारांची थैली अर्पण करण्याचे जाहीर केले. खडकी–देहू येथील अस्पृश्य काम गारांची युनियन **बाबासाहेबांच्या** हस्ते चालू करण्याचेहि जाहीर करण्यात आले [ नवशक्ति, ३०–११–५१ ].

शे. का. फे. व समाजवादी यांचा निवडणूक करार झाल्यानंतर फेडरेशन आणि शे. का. पक्ष यांच्यात निवडणूक करार झाला. यामुळे समाजवादी पक्षाच्या उमेदवाराना फेडरेशनच्या अनुयायी मतदारांचा पाठिंबा मिळेल की नाही अशी शंका उत्पन्न झाली या शंकेचे निरसन श्री. **भा. कृ. गायकवाड** यांनी पुण्यात ३० नोव्हेंबरला केले. ज्य मतदार संघात समाजवादी पक्ष आणि शे. का. पक्ष यांचे उमेदवार निवडणुकीसाठी उभे राहतील त्यांना फेडरेशनचे अनुयायी मतदार मते देतील, असे ते निरसन होते. पुणे जिल्ह्यात श्री. **एस. एम. जोशी** हे समाजवादी उमेदवार, श्री. **न. वि. गाडगीळ** हे काँग्रेसचे उमेदवार आणि श्री. **के. एम. जेधे** हे शे. का. पक्षाचे उमेदवार होते यापैकी फेडरेशनच्या पाठिंब्यामुळे श्री. **एस. एम. जोशी** यांचे आसन डळमळीत दिसू लागले. या परिस्थितीमुळे समाजवादी पक्षाने फेडरेशन व शे. का. पक्ष यांच्य कराराविरुद्ध जोराची हाकाटी केली. शे. का. पक्ष मार्कसिस्ट विचारांचा असला तरी कम्युनिस्ट पक्षापासून अलग आहे. शे. का. पक्ष महात्मा फुले यांच्या सामाजिक तत्वज्ञानाचा पाईक आहे, तसा फेडरेशन पक्षही आहे. या समस्येमुळे दोन्ही पक्षांत करार झाला तो योग्य होय. असा श्री. **शंकरराव मोरे** यांनी खुलासा केला. याबद्दलचा सर्व वृत्तांत १–१२–५१ च्या टाईम्समध्ये प्रसिद्ध झाला होता.

या करारासंबंधीची बातमी २–१२–५१ च्या विविधवृत्ताच्या पहिल्या पानावर प्रसिद्ध झाली होती ती अशी :–

" मुंबई राज्यांत शेड्युल्ड कास्ट फेडरेशनने शेतकरी–कामकरी पक्षाशी पुणे, कुलाबा, सोलापूर व उत्तर सातारा येथील लोकसभेच्या निवडणुकीबाबत त्या पक्षाला पाठिंबा देण्याचा करार केला आहे. यामुळे पुणे येथे श्री. **केशवराव जेधे**, कुलाबा येथे श्री. **आर. बी. राऊत** व सोलापूर येथे श्री. **शंकरराव मोरे** व उत्तर सातारा येथे श्री. **आर. एम. नलावडे** या शेतकरी कामकरी पक्षाच्या उमेदवारांना शे. का. फेडरेशची मते मिळणार आहेत. या मतदार संघात सोशालिस्ट उमेदवार उभे आहेत. डॉ. **आंबेडकरांनी** सोशालिस्ट पक्ष आणि शे. का. पक्ष यांचे पितळ साफ साफ उघडे पाडले. याबद्दल त्यांना धन्यवाद ! "

या करारांच्या बाबतीत २–१२–५१ च्या विविधवृत्तात आलमगीरने खालील विचार प्रदर्शित केले होते :–

## " सोशालिस्ट- शे. का. फे. युती"

काँग्रेसची मिरासदारी मोडून टाकण्यासाठी निर्भेळ लोकशाहीच्या तत्वावर वरील स्वतंत्र उमेदवार संघटीत झाले आहेत, आणि निवडणूकीचे कार्यहि त्यांनी संघटीतपणे सुरू केले आहे, पण निर्भेळ लोकशाहीच्या तत्वावर जशी ही संघटना मुंबईत झाली आहे. त्याचप्रमाणे राजकीय हेतूसाठी मुंबईत व इतरत्रही अशीच एक पक्षीय संघटना अलिकडे घडून आली आहे. काँग्रेसवाल्यांचे पित्त जरी यामुळे खळखले असले तरी इतर नागरिकही काही कमी स्तिमित झालेले नाहीत. ही दुसरी संघटना म्हणजे सोशालिस्ट व डॉ. **आंबेडकर** यांच्या शे. का. फेडरेशनची झालेली युती ही होय. **डॉ. आंबेडकर** हे व्यवहारी राजकारणाचे पुरस्कर्ते असल्यामुळे या युतीमुळे सोशालिस्ट पक्षाला आपल्या पक्षाच्या राजकारणाला जखडून टाकण्यांत त्यांना यश मिळाले याबद्दल कोणीही डॉ. **आंबेडकरांच्या** मुत्सदीपणाचे कौतुकच करील. पण डॉ. **आंबेडकरांचा** विजय तो सोशालिस्टांचा विनाश असेही समीकरण आता त्यामुळे मांडता येणार नाही काय ? **ही युति मुंबईत श्री. अशोक मेहता हे निवडणूक यावेत म्हणून जरी झाली असली आणि तिच्या मुळाशी जरी अशोक मेहतांचा वैयक्तिक स्वार्थ असला तरी सोशालिस्टांचा हा स्वार्थ आंबेडकर पक्षीयांना कितपत मानवेल याची मला शंकाच आहे. कारण या करारामुळे आंबेडकर पक्षीयांना ज्या जागा सर्वसाधारण मतदार संघात विनासायास व हमखास मिळाल्या असत्या, त्या त्यांच्याकडून हिसकून घेण्यांत आल्या आहेत. व केवळ राखीव जागावरच त्यांना संतुष्ट राहावे लागत आहे. तथापि स्वार्थ असावा, तरी तत्व म्हणून काही तरी असतेच की नाही.**

या दोन्ही पक्षांच्या तात्विक बैठकीमध्ये जमीन अस्मानचे अंतर असून शे. का. फे. चे जे अन्न तेच सोशलिस्टाचे विष आहे. मग सोशालिस्ट पक्ष ते विष अन्न म्हणून पचविणार की, अन्नान्न करीत पक्षविसर्जन करणार? सोशालिस्टाचा जातीयतेला तीव्र विरोध आहे. तर शे. का. फेडरेशन ही संघटना जातीय आहे. सोशालिष्टाचे परराष्ट्रीय धोरण अमेरिका विरोधी आहे. तर डॉ. **आंबेडकर** भारताच्या आर्थिक उद्धारासाठी का होईना पण अमेरिकेच्या आश्रयाला जाऊ इच्छितात. चीन हिंदुस्थानला खाऊन टाकील अशी भीती डॉ. **आंबेडकर** यांना वाटते, तर चीनमधील समाजसत्तावादी प्रयोगाचे सोशालिस्ट स्वागत करतात आणि हा प्रयोग स्टॉलिनच्या हुकमतीखाली चालू असून तो स्वतंत्र आहे असे जीव तोडून सांगताना आढळतात. काश्मिरची फाळणी डॉ. **आंबेडकरांना** मान्य आहे. तर सोशालिस्ट या पाहणीच्या विरुद्ध आहेत. असे अनेक तात्विक विरोध या उभयतांमध्ये असतांना हे ऐक्य कसे होऊ शकले व ते किती काळ टिकण्याचा संभव आहे ?

शिवाय महत्वाच्या तात्विक मतभेदाची सांगड घालून एक भूमिकेवर या उभयतानाही येता येईल असे म्हणावे, तर सोशलिस्टाना जो पक्ष वैऱ्यासारखा वाटतो त्या कम्युनिस्ट व शेतकरी कामकरी पक्षाशीही असेच संगनमत डॉ. आंबेडकर यांनी आपल्या पक्षाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात करून सोशालिस्टाच्या उरावर सवत आणण्याचा बोलावा झाला आहे. ह्या परिस्थितीत आंबेडकरांच्या घरात सोशालिस्टाची नांदणूक तरी कशी होणार? राजकारणात देवाणघेवाण होते आणि 'त्वयार्थ मयार्थम' या न्यायने जमाखर्चही मांडला जातो. पण अंशाला छेद देऊन भोपळा पुढे करण्यात आल्याचे उदाहरण कोठेच घडून आलेले नाही. पण त्याचाही खेद आता करण्याचे तसे फारसे कारण नाही. कारण डॉ. आंबेडकरांचा इंगा सोशालिस्ट साथीवरुन फिरु लागल्याचे व आंबेडकरांच्या जरबेखाली सोशालिस्टांच्या माहेरच्या वढाया वितळू लागल्याचे पुरावे मिळू लागले आहेतच? कारण साथी जोशी यांनी परवाच काश्मिरची फाळणी आपल्याला अपरिहार्य म्हणून पत्करली! असे उद्गार काढले तर अशोक मेहता हेही 'रचनात्मक बदल व व्यवहारिक तडजोड' (Structural changes and functional adjustments) असा शब्दछळ करून ऐक्याचे समानशीलत्व प्रतिपादन करू लागले आहेत. अंतर्गत धोरणाच्या व्यक्तीखेरीज परराष्ट्रीय धोरणाच्या पडद्यावर सिनेमा दाखविता येणार नाही. असेही काही तरी ते आता म्हणू लागले आहेत. कांही का असेना! हा नवा सिनेमा मात्र चांगलाच स्टंटपट झाला आहे. एवढी गोष्ट खरी आणि या स्टंटपटात डॉ. आंबेडकरांची भूमिका टारझनची आहे हेही कोणाला विसरता येणार नाही."

अ. भा. सोशालिस्ट पक्षाचे संयुक्त चिटणीस मधु लिमये यांनी ठाकुरद्वारला भरलेल्या निवडणूक प्रचार सभेत भाषण करताना सांगितले की, अस्पृश्य वर्ग वन्य, जमाती आणि दलित लोक हे समाजवादी पक्षात आले तर समाजवादी चळवळीची शक्ती वाढेल, आणि हे घडवून आणण्यासाठीच समाजवादी पक्षाने शे. का. फेडरेशन व आदिवासी महासभा यांच्याशी निवडणूक करार केले. शे. का. पक्षाशी करार करून फेडरेशनने समाजवादी चळवळीला तोंडघशी पाडले नसले तरी तिच्या मार्गात अडथळे उत्पन्न केले. अशा अर्थाचे उद्गार साथी लिमये यांनी काढले; याबाबतीत फेडरेशनचे पुढारी यांनीच खुलासा करणे जरूर आहे. असेही ते म्हणाले. [ नवशक्ती ३-१२-५१ ]

**नेहरुंचे** परराष्ट्रीय धोरण देशाला हितवाह आहे. समाजवादी आणि शे. का. फेडरेन हे त्याबद्दल टीका करतात व त्यांनी निवडणूक करार केलेला आहे. हे बरे दिसत नाही. असे श्री. मधुकर सबनिस यांनी ४-१२-५१ च्या टाईम्समध्ये पत्र ("Mystifying the Voter") लिहून मत प्रदर्शित केले. फेडरेशन काश्मीरची

फाळणी करावयास आणि अमेरिकेला परराष्ट्र धोरणात जवळ करण्यास तयार आहे. समाजवादी पक्षालाही ही भूमिका पसंत असणे शक्य नाही तरीही त्यांनी फेडरेशनशी निवडणूक करार करून मतदारांना संभ्रमात टाकलेले आहे, असे श्री. सबनीसाचे म्हणणे होते.

साथी **लिमये** यांनी दुसऱ्या एका सभेत भाषण करताना फेडरेशनच्या पुढाऱ्यावर दुटप्पीपणाचा आरोप केला. फेडरेशनने शे. का. पक्षाबरोबर करार केल्यामुळे त्या पक्षाच्या लोकसभेसाठी उभे राहिलेल्या उमेदवारांची बाजू मजबूत झाली व समाजवादी उमेदवारांची बाजू लंगडी झाली, असा सर्वत्र अंदाज करण्यात आला, असे **लिमयांनी** मत प्रदर्शित केले [ टाईम्स ५–१२–५१ ]

समाजवादी पक्ष आणि शे. का. फे. यांच्या कराराविरुद्ध काँग्रेस पक्ष आणि इतर पक्ष यांच्याकडून निरनिराळ्या निवडणूक सभामधून टीकेची झोड उठलेली पाहून दोन्ही पक्षाविरुद्ध लोक मत कलुषित होण्याचा संभव उत्पन्न झाला. अशी परिस्थिती चालू राहिली तर दोन्ही पक्षाच्या उमेदवारांच्या निवडणूकीवर अनिष्ट परिणाम होईल हे उघड होते. यातच शे. का. पक्ष व शे. का. फे. यांच्यामधील करारामुळे समाजवादी पक्षाला विशेष काळजी वाटू लागली. तेव्हा या सर्व घटनाबद्दल लोकमत अनुकूल करण्यासाठी समाजवादी, शे. का. पक्ष व शे. का. फे. आपपल्या सभातून व वर्तमान पत्रातून स्पष्टीकरणे मांडू लागले. समाजवादी पक्षातर्फे ५–१२–५१ (बुधवार) च्या नवशक्तीने अग्रलेख लिहून आपल्या पक्षाची बाजू जनतेसमोर मांडली ती अशी :–

## " फुंकरीने हा ऐक्य दीप विझणार नाही,

युद्धात हातचे शस्त्र गळण्यापेक्षा आत्मविश्वास गळून पडणे अधिक घातक असते. समाजवादी व शे. का. फे. कराराने या उभय पक्षांना निवडणुकीमध्ये थोड्या जास्त जागा मिळावयाच्या असतील तर मिळतीलच. परंतु त्यांच्या एकजुटीने विरोधकांचे, विशेषतः काँग्रेस जनाचे धैर्य साफ खचले आहे. असे वाटू लागले. म्हणूनच त्यांनी या कराराविरुद्ध वाटेल तसा खोटानाटा गहजब चालविला आहे. पूर्वी समाजवाद्यांच्या नावाने उल्लेखही न करणारे पं. नेहरू आपल्या अखिल भारतीय दौऱ्यात समाजवाद्याया सामर्थ्याचे दर्शन झाल्याबरोबर ' मी समाजवादीच आहे. समाजवादी पक्षाजवळ चांगला कार्यक्रम आहे ते जर प्रत्यक्ष कार्य करतील तर मग त्यांच्या समवेत कार्य करण्यास (मी) तयार आहे. अशी अजीजीची भाषा वापरू लागले आहेत. मुंबईत समाजवादी सुद्धा आपल्या इतकीच गर्दी आकर्षित करू शकतात. त्रावणकोर–कोचीनमध्ये काही ठिकाणी ते आपल्यावर ताण करतात याची जाणीव झाल्यानंर नेहरुंनी पवित्रा बदलला असावा. समाजवादी शे. का. फे. युतीने समाजवादी चळवळीचे सामर्थ्य अधिकच वाढणार असल्यामुळे पं. नेहरूंपासून खालपर्यंतचे, सर्वच काँग्रेसजन अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे. त्यांची मनोव्यथा आम्ही समजू

शकतो. परंतु यातही काही व्यक्तींनी व वृत्तपत्रांनी जो बेछुट थयथयाट चालविला आहे, त्यामुळे उद्वेग आल्याशिवाय रहात नाही. सभोवतीली अंधार पसरला असताना समाजवादी व शे. का. फे. युति हाच एक ऐक्याचा दीप तेवत आहे असे श्री. अशोक मेहतानी जे उद्‌गार काढले त्यांत बराच अर्थ आहे. काँग्रेस म्हणजे फूटाफूट असे आज समीकरण होऊन बसले आहे. काँग्रेसची शकले झाली नाहीत असा एकही प्रांत, जिल्हा, तालुका किंवा गाव दाखविता येणार नाही. पंजाब, बंगाल, मद्रास, उत्तर प्रदेश यांची उदाहरणे सोडली तरी खडकाप्रमाणे अभंग समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र काँग्रेसलासुद्धा खिंडारे पडू लागली आहेत. हे काकासाहेब गरुड, हिरालाल कल्याणी आदींच्या राजिनाम्याने दिसून येईल. या सोडकाँग्रेसवाल्यांचा प्रश्न सोडला तरी शिल्की काँग्रेस तरी एकजिनसी आहे काय? परराष्ट्र धोरण, नियंत्रणे, आर्थिक प्रश्न या सारख्या महत्वाच्या मुद्यावर काँग्रेस वरिष्ठांचे एकमत आहे काय?

## कम्युनिस्ट धार्जिणे काँग्रेस

या कराराविषयी आक्रंदन करणाऱ्याचा आणखीहि एक वर्ग आहे. हे लोक स्वतःला काँग्रेसवादी म्हणवत असले तरी ते शेळीचे कातडे पांघरुन मोठ्या धूर्तपणे काँग्रेसच्या कळपात शिरून आपला इच्छित कार्यभाग साधत आहेत. दलित वर्ग व आदिवासी जनतेची सुप्त विश्वामित्री शक्तीची प्रत्यंचा लोकशाही समाजवाद्यांच्या धनुष्यावर न चढता कम्युनिस्टांच्या कच्छपी जावी अशी यांची आंतरिक इच्छ आहे. समाजवादी पक्षाचे शे. का. फे. आदिवासीमहासभा व आसामांतील आदिवासी लीग यांच्याबरोबर सोयर जमल्याबरोबर या कम्युनिस्टधार्जिण्या काँग्रेसवाद्यांच्या पोटात गोळा उठला, याचे खरे कारण हेच आहे. येन–केन प्रकारेण या लग्नात विघ्न निर्माण करावे, निदान आपले नाक कापून अपशकून करावा असा त्यांचा प्रयत्न आहे. त्यासाठीच त्यांनी नाना क्लृप्त्या योजायला, समाजवाद्यांमध्ये फूट पडल्याची आवई उठवायला किंवा अशोकसाठी एस. एम. जोशींचा बळी दिला अशी कोल्हेकुई करायला सुरुवात केली आहे. मागे याच लोकांनी **अशोक मेहता**–अच्युतराव पटवर्धन यामध्ये तेढ माजल्याचे प्रसिद्ध केले होते. त्या बातमीइतकेच अशोक मेहता, एस. एम. जोशी यांच्या मतभेदाच्या बातमींत तथ्य आहे.

## शे. का. फे. व शे. का. पक्ष

शे. का. फे. ने जेधे राऊतांच्या शे. का. पक्षाशी तीन चार जागासाठी जो करार केला त्याची दिवटी पुढे करून हे लोक जनतेला हुलकावणी देऊ पहात आहेत. शे. का. पक्ष कम्युनिस्ट धार्जिणा असताना डॉ. आंबेडकरांनी त्यांच्याशी करार केला व अशा 'संधिसाधू' डॉ. आंबेडकरांशी समाजवाद्यांनी अगोदरच करार केला म्हणून कुणीतरी कुणाचा विश्वासघात करीत आहे असा त्यांना सुगावा लागला आहे. याच संदर्भात एका संपादक महाशयांनी आपली ठेवणीतली माहिती बाहेर काढून समाजवादी पक्षाचे चिटणीस

श्री. मधु लिमये यांनी "आंबेडकर शे. का. पक्ष करार कसा झाला?" या प्रश्नाला, "हा प्रश्न आंबेडकरांना विचारणे अधिक सयुक्तिक होईल" असे उत्तर देणे म्हणजे लपवालपवी आहे असाहि शोध लावला आहे. वास्तविक सोशालिस्ट व शे. का. फे. यांचा मुंबई महाराष्ट्रांत १५० जागा पुरता, १ नोव्हेंबर रोजी उभ्या असलेल्या उमेदवारांपुरता करार झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या जागांसाठी इतर पक्षांशी करार करण्याचे वा न करण्यांचे उभय पक्षांनाहि स्वातंत्र्य आहे. ठरलेल्या जागासाठी, यांतच सोलापूर, पुणे व कुलाबा यांतील लोकसभेच्या जागा येतात. शे. का. फे. ने. शे का. पक्षाशी करार केल्यामुळे शे. का. फे. समाजवादी कराराचा भंग होतो असे उभय पक्षांना मुळीच वाटत नाही. उभय पक्षीय कार्यकर्त्यांच्या बैठकीत ही भूमिका साफ झाली असल्याचे आम्हांला समजले आहे. तेव्हां ज्यांना या कराराच्या भंगाचीच स्वप्ने पडत आहेत त्यांनी तो मोडला, म्हणून ओरडत सुटण्यांत काय अर्थ आहे! जातीयवादी व कम्युनिस्ट यांच्याशी कदापिही सहकार्य करणार नाही अशा डॉ. आंबेडकरांनी वेळोवेळी घोषणा केल्या. तेव्हा त्यांनी कॉमिन्फार्मची वेसन नाकांत घालणाऱ्या शे. का. पक्षांशी काही जागांपुरती का होईना हात मिळवणी का केली असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. (पंजाबात अकाली दलाशी शे. का. फे. करार करणार असल्याचीहि वार्ता आहे. परंतु अजूनपर्यन्त त्याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही.) आतांपर्यन्त अखिल भारतात समाजवादी व शे. का. फे. यांचेच महाराष्ट्र, मध्येप्रदेश, उत्तर प्रदेश, पं. बंगाल यादि प्रांतात करार झाले आहेत. महाराष्ट्रांतच शे. का. फे. ने समाजवादी व शे. का. पक्ष असा दोन हाती करार केला आहे.

## आंबेडकरांना का विचारा?

श्री. मधु लिमये यांनी "हा प्रश्न डॉ. आंबेडकरांनांच विचारणे सयुक्तिक ठरेल" असे उत्तर का दिले याचा अर्थ या पार्श्वभूमीवर लागतो. आम्हाला कळलेल्या माहितीनुसार डॉ. आंबेडकरांनी शे. का. पक्षाच्या नेत्यांकडून दाभाडी प्रबंधाशी काडीमोड करण्याची कबुली घेतल्यानंतरच शिलकी जगासाठी करार करण्यांस संमति दिली. काही वृत्तपत्रातून तसी बातमी प्रसिद्ध झाली आहे. तेव्हा या बाबातीत त्यांच्या वर फसवणुकीचे किटाळ आणण्यांत किंवा तत्वच्युतीचा आरोप करण्यांत मुळीच अर्थ नाही. एस. एम. जोशी किंवा खेडगीकर यांची नांवे नंतर जाहीर करण्यांत समाज वादी पक्षाची चूक झाली असे फारतर या प्रकरणी म्हणता येईल. म्हणूनच समाजवादी पक्षाचे श्री. जोशी, गोरे किंवा अशोक मेहता यांनी या प्रकारचा राईचा पर्वत केला नसावा असा आमचा अंदाज आहे. "समाजवादी पक्षही जोशी, गोरे, व अशोक यांच्या मालकीची पेढी आहे की काय?" असा "लोकमान्यकरांनी मोठ्या आवेशाने प्रश्न विचारला आहे. समाजवादी पक्ष ही या तिघांच्या काय पण कुणाच्याही मालकीची पेढी नाही. लोकशाहीत कोणत्याहि पक्षाची परिस्थितीत इतकी केविलवाणी असू नये. समाजवादी शे. का. फे. कराराचा निर्णय व फेर निर्णय हा जोशी, गोरे

व अशोक मेहता यांनी घेतलेला नसून त्यांच्या कार्यकर्त्यांनी खास बैठकीत घेतला आहे. यदाकदाचित तो चूक ठरला तर त्याची जबाबदारी या नेत्यापेक्षाहि अनुयाया-वरच अधिक आहे असे आम्हांला वाटते. तेव्हां जे लोक समाजवादी पक्षांत नेते विरुद्ध अनुयायी अशी फूट पाडू इच्छितात त्यांच्या प्रयत्नांना काडीचेहि यश येणार नाही.

## ही तत्वनिष्ठा नव्हे काय ?

समाजवादी व शे. का. फे. यांचे काश्मीर आणि परराष्ट्रीय धोरणाच्या मुद्यावर मतभेद आहेत असेही हे संपादक वारंवार नव्या उत्साहाने सांगत आहेत. पण जी गोष्ट या उभय पक्षाच्या पुढाऱ्यानी स्वतःच मान्य केली आहे, तीच पुनः पुन्हा घोळून सांगण्यात काय हाशील आहे ! काही मतभेद असतानाही अधिक व्यापक समान कार्याच्या भूमिकेमुळे आम्ही एकत्र येत आहोत असे या उभय पक्षीय पुढाऱ्यानी जाहीर केले आहे. दोघाच्याही द्विपक्षीय लोकशाही राज्यव्यवस्थेवर व तावडतोब आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थित्यंतर घडवून आणण्यावर विश्वास आहे. सहकार्य म्हटले की ते अगदी १०० टक्के 'फिट्ट' बसले पाहिजे असा नियम आहे की काय ? ज्या श्यामप्रसाद मुकर्जीवर व आंबेडकरावर पं. नेहरू आणि काँग्रेसजन इतके तुटून पडत आहेत तेच लोक मध्यवर्ती सरकारात अगदी 'फिट्ट' बसत होते. नाही ! [कदाचित योगयोगाने काँग्रेस व शे. का. फे. यांचे जमले असते तर या टीकाकारानी अशी टीका केली नसती, असे आम्हाला वाटत नाही.] समाजवादी व शे. का. फे. व शे. का. पक्ष करार तर्कशास्त्राच्या निकषावर अगदी अस्सल सुवर्ण ठरेल किंवा ठरणार नाही. आम्हाला त्यांची फारशी क्षिती वाटत नाही मानवी जीवन हे गणिती नियमानी चालत नाही. माणसाबरोबर ह्याचे गुणधर्म स्वभाव विशेषही येतात. दगड, माती, चुना, यांच्या सहाय्याने उभारल्या जाणाऱ्या घराप्रमाणे संघटनेचा प्रत्येक प्रश्न 'कोनात' मोजून चालणार नाही. हरिजन किंवा वनवासी यांचे प्रस्थापित पुढारी डावलून कोणतीही पुरोगामी शक्ति आत शिरू शकेल अशी जर कुणाची कल्पना असेल तर ती साफ चुकीची आहे. गांधीजींनी खिलाफत चळवळीला व प्रस्थापित नेतृत्वाला पाठिंबा देऊन मुसलमान समाज काँग्रेसमध्ये आणला. समाजवादी—शे. का. फे. युक्ती-मुळे भारतात लोकशाही मार्गाने आर्थिक, सामाजिक व राजकीय स्थित्यंतर घडवून आणणारी प्रभावी शक्ती निर्माण होईल अशी आमची श्रद्धा आहे. निवडणुका तात्कालिक आहेत. परंतु निवडणुकानंतरही हे सहकार्य चालू राहील असा या पक्षांच्य पुढाऱ्यांनी दिलासा दिला आहे. म्हणूनच काही लोकांच्या किरकोळ फुंकारीने हा ऐक्यदीप विझणार नाही, असा तो विझू नये अशीच कुणीही प्रामाणिक समाजवादी व्यक्तींची आंतरीक इच्छा असेल. ही लांबवरची दृष्टी म्हणजे तात्विक दृष्टी नव्हेच काय, असा आमचा या कराराच्या विरोधकांना सवाल आहे.'

निरनिराळ्या पक्षांच्या निवडणूक सभामधून परस्परांवर निंदा व टीका यांची चिखलफेक केली जाते. हा प्रत्येक देशाचा अनुभव आहे. १९५१-५२ च्या निवडणुकासंबंधी भारतीय राजकीय पक्षांनी हीच भूमिका स्वीकारली होती. याबद्दलची अनेक उदाहरणे देता येतील. त्यापैकी महाराष्ट्रातील एक उदाहरण असे- 'काँग्रेसचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरु यांचा महाराष्ट्रात आठ दिवस दौरा होणार असल्याचे वृत्त मुंबई पुण्याच्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले होते. पण ते खरे दिसत नाही. पं. नेहरुंनी महाराष्ट्रात फक्त दोन दिवस देण्याचे ठरविले असून ते पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नगर कुलाबा, रत्नागिरी व जमल्यास धुळे येथे जातील. नेहरु बहुधा डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात महाराष्ट्रात येतील.

## हिऱ्यांची साथींना विनंती

दरम्यान काँग्रेसच्या प्रांतिक पुढाऱ्यांचा तोफखाना गर्जत आहे. महाराष्ट्र प्रांतिकचे अध्यक्ष व मुंबई राज्याचे मुख्य प्रधान होऊ पहात असलेले श्री. **भाऊसाहेब हिरे** यांचे परवा पुण्यात शनिवार वाड्यासमोर भाषण झाले. त्यावेळी त्यांनी समाजवाद्यांनी ना. देशमुखांविरूद्धचा उमेदवार मागे घ्यावा अशी विनंती केली. ते म्हणाले, समाजवादी म्हणतात, त्याचप्रमाणे देशमुखानीही आपली स्वतंत्र उभे राहण्याची भूमिका सोडलेली नाही. इतर पक्षांनी [शे. का. पक्ष] घेतलेल्या भूमिकेमुळे देशमुखांना काँग्रेसतर्फे उभे राहण्याचा निर्णय घ्यावा लागला. देशमुखांनी प्रतारणा केली असे न म्हणता समाजवादी पक्षाने पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे त्यांना अद्यापही पाठींबा द्यावा व आपला तेथील उमेदवार मागे घ्यावा अशी माझी त्यांना जाहीर विनंती आहे. यातच महाराष्ट्राचा स्वाभिमान व देशाचे हीत आहे.

## क्रिकेट संघ

महाराष्ट्र काँग्रेसने केलेल्या उमेदवारांच्या निवडीबाबतची जी टीका चालू आहे तिला उत्तर देताना हिरे म्हणाले, काँग्रेस उमेदवाराची निवड जातीय दृष्टीने व पैशाच्या भूमिकेवरून करण्यात आली आहे. या विरोधी पक्षाच्या 'टीकेला' सडेतोड उत्तर दिल्यानंतर काँग्रेस उमेदवारांच्या यादीबद्दल बोलतांना ते म्हणाले 'एखादा क्रिकेटचा संघ ज्याप्रमाणे गोलंदाजी फलंदाजी, क्षेत्ररक्षण या सर्व दृष्टीनी परिपूर्ण राहील अशी दृष्टी ठेवावी लागते, तीच दृष्टी आम्ही उमेदवारांच्या यादीबाबत ठेवली आहे. आमच्या यादीत सेवेची थोर परंपरा असणारे उमेदवार आहेत, त्याप्रमाणे विधीमंडळाच्या कार्यात कर्तबगारी दाखवू शकतील असेहि लोक आहेत.

## शंकररावांचे रोकडे उत्तर

भाऊसाहेबांच्या या शे. का. पक्षांचे अध्वर्यु श्री. **शंकरराव मोरे** यांनी पुण्याला शनिवारवाड्यासमोरच एक सभा घेऊन खणखणीत उत्तर दिले. मोरे म्हणाले,

ध्येयनिष्ठा, त्याग, कर्तृत्व पाहून आम्ही उमेदवार उभे केले ही **भाऊसाहेब हिऱ्यांची** निव्वळ थाप आहे. पैसेवाल्यांना आणि खुषमस्करी करणाऱ्याशीच तिकीटाचे सौदे पटविण्यात आले आहेत, असा आरोप श्री. **शंकरराव मोरे** यांनी आजच्या सभेत केला व बानगीदाखल अनेक उदाहरणे दाखविली. ते म्हणाले, ' देश स्वातंत्र्याच्या चळवळीत गुंतला असताना शेले-शेरवाण्या घालून ब्रिटीशांपुढे कमरेचे तिरकमटे करणाऱ्या श्री. **निंबाळकरानी** कॉंग्रेसचे तिकीट देण्यात त्यांचा कोणता त्याग पाहिला ? ४२ साली स्वातंत्र्याची चळवळ चालू असताना ऑनररी मॅजिस्ट्रेट बनून देशभक्तांना शिक्षा ठोठावणाऱ्या श्री. **आण्णासाहेब आवळ्यांना** तिकीट दिले ही ध्येयनिष्ठा की संधिसाधूपणा ? सातारच्या गरीब हकीमाला बसवून श्रीमंतीचा जोर दाखविणाऱ्या बागवानला उभे केले. शिरूरच्या शिंद्यांना बसवून क्रमिक पुस्तकांची चांदरात फुलविण्यासाठी कॉंग्रेसच्या **देशपान्डे** यांना तुम्ही लोकसभेचे तिकीट दिले ! आणि या सर्वांवर कडी म्हणजे बागाईतदार व शेतकऱ्यांची मते मिळविण्यासाठी पी. डब्लू. डी. त वजन असलेल्या मायदेव इंजिनियरांच्या पत्नीना उभे केले. **दिराबाईनी** कोणता त्याग आजपर्यंत केला ? पण आज याना उभे करून सरकारी साधने व सरकारी दडपण कॉंग्रेस वापरीत आहे.

## हजारेंची नव्हे, भूपतची टीम

ही व अशी अनेक उदाहरणे देऊन श्री. मोरे म्हणाले, " भाऊसाहेब तुमच्य या याद्यांनी लोकाना फसवू नका. ही विजय हजारेने निवडलेली टीम नसून भूपतची टोळी आहे की काय अशी शंका यावी अशी ही यादी आहे." ( नवशक्ती, बुधवार, आजकालचा महाराष्ट्र, ५-१२-५१ )

रविवारी ९-१२-५१ ला सायंकाळी गोवालिया टॅंक मैदानावर समाजवादी व फेडरेशन यांच्यातर्फे भरविण्यांत आलेल्या सभेत साथी जयप्रकाश नारायण यांनी दोन्ही पक्षात झालेल्या कराराचे स्वागत केले. याच दिवशी भरविण्यांत आलेल्या दुसऱ्या सभेत साथी जयप्रकाश नारायण यांनी दोन्ही पक्षात झालेल्या कराराचे स्वागत केले ते म्हणाले, " राजकारणात १०० टक्के शुचिता व उच्च पातळी कोणाचीच नसते अशा सुचितेचा उद्देश राजकीय पक्षाने करणे म्हणजे आर्यमंदिर मंडळातील सदस्याने दारूचा वास येणाऱ्या तोंडाने सुधाकरला, "सुधाकर" दारु सोडा बुवा" असे सांगण्यासारखेच आहे. समाजवाद्यांचे आंबेडकरांशी सहकार्य हा संधिसाधूपणा म्हणतात. अगदी राजकीय दृष्टीने विचार करता आरोप खरा मानलाच पाहिजे. "ज्या. एस. एम् जोशींनी या करारावर सही केली त्यांना कराराची शाई वाळते न वाळते तोच **आंबेडकरांनी** विरोध करावयास संमति दिली ! हा बाह्य विचार सोडला तर हा करार आवश्यकच आहे असे माझे मत आहे. आज आर्थिक विषमता खंबीर धोरणाने नाहीशी होईल. परंतु शेकडो वर्षांच्या संस्कारांनी दृढ झालेली सांस्कृतिक विषमता नष्ट

कशी होईल हा प्रमुख सवाल आहे. दलितांचे राजकीय तत्त्वज्ञानी म्हणून **आंबेडकरांवर** भक्ती आहे. त्यांच्यात व त्यांच्या समाजात हिमालयाएवढे अंतर आहे. त्या समाजासाठी कष्ट आवश्यक आहेत. आज शे. का. पक्ष कितीही दलितांचा कैवारी म्हणवत असला तरी तो कॉंग्रेस एवढाच पांढरपेशा आहे. तेव्हा समाजवादी लोकशाही मार्गाचे संस्कार करण्यासाठी हे आवश्यक होते. (नवशक्ती १०–१२–५१)

दि. १३–१२–५१ च्या टाईम्समध्ये श्री. पी. एस. परळकर यांचे "Party Alliance" चा शिर्षकाखाली पत्र प्रसिद्ध झालेले होते. मुंबई हा कॉंग्रेसच्या निवडणुका लढयांचा बालेकिल्ला! कॉंग्रेस उमेदवार हे निवडून येणार हे नक्की, असा आतापर्यन्तचा इतिहास होता. कॉंग्रेस विरोधी पक्षांनी निवडणुक करार केल्यामुळे त्या पक्षाचे उमेदवार निवडणूकीत यशस्वी होतील आणि कॉंग्रेसचे उमेदवार पडतील, अशी **श्री. नेहरू** यांना भीती वाटते. म्हणून ते या निवडणुक करारावर तोंडसुख घेत आहेत. पण कॉंग्रेस आणि चौथा पक्ष (पूर्वीचा मुस्लिम लीग पक्ष) यांच्या मुंबईतील प्रचार सभा एकत्र होतात, त्याबद्दल **श्री. नेहरू, श्री. एस. के. पाटील** यांच्या संधिसाधूपणाबद्दल कां जाहीरपणे निषेध करीत नाहीत, असे **श्री. परळकर** यांनी मुद्दे उपस्थित केले होते.

कुलाबा जिल्ह्यातील निवडणुकीसाठी शे. का. प. व हिंदु महासभा यांनी करार केला. (नवशक्ती १५–१२–५१).

शेतकरी कामगार पक्ष आणि शे. का. फे. यांच्यात निवडणुकीच्या बाबतीत जो कारार झाला त्याच्या मागील पार्श्वभूमि आणि करारपालनाबद्दची दोन्ही पक्षाची भूमिका त्याच्या संबंधी **श्री. शंकरराव मोरे** आणि **श्री. केशवराव जेधे** यांनी २२–१२–५१ च्या जनता पत्रांत खुलासे केलेले होते ते असे :–

"राजाभाऊ भोळे यांच्या अपप्रचारास रोकडा जबाब शे. का. फे. शे. का. पक्ष कराराचा पत्रव्यवहार."

**पुणे–** श्री. **राजाभाऊ भोळे** यांनी कोल्हापूरला केलेले भाषण प्रसिद्ध केले आहे. त्याचप्रमाणे पुणे जिल्हा संघटक शे. का. फे. यांनीही एक पत्रक प्रसिद्ध करून शे. का. पक्ष व शे. का. फे. यांच्यातील कराराचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. कराराचे वेळी प्रत्यक्ष बोलणी काय झाली हे राजाभाऊ भोळे यांना माहीत असावयास पाहिजे. तरीही ते आज विकृत प्रचार करीत आहे. हा करार होण्याच्या आधी राखीव जागासाठी ज्यांना शे. का. पक्षाने पुरस्कृत केले होते, त्यांचेवर हा करार बंधनकारक नाही. याबाबतचा स्पष्ट खुलासा **डॉ. बाबासाहेब** यांचेबरोबर बोलताना आलेला होता. जनतेचा गैरसमज होऊ नये म्हणून **डॉ. बाबासाहेबांचे** बरोबर झालेला करार शे. का. पक्षाने श्री. **राजभोज** यांना कळविला. तो खाली देत आहोत. त्यावरून खरी परिस्थिती मतदारांच्या सहज लक्षात येईल.

भाई **शंकरराव मोरे**, सरचिटणीस, शे. का. पक्ष, याजकडून, श्री. **पां. ना. राजभोज**, सरचिटणीस, शे. का. फे. यांस वि. वि.—

ता. १९–११–१९५१ रोजी तुम्ही व सोलापूरचे तुमच्या फेडरेशनचे कार्यकर्ते श्री. **बाबर** व श्री. **कांबळे** व त्यांचे सहकारी असे आम्ही भेटलो. त्यावेळी "शे. का. पक्ष व शे. का. फे. यांच्या दरम्यान आगामी निवडणुकीमध्ये झगडा होऊ नये" असे आपण आपले मत व्यक्त केले. त्यावेळी मी व भाई **केशवराव जेधे** व त्यांचे बंधू श्री. **बाबूराव जेधे** यांनीही त्याचप्रमाणे मत व्यक्त केले. पण हे मत व्यक्त करताना "शे. का. फे. ने समाजवाद्यांशी निवडणूक समझोता केल्यामुळे आता हा झगडा टाळणे कठीण आहे" असेही मी स्पष्टपणे सांगितले. त्यावेळी आपण व श्री. बाबार यांनी "हा झगडा अद्यापहि टाळता येईल. परंतु त्याबाबत आपले व डॉ. आंबेडकरांचे बोलणे स्पष्टपणे झाले पाहिजे. त्यांची बोलण्याची तयारी आहे. तरी आपण मुंबईस चला." असे सांगितले. आमची तशीच उत्कट इच्छा असल्यामुळे आम्ही याबाबत **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांचेशी बोलण्याचे कबूल केले त्याप्रमाणे ता. २०–११–५१ रोजी दुपारी २ वाजता तुमच्यासमावेत आमची **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांचेशी भेट झाली त्यावेळी आमच्या पक्षाचे भाई **केशवराव जेधे भाऊसाहेब राऊत** हेही माझ्याबरोबरच होते. थोडेसे औपचारिक बोलणे झाल्यानंतर शे. का. फे. चे मुंबई प्रांतिकचे अध्यक्ष श्री. **भाऊराव गायकवाड** हे थोड्या वेळाने येतील. ते आल्यावर ह्याबाबात बोलू तरी पुन्हा बैठक ३.३० वाजता घ्यावी असे ठरले.

श्री. **भाऊराव गायकवाड**, तुम्ही मी **जेधे** व **राऊत** यांनी साडेतीन वाजता प्रथम प्राथमिक स्वरुपाची चर्चा केली. त्यावेळी "शे. क. फे. ला शे का. पक्षाची मदत पाहिजे, व शे. का. पक्षाला शे. का. फे ची मदत पाहिजे. अशा प्रकारे दोन्ही दलित व श्रमजीवी जनतेच्या संघटनानी एकमेकांना सहाय्य केल्यास निवडणुकीत आम्ही, कॉंग्रेसला जबर धक्का देऊ शकू" हे दोन्ही पक्षांनी मान्य केले.

या प्रस्ताविक बोलण्यानंतर आपण सर्व **डॉ. आंबेडकर** यांच्या खोलीमध्ये गेलो. त्यावेळी ता. ३० व ३१ ऑक्टोबरला आम्ही दिल्लीस येण्याचे कबूल केले. होते. पण त्याप्रमाणे का गेलो नाही याबद्दलचा मी खुलासा केला. त्या खुलाशावरून दोन्ही पक्षाच्या समजुतीचा घोटाळा झाल्यामुळे अखेर दोन्ही पक्षांत सहकार–करार होणे अशक्य झाले तरी आतां काय करतां येईल याबद्दल आपण चर्चा केली.

प्रथम डॉ. **बाबासाहेब आंबेडकर** यांनी शे. का. फे. पक्षाचा समाजवादी पक्षाशी जो समझोता झाला आहे, त्याचे स्पष्ट स्वरुप व मर्यादा सांगितल्या व त्या सांभाळून शे. का. फे. व शे का. पक्ष यांच्यात अद्यापही व्यापक प्रमाणात सहकार्य होणे शक्य आहे असे मत व्यक्त केले. त्याचबरोबर "कुलाबा व पुणे शहर येथे

काँग्रेसचे दोन मंत्री उभे असून त्यांचे विरुद्ध शे. का. पक्ष अनुक्रमे **भाई राऊत** व **जेधे** यांना आपले उमेदवार म्हणून उभे करीत आहे. या लढ्याचे कामी शे. का. फे. शे. का. पक्षालाच पूर्णपणे सहाय्य करील. तरी आमच्या या सहकार्याबद्दल शे. का. पक्ष काय उलट मदत करील याचा खुलासा व्हावा असे त्यांनी मोकळ्या मनाने सांगितले. तसेच "सोलापूरला, शे. का. पक्षाचे सरचिटणीस **श्री. मोरे** उभे आहेत त्यांनाही सहाय्य करण्याची आमची इच्छा आहे. पण श्री. **राजभोज** यांचे उमेदवारी बाबत तुमची काय भूमिका राहील हे स्पष्ट व्हावे." असेही ते म्हणाले. त्यांच्या या घोषणेचे आम्ही अंतःकरणपूर्वक स्वागत केले. त्यानंतर थोडी तपशीलाची चर्चा झाली. त्यावेळी आम्ही **कोल्हापूरचे बॅ. माने,** दौंड हवेलीत उभे असलेले **श्री. डी. एस. सोनावणे** या उमेदवारांना पाठिंबा देण्याचे कबूल केले आहे. त्याचप्रमाणे आमच्या पक्षाचे भाई **रामभाऊ नलवडे** व **भाई गवळे** यांनाही कोठेतरी उभे करून निवडून आणणे आमचे कर्तव्य आहे, हे स्पष्ट केले. शे. का. फे. ने समाजवाद्यांशी जो करार केलेला आहे तो पाळणे हे शे. का. फे. चे कर्तव्य आम्ही मान्य केले व त्याप्रमाणे आमची वरील जबाबदारी पाळणे आमचे कर्तव्य आहे ही भूमिकाही स्पष्ट करण्यांत आली. "हिंदुस्थानांत राजकीय पक्षांनी एकमेकांशी व व्यक्तीशी केलेले करार प्रामाणिकपणाने पाळले तरच आपण राजकारणात पुढे जाऊ शकू" असे मत **डॉ. बाबासाहेबांनी** व्यक्त केले. त्यास आम्ही पाठिंबा दिला. मला घाईने पुण्यास जाणे जरूर असल्यामुळे पावणे पांच वाजता मी तेथून निघालो त्यावेळी या बोलण्याच्या अनुषंगाने शे. का. फे. पक्ष काय करू शकेल हे आम्ही निश्चितपणे आपणांस कळवावे असे ठरले व त्याप्रमाणे आम्ही विचार करून, हे पत्र (मी) आपणांस देत आहे. आपण खालील सूचनांचा योग्य विचार करावा."

[१] शे. का. फे. चे अनुयायी हे सर्व तऱ्हेने नडलेल्या दलित समाजाचे आहेत व त्याचप्रमाणे शे. का. पक्षाच्या पाठीमागे असलेला बहुजन समाज जरी बहुसंख्य असला तरी तो आर्थिक व सामाजिक दृष्ट्या नाडलेला आहे. या दृष्टीने शे. का. फे. व शे. का. पक्ष यांचे दरम्यान धार्मिक व आर्थिक पिळवणूक करणाऱ्या समान शत्रूविरुद्ध किमान कार्यक्रमाचे भूमिकेवरून टिकाऊ "सहकार्य होणे शक्य आहे. याबाबत आज जरी काही करता आले नाही तरी निवडणुकीनंतर संयुक्त आघाडी बनविण्याचा प्रयत्न करता येईल. म. फुले यांच्या मतप्रणालीवर नितांत निष्ठा दोन्ही पक्षाच्या पुढाऱ्यांत असल्यामुळे या दोन्ही संघटना एकत्र येण्याची शक्यता खात्रीने वाढली आहे.

[२] शे. का. फे च्या संघटनेने भाई जेधे व राऊत यांना पुणे व कुलाब्यात पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे शे. का. पक्ष कुलाब्यात अस्पृश्यांच्या जागेसाठी उमेदवार उभा करणार नाही. कुलाब्यात समाजवाद्यांशी समझोता होताना त्या पक्षाचे जे उमेदवार निश्चित झाले होते त्यांना असेंब्लीबाबत नवीन मदत शे. का.

फे. ने करावी पण ह्या समझोत्याच्या वेळी ज्या मतदार संघात समाजवाद्यांचे उमेदवार निश्चित झालेले नव्हते त्या मतदार संघात शे. का. फे. ने शे. का. पक्षाच्या उमेदवारास पाठिंबा द्यावा.

३) पुणे जिल्ह्यांत श्री. **डी. एस. सोनावणे** या स्वतंत्र अस्पृश्य उमेदवारास आपली बोलणी होण्याचे पूर्वी शे. का. पक्षाने पाठिंबा देण्याचे जाहीर केले आहे. श्री. **सोनावणे** यांनी उमेदवारी परत न घेतल्यास त्यास शे. का. पक्ष मदत करीलच. त्याचप्रमाणे समाजवाद्यानी समझोत्याच्या वेळी ज्या उमेदवारांची नावे शे. का. फे. ला लेखी कळविली होती, त्यांना शे. का. फे ने मदत करावी. पण याखेरीज अन्य मतदार संघात असेंब्लीसाठी व पुणे जिल्ह्यांत लोकसभेसाठी शे. का. पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांना शे. का. फे. ने पाठिंबा द्यावा

४) सोलापूर जिल्ह्यात असेंब्लीसाठी सर्वसाधारण ११ व राखीव २ जागा आहेत व लोकसभेसाठी एक सर्वसाधारण व राखीव जागा आहे. समाजवाद्यांशी समझोता केला त्यावेळी समाजवाद्यांचा एकही उमेदवार या जिल्ह्यांत उभा नसल्याने त्यांनी निश्चीत नावाची यादी शे. का. फे. ला दिली नाही. पण आता शे. का. फे. चा पाठिंबा मिळाल्यानंतर समाजवादी बरेच उमेदवार उभे करून कॉंग्रेस विरोधी मतांची विभागणी करण्याचा व अशा तऱ्हेने अप्रत्यक्षपणे कॉंग्रेस उमेदवारांना यशस्वी करण्याचा प्रयत्न करीत आहे. शे. का. फे. ने या प्रयत्नांना उत्तेजन न देता लोकसभेच्या सर्वसाधारण जागेसाठी व असेंब्लीच्या सर्वसाधारण जागेसाठी शे. का. पक्षाला मदत करावी. अशी मदत केली तर शे. का. पक्ष लोकसभेच्या राखीव जागेसाठी जाहीर केलेली **भाई रामभाऊ नलावडे** यांची उमेदवारी परत घेईल व असेंब्लीच्या राखीव जागेसाठी आपल्या पक्षाचे उमेदवार उभे करण्याचा निर्णय मागे घेईल. सोलापूरात सर्वसाधारण २ जागांसाठी शे. का. फे. ने उमेदवार उभे केले आहेत ते उमेदवार शे. का. फे. ने परत घेऊन सोलापूरातील शे. का. पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा द्यावा.

५) मुंबई शहरात समाजवादी व शे. का. फे. यांचे सहकार्य होण्यास शे. का. पक्षाची हरकत नाही. त्या मतदार विभागांत शे. का. पक्षाचे अनुयायी हे डॉ. **बाबासाहेब** यांचे उमेदवारीस त्याचप्रमाणे श्री. **भंडारे** व श्री. **बी. सी. कांबळे** यांना पाठिंबा देतील. सर्वसाधारण जागेबाबत त्याना योग्य वाटेल त्या उमेदवारास पाठिंबा देण्याचे स्वातंत्र्य त्याना राहील.

६) शे. का. पक्षाने सोलापूर जिल्ह्यातील आपला लोकसभेचा उमेदार भाई **रामभाऊ नलावडे** यांची उमेदवारी परत घेतल्यानंतर त्यांना पक्ष सर्वसाधारण जागेसाठी उभे करील त्या ठिकाणी शे. का. फे ने त्यांच्या उमेदवारीस पाठिंबा द्यावा. व तसेच **भाई गवळे** हे मुंबई शहरात धारावी या विभागात सर्वसाधारण जागेसाठी उभे आहेत. त्यांनाही शे. का. फे. ने पाठिंबा द्यावा अशी आमची इच्छा आहे.

७) महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाचे पुढारी पांढरपेशा वर्गातील आहेत. शे. का. पक्षाचे लोक सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतून पुढे आले असल्याने समाजवादी पुढारी हे शे. का. पक्षापेक्षा त्यांना काँग्रेस अधिक जवळ आहे. शे. का. पक्षाचे वाढते वजन पाहून हे पुढारी छुप्या रीतीने काँग्रेसलाच मदत करीत आहेत.

महाराष्ट्रात बहुतेक जिल्ह्यांत त्यांना पाठिंबा नसताना शे. का. फे. शी झालेल्या समझोत्याचा गैरफायदा घेऊन समाजवादी पक्षाचे महाराष्ट्रातील नेते बरेच उमेदवार उभे करून शे का. फे. व शे. का. पक्ष यांचेमधील अंतर वाढून काँग्रेसचा व दलित समाजाच्या शत्रूचा फायदा होणार आहे. तरी शे. का. फे. ने समाजवाद्यांच्या या कारवायास आळा घालण्याचा प्रयत्न करावा.

सोलापूर, २२–११–५१

## "शंकरराव मोरे, सरचिटणीस"

**श्री. जेधे** यांच्या करारभंगाच्या आरोपासंबंधीचा खुलासा खालीलप्रमाणे होता :–

**'शेतकरी कामगार पक्षाने शे. का. फे. शी केलेला करार मोडला नाही.'** तर १८ डिसेंबरच्या सर्व वर्तमान पत्रांतून 'आम्ही **बाबासाहेब आंबेडकर** यांच्याबरोबर केलेला करार मोडला' असा आरोप आमचेवर **श्री. राजाभाऊ भोळे** यांनी कोल्हापूर येथील सभेत केला असा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे. हा आरोप सर्वस्वी खोटा आहे. आम्ही **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांचेशी झालेला करार तंततोत पाळीत आहोत. आमचेकडून करार भंग होत नसून समाजवाद्याच्या चिथावणीवरून हरिजन बंधू फसले जात आहेत. व **डॉ. बाबासाहेबांच्या** आदेशाचा अवमान करीत आहेत. ही गोष्ट मला हरिजन बंधूच्या निदर्शनास आणावयाची आहे.

शेड्यूल कास्ट फेडरेशनचे सेक्रेटरी श्री. **राजभोज** यांच्यासाठी आम्ही आमचे उमेदवार **नलावडे** यांना सोलापूर येथून काढून साताऱ्याच्या एका भागातून लोकसभेसाठी उभे केले आहे. त्यांना ती जागा देताना आम्ही आमच्या पूर्वीच्या उमेदवाराला दूर लोटिले आहे.

करार होण्यापूर्वी आमच्या पक्षातर्फे पुरस्कृत असलेले **माने** (कोल्हापूर) आणि दौंड हवेलीतर्फे श्री. **सोनोने** वकील यांचे बाबतीत आम्ही सोडवणूक करून घेतली आहे. तेव्हा त्यांच्या उमेदवारीने या कराराला बाधा येत नाही.

आमच्या कराराचें हे स्वरुप श्री. **राजाभाऊ भोळे** यांना माहीत होते. असे असताना ते आज काही माहित नसल्याचे सोंग घेऊन आमच्यावर करारभंगाचा आरोप करीत आहेत. श्री. **राजाभाऊंना** मला असे सुचवावयाचे आहे की त्यांनी आमच्या कराराच्या प्रत्यक्ष स्वरुपाबद्दल त्यांच्या पक्षाचे सरचिटणीस श्री. **राजभोज**

किंवा **डॉ. बाबासाहेब** यांच्याकडे विचारणा केल्यास बरे होईल. **राजाभाऊं**चे आजचे धोरण सर्वस्वी समाजवाद्यांच्या सोयीचे आणि **डॉ. बाबासाहेबांच्या** इभ्रतीला कमीपणा आणणारे आहे. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांचा मला सर्वस्वी पाठिंबा आहे.

**केशवराव जेधे**
अध्यक्ष, मध्यवर्ती निवडणूक मंडळ,
शेतकरी कामगार पक्ष.

निवडणूक जानेवारी १९५२ च्या पहिल्या आठवड्यात झाली. निरनिराळ्या पक्षांच्या बरोबर निवडणूक करार करुनही फेडरेशनचा फक्त एकच उमेदवार मुंबई कायदे मंडळात निवडून आला. आणि आश्चर्यातील महान आश्चर्य म्हणजे **बाबासाहेब या निवडणुकीत विजयी झाले नाहीत.** ते निवडून येतीलच असा आम्हा सर्वांचा होरा होता. घटनेचे बिकट कार्य यशस्वी केले, हिंदु कोड तयार केले आणि या दोन्ही कार्यांनी आपला उभा भारत देश आणि समाज यांना आपण ऋणाकित केले, म्हणून मुंबईतील मतदार आपणाला बहुमताने निवडून देतील असा **बाबासाहेबांना** आत्मविश्वास होता. पण निवडणुकीचा निकाल आपल्या विरुद्ध झालेला ऐकून त्यांना अत्यंत वाईट वाटले. त्यांच्या आयुष्यातील ही अपयशी घटना त्यांना फार तीव्रतेने भासली. त्यांचा निकाल ऐकून लोक जेंव्हा त्याना भेटण्यास सिद्धार्थ कॉलेजच्या मिलिटरी हटमेंटसमध्ये गेले तेव्हा ते इतरांबरोबर निवडणुकीच्या यशापयशाबद्दल बोलत होते. काही भावनावश कार्यकर्ते हताशपणे बसले होते. कांही हातरुमालांनी स्वतःचे अश्रू पुसत होते. या दुःखी वातावरणांत **बाबासाहेब** सर्वांना धीर देत होते. निवडणुकीसंबंधी अर्ज करावा की नाही, याबद्दल ते कार्यकर्त्यांच्याबरोबर बोलत होते. काही वकील मंडळी त्यांना मुद्दे सुचवीत होती. **बाबासाहेब** म्हणाले, यासंबंधी मी लवकरच निर्णय घेईन. लोक दुःखी अंतःकरणाने रात्री १२ च्या सुमारास आपापल्या घरी परतले. आणि **बाबासाहेब** 'हेच फळ काय मम तपाला' म्हणत हताशपणे थोडा वेळ एकटेच बसून राहिले व मग निवांतपणे झोपी गेले.

• •

## खंड १०

## प्रकरण ११ वे

# अपयशाची चिकित्सा

दी बुद्धदूत सोसायटी या संस्थेतर्फे वरळी येथील बुद्ध मंदिरात मंगळवार, ७–१–५२ पासून एक महिनाभर "बुद्ध मेळा" या नावाचा कार्यक्रम सुरू करण्यात आला. त्या दिवशी सायंकाळी या कार्यक्रमाचा उद्‌घाटन समारंभ मुंबईतच राज्यपाल **श्री. राजा महाराजसिंग** यांच्या हस्ते करण्यात आला. सोसायटीतर्फे अनाथाश्रम, दवाखाना इत्यादि कार्ये करून वरळी भागातील गरीब जनतेची सेवा करण्याचा हेतु, सोसायटीचे अध्यक्ष श्री. एन्. के. भागवत यांनी समारंभाचे वेळी सांगितला. राज्यपालांनी संस्थेस दोनशे रुपयाची देणगी दिली. बुद्ध आणि बुद्धधर्म यांच्यासंबंधी जनतेत माहिती पसरविण्यासाठी संस्था दररोज एक व्याख्यान याप्रमाणे महिनाभर कार्यक्रम करणार आहे, असे जाहिर करण्यात आले. रे. डब्लू. संघरक्षित वेरो आणि स्वामी संबुद्धानंद यांची बुद्धाचे चरित्र आणि बुद्धधर्माची शिकवण यावर भाषणे झाली. श्रीमती रोहिणीदेवी यांनी शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानले. राज्यपाल व इतर लोक यांचीही छायाचित्रे टाईम्स ऑफ इंडियाच्या ९–१–५२ च्या अंकात आलेली होती.

निवडणुका झाल्यानंतर यशस्वी व अयशस्वी उमेदवारांची नांवे ता. ११–१–५२ ला जाहिर झाली. तेव्हा कम्युनिस्ट पक्षाचे श्री. **डांगे**, शुडयुल कास्ट फेडरेशनचे **बाबासाहेब** हे आघाडीचे कार्यकर्ते व पुढारी अयशस्वी झाले. **बाबासाहेबांना** १,२३,५७५ आणि **श्री. काजरोळकर** यांना १,३७,९५० मते पडली. म्हणजे **बाबासाहेबांचा** ४,३७५ मतांनी पराभव झाला. निवडणुकीचा निकाल लागला त्याच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी **बाबासाहेब** आपल्या सहकाऱ्याशी, सिद्धार्थ कॉलिजमध्ये बोलताना त्यांच्या तोंडून उद्‌गार निघाले, "निवडणुकीतील यश अपयश हे लायकीवर अवलंबून नसते, तर ते विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीवर अवलंबून असते. मला या अपयशाचे फारसे वाईट वाटत नाही. वाईट कशाचे वाटत असेल तर

**काँग्रेसचे लोक नालायकांनाही निवडून देतात व लायक लोकांना पाडतात.** त्यांत त्यांना देशाचे, धर्माचे, समाजाचे काही प्रेम असते काय? (नसते हे) स्पष्ट होते. हो, पण या माझ्या अपयशामुळे माझ्या पत्नीला काय वाटले असेल? बिचारी ती दिल्लीत आहे."

डांगे प्रभृति उमेदवारांनी मते पुन्हा मोजण्याची मागणी केली. मतमोजणीचे हे काम जवळ जवळ दहा दिवस मुंबईच्या कायदेमंडळाच्या इमारतीत चालले होते. या कामात माझा (श्री. खैरमोडे यांचा) ही भाग होता. पण पुनर्मोजणीतही असे सिद्ध झाले की **डॉ. आंबेडकर** व श्री. **डांगे** पडले.

**बाबासाहेबांच्या अपयशामुळे विचारवंत आणि समाज व देश यांचे खरे हितचिंतक व कळकळ बाळगणाऱ्या सर्व धर्मातील लोकांना वाईट वाटले. त्यांनी व वर्तमानपत्रांनी याबाबतीत आपआपली मते चिकित्सापूर्वक पद्धतीने प्रगट केली.**

**बाबासाहेब मध्यवर्ती सरकारचे टीकाकार म्हणून ते राज्यसभेत गेले पाहिजेत, अशी बऱ्याच विचारवंतांनी बाबासाहेबांजवळ इच्छा व्यक्त केली. पण बाबासाहेब तयार होईनात. शेवटी ११ जानेवारी १९५२ च्या शुक्रवारी रात्री ९ वाजता काही विचारवंत निकटवर्तीयांनी बाबासाहेबांना अत्यंत आग्रह करून त्यांची संमती मिळवली. मग त्याच रात्री पासून मुंबईत** निवडून आलेल्या विरोधी पक्षांतील पुढाऱ्यांना भेटून **बाबासाहेबांना** निवडून देण्याकरिता कार्यकर्ते प्रयत्न करु लागले, आणि त्या प्रयत्नांना यश आले व **बाबासाहेब मुंबई कायदेमंडळातर्फे राज्यसभेत निवडून गेले.**

**बाबासाहेब** लोकसभेच्या निवडणूकीत अपयशी झाले यासद्दल जे विचार वर्तमानपत्रातून प्रदर्शित करण्यांत आले, त्याची माहिती खाली देत आहे.

१९५२ च्या निवडणुकीत समाजवादी पक्षाने शेड्यूल्डकास्ट फेडरेशनशी करार केला होता, तो काँग्रेसच्या उमेदवारांना चकीत करण्यासाठी. आणि काँग्रेसने इतर सर्व पक्षांशी जे करार केले ते स्वतःच्या हाती राज्यसत्ता सर्व प्रांतात रहावी म्हणून. परंतु या दोन्ही पक्षांना (समाजवादी व काँग्रेस) काही प्रदेशात वेगळेच अनुभव आले. याचे कारण हे दोन्ही पक्ष जनतेला निव्वळ शाब्दीक भपकेबाजीवर झुलवत ठेवतात, पण त्यांच्या हितासाठी काही भरीव कार्य करीत नाहीत, म्हणून असंतुष्ट मतदारांनी त्यांच्या उमेदवारांना मते दिली नाहीत तरी या पक्षांनी आणि विशेषतः काँग्रेसने हा खोटा देखावा नष्ट करावा आणि स्वतःचे घर प्रथम स्वच्छ ठेवावे व मग देशाला उज्वल स्वरुप देण्याचे कार्यक्रम हाती घ्यावेत, असा सल्ला टाईम्सने १२-१-५२ ला "Guilty Men" (अपराधी लोक) हा अग्रलेख लिहून सल्ला दिला.

त्यातील कांही भाग असा :—

"GUILTY MEN'

("..........Opportunism led them into an unholy alliance with Dr. Ambedkar's Scheduled Castes Federation and the partnership has helped neither. Observed with the Congress sins of commission and omission, they forgot to close the clinks in their own armour. Clearly, India's masses are not guided by negative appeals. "Better the devil we know than the devil we don't" sums up the average action of the middle class voter ...... On the tone and temper of Congress regimes will therefore depend largely the political shape of things to come. Before the Congress attempts to cleanse the country, let it cleanse itself." The Times of India, Editorial Article "Guilty men," dated 12-1-1952, after A's defeat in election).

उत्तर मुंबईत मतदार संघातील राखीव जागेच्या निवडणुकीत कॉंग्रेस उमेदवा **श्री. नारायणराव काजरोळकर** यांना १,३७,८९७ व डॉ. **आंबेडकरांना** १,२३,७३३ मते पडली. **बाबासाहेबांचा** १४,१६४ मतांनी पराजय झाला. मुंबईत कॉंग्रेस उमेदवारापेक्षा समाजवादी व शे. का. फे. उमेदवारांना जोराचा पाठिंबा असत हा अनपेक्षित निकाल कसा लागला, याबद्दल इलेक्शन कमिशनरनी चौकशी करणे अगत्याचे आहे, असे पत्रक बाबासाहेबांनी (शनिवार) १२ जानेवारीला काढले.

शे. का. फे. चे उमेदवार या निवडणुकीत का पडले याची कारणमीमांसा विविध वृत्ताच्या आल्मगीरने १३–१–५२ च्या अंकात (पा. २–३) करून दोन कारणे दाखविली.

(१) शे. का. फे. पक्ष व समाजवादी पक्ष यांच्यातील कराराचा उभय पक्षातर्फे भंग, आणि

(२) निवडणूक केंद्रावर झालेले वाममार्गी मतदान. "...... हा निवडणूक करार सोशॅलिस्टांच्या तत्वभ्रष्ट संधिसाधु धोरणापोटी जन्माला आला होता व त्यांतही साथी अशोक यांच्या वैयक्तिक स्वार्थाचा कुजकट डाव त्याच्या मुळाशी होता. यामुळे आणि करार पालनाच्या बाबतीत सोशालिस्टांनी विश्वासघातकी कारवाया चालू केल्या मुळे आंबेडकर पक्षीयांकडूनही कराराची तशीच संभावना होऊन एकंदरीने ऐन निवडणुकीत कराराच्या चिंद्याच तेवढ्या शिल्लक राहिलेल्या पहावयास सांपडतील अशी या कराराची फलश्रुती मी कथन केली होती. अगदी हीच फलश्रुती राज्य विधानसभेचे जे निकाल जाहीर झाले आहेत, त्यांनीही ऐकविली आहे. कराराच्या पालनाबाबतचा पडताळा मिळण्याजोगे वर्गीकृत जातींकरता राखीव जागा असलेले

दोन मतदार संघ राज्यविधान सभेच्या मुंबई शहरातील या निवडणुकांत होते आणि या दोन्हीही मतदार संघात शे. का. फे. सोशालिस्ट कराराचा नकारात्मक निकाल लागला असून यापैकी एका मतदार संघात तर सोशालिस्टांच्या दगाबाजीने शे. का. फे. च्या एका अत्यंत भरवशांच्या उमेद्‌वाराचा सरळच बळी घेतला आहे.

## दगलबाजी

माझे हे विधान सिद्ध करण्याकरता मला अधिक शब्द खर्ची घालण्याची वास्तविक जरुरच नाही. या दोन मतदार संघात सोशालिस्ट व शे. का. फे. उमेदवारांना जी मते पडली आहेत त्यांचे आकडे व त्याचप्रमाणे जी मते वाया गेली आहेत, त्यांचेही आकडे मी येथे देतो. हे आकडेच सोशालिस्टांच्या विश्वासघाताची ही कहाणी सांगू शकतील. या दोन मतदार संघापैकी जेथे सोशालिस्ट व शे. का. फे. असे दोन्ही उमेद्‌वार निवडून आले आहेत, तो चिंचपोकळी, लोअरपरळ, ल्हग्रोव्ह हा मतदार संघ आहे या मतदार संघात यशस्वी सोशालिस्ट उमेदवार श्री. **भगीरथ सदानंद झा** यांना एकंदर १३,५०२ मते पडली तर राखीव जागेकरता उभे राहिलेले श्री. **बापू चंद्रसेन कांबळे** या शे. का. फे. च्या यशस्वी उमेदवाराला २०,५५० मते पडली आहेत. म्हणजे सोशालिस्ट उमेदवाराला २९५२ म्हणजे जवळ जवळ तीन हजार मते कमी पडली आहेत. सोशालिस्टानी शे. का. फे. चा हक्क असलेले आपले एक मत कुजविले असावे ? या मतदार संघात वाया गेलेल्या मतांची संख्य ११९१८ इतकी भरली आहे. या वाया गेलेल्या मतांत याच तीन हजार कुजलेल्या दगाबाज मतांचा भरणा झालेला आहे असा कोणी निष्कर्ष काढला तर तो चुकीचा म्हणता येईल काय ?

## दगलबाजी पुढे चालू

या तीन हजार सोशालिस्ट मतदारांनी या मतदार संघात शे. का. फे. चा जो हा विश्वासघात केला, तो सुदैवाने शे. का. फे. ला घातक तरी झालेला नाही. पण शिवडी, काळाचौकी, नायगांव, वडाळा या मतदार संघात सोशालिस्टांनी शे. का. फे. चा अगदी या कानापासून त्या कानापर्यंत साफ गळा कापला आहे ! या मतदार संघातील सोशालिस्ट उमेदवार श्री. एम. जी. माने यांना २३,५९६ मते पडली असून राखीव जागेचे शे. का. फे. चे उमेदवार श्री. आर. डी. भंडारे यांना १९,३३७ मते पडली आहेत. या दोघांच्या मत संख्येत ४,२५९ मतांचे अंतर आहे. दुसऱ्या शब्दांत हेच सांगावयाचे म्हणजे श्री. माने यांच्या ४,२५९ सोशालिस्ट मतदारांनी शे. का. फे. चे उमेदवार श्री. आर. डी. भंडारे यांना मतदान न करता आपली मते काँग्रेसच्या किंवा इतर अन्य पक्षीयांच्या पेटीत टाकली आहेत अथवा श्री. माने यानाच दोन्ही मते देन आपले एकेक मत कुजविले आहे. शे. का. फे. सोशालिस्ट कराराप्रमाणे या ४,२५९ मतांवर शे. का. फे. चे उमेदवार भंडारे यांचाच हक्क होता. पण य

सोशालिस्टांनी दगलबाजी करून या एवढ्या मतांना श्री. भंडारे यांना नागविले आणि यांचा परिणाम काय झाला? तर काँग्रेसचे राखीव जागेचे उमेदवार श्री. **शिवतरकर** हे श्री. **भंडारे** यांच्यापेक्षा फक्त ५५३ मते अधिक पडून निवडून आले! सोशालिस्टांची दगलबाजी श्री. **भंडारे** यांना ही अशी भोवली. त्यांच्या मतदारांच्या बळावर सोशालिस्ट उमेदवार ऐसपैस मते पडून सुरक्षितपणे निवडून आला, पण त्यांचे स्वतःचे पाय मात्र, त्यांच्या गळ्यात गळा घालून निवडणूक लढविण्यास सिद्ध झालेल्या या साथीदारांनी अलगद ओढून त्यांना सपशेल तोंडघशी पाडले! मी विचारतो, शे. का. फे. मतदारांच्या प्रामाणिकपणाचेच हे बक्षिस सोशालिस्टांनी त्यांना दिले काय? की शे. का. फे. ने मुंबईबाहेर शेतकरी कामकरी पक्षाशी जो करार केला त्याचा हा असा सूड त्यांनी मुंबईत उगवून घेतला? पण तसे म्हणावे तर इतरत्र काही झाले तरी मुंबईत सोशालिस्टांनी शे. का. फे. ला दिलेला शब्द ते पूर्णपणे पाळल्याशिवाय रहाणार नाहीत' असे मोठ्या नेकीने आणि औदार्याचा आव आणून सोशालिस्टांनी शे. का. फे. ला आश्वासन दिले नव्हते काय? पण हे असे आश्वासन सोशालिस्टांनी दिले असले, तरी ते त्यांनी पाळण्यासाठी दिले दिले नव्हते, ते पाळण्याची त्यांची इच्छा (च) नव्हती. हेच या साऱ्या प्रकाराने आता सिद्ध करून दिले आहे. वाया गेलेल्या मतांचा आकडा या मतदार संघात तर १३००० पर्यंत गेला आहे. ही एवढी वाया मते सोशालिस्ट मतदारांच्या वाया गेलेल्या मतांमुळेच फुगली आहेत, हे त्यांना नाकारता येईल काय? ते नाकारावयाची त्यांची तयारी असल्यास, श्री. **भंडारे** यांना वगळून इतर पक्षांच्या उमेदवारांना त्यांनी आपली मते दिली हे तरी त्यांनी कबूल करावयास पाहिजे. एकंदरीत काय की दगलबाजीच्या आरोपातून त्यांची मुक्तताच होऊ शकत नाही! चिंचपोकळी, लव्हग्रोव्ह आणि शिवडी-वडाळा हे दोन्ही मतदार संघ या मतदानाच्या स्वरुपात हेच गर्जत आहेत की सोशालिस्ट पक्ष दगलबाज आहे, मित्र म्हणून अभिवचने देऊन ज्याला जवळ केले, त्याच्या मानेवर सुरी ठेवण्यासाठी तो माघार घेत नाही.

## अपयशही कलंकीत

या माझ्या आरोपाला प्रत्यारोप म्हणून कोणी एकदा असा मुद्दा उपस्थित करील की या दोन्ही मतदार संघात वाया गेलेल्या मतांत शे. का. फे. मतदारांचीही कुजलेली मते असण्याचा संभव काहीच का नाही? हा संभव अगदीच नाही असे मी म्हणत नाही. सोशालिस्टांच्या विश्वासघातकी कारवायांना प्रत्युतर म्हणून काही शे. का. फे. मतदारांनीच केवळ स्वतःच्याच उमेदवारांना अगदी शेवटी दोन्ही मते टाकली असतीलही. मनुष्य स्वभाव आहे. तेथे 'शंठं प्रति शाठ्यम्'ही प्रवृती या मतदारांत आणि तीही या अशिक्षित मतदारांत निर्माण झाल्यास ते अस्वाभाविक म्हणता येत नाही. पण अशी मते फार नसावीत, सोशालिस्ट मतदारांनी कुजविलेल्या मतसंख्येच्या

मानाने तर ती अगदीच तुटपुंजी असली पाहिजे. शे. का. फे. च्या मतदारांनी त्यांचा मनःक्षोभ होण्याला भरपूर कारणे असतानाही प्रशंसनीय संयम व शिस्त दाखविली हेच या मतदानावरून प्रकट होत आहे. मी असे म्हणत आहे, त्याला सबळ पुरावा आहे व तो लोकसभेचे त्यांचे उमेदवार डॉ. आंबेडकर यांना पडलेल्या मतांनी पुरविला आहे. डॉ. आंबेडकरांना १,२३,७३३ मते पडली आहेत आणि त्यात वाया गेलेली अथवा कुजलेली मते फक्त २९०० आहेत. कम्युनिस्टांप्रमाणे शे. का. फे. च्या मतदारांनी मतदान करावयाचे मनांत आणले असते तर डॉ. बाबासाहेबांच्या पेटीत पडून कुजलेल्या मतांची संख्या यापेक्षा किती तरी पटींनी अधिक वाढली असती. पण ती संख्या सुमारे सव्वा लाख मतांत फक्त दोन तीन हजारच आहे. यावरून हेच सिद्ध होत नाही काय की शे. का. फे. मतदारांनी कराराचे पालन शक्य तो प्रामाणिकपणेच केले. पण सोशालिस्टांनी मात्र त्यांची दुष्ट वंचनाच केली! लोकसभेच्या आपल्या उमेदवारासाठी सोशालिस्टांनी केलेल्या मतदानांचे आकडे हा मजकूर लिहून होईतो जाहीर झालेले नाहीत. पण राज्यविधान सभेच्या निवडणुकीतील मतदानाचा पुरावा त्यांचे करार भंगाचे पाप चव्हाट्यावर आणण्यास इतका पुरेस आहे की इतर मतदान त्यासाठी लक्षात घेण्याची सुद्धा आवश्यकता नाही! या इतक्या अशिष्ट कारवाया आणि विश्वासघातकी डावपेच खेळून त्यांनी अखेर काय साधले? राखीव जागा व शे. का. फे. चे साह्य जेथे होते, त्या दोन मतदार संघाखेरीज इतरत्र तुरळक अपवाद सोडल्यास त्यांचा उमेदवार अन्यत्र कोठेही निवडून आलेला नाही. स्वतंत्र उमेदवारांनाही राज्यविधान सभेच्या निवडणुकांत मुंबईत साऱ्याच ठिकाणी हार घ्यावी लागली आहे. पण त्यांनी या असल्या कसल्याच अशिष्ट व दगलबाजीच्या मार्गाचा आधार घेतला नव्हता किंवा आपल्या प्रामाणिकपणाचा "बोऱ्या" वाजविला नव्हता. त्यांना यश मिळाले नाही, पण त्यांचे अपयशही सोशालिस्टांप्रमाणे कलंकित नाही, प्रचंड पक्ष संघटना किंवा राजे-महाराजे आणि भांडवलवाले यांजकडून उकळलेल्या प्रचंड फंडाचे पाठबळ नसतानाही त्यांनी या निवडणुकीत मिळविलेली मताची संख्या उपेक्षणीय खास नाही, काही काही मतदार संघात तर सोशालिस्टांच्या बरोबरीने ही मतसंख्या त्यांनी मिळविली आहे. त्यांच्यामुळेच त्यांच्या अपयशाबद्दल मोठी खंत वाटावी अथवा त्यामुळे नाऊमेद व्हावे असे मला तरी काहीच दिसत नाही."

निवडणुकीत अनेक लायक उमेदवार पडले आणि अनेक नालायक उमेदवार निवडून आले हे कसे, याबद्दल मिमांसा करणारा अग्रलेख 'निवडणुकातील चमत्कार' २०-१-५२ च्या विविधवृत्ताने लिहिला. बाबासाहेबांच्या अपयशासंबंधी सदर अग्रलेखात खालील उद्गार काढले होते. :-

## ' गज गोष्पदी बुडाला '

कित्येक लायक उमेदवारांचा विजय पाहिल्यावर " गज गोष्पदी बुडाला " हा दैवा सिंधु शोषिला मशके या मोरोपंती उक्तीची आठवण झाल्यावाचून राहत नाही. गाईचे पाऊल पडलेल्या जागी सांचलेल्या पाण्यात हत्ती बुडणे ही अतिशयोक्ती तर खरीच, परंतु जवळ जवळ तसाच प्रकार डॉ. आंबेडकरांच्या पराजयाच्या बाबतींत दिसून आला. डॉ. आंबेडकर व श्री. काजरोळकर यांची कोणत्याच बाबतींत तुलना होणे शक्य नाही. परंतु काजरोळकरांना काँग्रेसने आंबेडकरांच्या विरुद्ध उभे केले होते. हत्ती ही आंबेडकरांची निवडणुकीतील निशाणी होती आणि काजरोळकरांची निशाणी काँग्रेसची म्हणजे बैल होती. गाईच्या ( येथे अर्थात बैलाच्या ) पावलातल्या पाण्यात हत्ती बुडाला असे म्हणावयास काय हरकत आहे ? डॉ. आंबेडकरांशी आम्ही कित्येक बाबतीत सहमत नाही. तथापि लोकसभेसाठी ते निवडून यावे असे आम्हास मनःपूर्वक वाटत होते. ते वर्गीकृत जातीचे प्रतिनिधी म्हणून उमेदवार होते व त्या बाबतीत त्यांची योग्यता "एकमेवाद्वितीयम" अशीच आहे. आंबेडकर व काजरोळकर यांच्यामधील वैयक्तिक पात्रतेचे महदंतर जरी बाजूला ठेवले, तरी आंबेडकरांच्या पराभवामुळे वर्गीकृत जातीच्या हितसंबंधांना जबर धक्का बसला ही गोष्ट कोणालाही नाकबूल करता येणार नाही. डॉ. आंबेडकरांचा पराभव पूर्वास्पृश्यांच्या मतानी नव्हे तर इतरांच्या मतामुळे झाला. काजरोळकर हे राखीव जागेसाठी निवडून आलेले असले तरी त्यांची निवड मुख्यतः स्पृश्य मतदारांनीच केली आहे, हे कसे विसरता येईल ! काजरोळकर हे सुस्वभावी गृहस्थ आहेत. परंतु तेवढयावरून ते लोकसभेत बसण्याला पात्र ठरत नाहीत. तेथे आंबेडकरासारखा (सव्यसांची) लढवय्याचा पाहिजे. डॉ. आंबेडकरांच्या पराजयामुळे राष्ट्राचेही नुकसान झाले आहे. ते निवडून आले असते तर, विरोधी पक्षाचे नेतृत्व बहुधा त्यांच्याकडेच आले असते. कसेही असले तरी पार्लमेंटात मंत्री किंवा विरोधी पक्षाचा प्रमुख सभासद या नात्याने ज्या काही थोड्या व्यक्तींना अवश्य स्थान मिळाले पाहिजे, त्यापैकी डॉ. **आंबेडकर** हे एक आहेत. त्यांना पाडण्यात काँग्रेस पक्षाशी कम्युनिस्ट उमेदवार श्री. **डांगे** यांनी ' तूस नको, मस नको, कुत्रेस घाल ' अशा धोरणाचा अवलंब करून जी हजारो मते **आंबेडकर** यांना गेली असती, ती फुकट घालवून सहकार्य केले ही गोष्टही दृष्टीआड करता येत नाही....'

टाईम्सचा स्तंभलेखक ' विवेक ' यांने जे विचार **बाबासाहेबांच्या** अपयशाबद्दल काढले होते ते हैद्राबादचे एक वाचक यांनी खोडून काढण्यासाठी टाईम्स-मध्ये पत्र प्रसिद्ध केले. **बाबासाहेबांनी** ज्या पद्धतीने राजिनामा दिला व काश्मिर प्रश्न आणि परराष्ट्रीय सरकारी धोरण या संबंधी जी सरकारी भूमिका आहे, तिच्यावर क्रूरपणे **आंबेडकरांनी** हल्ले केले, म्हणून मतदार त्यांच्यावर चिडले. आणि त्यांनी **आंबेडकरांना** निवडून दिले नाही. असा या पत्राचा आशय आहे. ते पत्र येणेप्रमाणे :—

"DR. AMBEDKAR

Sir, — "Vivek's" assertion that Dr. Ambedkar's defeat would seem to indicate that the non-Scheduled Classes did not wish to have the Scheduled Ciasses repaesented by their eminent champion is not only a wrong inference but an unnecessary provocation which an unbiassed critic having no links with the political parties should always avoid.

Had Dr. Ambedkar restricted himself to the progress and uplift of the oppressed people and also to matters of social reform like the Hindu Code Bill he would no doubt have been elected with a thumping majority. His defeat is due, not because he is unpalatable although a champion of the depressed classes, but mainly to the manner in which he resigned from the Cabinet and his views against the independent foreign policy of India and the Congress stand on Kashmir."

(Hyderabad (Deccan), January 24, Madan Mohan)

(Times of India, 3-2-1952)

**बाबासाहेबांनी** इलेक्शन कमिशनकडे आपल्या अयशस्वी निवडणुकीसंबंधी अर्ज २१ एप्रिल १९५२ ला सुपूर्द केला तो असा :—

IN THE MATTER OF THE REPRESENTATION OF THE PEOPLE ACT, 1951.

Election Petition under Section 81 to set aside the Election to the House of the People from the Bombay City North Constituency held on the 3rd day of January 1952.

Before the Election Commission,

NEW DELHI.

(1) Bhimrao Ramji Ambedkarl agead 60 of Bombay Inhabitant residing at Rajgraha, Hindu Colony, Dadar, without the Fort of Bombay.

(2) Asoka Ranjitram Mehta aged 39 of Bombay Inhabitant residing at 3, Dadystth Street, near Babulnath Temple without the Fort of Bombay. Petitioners.

Vs.

(1) Shripad Amrit Dange aged 52 of Bombay Inhabitant residing at Shah Nivas, Municipal House No. 3, Kohinoor Road, Dadar, without the Fort of Bombay.

(2) Gopal Vinayak Deshmukh aged 56 of Bombay Inhabitant residing at 39, Peddar Road, without the Fort of Bombay.

(3) Vithal Balkrishna Gandhi aged 55 of Bombay Inhabitant residing at 23, Dkarkadas Street, Khatau Building. within the Fort of Bombay.

(4) Keshav Balkrishna Joshi aged 49 of Bombay Inhabitant residing at P. 165, Shivaji Park Road No. 6, Mahim, without the Fort of Bombay.

(5) Narayan Sadoba Kajrolkar aged 56 of Bombay Inhabitant residing at 187 Suparibaug Road, Parel, without the Fort of Bombay.

(6) Nilkanth Baburao Parulekar aged 57 of Bombay Inhabitant residing at 157, Princess Street, without the Fort of Bombay. Respondeets

(7) Dattatraya Ramchandra Gharpure aged 62 of Bombay Inhabitant residing at Topiwala Mansion, 386, Sandhurst Road, without the Fort of Bombay.

(8) Ramchahdra Sadoba Kajrolkar aged 42 of Bombay Inhabitant residing at 185, Suparibaug Road, Parel, without the Fort of Bombay.

(9) Shantaram Sawalram Mirajkar aged 49 of Bombay Inhabitant residing at Abdul Kadar Chambers, Municipa 1 House No. P.L. 180, St. Xavier's Street, Bhoiwada Police Station Area without the Fort of Bombay.

To

The Election Commission,

New Delhi.

THE HUMBLE PETITION OF THE PETITIONERS ABOVE NAMED RESPECTFULLY SHEWETH :

1. That the Petitioners were candidates for election to the House of the people from Bombay City Noth Constituency at the Elections to the House of the People held on the 3rd January, 1952.

2. That the Petitioners' names were duly enrolled in the electoral roll and the Petitioners thus became eligible to stand as candidates from the said Constituency to the House of the People.

3. That the Petitioners duly filed their nomination papers as candidates from the Bombay City Noth Constituency. The Petitioners' nominations were duly accepted on 27th November, 1951. The Respondents 1 to 9 were the other candidates to the House of the People from the same Constituency as that of the Petitioners. The Respondents Nos. 7, 8 and 9 withdrew their candidature within the time allowed for such withdrawal.

4. That the said Bombay City North Constituency, as a plural member Constituency, has a right to elect two members to the House of the People. Out of the two seats to be filled in by Election in the said Constituency, one seat is general and the second one is reserved for the Scheduled Castes. Every voter in this Constituency has subject to the restriction prescribed in Section 63 (1) of the Act, two votes as there are two members to be elected; Section 63 (1) of the Representation of the People Act, 1951 (Act No. XLIII of 1951) expressly lays down that no elector shall give more than one vote to any one candidate.

5. That the election at the polling stations in the Bombay City North Constituency was held on the 3rd January, 1952.

7. That the counting of votes polled by the various candidates commenced on the 7th January 1952 and the same was completed on the 11th January 1952.

8. That the result of the election of the said Parliamentary Constituency was declared by the Returning Officer on 11th January to be as follows :—

(i) That the Petitioners I and 2 polled respectively 1,23,576 and 1,39,741 votes;

(ii) That the Respondents No. 1, 2, 3, 4, 5 and 6 polled 96,755; 40,786; 1,49,138; 15,195; 1,38,137 and 12,560 votes respectively;

(iii) That the Respondent No. 5 was elected to the reserved seat and the Respondent No. 3 was elected to the remaining seat from the said Constituency; and

(iv) That it was further declared by the Returning Officer that the total number of valid votes polled in the said Constituency was 7,15,888 and that the total number of invalid votes was 74,333;

That tde Petitioners rely on the declaration of the result made by the Returning Officer, a copy whereof is hereto annexed and marked A.

9. That the result of tde said election was published in the Gazette of India (Extraordinary) Part-I Section I, dated 26th January 1952, at page 130. The respective returns of election expenses have been duly lodged with tde Returning Officer under Rule 112 of the Representation of the People (Conduct of Election and Election Petitions) Rules, 1951, by the No. 1 on 10th March 1952 and by the Petitioner No. 2 on 7th March 1952.

10. The Pettitioners say that the Returning Officer has declared at the counting of the votes that the candidates who contested the election had obtained several double votes which the Returning Officer had to cancel as beinf null and void. The Petitioers say that as a result of the

inspection it was found that such invalid votes found in the ballot boxes of the Petitioners Nos. 1 and 2 and of the Respondents Nos. 1, 2, 3, 4, 5 and 6 and cancelled as being double votes, are as shown below :

| | | |
|---|---|---|
| Petitioner No. 1 | — | 2,921 |
| Petitioner No. 2 | — | 5,597 |
| Respondent No. 1 | — | 39,165 |
| Respondent No. 2 | — | 6,634 |
| Respondent No. 3 | — | 10,881 |
| Respondent No. 4 | — | 1,168 |
| Respondent No. 5 | — | 6,892 |
| Respondent No. 6 | — | 1,025 |
| | Total : | 74,333 |

The Petitioners will rely on the records in proof of this statement.

The Petitioners submit that in the aggregate 74,333 ballot papers had been rejected and not counted at all as being void by the Returning Officer for the aforsaid reason.

11. The Petitioners submit that at several polling stations of the aforesaid Constituency the voters to whom double voting papers were issued, did not, in thousands of cases, distribute the same as required by Section 63 (1) of the said Act, and their failure to comply with the provisions of Section 63 (1) of the said Act resulted in the said ballot papers being declared to be void and wholly worthless in respect of the election held in the said Constituency.

12. The Petitioners say that thte aforesaid large number of double votes being void votes, has been the result of corrupt practiie of undue influenre on the part of the Respondents Nos. 1 and 2 within the meaning of Section 123 (2) of the Representation of People Act, 1951, at the election as set out below and that the said corrupt practice has vitiated the entire election and has rendered the same void.

13. The Petitioners say that the Respondents Nos. 1 and 2 during their election campaign carried on a fierce, virulent and malicious propaganda by leaflets, handbills and press statements and by speeches at public meetings held in the Constituency and induced and illegally exhorted the voters to cast both their votes in favour of each of them in direct contravention of the rivisions of Section 63 (1) of the Act. The Petitioners say that due to the aforesaid propaganda carried on by the Respondents Nos. 1 and 2, amongst the voters in the Constituency, the electors were falsly induced to give more than one votes to the same candidate by placing both the ballot papers issued to them in the same ballot box and thereby contravening the said section of the said Act and defeating the purpose and policy underlying it.

14. (i) In a printed Marathi pamphlet addressed to and distributed amongst the voters in the said Bombay City North Constituency at the instance of the Respondent No. 1 or his agents and/or supporters, the Respondent No. 1 was described as the most capable leader of all, to lead the People's Front in the House of the People. The voters were exhorted therefore, to cast both their votes in favour of the said Respondent No.-1 avoiding to tell the voters whether voting in the manner suggested would benefit Respondent No. 1. A copy of the English translation of the relevant portion of the said hand-bill is annexed hereto the marked B.

(ii) A Marathi weekly paper entitled 'Yuganter' printed at Bombay gave instructions to the Bombay voters in its issue dated 29th December 1951 at page 4, columns 1, 2 and 3 whereby the voters receiving two ballot papers were, inter alia, falsely instructed and exhorted to drop both the ballot papers in the box with picture of the Engine pasted on it i.e. into the ballot box of the Respondent No. 1 again avoiding to tell the voters whether voting in the manner suggested would benefit Respondent No. 1. The Yugantar is an organ of the Communist Party of which the Respondent No. 1 was a nominee for the Parliamentary seat. A vopy of the English translation of the said instructions is annexed hereto and marked C.

(iii) Similarly in leaflet in Marathi issued ovear the signature of the Respondent No. 1 described as the United Front of the Leftist candidate for the House of the People from the said Bombay City North Constituency. It was stated, inter alia, that if the voters wanted their candidate to be elected they should cast both their votes for the Respondent No. 1. The Respondent No. 1 stated further that the waste of one of the two votes did not in any way violate democracy because according to the Respondent No. 1 giving of a vote by the non-Scheduled Caste voters to a candidate for the seat reserved for the Scheduled Castes is itself against the interests of democracy of the Scheduled Caste voters. Then referring particularly to the petitioner No. 1 the Respondent No. 1 stated in the said pamphlet that as the Petitioner No. 1 as aScheduled Caste candidate, was according to the Respondent, entitled to contest both the seats, it was desirable that the Respondent No. 1 must take both the votes for himself and that all those who wanted to make the United Front of Leftist nomination successful, should give both their votes to the 'Engine' (the symbol of the Party on whose ticket the Respondent No. 1 stood for election). A copy of the English translation of the said leaflet is annexed hereto and marked D.

15. In a press statement published by the Respondent No. 2 in the Marathi Weekly in Bombay entitled Vividh Vritta, in its issue of the 30th December 1951 under the caption, '*Bombay City North Constituence Parliamentary Election Trap*' '*Warning to the Voters*' the Respondent No. 2 warned the voters in this Constituency, where a reserved seat for the Scheduled Castes is provided, that a virtual trap to enable the two Scheduled Castes candidates to capture both the seats had been laid by the Petitioner No. 1, who belongs to the Scheduled Castes. The Respondent No. 2 further stated in the said statement that in order to escape the trap, the voter should cast his votes as he

himself wanted to, without paying any heed to any party or pact and comyletely disregarding, what he conveys, "the influence of self seeking leaders." He still further added that "that alone would be his duty", meaning thereby that the voters should cast both their votes to a candidate other than the Petitioner No. 1 if they wanted to avoid the Petitioner No. 1, who belonged to Scheduled Caste being elected with the Respondent No. 5 who also belonged to the Scheduled Castes, and thereby the Scheduled Castes candidates carrying both the seats and the non-Scheduled Castes community going unrepresented. An English translation of the said statement issued by and on behalf of the Respondent No. 2 is hereto annexed and marked E.

16. Then again the said Marathi Weekly, the Vividha Vritta, sponsoring the cause of the Respondent No. .2, published a statement under the caption '*Ruse in Voting,* in its issue dated 30th December 1951 at page 1 column 5 wherein it is stated, inter alia, that both the votes can be dropped in the box of a Caste Hindu candidate and that voting in this manner is in no way illegal. It is further stated that voters have complete freedom to cast both their votes for one candidate alone. An English translation of statement referred to in this para is hereto annexed and marked F.

17. The Petitioners say that the Respondents Nos. 1 and 2 in view of what is contained in the foregoing part 13, 14, 15 16 of this Petition not only misled tne voters but also played upon the communal feelings of the Caste Hindu voters; the Respondent No. 2 particularly raising the communal feeling of the Caste Hindu voters by creating a fear complex in them that their interests would be in jeopardy if they distributed their votes as required by law.

18. The Petitioners say that the Respondent No. 1 and 2 not only did create an alarm in the mind of the Caste Hindu voters in the said Borbay City North Constituency but failed to explain the provisions of Section 54 of the Act,

which prescribes how the results of election are to be determined and declared.

19. In the aforesaid manner the Respondents Nos. 1 and 2 mispresented the law and misled the Caste Hindu voters into believing that in any and every circumstance it was probable for the Scheduled Castes candidates to get themselves elected to both the seats to the exclusion of Caste Hindu community candidates.

20. The Petitioners say that in the aforesaid manner the Respondents Nos. 1 and 2 practised deception on the Caste Hindu voters and wilfully and fraudulently indused them caste both their votes in their favour.

21. The Petitioners submit that in view of what is stated in the foregoing paras, the Respondents Nos. 1 and 2 have by themselves their Agents and other persons acting for and on their behalf, exercised undue influence during their election campaign preceding the said election in as much as they actively interfered with the free exercise of the electroal right of thte voters within the meaning of Section 123 (2) of the Act and that the election on that account has not been a free election within the meaning of Section 100 (i) (a) of the said Act.

22. The Petitioners further say that the Respondent Nos. 1 and 2 knew that they could not derive any benefit to themselves by their propaganda to appropriate both the votes to themselves. All the same they persisted in the said propaganda because they were actuated by the malicious motive to injure the prospects of the Petitioners Nos. 1 and 2.

23. The Petitioners submit that the large number of double votes cast by the voters in favour of the Respondents Nos. 1 and 2 as hereinabove stated in para 10 is evidence of the fact that the undue influence exerted by the Respondents Nos. 1 and 2 in the said Constituency has extensively prevailed at the Election.

24. The Petitioners therefore say that the election has not been a free election by reason of the corrupt practices

of undue influence which extensively prevailed at the election, and that hence the said election should be declared wholly void.

25. That your Petitioners have deposited Rs. 1,000|- with the Reserve Bank of India in favour of the Secretary to the election Commission as security for the costs of the petition as required by Section 117 of the Representation of the Peoples Act, 1951. The original receipt showing that the said amount has been deposited in hereto annexed and marked G.

26. That this Petition is accompanied by a list of the particulars of the corrupt practices committed by the Respondents Nos. 1 and 2 signed and verified as required by Section 83 (2) of the Representation of the People Act, 1951 and is hereto annexed and marked H.

27 That this Petition is being presented within the time allowed under Rule 119 (b) of the Representation of the People (Conduct of Election and Election Petitions) Rules, 1951, 11th March 1952 being the date on which the time for lodging of the return of expenses under sub-rule (1) of Rule 112 of the said Rules expired.

28. The Petitioner No. 2 craves leave to submit any other petition on grounds other than those advanced in this Petition.

Your Petitioners, therefore, pray:—

(a) that an Election Tribunal be appointed for the trial of the Petition;

(b) that the election to the House of the people from the Bombay City North Parliamentary Constituency held on 3rd January 1952 be declared wholly void;

(c) that the Petitioners' costs of this Petition be provided for; and

(d) that your Petitioners may have such further and other reliefs as the nature of the case may require and for the purposes aforesaid all such orders may be passed and directions given including scrutiny of of votes as may be deemed necessary and proper.

Sd|- B. R. Ambedkar

Sd|- Ashoka Mehta

petition draw by )
Mr. N. C. N. Acharya, )
Advocate O.S. )
Sd|- Kothare & Co.
Attorneys for the
Petitioners.

We ,1) Bhimrao Ramji Ambedkar and (2) Ashoka Ranjitram Mehta of Bombay Inhabitants residing respectively at Rajgraha, Hindu Colony, Dadar, and 3, Aadyseth Street near Babulnath Temple without the Fort of Bombay do solemnly declare that what is stated in paras 1 to 9 and 11 to 26 of the foregoing Petition is true to our own knowledge and that what is stated in para 10 is stated on information and belief and we believe the same to be true.

Solemnly declared by )
Bhimrao Ramji Ambedkar, )
the Petitioner No. 1 )
above named at Bombay )
aforesaid this 21st day )
of April 1952. )

Sd|- B. R. Ambedkar

Before me

S e a l

Sd|- H. K. Patel

Presidency Magistrate,
XI Court, Kurla, Bmbay
21-4-52.

Solemnly declared by )
Asoka Ranjitram Mehata, )
the Petitioner No. 2 )
abovenamed at Bombay )
aforesaid this 21st day )
of April 1952. )

Sd|- Ashoka Mehta

| Seal |
|---|

.........................

Before me
Sd|- H. K. Patel
Presidence Magistrate
XI Court, Kurla, Bombay
21-4-52.

निवडणुकीतील अपयशाचे दुष्ट वातावरण चोहोकडे पसरलेले असता एक सुखद बातमी अमेरिकेतून आली.

भारताची राज्यघटना तयार करण्यात **बाबासाहेबांनी** जी महत्वाची कामगिरी केली; त्याबद्दल त्यांना सन्माननीय पदवी देऊन त्यांचा सत्कार करण्याची योजना **कोलंबो युनिव्हर्सिटीने १९५० साली आखली.** युनिव्हर्सिटीने तसे त्यांना कळविले. ज्या युनिव्हर्सिटीतून आपण एम्. ए. पीएच. डी. या पदव्या १९५१ व १९७१ सालात घेतल्या ती युनिव्हर्सिटी आपल्या कतृत्वाने प्रभावित होऊन आपला सन्मान करण्यासाठी आपणाला आणखी एक उच्च पदवी, डॉक्टर ऑफ लॉज (LL. D.), देऊन आपला सन्मान करीत आहे हे पाहून **बाबासाहेबांना** फार फार आनंद झाला आपल्या आयुष्यातील मनात बाळगलेल्या सर्व महत्वाकांक्षा आपण जिवापाड परिश्रम करून सफल केल्या, याचे त्यांना समाधान वाटले. परंतु यावेळी, भारताच्या मंत्रिमंडळापुढे मोठे मोठे प्रश्न उपस्थित झालेले होते, आणि ते घटनात्मक पद्धतीने हाताळून सोडविणे इष्ट होते. या महत्वाच्या कामाला बाजूला सारुन कोलंबीया युनिर्व्हसिटीची पदवी घेण्याकरतां न्यूयार्कला जाणे **बाबासाहेबांना** प्रशस्त वाटले नाही. शिवाय इतक्या लांबचा [सहा हजार मैल] प्रवास करण्याची दगदग आपल्या ढासळलेल्या प्रकृतीमुळे शक्य होईल की नाही याची त्यांना खात्री नव्हती. म्हणून त्यांनी युनिव्हर्सिटीला कळविले की सध्या मला अमेरिकेला येण्यास सवड नाही. युनिव्हर्सिटीचे त्यावेळचे अध्यक्ष जनरल **ऐसेनहॉवर** हे होते. हेच पुढे अमेरिकेचे अध्यक्ष झाले. **बाबासाहेब** त्यावेळी गेले असते तर **ऐसेनहॉवरच्या**

हस्ते सदर पदवीदान समारंभ झाला असता, कोलंबिया युनिव्हर्सिटी, **बाबासाहेबांच्या** गैरहजेरीत पदवी देण्यास तयार होती. पण **बाबासाहेबांना** ते नको होते. आपल्या विद्वत्तेला कारणीभूत झालेल्या युनिव्हर्सिटीत स्वतः जाऊन पदवी स्वीकारण्याची त्यांची इच्छा होती. म्हणून एक दोन वर्षात आपण पदवी स्वीकारण्यास येऊ असे त्यांनी युनिव्हर्सिटीला कळविले. शेवटी १९५२ च्या एप्रिलमध्ये, सर्व प्रमुख कामाच्या व्यापातून मोकळे झाले, तेव्हा त्यांनी युनिव्हर्सिटीशी पत्रव्यवहार केला. युनिव्हर्सिटीने पदवीदान समारंभ ५/६/५२ ला करण्याचे जाहीर केले. ज्या पंडितांना मानाच्या उच्च पदव्या द्यावयाचे ठरविले होते त्यांची यादी युनिव्हर्सिटीने मे महिन्याच्या चौथ्या आठवड्यांत जाहीर केली. तींत **बाबासाहेबांचे** नांव होते. ते नांव वाचून त्यांच्या हजारो चाहत्यांनी त्यांना अभिनंदनपर तारा व पत्रे पाठविली. त्या चहात्यापैकी भारताचे जगद्‌विख्यात तत्वज्ञानी पंडित आणि भारत सरकारचे उपाध्यक्ष, **डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्** हे एक होते. त्यांचे **बाबासाहेबांना** आलेले पत्र व **बाबासाहेबांचे** त्यांना आभारप्रदर्शक उत्तर ही मी खाली देत आहे.

(Government of India

| S e a l |
|---|

2, King Edward Road,
New Delhi.
26th May 1952.

My dear Dr. Ambedkar,

I am very pleased to see in the papers that the Columbia University is conferring on you the Honorary Degree of Doctor of Laws. It is an appropriate recognition for your great work in regard to our Constitution. My warmest congratulations.

There will be no time limit to-day and tomorrow for the first hour or so. So, if you wish to speak on the General Budget, it will be convenient if you do so to-day or to-morrow forenoon.

With kind regards,

Yours sincerely,
Sd/- S. Radhakrishnan.

Dr. B. R. Ambedkar,
Member, Council of States,
Parliament House, New Delhi."
4001-4003

"26, Alipore Road,
Delhi,
the 27th May 1952.

Dear Dr. Radhakrishnan,

Thank you very much for your letter of the 26th May 1952 containing your congratulations on the project of the Columbia University to confer and Honorary Degree of Doctor of Laws on me.

I am very glad to say there were at least some in India who are prepared to appreciate the honour that is being done to be.

With kind regards,

Yours sincerely,
Sd|- B. R. Ambedkar.

Dr. S. Radhakrishnan,
Vice President of India,
New Delhi."

**बाबासाहेबांच्या** बरोबर जाण्याची माईसाहेबांची इच्छा होती. परंतु **बाबासाहेबांनी** त्यांना दाद दिली नाही. "प्रकृति इतकी ढासळलेली असतां तुम्ही एकट्याने एवढा दूरचा प्रवास कसा करणार? तुम्हाला कोणाची तरी सोबत हवी." असा सल्लाही त्यांच्या अंतरवर्तुळातील काही जणांनी दिला. तो **बाबासाहेबांनी** तीव्र शब्दांत रागाने धुडकावून लावला. अर्धवट निराशा, अर्धवट राग अशा मनःस्थितीत **बाबासाहेब** त्यांना म्हणाले, "तुम्ही सर्वजण माझ्या मरणाची वाट पहात आहात" **सौ. माईसाहेब** व ते बोलणारे लोक खजील झाले. बाबासाहेब हताश झालेले होते. **बाबासाहेब** एकटेच न्यूयॉर्कला गेले.

इलस्ट्रेटेड विकली ऑफ इंडिया (रविवार) या साप्ताहिकाच्या १–६–५२ च्या अंकात (पा. ८) "पौलसक्स" या लेखकाने **बाबासाहेबांच्या** बद्दल जे उद्गार काढले ते असे :–

"THESE NEWS MAKE NEWS

"Whether in office or out of it, Dr. Bhimrao Ramji Ambedkar is always news. Earlier in the week he once again hit the headlines with a ruthless speech in the Upper House, in which he attacked the Government's Kashmir policy towards the formulation of which he is supposed to have taken a share as Minister in the last Cabinet. The Treasury Benches will, no doubt, have a sign of relief at the news that the formidable Doctor is going out of the country on June 1. He is flying to New York to receive the Honorary Degree of L.L.M. from his old University, Columbia.

He should have received this degree three year ago, at the hands of General Eisenhower who was then President of the University, but Cabinet responsibilities and, later, electioneering came in the way of the trips and the university was reluctant to confer it in absentia. Dr. Ambedkar will be visiting the United States of America, after 20 years. He told Pollux that Mrs. Ambedkar was not accompanying him on the trip for lack of an adequate supply of dollars. While in New York he plans to enter a clinic for medical treatment." [(Column 4) of the article by "Pollux" in the Illustrated Weekly of India, Sunday, 1-6-1952, page 8].

न्यूयॉर्क येथे एखाद्या निष्णात डॉक्टरांकडून प्रकृति तपासून घेण्याचे **बाबासाहेबांनी** मनांत योजलेले होते. त्यावेळी कोणीही बरोबर नसावे, अशी त्यांची इच्छा होती. आपल्या खर्चाला लागतील इतके डॉलर्स बँकेकडून मिळत नाहीत म्हणून आपण आपल्या पत्नीला न्यूयॉर्कला नेऊ शकत नाही असाही खुलासा **बाबासाहेबांनी** पोलेक्सजवळ केला.

**बाबासाहेब,** रविवार १–६–५२ च्या रात्री अमेरिकेला [न्यूयॉर्क] टी. डब्ल्यू. ए. च्या विमानाने निघणार हे नक्की ठरले, तेव्हा त्यांचे चहाते, अनुयायी, मित्र आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे कर्मचारी यांच्यातर्फे त्यांना; शनिवार ३१–५–५२ ला रात्री क्रिकेट क्लब ऑफ इंडिया येथे सत्कार–जेवण दिले. **डॉ. व्ही. एस. पाटणकर** [ प्रिन्सीपॉल ] आणि **श्री. के. वि. चित्रे** सेक्रेटरी पीपल्स एज्युकेशन सोसायटी, **श्री. प्रभाकर पाध्ये, श्री. बी. एच. राव, श्री. डब्ल्यू. आल्फ्रेड,** चेअरमन ऑफ दि युनियन ऑफ जर्नालिस्ट, वगैरे लोक हजर होते. **बाबासाहेबांना** परदेशातील विद्यापीठे उच्च पदवी देऊन त्यांचा सन्मान करतात, आणि आमची

भारतीय विद्यापीठे, ज्या विद्यापीठातून बाबासाहेब प्रथम पदवीधर झाले, ते मुंबई विद्यापीठहि त्यांना उच्च पदवी देऊन सन्मान करण्यास कां कू करीत आहे. असे डॉ. **पाटणकर** म्हणाले. **बाबासाहेब** न्यूयॉर्कला गेल्यानंतर ते तेथे भाषणे करतील आणि भारतातील अस्पृश्यांच्या प्रश्नाबद्दल भारतीय सरकार, किती उदासवाणे धोरण आंखीत आहे, याबद्दल आणि इतर राष्ट्रीय स्वरुपाच्या ज्वलंत, प्रचलीत प्रश्नांबद्दल ते आपले विचार प्रदर्शित करून भारतीय सरकारची अमेरिकन लोकांपुढे टर उडवतील की काय, अशी शंका अनेक लोकांना पडली होती. या शंकेचे निरसन करण्यासाठी त्यांना तशा अर्थाचे कांही प्रश्नही विचारण्यात आले. तेव्हा जेवणानंतर **बाबासाहेबांनी** जे आभारप्रदर्शक भाषण केले, त्यात सदर शंकेचे त्यांनी निरसन केले. मी स्वभावाने तापट आहे. मी अनेक बड्या व्यक्तींशी त्यांच्या, दिखाऊ कार्यावर प्रछन्न टीका करून भांडलोही आहे. पण मी आतांपर्यंत एकदाही राजद्रोह केलेला नाही. मी राष्ट्रीय आदर, महत्तता वगैरे राष्ट्रीय हिताबद्दलचे जे माझे विचार हिंदी वर्तुळ परिषदेच्या वेळी होते, ते महात्मा **गांधींच्या** विचारांच्यापुढे दोनशे मैल अंतरावर होते. मी अमेरिकन लोकांत भारताबद्दल तुच्छता उत्पन्न होईल, असे काहीही बोलणार नाही, असा त्यांनी खुलासा केला. या प्रसंगाचा वृत्तांत टाईम्स ऑफ इंडिया पत्राने २–६–५२ च्या अंकात [पा. ७ स्तंभ ३–सोमवार] दिलेला आहे. **बाबासाहेबांच्या** भाषणासंबंधी खालीलप्रमाणे उल्लेख आहे.

"Dr. Ambedkar said that he had not arranged any lecture programme in the United States and therefore no one need be under the apprehension that he would say anything harsh there about this country.

Dr. Ambedkar said that although he was said possess a vitriolic temperament and had on many occasions crossed the floors and come into conflict with those in authority he had not on a single occasion been a traitor to the country. He always had the interest of the country at heart. Even at the round table conference, he said, he had been "200 miles ahead of Mahatma Gandhi" so far as the interests of India were concerned". (The Times of India, Monday, 2-6-1952).

या प्रसंगाचे दी इव्हिनिंग न्यूज ऑफ इंडिया या पत्राच्या स्तंभ लेखकाने, गुरुवार दि. ५–६–५२ च्या आपल्या स्तंभात खालील विचार प्रदर्शित केले होते.

"A GREAT MAN

It is an irony of fate — to quote Principal U. S. Patankar of Siddhartha College — that none of the Indian Universities

has so far taken the initiative in honouring Dr. B. R. Ambedkar, one of the Chief Architects of our Constitution, by conferring an honorary degree on him. Even Bombay University of which Dr. Ambedkar was an alumnus, has been "slow and halting."

It has fallen to the credit of Columbia University, ot which also the learned doctor was a student, of being the first to honour Dr. Ambedkar by conferring on him the honorary degree of Doctor of Laws.

Dr. Ambedkar left for the United States last Monday by a T.W.A. plane. He will stay in the States for only a few weeks during which he hopes to get some treatment for his legs.

Dr. Patankar and Mr. Chitre, of Siddharth College, gave a dinner at the C.C.I. to Dr. Ambedkar on the eve of his departure. No one has ever seriously questioned Dr. Ambedkar's patriotism, and he made it plain during an after-dinner talk that it was never his intention to run down India during his stay in the United States.

During on interesting conversation, the doctor revealed that he liked Maulana Azad's Hindi very much. "If that is the type of Hindi which we are asked to follow, it will be a very good thing, and not the highly Sanskritised kind," Dr. Ambedkar said adding that the Maulana's Hindi hardly contained any Arabic or Persian words nor any Sanskritised expressions and yet was chaste, polished and dignified.

I must add that the dinner, apart from the excellent food served, was very well arranged. It must also be mentioned that if any Indian University itself." (Columnist of the Evening News of India, Thursday 5-6-1952, on Ambedkar's promise not to make a speech in New York embarrassing India).

या समारंभाचा वृत्तांत 'सकाळ' पत्राच्या [सोमवार] २–६–५२ च्या अंकात खालीलप्रमाणे प्रसिद्ध झालेला होता :–

## माझ्या देशाची नाचक्की करणार नाही —डॉ. आंबेडकर

मुंबई ता. १–'माझ्या देशातील आजची परिस्थिती मी परदेशांत कदापि उघड करून सांगणार नाही. देशाचा मान कसा व कोठे ठेवावयाचा हे मला चांगले कळते आतापर्यंत मी कोणाही परकीय माणसांजवळ माझ्या देशाबद्दल वाईट बोललो नाही. मग बाहेर जाऊन बोलण्याची शक्यता दूरच, असे उद्गार हिंदचे माजी कायदेमंत्री **डॉ. आंबेडकर** यांनी काल येथे एका सत्कार समारंभाचे वेळी बोलताना काढले.

सिद्धार्थ कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. **व्ही. एस. पाटणकर** व रजिस्ट्रार **श्री. सी. वाय.** (के. व्ही.) **चित्रे** यांनी काल **डॉ. आंबेडकरांना** भोजन दिले. कोलंबिया विद्यापीठाच्या डॉ. ऑफ लॉ पदवी स्वीकारण्याकरितां **डॉ. आंबेडकर** अमेरिकेला जात आहेत. ते पुढे म्हणाले, "मी अमेरिकेला जाणार हे समजताच काही लोकांच्या मनात धास्ती निर्माण झाली की येथे मी सरकारी कारभारावर प्रकाश टाकून देशाच्या स्थितीचे खरे चित्र रेखाटीन. त्या लोकांना मी सांगू इच्छितो की, अधिकारारूढ पक्षाशी व अधिकारावरील गृहस्थांशी (व्यक्तींशी) माझे मतभेद असले तरी मी त्याकरतां देशाची नाचक्की कधीही करणार नाही. समोरासमोर मी मंत्र्यांशी किंवा सरकार पक्षीय सभासदाशी दोन हात करीन. पण परकीयांदेखत किंवा परदेशात त्यांचा मानभंग करणार नाही.

गांधीजींच्याबरोबर मी गोलमेज परिषदेस हजर होतो. देशाचे हित जपण्याबाबत मी त्यांचेही पुढे २०० मैल होतो हे सांगू इच्छितो."

**बाबासाहेबांचे** विमान रविवार (१–६–५२) रात्रौ सांताक्रुझ विमानतळावरून निघाले. विमानांत चढतांना त्यांनी लोकांना हसून नमस्कार केला व "मी जातो" असे दर्शविण्यासाठी उजवा हात वर केला. डाव्या हातात ओव्हरकोट, डोकीस फेल्ट हॅट व गळ्यात काळी टाय असा त्यांचा पोशाख होता. या पोशाखातील त्यांची "जातो हे" या पोझमधला फोटो (सोमवार) २–६–५२ च्या फ्री प्रेस बुलेटिनने पहिल्या पानावर प्रसिद्ध केलेला होता.

कोलंबी या युनिव्हर्सिटीचा पदवीदान समारंभ शुक्रवार दिनांक ६ जून १९५२ रोजी झाला. आपल्या पदव्या घेण्यासाठी १७ कॉलिजे व हायस्कूल यांतील ६८४८ विद्यार्थी विद्यार्थीनी, युनिव्हर्सिटीच्या भव्य मंडपात बसलेले होते. कॅनडाचे परराष्ट्रमंत्री, मि. लेस्टर बी. पिअरसन, फ्रान्सचे प्रसिद्ध वाङ्मयेतिहासकार मि. एम्. डॅनिअल मार्टेन व बाबासाहेब हे तिघे परदेशी आणि आठ अमेरिकन नागरिक असे अकरा गृहस्थ उच्च व सन्माननीय पदव्या स्वीकारण्यास मंडपात बसलेले होते. पदवी देतांना **बाबासाहेबांचा** उल्लेख केला, तो, ते भारताचे एक प्रमुख नागरिक, मोठे समाजसुधारक, आणि मानवी हक्कासाठी खंबीरपणे लढत राहणारे लढवय्ये, अशा

गौरवापर शब्दांत केला. समारंभाचा वृत्तांत टाईम्स ऑफ इंडियाच्या ७–६–५२ (शनिवार) च्या अंकात (पा. ५ स्तंभ ८ दिलेला होता तो असा :—

"DR. B. R. AMBEDKAR

New York, June 6. Columbia University Yesterday bailed Dr. B.R. Ambedkar as "one of India's leading citizens — a great social reformer and a valient upholder of human rights," in awarding him an honorary degree at its 198th commencement execites.

Dr. Ambedkar received the honorary doctorate of laws and letters before the large crowd assembled to watch 6,348 graduates of Columbia's 17 schools and colleges receive degrees for completing course of study. Among those who were also honoured were Mr. Laster B. Pearson, Canadian Secretary of State for Foreign Affairs, Mr. Daniel Mornnet, the noted French literary historian, and eight American citizans."

(The Times of India, Saturday 7-6-1952, page 6)

पदवीदानानंतर बाबासाहेब आणि मि. वॅलेस स्टिव्हन्स, कवि आणि कानेकिटकर देशांतील हार्टफोर्ड येथील इन्सुरन्स कंपनीचे अधिकारी या दोघांचा फोटो घेण्यात आला. तो १३–६–५२ च्या टाईम्स ऑफ इंडिया पत्राने प्रसिद्ध करून याच्या खाली खालील खुलासा प्रसिद्ध केला होता :—

"DOCTOR OF LAWS"

Dr. B.R. Ambbdkar, who received the honorary degree of Doctor of Laws from Columbia University, New York, on June 5, is seen above with a another receipient Mr. Wallace Stevens, poet and Insurance Executive from Hartford, Connectieut, who received the honorary degree of Letters."

(The Times of India, 13-6-1962, with a photograph of Wallace Stevens and Amberlkar).

डॉक्टर ऑफ लॉज या पदवीचे "सायटेशन" लॅटिन व इंग्रजी या दोन्ही भाषेत होते. हे "सायटेशन" ५ जूनला युनिव्हर्सिटिचे "व्हॉईस प्रेसिडेंट ॲण्ड प्रोव्होस्ट" ग्रेसन कर्क यांनी समारंभाच्या भव्य सभामंडपात वाचून दाखविले ते असे :—

CITATION

"COLUMBIA UNIVERSITY IN THE CITY OF NEW YORK

BHIMRAO RAMJI AMBEDKAR, LL.D.

Born in India and schooled there under heavy hardships; B.A. of the University of Bombay at twenty and for three years a graduate student in this University, receiving the doctorate in poitical scienhe, subsequently a student of the Ihns of Court and the University of London obtaining a doctorate in economics; for the past trree decades as barrister, University professor and member of the legislative council, as a framer of the Constitution, member of the cabinet and of the Council of State. one of India's leading citizens, a great social reformer and a valiant upholder of human rights.

In the exercise of the authority conferred upon me by the Trustees, I gladly admit you to the degree of Doctor of Laws, *honoris causa*, in this University and confer upon you all the rights and privileges which attach thereto, in token whereof I hand you this diploma.

Sd/- Grayson Kirk,

June 5, 1952. Vice-President and Provost."

"SURATORS UNIVERSITATIS COLUMBIAE
NEO EBORACENSIS

OMNIBUS ET SINGULIS QUORUM INTEREST SALUTEM HIS LITTER'S TESTAMUR NOS UNANIMI CONSENSU

Bhimrao Ramji Ambedkar

AD GRADUM

DOCTORIS IN LEGIBUS

HONORIS CAUSA PROVEXISSE EIQUE OMNIA IURA ET PRIVILEGIA QUAE AD ISTUM ATTINENT DEDISSE ET CONCESSISSE IN CVIVS REI PLENIVS TESTIMONIUM SIGILLO HVIVS UNIVERSITTIS ET PRAESIDIS CHIROGRAPHO DIPLOMA IIOCCE MUNIENDUM CURAVIMVS DATUM NOVI EBORACI DIE

MENSIS IVNII QUINTO
ANNOQUE DOMINI Sd/- Grayson Kirk
MILLESIMO NONGENTESM PROPR AE SES
QUINQUAGESIMO SECUNDO

Seal of the University
of Columbia.

कोलंबिया युनिव्हार्सिटीचा पदवीदान समारंभ संपल्यानंतर **बाबासाहेबांनी** आपली प्रकृति न्यूयॉर्कमधील सुप्रसिद्ध अशा दोन डॉक्टरांकडून तपासून घेतली. डॉक्टरांनी त्यांना न्यूयॉर्कमध्ये एक महिनाभर उपचारासाठी रहावे लागेल असे सांगितले. पण एक महिना उपचारासाठी रहाण्याचा खर्च करण्याइतके पैसे त्यावेळी त्यांच्याजवळ नव्हते. कमीत कमी त्यांना त्यावेळी दहा पंधरा हजार तरी खर्चावे लागले असते. दुसरे आणि महत्वाचे म्हणजे हिंदुस्थानांत त्यांना पिपल्स एज्युकेशन सोसायटीची व इतर सामाजिक व राजकीय कामे जी करावयाची होती त्यांच्याकडे त्याचे लक्ष लागले होतें. कामाच्यापुढे त्यांनी आपल्या प्रकृतीला कधीच महत्त्व दिलेले नव्हते, आणि यावेळीसुद्धा त्यांची संपूर्णपणे ढासळलेली प्रकृति न्यूयॉर्कमधील डॉक्टरांच्या हातून दुरुस्त होण्याची खात्री असतांनाही त्यांच्या नेहमीच्या स्वभावानुसार (कामापुढे प्रकृतीला महत्त्व न देणे) उचल खाल्ली. त्या दोन अमेरिकन डॉक्टरांनी औषधे लिहून दिलेले कागदबरोबर घेऊन ते विमानाने न्यूयॉर्कहून मुंबईस २१ जूनला संध्याकाळी परत आले. त्यांच्या स्वागतासाठी सांताक्रुस विमानतळावर हजारो लोक जमले होते. अमेरिकेतून सन्माननीय उच्च पदवी घेऊन येणाऱ्या आपल्या पतीला ओवाळण्यासाठी सौ. माईसाहेब आरती घेऊन सज्ज होत्या. **बाबासाहेब** विमानातून खाली उतरताच अनेकांनी त्यांना हार घातले. **सौ. माईसाहेब** आरती घेऊन ओवाळण्यासाठी पुढे आल्या, पण **बाबासाहेबांनी** त्यांना तसे करण्यास मज्जाव केला.

विमानतळाहून **बाबासाहेब** सरळ मॅजेस्टिक हॉटेलमध्ये रहावयास गेले. तेथे ते २९ जून पर्यंत राहिले. त्या दिवशी रात्री ८ वाजतां ते राजगृहात रहावयास आले. तेव्हा नेहमीप्रमाणे राजगृहावर संध्याकाळी लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत व परत जात.

२१ जुलैला पश्चिम बर्लिन येथे भरणाऱ्या कायदेविषयक व इतर विषयासंबंधीच्या अंतरराष्ट्रीय परिषदांना उपस्थित राहाण्याचे आमंत्रण **बाबासाहेबांना** मुंबईच्या पत्त्यावर १९ जूनला आलेले होते. त्या आमंत्रणाला त्यांनी नकारात्मक उत्तर ३० जूनला पाठविले.

१४-७-५२ ला परळच्या दामोदर हॉलमध्ये निमंत्रित समाजसेवकांची सभा रात्री ८ वाजता भरविण्यात आली होती. तीत भाषण करतांना बाबासाहेबांनी ढोंगी व पैसे खाणाऱ्या कार्यकर्त्यांचा अत्यंत तीव्र शब्दांत, रागाने निषेध केला. त्यांच्या बोलण्याचा मुख्य रोख इमारत फंड व जनता पत्र याबद्दल होता. हा फंड १९३८ साली स्थापन झाला. या फंडात १९५२ पर्यंत १,११,२२८ रु. आ. ३ पै. इतका निधी जमा झाला होता. इमारत व हॉल यांना पावणेदोन लक्ष रुपये खर्च येईल. माझ्यासाठी साठाव्या वाढदिवसानिमित्त जी साठ हजारांची थैली देण्यात येईल ती या इमारत फंडास मी देईन व जनता पत्राचे ट्रस्ट करून ते पत्र जोमाने चालविण्यास एक फंड चालू करणे वगैरे बाबीसंबंधी बाबासाहेबांनी खुलासा केला. [ जनता, १९-७-५२ ]

शे. का. फेडरेशन, शे. का. इंप्रुव्हमें- ट्रस्ट, म्यु. कामगार संघ, महार ज्ञाती पंचायत, व समता सैनिक दल या पांच संस्थातर्फे २८–९–५२ ला ५–३० वाजता नरेपार्क, मुंबई येथे दसऱ्यानिमित्त 'मुंबईतील अस्पृश्य जनतेचे जाहीर संमेलन घेण्यात आले होते. या संमेलनात मुख्यतः **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे** भाषण हाच मुख्य कार्यक्रम होता. 'इमारत फंड जमविण्यासाठी सोन्यासारखी प्रतिज्ञा करा' असा यांनी जनतेला संदेश दिला. अस्पृश्यांच्या चळवळीतील फंडगुंड व सुशिक्षीत लोक यांच्यावर बाबासाहेबांनी टीकेचे प्रहार केले. [ जनता, ४–१०–५१ ]

बुद्ध धर्मातील प्रार्थना सामान्य माणसांना सुस्वर पद्धतीने म्हणता येईल, अशी चाल प्रार्थना गीतांना लावण्याची कल्पना बाबासाहेबांच्या मनात कित्येक दिवस घोळत होती. ती कल्पना अमलात आणण्याचे ठरवून ते काम कोणाकडून करवून घेता येईल याबद्दल बऱ्याच जणांशी विचारविनिमय केला. **श्री. भास्कर भोसले** हे गृहस्थ आकाशवाणीत अधिकारी होते. ते बाबासाहेबांना म्हणाले मी **श्री. मास्तर कृष्णराव फुलम्रीकरांना विचारतो.** मास्तर कृष्णरावांनी भोसले यांना गुळमुळीत होकार दिला पण नक्की कांही ठरले नसल्यामुळे भोसले यांनी बाबासाहेबांना काहीच कळविले नाही. तेव्हां बाबासाहेबांनी १९ जुलैला भोसले यांना पत्र लिहीले. भोसले, मास्टर कृष्णराव आणि त्यांचे शिष्य यांना घेऊन राजगृहावर आले. **बाबासाहेबांच्या बरोबर मास्तर कृष्णरावांची** चर्चा होऊन ९ ऑगस्टला पद्यांच्या रेकॉडिंगला सुरवात झाली. तीन रेकॉर्डस तयार झाल्या बाबासाहेबांच्या पसंतीस उतरल्या. शेवटच्या दिवशी बाबासाहेबांनी मास्टर कृष्णराव व त्यांचे शिष्य आणि उपस्थित मंडळींना कॉफी पान दिले. मास्टर कृष्णरावांनी, बाबासाहेबांना दोन चीजा म्हणून दाखविल्या, आणि सारे वातावरण धुंद करून सोडले. सर्वांनी मास्टर **कृष्णरावांच्या** गाण्याचा आनंद लुटला.

हिंदुकोड बिल नव्या स्वरुपात कायदेमंडळांत आल्याचे कायदेमंत्री यांनी जाहीर केले तेव्हा अनेक विचारवंतांना बरे वाटले नाही. बाबासाहेबांनी ज्या विशाल स्वरुपात कोड तयार केले होते; ते पास व्हावे अशी त्या सर्वांची इच्छा होती. पण आता जाहीर झालेले हिंदुकोड बिल फारसे महत्वाचे नसल्यामुळे टीकाकारांनी त्यावर तीव्र हल्ले चढविले. एका गृहस्थाने टाईम्समध्ये पत्र प्रसिद्ध करून असे दाखविले की धृतराष्ट्र दरबारात द्रौपदीची वस्त्रे ओढतांना कौरवांनी जितके तिचे हाल केले, त्यापेक्षा जास्त हाल आंबेडकरांच्या हिंदु कोड बिलाचे तुकडे तुकडे करून काँग्रेस सरकार करीत आहे. अशा सरकारी धोरणामुळे सामाजिक व राजकीय जीवन आहे त्याच चाकोरीतून चालू लागले. ते धडाडीने [आत्मविश्वासाने] चालणार नाही व देशाची प्रगतिही होणार नाही. ते पत्र असे :—

"DEAD AND UBRIED

Sir, — There can hardly be a parallel in history in the mauling and humiliation that the Hindu Code Bill on which eminent jurists like Mr. B. N. Rau had slaved for years has been subjected to by the very Government that sponsored it. Its fate has been worse than that of Draupadi who had Lord Krishna to save her honour when she was being stripped naked in the Dhritarashtra's court. Filibuster, postponement of consideration for amendment after informal consultations and, finally, splitting it up in parts held up in progress of the Bill and, as if this were not enough, even the marriage part, introduced separately, was not passed by the last Parliament. Yet we were asked to believe that the Bill was a precursor of the common civil code envisaged by the Constitution.

The President told the present Parliament that fresh legislation on the Bill would be introduced in parts. The Law Minister later referred to the "diversity of opinion" on the Bill and the possible need for "a new approach". So the Rau Committee and others had laboured in vain to produce the Bill. And since when has the Government begun to show deference to the "diversity of opinion" on a legislative measure? Is any such deference discernible for example, in the Government's determination to perpetuate the Preventive Detention Act? However that may be, the Law Minister said that a "small" Bill would be introduced in the present session in pursuance of the Government's decision to enact a modified Hindu Code Bill in parts. Actually all that he has done in is to produce some amendments to the Special Marriage Act of 1872 which is merely a permissive measure and has nothing to do with Hindu Code Bill. Bombay and one or two other States already have a monogramous marriage and divorce law for the Hindus. Why should the Central Government fight shy of adopting it for application to the whole country?

It is better that all pretences about Government's continued support of the Hindu Code Bill are dropped. In any

case, the people will not be fooled. They know that the Bill has been killed and buried so far as the present Government is concerned.

Some two years ago Mr. Nehru said heroically that his Government would stand or fall by the Bill. Someone stands but it is not the Hindu Code Bill. Yet Mr. Nehru will continue to acclaim himself as a progressive and we may even hear him say that the Rau Committee like Marx is out of date and even reactionary.

Sd|- Anti Humbug."

Bombay, July 31.

(The Times of India, 4-8-1952).

सामाजिक आणि शैक्षणिक बाबतींत ज्या जाती मागासलेल्या आहेत त्यांच्या प्रगतीसाठी कोणत्या योजना हाती घ्याव्यात याची चौकशी करून शिफारसी करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष, एक सात सभासदांचे मंडळ नेमण्याची घोषणा सुमारे महिन्यांच्या आत करणार आहेत असा वृत्तांत "Backward Class Welfare — 7 man body Investigate" या शीर्षकाखाली टाईम्स ऑफ इंडियाच्या ११-८-५२ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. त्याप्रमाणे Castes and Scheduled Tribes Commission नेमण्यात आले.

**बाबासाहेबांची** प्रकृति सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात बिघडली. ते मुंबईस औषधोपचारासाठी आले. तेव्हा मुंबईतील कार्यकर्ते त्यांच्याकडे सिद्धार्थ कॉलेजात (मिलिटरी हटमेंटस) जाऊन बसत. ते एकमेकाच्या कागाळ्या साहेबांच्या कानावर घालू लागले. तेव्हा बाबासाहेबांनी सर्व कार्यकर्त्यांना बोलावून घेतले व खुलासे विचारले. त्यांच्या खुलाशांनी त्यांचे समाधान होऊ शकले नाही. सुमारे तीस हजार रुपयांचा हिशेब कार्यकर्त्यांना देता येत नाही, हे पाहून बाबासाहेबांनी ठरविले की हे समाजकंटक शिरजोर होण्याच्या अगोदर त्यांची नांगी मोडून ताळ्यावर आणले पाहिजे म्हणून साहेबांनी त्यांना जाहीर सभा बोलाविण्यास सांगितले. त्याप्रमाणे जनतेत खालील विनंतीपत्र प्रसिद्ध झाले.

## "जाहीर संमेलन"

अस्पृश्य वर्गातील सर्व जनतेस कळविण्यात येते की, रविवार दि. २८-९-५२ रोजी सायंकाळी चार वाजता नरे पार्क मैदान (जी. आय. पी. आर. वर्कशॉप समोर) या ठिकाणी शे. का. फेडरेशन, शे. का. इंप्रुव्हमेंट ट्रस्ट, महार ज्ञाति पंचायत समिती, मुंबई, म्यु. कामगार संघ व समता दैनिक दल या संस्थातर्फे जाहीर संमेलन घेण्यात

येत आहे. सदर प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित राहून भाषण करणार आहेत. तरी या प्रसंगी सर्वांनी हजर राहून या अमूल्य संधीचा लाभ घ्यावा अशी विनंती आहे. सभेची व्यवस्था ठेवण्याचे काम समता सैनिक दल करणार आहे. कळावे.

आपले नम्र,

**जे. जी. भातनकर**

सेक्रेटरी, शे. का. फे., मुंबई, म्यु. कामगार संघ

**एल. एफ. हिंदळेकर**

जनरल सेक्रेटरी, महार ज्ञातिपंचायत स. मुंबई.

**डॉ. अ. उपशाम**

सेक्रेटरी, शे. का. ई. ट्रस्ट.

**एम्. एम्. ससोळेकर**

जी. ओ. सी. समता सैनिक दल

**वि. सूचना** :– समता सैनिक दलातील सैनिकांनी दुपारी २–०० वाजता सभेच्या ठिकाणी हजर रहावे.” [जनता, २७–९–५२]

ढोंगी, स्वार्थी, जनतेची दिशाभूल करुन फंड गोळा करणारे पैसे खाणारे आणि भरीव कार्य न करतां नुसता गारुडी देखावा निर्माण करुन लोकांच्या डोळ्यात धूळ फेकणारे जे समाजांत लहान मोठे कार्यकर्ते होते, त्यांच्या फसवेगीरीच्या वर्तनाबद्दल बाबासाहेबांनी जोराची टीका केली. जेव्हा त्यांनी काही समाककंटकांची नांवे घेऊन, त्यांची निर्भत्सना केली, तेव्हा कोणीतरी एकाने माईक बंद पाडला. माईक बंद पडला व साहेबांच्या भाषणांत अडथळा आणला. तेव्हा साहेब खूपच संतापले व त्वेशाने भाषण करुं लागले. या भाषणाने सारे लोक चकीत झाले. अपराधी कार्यकर्ते रडकुंडीला आले. आता आपली धडगत नाही असे त्यांना वाटले. याबद्दलचा वृत्तांत टाईम्सने दिला तो असा :–

“BUILDING FUND OF PARTY
DR. AMBEDKAR'S CRITICISM

Dr. B. R. Ambedkar, the Scheduled Castes leader, caused a flutter among his followers on Sunday but publicly criticising those responsible for raising the Scheduled Castes Federation's building fund for the manner in which the accounts had been handled.

It was expected that Dr. Ambedkar would make a reference to the merger of the Socialist Party with the

K.M.P.P. Instead, he surprised a large gathering at a meeting held at Nare Park, Parel, Bombay, by demanding "show me the accounts now."

Dr. Ambedkar said that he did not trust the educated people of his community any more.

The Scheduled Castes leader made a ten-minute speech, in which he confined himself to the question of the building fund to the disappointment of the crowd which had waited for nearly two hours to listen to him.

As Dr. Ambedkar was angrilly telling the organisers of the fund, some of whom were present on the rostrum, that he desired account books to be submitted to him, the loud-speakers were switched off.

Apparently in answer to an explanation given by a member, Dr. Ambedkar was heard to remark, "I won't tolerate this. Give me the books to-morrow."

Dr. Ambedkar first declined a garland presented to him before the meeting came to an end, and then reluctantly accepted it.

The funttion was held under the joint auspices of several organisations. They were the Scheduled Castes Federation, the Bombay Municipal Kamgar Sangh, the Mahar Gnati Panchayat, the Samata Seva Dal and the Scheduled Castes Improvement Trust Fund.

### FUNDS FOR BUILDING

At present Dr. Ambedkar said, all his attention was concentrated on the building of a hall for the Federation He was leaving for Delhi next week and would not return for some days. He had a fear that his absence from Bombay, the work of swelling the fund would not progress.

While making an appeal for generous donations from members of his community, Dr. Ambedkar said that the common people would support him in the case. Having lost his faith in the "educated people", he had pinned his hopes on them, he said.

In the last few moments, a sum of Rs. 22,000|- had been collected. Dr. Ambedkar had once thought that a hall had to be built even if it necessitated raising a loan. Now he had changed his mind and the hall had to be constructed out of the funds donated by members themselves."

(The Times of India, Monday, 29-9-1952).

या सभेचा मराठी वृत्तांत असा होता :-

## "शे. का. फे. च्या जाहीर सभेत खळबळ जनक प्रकार"

## डॉ. आंबेडकरांचा सहकाऱ्यांवर संताप.

मुंबई सोमवार :- शेड्यूल कास्ट फेडरेशन, महार ज्ञातिपंचायत, म्युनिसिपल कामगार संघ आदि हरिजन संस्थांच्या वतीने काल रोजी सायंकाळी नरेपार्क येथे भरलेल्या जाहीर सभेत खळबळजनक प्रकार घडला.

या सभेत डॉ. आंबेडकरांचे भाषण होण्याचे जाहीर झाल्यामुळे सभेस बरीच गर्दी झाली होती. नुकत्याच झालेल्या प्रजा सोशालिस्ट युतीसंबंधी डॉक्टरसाहेब कांहीतरी बोलतील अशी बहुतेकांची कल्पना होती. पण डॉक्टरांनी आपल्या भाषणांत त्यासंबंधी एक शब्दही उच्चारला नाही.

आपल्या भाषणांत त्यांनी शे. क. फेडरेशनची मुंबईत एक इमारत असली पाहिजे याच एकमेव मुद्यावर विवेचन केले.

### सहकाऱ्यांवर टीका

याच इमारत निधीच्या हिशेबाबात त्यांनी आपल्या सहकाऱ्यांवर जाहीर टीका केली. ते म्हणाले, आपल्या जातीतील सुशिक्षित लोकांवर अजिबात विश्वास उरलेला नाही. माझ्या सर्व आशा मी आपणावर (अशिक्षितांवर) केंद्रित केल्या आहेत.

### ध्वनिक्षेपक बंद

या निधीचे काही कार्यकर्ते व्यासपीठावर हजर होते. त्यांच्याजवळ डॉक्टरसाहेबांनी हिशेब मागितले. त्यावेळी खळबळ माजली नि ध्वनीक्षेपक बंद करण्यांत आले पुढे ध्वनिक्षेपक चालू झाले तेव्हा डॉक्टरसाहेबांचे पुढील वाक्य ऐकू आले. "मला हे खपणार नाही. उद्याच्या उद्या मला हिशेब आणून दाखवा", त्यांच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या खुलाशाला उद्देशून हे वाक्य असावे.

### हार नको

**आंबेडकरांनी** अवधी दहा मिनिटे भाषण केले. भाषणांनंतर त्यांनी पुष्पहार नाकारला. अखेर बऱ्याच आग्रहानंतर त्यांनी त्याचा स्वीकार केला. (नवशक्ति, ३०-९-५२)

दिनांक २८ सप्टेंबरच्या नरेपार्कवरील सभेत बाबासाहेबांनी फेडरेशनच्या कार्यकर्त्यांवर जे चौफेर हल्ले चढविले ते अतिशयोक्तिपूर्ण होते, अशा अर्थाचे पत्र श्री. कदम या नावाच्या एका गृहस्थाने टाईम्समध्ये प्रसिद्ध केले. कोणते कार्यकर्ते संभावित चोर आहेत, आणि कोणते सुशिक्षित लोक सोनेरी टोळीतील ठक आहेत, हे समाजाला [ म्हणजे पर्यायाने बाबासाहेबांनाही ] माहीत होते, तरी त्यांना चळवळीतून हद्दपार न करता चळवळीची सूत्रे व फंड ही या समाज कंटकांच्याच हातात राहू दिली, ही समाजाची चूक झाली. त्यामुळे हा घोर प्रसंग आला व तो जनतेसमोर उघड करणे बाबासाहेबांना भाग पडले असेही श्री. कदम यांनी या पत्रात मत प्रदर्शित केले. त्याचे पत्र असें होते. :–

**"BUILDING FUND**

Sir, — Dr. Ambedkar's vitriolic outbursts against educated people at the mass meeting on Sunday September, 28, was uncalled for. Even admittisg the bungling of those handling the "Building Fund" the situation is not so serious as to justify public exposure of the organisers and wholesale condemnation of all educated people in the community.

The Party was aware of the misercants and no action was taken to purge them before launching a new the present "Building Fund." The very people against whom popular feelings ran continued to manage the fund.

Sd|- M. T. Kadam."

Bombay, November 1.

(The Times of India, 10-11-1952).

बाबासाहेबांनी कार्यकर्त्यांच्या समाजविघातक कृत्यांचा जो स्फोट केला त्यासंबंधी वर्तमानपत्रातून बराच पत्रव्यवहार प्रसिद्ध झालेला होता. कार्यकर्त्यांतील ठळक लोक व त्यांचे हस्तक यांचे समाजाला भुलभुलावणी घालणारे चाळे यांचा सदर पत्रव्यवहारांत संदर्भ दिलेला होता. अशा कार्यकर्त्यांची बाजू दाखविणारीही पत्रे प्रसिद्ध झालेली होती. या संबंधीचा एक नमुना मी येथे देतो. :–

**" शेडयूल्ड कास्ट फेडरेशनमधील सूर्याजी पिसाळ कोण ?"**
**शे. का. फे. ची प्रतिष्ठा व बाबांची इभ्रत धोक्यात**
**फेडरेशनविरोधकांना फेडरेशनमध्ये घुसवून फेडरेशनचा**
**विचका करणारे कुलकलंक –**

[ लेखक– **तोच तो फेडरेशनवाला** ]

सार्वजनिक फंडातील हजारो रुपयांची अफरातफर करणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी मुंबईतून जो सूबाल्या केला तो काही दिवसांनी लोकांच्या लक्षात आला. कांही जणांना बाबासाहेबानी पदच्युत केले. हे पदच्युत लोक, पूर्वी समाजात झकपक पोषाख करून रुबाबात मिरवीत होते. तेच आता भुकेकंगाल अवस्थेत दिवस काढू लागले. यावरून लोकांना कळून चुकले की यांचा रुबाब फंडातील पैशांवर होता. परंतु एवढे रामायण घडले तरी बाबासाहेबांच्या पश्चात हेच पदभ्रष्ट झालेले लोक पुनःसमाजाचे पुढारी होऊन बसले व साऱ्या चळवळीचा बोऱ्या वाजविला.

१९५२ च्या निवडणूक निकालाविरुद्ध बाबासाहेबांनी अर्ज केला व ते प्रकरण चालू झाले. या संबंधीची माहिती वर्तमान पत्रातून प्रसिद्ध होऊ लागली ती मी, येथे देतो :–

**" डांगे व देशमुखांच्या प्रचारामुळे निवडणुका दुषित झाल्या' निवडणूक मंडळापुढे डॉ. आंबेडकर आणि अशोक मेहतांचा अर्ज :–**

मुंबई बुधवार– उत्तर मुंबईतील लोकसभेच्या निवडणुकी रद्द कराव्या अशी मागणी डॉ. भीमराव आंबेडकर आणि अशोक मेहता यांनी निवडणुकीत **डॉ. व्ही. बी. गांधी** आणि **नारायण काजरोळकर** निवडून आले आहेत.

## – बेकायदा –

**डॉ. आंबेडकर** आणि **अशोक मेहता** यांनी केलेल्या अर्जात म्हटले आहे की, अनेक मतदान केंद्रावर देण्यात आलेल्या दोन दोन मतपत्रिका पीपल्स रिप्रेझेंटेशन ॲक्टच्या सेक्शन ६३ (१) मध्ये सांगितल्याप्रमाणे देण्यात आल्या नव्हत्या, अशी हजारो उदाहरणे आहेत. त्यामुळे या पत्रिका रद्द झाल्या.

## अयोग्य प्रचार

या निवडणुकीतील **डांगे** आणि **डॉ. देशमुख** यांनी केलेल्या अयोग्य प्रचाराचा वाईट परिणाम होऊन अनेक मते रद्दबातल ठरली. यामुळे निवडणुकच दुषित झाली आहे, म्हणून ती रद्द ठरविण्यात यावी.

## डांगे व देशमुख

**डांगे** आणि **देशमुख** यांनी पत्रके आणि भाषणे यांचेद्वारा उग्र आणि दुष्ट प्रचार बेकायदेशीरपणे करून दोन्ही मते आपल्याला टाकण्यास मतदाराना प्रवृत्त केले. या प्रचारामुळे दोन उमेदवारांना एक एक मत देण्याऐवजी दोन्ही मते एकाच मत-पेटीत टाकण्यास मतदार उद्युक्त झाले.

## खोटी भीती

**डॉ. देशमुखांचा** प्रचार करताना एका मराठी साप्ताहिकाने असे निवेदन प्रसिद्ध केले की, स्पृश्य हिंदूना आपली दोन्ही मते स्पृश्य उमेदवाराला देता येतील

आणि असे मतदान करण्यात काहीही बेकायदेशीर नाही. निवेदनामुळे स्पृश्य हिंदू मतदारात जातीय भावना उत्पन्न झाली. कायद्याप्रमाणे ते विभागून देण्यात आपल्या हिताला धोका आहे अशी भीती त्यांच्या मनात निर्माण झाली.

निवडणुकीनंतर रिटर्निंग अधिकाऱ्याने ७४,३३३ मतपत्रिका रद्द ठरविल्या.

विविधवृत्ताचे मुद्रक, प्रकाशक, तसेच **एस. जी. पाटकर**, युगांतरचे संपादक **एस. व्ही. देशपांडे** आणि **बाबूराव जगताप** यांच्या आज साक्षी झाल्या.

[ नवशक्ती, २–१०–५३ ]

"USE OF AGENTS AT GENERAL ELECTIONS
Dr. Ambedkar's Plea.

"Anything which causes a disturbing effected the minds of voters amounts to undue influence and interference. If a candidate carries on propaganda to frighten voters then he has caused interference and obviously disturbed the minds of voters. If he conceals an important point of law from the electorate he commits a fraud on voters or brings about undue influence on them. And to tell voters to act contrary to the electoral law is corrupt practice.

There were some of the points of law Dr. B. R. Ambedkar submitted to the Election Tribunal, composed of Mr. N. J. Wadia, Chairman, Mr. M. K. Lalkaka, and Mr. G. P. Murdeshwar at the resumed hearing of his petition and that of the Socialist Leader. Mr. Asoka Mehta, complaining of malpractices at the last General Elections from the Bombay City North Constituency, on Friday.

Dr. Ambedkar, who appeared in person, argued at length on the question of agency at elections and touched on propaganda some of the candidates had made through newspapers and pamphlets and went on to prove that those publications had amounted to undue influence with particular reference to Section 123 (2) of the Representation of the People's Act.

UNDUE INTERFERENCE

He pointed out the difference between the English and the Indian law and said that the former particularised un-

due interference while the latter only used the word in a general sense.

He referred to the statements published by and on behalf of Mr. S. A. Dange, the Communist candidate, and Dr. G. V. Deshmukh, the Independent candidate, and said that by asking voters to cast both their votes in favour of one candidate they had caused undue influence on them. One of the four witnesses previously examined had admitted that Mr. Dange knew that the Left United Front which supported his candidature to Parliamentary seat, had issued leaflets, but at no stage had he intervened and asked the Front to stop the issuing of the leaflets, he said.

The petitioner contended that Mr. Dange was responsible for his agents' doings. The *Ugantar*, a Marathi weekly, had in an hesitatant manner admitted that it was an organ of the Communist Party and that the two members of the Front in their evidence had also admitted that they had made propaganda to support the candidature of Mr. Dange. On the basis of this submission, he said, there could be no doubt that they were Mr. Dange's agents.

Dr. Ambedkar tried to trace the relationship between *Vivid Vritta,* a Sunday Marathi weekly, and Dr. Deshpande (Deshmukh), and said that the statement the respondent had published in the paper was not to enlighten voters. In fact, it was given to that particular newspaper and to no other and this, in his contention, proved that there was a link between the paper and the respondent.

....At this stage, Dr. Deshmhkh stood up and requested the tribunal that Dr. Ambedkar might be asked to address him question. "I am not asking you any questions. In fact, you have raised them and I am only trying to answer them, was Dr. Ambedkar's report which caused laughter in the court room.

Earlier Mr. K. V. Chitre, Registrar of Siddharth College and an agent of Dr. Ambedkar gave evidence.

The hearing will be continued on Manday."

(The Times of India, 4-10-1952)

## "PROPAGANDA FOR WASTAGE OF VOTES IS ILLEGAL."

*Dr. Ambedkar's Plea In Election Dispute*

It was a gross perversion of law to arouse communal feelings among the electorate by frightening it that it would go unrepresented if it distributed votes, declared Dr. B. R. Ambedkar, arguing his petition before the Election Tribunal, composed of Mr. N. J. Wadia, Chairman, Mr. M. D. Lalkaka and Mr. G. P. Murdeshwar, at the Small Causes Court Bombay, on Monday.

He was referring to the communal propaganda that had been carried on in the Bombay City North Constituency by Dr. G. V. Deshmukh, who, he said, was the leader of the Independent Candidates' Group, comprising 17 candidates.

"I cannot find worse propaganda than this," said Dr. Ambedkar, and added "Because of the realisation of the psychology of Caste Hindus, who did not want Untouchables to occupy important posts in the legislature, a special provision was made for Scheduled Cast in the Montague — Chelmsford Reforms. There is a similar provision in the Representation of the People Act also."

....The petitioner contended that Dr. Deshmukh has conceded the provisions of Section 54 of the Act from the electorate while the Communist candidate, Mr. S. A. Dange, by preaching the mullification of Section 63, had set the law at naught. He charged both the respondents with adopting corrupt practices and unduly influencing the voters.

### DISPOSAL OF VOTES

Dr. Ambedkar submitted that the disposal of one of the two votes was not left to the wishes of voters or, for that matter, of candidates. The disposal of the second vote was regulated by Section 79 (d) which, he said, gave the electorate the option to vote or not to vote as voting was not compulsory in India. He raised the following points (1) A voter was free to exercise his electoral rights; (2) He could

go to the polling booth and receive both his ballot papers and distribute them; (3) He could use one of them and return the other to the Presiding Officer; (4) To use one ballot paper and destroy the other was illegal and an offence, according to Section 136 (e) (f); (5) To cast one ballot paper in the ballot box and take the other with him would be illegal, according to Section 135, and (6) To insert both the ballot papers in one box was also illegal, according to Rule 25 (1), and a violation of the Act.

He stoted that Section 100 clearly stated that "an election shall be set aside on the ground of corrupt practices extensively prevailing," and asked if the Tribunal did not consider the 74,333 votes wasted as the result of the perverse propaganda to be a large figure. "I lost my seat by 13,000 votes. I am not very presumptuous, but out of tre 39,000 votes wasted by Mr. Dange, I would certainly have got a large number had it not been for the crucial propaganda of his and that of Dr. Deshmukh," he said.

### "CHAPTER OF MISALLIANCE"

Mr. A. S. R. Chari, counsel for Mr. Dange, described the petitions of Dr. Ambedkar and Socialist leader, Mr. Ashoka Mehta, as the closing chapter of misalliance between ihe Socialists and the Scheduled Castes Federation. He said the petitioners' own witness Mr. Bapurao Jagtap, had told the Tribunal that the Left United Front had requested the petitioners "with folded hands" to join the Left United Front, a request they had refused only because they overestimated their strength.

Mr. Chari said that there was no legal obligation on a voter to us both his votes as he could either vote or refrain from voting for a candidate in accordance with the clauses of Section 63 of the Act. His arguments were: That the persuasion to vote only one candidate, or not to vote for any one candidate, did not constitute interference with the free exercise of the will of the voters according to the definition of "undue

influence". That any of the acts of Mr. Dange or any other candidate, did not come within the definition of "corrupt practice" as set out in the Representation of the People's Act; That what Mr. Dange had done was only to persuade the voter and he had a right to do so; That the petitioners had filed their petitions only to provide a plausible excuse for their defeat before their supporters; and that the defeat of the petitioners in the last election was due to ttheir arrogant refusal to join hands with the Left United Front which wanted to fight the Congress and the communal elements.

UNDUE INFLUENCE

Mr. T. R. Kapadia, counsel for V.B. Gandhi corroborating Mr. Chari's argument, said that the petitions had failed to prove who had exerted undue influence on voters. He asked whether the respondents alone were guilty of that charge or whether the petitioners were also equally guilty of it.

Dr. Deshmukh, after obtaining consent from the Tribunal that he might be allowed to address it in placc of his advocate, said that all parties were responsible for corrupt practices at the last elections. He admitted that the editor of "Vivid Vrith", a Marathi weekly, was not only his agentt but also his intimate friend.

Hearing will be continued on Wednesday.

The respondents are Mr. S.A. Dange, Dr. G.V. Deshmukh, Dr. V.B. Gandhi, Mr. K.B. Joshi, Mr. N.S. Kajrolkar and Mr. N.B. Parulkar.

Mr. S.S. Kavalekar and Mr. Madhusudhan Vyas, instructed by Kothare and Company, appeared for Mr. Ashoka Mehta; Mr. A.S.R. Chari and Mr T.S. Hegde for Mr. Dange; Mr. Pandit for Dr. G. V. Deshmukh and Mr. T. R. Kapadia for Dr. Gandhi and Mr. Kajrolkar."

(The Times of India, 7-10-1952).

" डांग्यांच्या "मत कुजवा" प्रचाराने कायद्याचा भंग झाला आहे"
आंबेडकरांचे डांगे देशमुख यांचेवर आरोप

मुंबई सोमवार – **भाई डांगे** यांच्या " एक मत कुजवा " या प्रचाराने लोकप्रतिनिधीत्वाच्या कायद्याचा भंग झाला असल्याचे **डॉ. आंबेडकर** यांनी आज निवडणूक चौकशी मंडळाच्या निदर्शनास आणले.

**डॉ. आंबेडकर** म्हणाले, मला १३ हजार व **अशोक मेहता** यांनी १० हजार मते विजयासाठी पाहिजे होती. **श्री. डांगे** यांच्या पेट्यातून ३९ हजार मते बाद ठरली. यापैकी काही मते जरी आम्हाला मिळाली असती तरी आम्ही दोघे खात्रीने निवडून आलो असतो.

## गैरवाजवी उपयोग

**श्री. डांगे** यांनी जनतेवर असलेल्या आपल्या वजनाचा गैरवाजवी उपयोग करून लोकांना लोकप्रतिनिधीत्वाच्या कायद्याच्या ६३ व्या कलमाविरुद्ध वागण्यास लावले.

## देशमुखांवर आरोप

**आंबेडकर** पुढे म्हणाले, **श्री. देशमुख** यांनी शे. का. फे. समाजवादी युती हे एक जाळे असून मतदारांनी या जाळ्यापासून दूर रहावे असा प्रचार केला आणि आपणाला मते दिली नाहीत तर दोन्ही जागा अस्पृश्यांना मिळतील असा मतदारांना धाक दाखविला. शेड्युल्ड कास्टसाठी जर राखीव जागा नसती तर एकही शे. का. उमेदवार निवडून आला नसता. बहुतेक संपूर्ण हिंदु मतदाराना शे. का. उमेदवाराना मत देण्याची मनापासून इच्छा नसते. **डॉ. देशमुख** यांनी सवर्ण हिंदूच्या या वृत्तीचा फायदा घेतला.

दुसऱ्या मताचा योग्य तऱ्हेने उपयोग न करणे हा कायद्याचा भंग आहे. एकंदर ७४,३३३ मते फुकट गेली. **डांगे** आणि **देशमुख** यांच्या प्रचारामुळे ही मते निकामी ठरली.

बाद मताचे शेकडा प्रमाण **आंबेडकर** २११, **अशोक मेहता** ४, आणि **डांगे** ४०.४८ असे आहे.

## डांगे यांचेतर्फे समर्थन

**श्री. डांगे** यांची बाजू **श्री. चारी** यांनी मांडली. ते म्हणाले मतदारांचे मन वळविणे याचा अर्थ आपल्या वजनाचा दुरुपयोग केला असा होत नाही. मतदारांला मत न देता बाहेर पडण्याचा अधिकार आहे. तसेच त्याने मते विभागलीच पाहिजेत असेहि त्याच्यावर कोणते कायदेशीर बंधन नाही. मतदाराला एक मत देखील देण्याचा अधिकार असेल तर तसा उमेदवाराने प्रचार केला तर त्यांत चुकले कुठे ?

## इंग्लंडचे दाखले

**श्री. चारी** यांचेनंतर **श्री. जी. व्ही. देशमुख** यांनी इंग्लंड मधील निवडणुकी संबंधीच्या खटल्यातील निकालांचे दाखले देऊन आपल्या वजनाचा दुरुपयोग, या आरोपाचे खंडन केले यावेळी चौकशीचे काम स्थगित झाले.

## कोर्टात तुफान गर्दी

**श्री. आंबेडकर** यांच्या अनुयांनी, कोर्ट आज तुडुंब भरुन गेले होते. कित्येकांना **श्री. आंबेडकरांचे** निवेदन व्हरांड्यांत उभे राहून ऐकावे लागले.

(नवशक्ति ७–१०–५२).

### स मा प्त

# चरित्र लेखकाचा अल्पपरिचय

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्रकार श्री. चां. भ. तथा आबासाहेब खैरमोडे यांचा जन्म पाचवड, ता. खटाव, जि. सातारा, येथे १५ जुलै १९०४ मध्ये झाला. १९१९ मध्ये बी.ए. झाले. एम्.ए., एलएल्.बी. च्या टर्म्स भरल्या परंतु सेक्रेटरीएटमध्ये नोकरी मिळाल्याने परीक्षेस बसले नाहीत. त्यांचे सामाजिक चळवळीवरील लेख व कविता १९२३ ते १९६४ या काळात अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या. १९२९ साली त्यांचे 'अमृतनाक' हे खंडकाव्य प्रसिद्ध झाले. युनिव्हर्सिटी ऑफ वुस्कानसन (अमेरिका) येथील रॉबर्ट मिलर यांचा 'Button Button, Great Tradition Little Tradition Whose Tradition?" या शिर्षकाखाली ॲन्थ्रापॉलॉजिकल क्वारर्ली व्हॉ. नं. ३० जानेवारी १९६६ ला लेख प्रसिद्ध झालेला आहे. त्यांत 'अमृतनाक' बद्दल, गौरवपर उद्गार काढले आहेत.



बाबासाहेबांच्या 'शूद्र पूर्वी कोण होते,' हिंदु स्त्रियांची उन्नती व अवनती यांचे अनुवाद श्री. खैरमोडे यांनी केले ते प्रसिद्ध झाले. श्री. आबासाहेब खैरमोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात आल्यापासून त्यांचे चरित्र लिहिण्याच्या दृष्टीने प्रचंड सामुग्री जमा करून चरित्राचे अठरा खंड प्रसिद्ध करण्याचा संकल्प केलेला होता. १९५२ ते १९६८ पर्यंत ५ खंड प्रसिद्ध झाले. ६ वा खंड छापत असतानाच म्हणजे १८ नोव्हेंबर १९७१ ला त्यांचा मृत्यु झाला.

१९८३ पासून पुढील खंडांचे काम म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळाने हाती घेऊन ६, ७, ८ व ९ हे खंड प्रसिद्ध झाले हा १० वा खंड आता प्रसिद्ध होत आहे. ११ वा खंड मंडळाने हाती घेतला आहे.

पूर्वी प्रसिद्ध झालेल्या चरित्र खंडावरील कांही अभिप्राय खंड १ (द्वितीय आवृत्ती) व खंड ५ यांत दिलेले आहेत. यावरून श्री. खैरमोडे यांच्या कर्तृत्वाची, अचूक व साधार लिहिण्याच्या प्रवृत्तीची साक्ष पटते.